# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY
OU_192760
UNIVERSAL
LIBRARY

॥ श्रीराम ॥

गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ।

## महाराष्ट्र-कुटुंब-माला



पुष्प ३२ वें

# मु का मा र

— लेखक —


## नारायण विनायक कुलकर्णी



आवृत्ति पहिली

नोव्हेंबर १९४०

पुष्प ३२ ब

# मुका मार

संपादक व लेखक

नारायण विनायक कुलकर्णी

प्रकाशक

विठ्ठल रामचंद्र खाडिलकर

मुद्रक

लक्ष्मण भाऊराव कोकाटे

३०० सदाशिव पेठ, हनुमान प्रिंटिंग प्रेस, पुणें २

चित्रकार

आर्ट ब्यूरो – कोल्हापूर

ब्लॉकमेकर

कला प्रोसेस – पुणें २.

प्रमुख एजंट

मेसर्स–परचुरे पुराणिक आणि मंडळी, मुंबई.

प्रमुख प्रचारक

वि. बा. मोडक, कोल्हापूर–शाहुपुरी.

प्रकाशन–स्थळ

महाराष्ट्र–कुटुंब–माला, कचेरी.

३९२ नारायण पेठ, पुणें २.

विक्रीचें मुख्य ठिकाण

[illegible] चौक, पुणें २.

# संकल्प आणि सिद्धि

'मुका मार' ही आजची कादंबरी आमच्या ग्राहकांच्या स्वाधीन करून केलेल्या संकल्पाची अंशतः कां होईना पण कार्याच्या थोड्याशा प्रमाणांत आम्हीं सिद्धि मिळवीत आहोंत, याबद्दल अशाही स्थितींत धन्यता वाटते. तीन वर्षांची किंचित् सवलतीची पण अगाऊ वर्गणी ग्राहकांकडून आम्ही घेतली. कांहींनीं पांच वर्षांच्या करारानें दहा रुपयांसारखी अल्पस्वल्प कर्जाऊ मदत दिली; कांहीं महाभागांनीं थोड्या मोठ्या रकमा बिनव्याजी व बेमुदतीच्या अलिखित सम्मतीनेच देऊन साह्य केलें, म्हणूनच आज अंशतः तरी तीन वर्षांतील बारा पुष्पें, ग्राहकांच्या-वाचकांच्या स्वाधीन करून संकल्पाप्रमाणें थोडीशी सिद्धि मिळूं शकली. थोरमोठे पुष्कळ संकल्प आम्हीं मोठ्या उमेदीनें केले; जनतेपुढें मांडले. जनतेनें आमच्या शब्दावर विश्वास ठेवून संकल्प सिद्धीस जाण्यास यावच्छक्य मदतीचा हात पुढें केला; परंतु सर्वच मनोरथ आमचे पूर्ण होऊं शकले नाहींत. बारा पुष्पें काढतां आलीं हा एकच संकल्प सिद्धीला गेला; हेंही कांहीं थोडें नाहीं झालें; पण तेवढ्याने आमचें समाधान पूर्णपणें कसें होणार ?

ग्राहकांचा विश्वास व संतोष संपादन केला खरा; परंतु ज्यांनीं केवळ कर्जाऊ सहाय्य दिलें; त्याची परत फेड कशी करावी, हा बिकट प्रश्न शिल्लक उरलाच! आरंभीच्या आशादायक उमेदीप्रमाणें, प्रत्यक्ष पदरांत भरपूर मनाजोगती रक्कम कधीच न पडल्यामुळें, मनाप्रमाणें पुस्तकांच्या बाह्यांगांत कोणत्याच सुधारणा कधींच करतां आल्या नाहींत; ही तळमळ कायमची राहिली आणि कर्जाऊ सहाय्याची परतफेडीची सिद्धि साधण्यास परिस्थिति प्रतिकूल राहिली त्याची जाचक टोंचणी आहे ती आहेच !

कर्जफेडीची चिंता आम्हीं अहर्निश वहात आहोंत. मार्ग शोधीत आहोंत. प्रयत्न, खटपट, धडपड चालूं आहे. यश कोठून कसें, केव्हां मिळेल हें आज घडीला कांहींच सांगता येत नाहीं. अनेक ग्राहकांनीं वचनें दिलीं, त्यांच्याकडे पुस्तकें गेलीं. परंतु त्याच्यांकडून अजून सवलतीची वर्गणीही मिळूं शकली

नाहीं. त्यामुळें आर्थिक संकटाशीं झगडावें लागलें, अजून झगडावें लागतें आहे आणि आणखी किती दिवस असेंच चालणार, याचा अंदाज लागत नाहीं. तरीही कार्य चालूं ठेवलें आहे व तें तसेंच सतत चालूं ठेवण्याचा आमचा निर्धार कायम आहे.

आणि असा निर्धार तरी कां करावासा वाटतो? तर आशेवर जीव जगविणाऱ्या मालेला या घडीपर्यंत आहूत वा अनाहूत अशें कांहीं महनीयां-कडून सहानुभूतीच्या आशिर्वादपर शब्दांनीं व बोलांनीं उत्तेजन मिळत आहे म्हणूनच !

औंध संस्थानचे **राजे श्रीमंत बाळासाहेब महाराज पंतप्रतिनिधि यांनीं श्री. नारायणराव कुलकर्णी** यांना अनाहूत पाचारण करून, आपल्या-कडील महोत्सवांत, ललितवाङ्मयावरील आपले विचार प्रकट करावयास संधि दिली. त्यांचे ते विचार ऐकून, त्या विचाराप्रमाणेंच 'माले' चें कार्य चालूं ठेवल्याबद्दल परम संतोष व्यक्त करून 'माले' च्या कार्याला शाब्दिकच कां होईना, परंतु हार्दिक आशिर्वाद देऊन मालेचें कार्य नेटाने सतत चालूं ठेवण्यास श्रीमंत महाराजांनीं प्रेमानें प्रोत्साहित केलें.

आणि म्हणूनच, बुडत्याला काडीचा आधार मिळाला तरी तो जसा सुखरूपपणें परतीर गांठण्याचा आटोकाट निर्धार करतो; त्याच प्रकारचा निर्धार खरोखरच आमचा आहे !

त्याहीपेक्षां विशेष म्हणजे वर्षोतून एकाददुसरा अगदीं सामान्यांतला सामान्य गरीब रसिक अनाहूतपणें पत्र पाठवून ग्राहक होत असतो; हें पाहून आमचा निर्धार अधिक बळकट होत असतो !

**गजेंद्रमोक्ष** — भाग १ व २ या मालेंतून प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक कादंबरीवर **ज्ञानप्रकाश, मन्वन्तर, सत्यकथा, नवाकाळ, विविधवृत्त, सकाळ, धनुर्धारी,** इत्यादि वर्तमानपत्रें व नियतकालिकांनीं चिकित्सक व विवेचक अभिप्राय देऊन 'माले' च्या कार्याकडे आपलें योग्य तें लक्ष आहे हें दाखवून दिलें. तसेंच कांहीं महनीय अशा विद्वान् पंडितांनीं खाजगी रीतीनें तारेनें व पत्रद्वारें सदर ऐतिहासिक कादंबरीबद्दल आपलें अनुकूल मत कळवून मालेला उपकृत केलें.

अभिप्राय देऊन ‘ माले ’ ला धन्यवाद देणाऱ्या सर्वांच्याच उपकार-ऋणांत ‘ माला ’ आहे.

‘ माले ’ चें ९ वें वर्ष पुढील पुस्तकापासून सुरू होत आहे. ३३ वें पुष्प श्री. ना. वि. कुलकर्णी यांचें “ ग्रहणापूर्वी सुटका—भाग ३ रा, जग कुठें आहे ? ” हें अन्यत्र जाहीर केलेंच आहे. ह्या पुढील तीनहि पुष्पें वाचकांना रिझवतील, रंजवतील व उद्बोधनहि करतील अशीच आहेत.

थोरामोठ्यांचे शाब्दिक पण हार्दिक आशिर्वाद आणि गरीबांच्याकडून अल्पस्वल्प पण सक्रीय आर्थिक मदत, हीं पदरीं बांधून पुढील वाट चालण्याची शक्ति ईश्वर देत आहे, ही त्याची कृपाच समजली पाहिजे.

आज ना उद्यां केव्हांतरी कोणाकडून तरी पैशाचा पाठिंबा ‘माले’ ला मिळेलच मिळेल हा भरंवसा धरून आहोंत ! तो क्षण येईल त्यावेळीं संकल्पाप्रमाणे संपूर्ण सिद्धिही प्राप्त झाल्यावांचून राहणार नाहीं. संकल्प आणि सिद्धि यांच्यामध्यें जी ईश्वरी इच्छा उभी असते, तिची अनुकूलता प्राप्त होण्यासाठीं, तिनें अनुकूल कौल देण्यासाठीं मनोभावानें ईश्वराची आराधना स्वकर्तव्य करण्यानेंच होणार आहे.

सर्व लहानथोरांनीं, श्रीमंतगरीबांनीं, आजपर्यंत जसा मालेवर निस्सीम लोभ ठेवला आहे तोच पुढें कायम राखून वाढवावा, अशी नम्र विनंति आहे. परोपरीनें उपयोगी पडणाऱ्या, ‘ माले ’ ची काळजी बाळगून तिच्यावर प्रेम करणाऱ्या आणि ती वैभवशाली व्हावी अशी कळकळ बाळगणाऱ्या सर्वांचीच माला अत्यंत ऋणी आहे.

गुरुवार, ता. २१ । ११ । ४० इ.
३९२, नारायण पुणें २.

सर्वांचा नम्र
**वि. रा. खाडिलकर**
प्रकाशक—म. कु. माला

# ना. वि. कुलकर्णी यांची ग्रंथ–संपत्ति

## कादंबऱ्या

| | | | |
|---|---|---|---|
| मजूर | ( १९२५–३० ) | माळावरची माती | ( १९२८ ) |
| कसे दिवस जातील ? | ( १९२५ ) | माणिक | ( १९३१–१९३९ ) |
| शिपाई | ( १९२५ ) | नयनबाण | ( १९३६ ) |
| न्याय ? | ( १९२६ ) | ती कोणाची ? | ( १९३६ ) |
| पैसा | ( १९२६ ) | ग्रहणापूर्वी सुटका-भाग १ ला | ( १९३८ ) |
| क्षमा | ( १९२७ ) | ग्रहणापूर्वी सुटका–भाग २ रा–प्रसाद | ( १९३९ ) |
| मातृसेवा | ( १९२८ ) | | |
| कर्ता वडील | ( १९३० ) | मुक्का मार | ( १९४० ) |

## नाटकें

— प्रकाशित —

संगीत पार्थप्रतिज्ञा ( १९१७ )
गद्य माईसाहेब ( १९२१–२९ )
गद्य डाव जिंकला ( १९२१ )
संगीत कान्होपात्रा ( १९२१ )
,, क्षमेची क्षमा ( नाटिका ) ( १९२३ )
,, तिकडची शोभा ( नाटिका ) ( १९३३ )
,, मंगल भुवन ( १९३४ )

— अप्रकाशित —

उदयकाल
महत्वाकांक्षी राक्षस
भले दिवाणजी
तीन तासांत
माता ( नाटिका )
कन्यादान
मधुचंद्र
अडला नारायण
ग्रामोद्धारक
चिरंजीव
मानला तर देव ( नाटिका )
साधु तुकाराम
नवीन कल्पना ( विनोदी )

## माझ्या गोष्टी

माझ्या गोष्टी–भाग १ ला ( १९३५ )
निर्माल्य–भाग २ रा ( १९३७ )
ग्रामोद्धार–भाग ३ रा
पंचप्रसंग–भाग ४ था

# मु का मा र

विश्वास पत्र लिहिण्यांत इतका रंगून गेला होता कीं, त्याच्या पाठीमागें त्याची प्रेमळ पत्नी—वर्षा केव्हांची येऊन उभी राहिली होती, तरी त्याला तिची यत्किंचितहि दाद नव्हती! विश्वासचें लेखन आतां संपेल, मग संपेल, तो मागें वळून आपल्याकडे पाहील, 'केव्हां आलीस?' म्हणून हंसत आपल्याला विचारील, चहा करायला सांगेल, अशी, वर्षाची कल्पना होती. खुदकन् हंसून, खोकून, शिंकरून, पाय वाजवून किंवा आपल्या कोमल—प्रेमळ नाजूक हाताचा विश्वासच्या खांद्याला स्पर्श करून आपल्या आगमनाची जाणीव करून द्यायला वर्षाला हरकत नव्हती. पण तसें तिनें आतांपर्यंत मुद्दामच केलें नव्हतें.

आपण होऊन विश्वास मागें वळून आपल्याकडे पाहील अशी तिची अपेक्षा होती. त्यानें पहावें अशी तिची इच्छा होती.

दहा मिनिटें झालीं. पंधरा मिनिटें संपलीं. अर्धा घंटा होऊन गेला. वर्षा उभी राहून राहून कंटाळली, दमली. तिची उत्सुकता, आनंद, आशा हळूं हळूं मावळूं लागून ती अगदीं रडायच्या बेताला आली होती. तरी अजून विश्वासचें लेखन चालूंच होते. चारसहा कार्डें लिहून फेकलीं गेलीं, पाकिटेंही दोनतीन झालीं. आतांही तो एक पाकीटच लिहित होता. टांचा उचलून नी मान उंचावून वर्षानें हळूंच विश्वास काय लिहित आहे, कोणाला लिहित आहे, हे पाहिलें. श्रीकार काढून नी मुक्काम, दिनांक वगैरे लिहून विश्वासनें नवे पत्र लिहावयास नुकताच प्रारंभ केला होता. हे पत्र लिहावयास बराच वेळ लागणार हें समजायला वर्षाला कठीण नव्हते.

विश्वासला चहाची लहर केव्हा लागेल व धसमुसळेपणा करीत आंत येऊन तो आपल्या मागे घाईगर्दी करायला लागेल नेहमींसारखा, त्याचा नेम नाहीं, म्हणून वर्षानें स्टोव्ह पेटवून चहाला अगोदर आधण ठेवून, मगच ती विश्वासच्या बैठकाच्या जागेत आली होती. आधण आंत उकळून चाललें असेल कदाचित् पाणी आटूनही गेले असेल तिकडे आणि वर्षा इथें उभी. विश्वास आपल्याच नादांत गुंग !

वर्षाला आधणाची आठवण झाली, तशी ती चोरपावलानी परत गेली. पुन्हां जेव्हां ती परत आली, तेव्हां विश्वासचे पत्र लिहून झालें होतें. पाकिटा-वरील संपूर्ण पत्ता लिहून झाला होता. घडी करून पाकिटांत घालण्यापूर्वी पुन्हां एकदां तो ते पत्र वाचीत होता.

पत्र असे होतें—

॥ श्री ॥ मु॥ × × ×

दिनांक २० आक्टोबर १९४० इ.

तीर्थस्वरूप रा. रा. विष्णू दामोदर देशपांडे—

मामासाहेब, यांचे सेवेसी,

कृ. शि' सा. न. विज्ञापना विशेषः—

आपणांकडून आलों त्याला एक महिना होऊन गेला. कार्यबाहुल्या-मुळें येथें आल्यानंतर पोंहचल्याचें पत्रही पाठवतां आलें नाहीं, याबद्दल क्षमा करावी. क्षमा कराल असा भरंवसाही आहेच !

आपल्या येथें असतांना आपल्या व ती. सौ. मामींच्या प्रेमळ सहवासात जो अत्यानंदाचा काळ गेला, त्याचें विस्मरण मला कालत्रयींहि होणे शक्य नाहीं. आपल्या येथील कोणत्या कोणत्या आनंददायक गोष्टींचें किती किती वर्णन करूं? येथें आल्यापासून प्रिय सौभाग्यवती वर्षाजवळ तिकडच्या पाहिलेल्या नी अनुभवलेल्या कोणत्याही लहानसान गमतीची उजळणी दिवसांतून चारदोन वेळां तरी होत नाहीं, असे होतच नाही. ज्या त्या वेळीं व प्रसगी सौ. वर्षाला– ती कांहीं चुकली म्हणजे- ती. सौ. मामीचा दाखला देण्यांत मला जितकी मौज तितकाच अभिमान वाटत असतो. वर्षाला म्हणतों अशा वेळीं मामींनीं असे असे निश्चित केलें असते. याकरितां एकदां मामींच्या प्रेमळ शिक्षेखाली वर्षाला काहीं दिवस तरी ठेवलेच पाहिजे, असे वारवार मनांत येते. तो योग केव्हां येईल हे पहावें.

व्यवहारात वागतांना माझ्या हातून कांही गफलत झाली म्हणजे मनाचा मोठा गोंधळ उडतो आणि नेमकी त्याच वेळीं आपली आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. अशा पेचप्रसंगांतून मामा कसे निसटले असते? ते जवळ असते तर त्यांनी आपल्याला कसा मार्ग दाखविला असता? असा प्रश्न उभा राहून आपल्या सान्निध्याची गरज वाटू लागते; पण ते जमणार कसें आणि केव्हां? आपल्याकडे, मी पुष्कळ पाहिले, ऐकलें, अनेक चांगल्या गोष्टींचे धडे घेतले, शिकलो, यांत शंकाच नाही.

. गरिबींत आनंद कसा मानावा? स्वकार्यरत कसें राहावें? आपण आनंदीत राहून आपल्या घरांतल्या लहानथोरांना आनंदात कसें वागवावें–ठेवावे, हे सर्व–सर्व मीच काय, पण कोणीही बहकल्या बुद्धीच्या माणसानें आपल्या पायाजवळ बसूनच धडे गिरवावे असे माझें ठाम मत आहे.

चि. कु. प्रेमाची प्रकृति कशी आहे? अलिकडे तिचें कांहीं पत्र आलें होतें काय? प्रकृति ठीक नसेल तर तिला परत घरीं बोलवावें. शक्य तर कांहीं दिवस इकडे पाठवावें. आमच्याकडील हवा कोरडी,

पाणी उत्तम. यामुळे तिला खात्रीनें आमच्याकडे लवकर बरें वाटूं लागेल. तिचीच तेथें तेवढी भेट झाली नाहीं. मामी ज्या ज्या वेळीं आपल्या लाडक्या प्रेमाचें गुणगान करीत, त्या त्या त्यावेळीं तिला पाहण्याची व तिच्याशीं बोलण्याची उत्कंठा मला अनावर होई. माझ्या तेथील राहण्यांतील आनंदांत तेवढेंच एक मोठें वैगुण्य उरलें. आपली ना नसेल तर तिच्या कॉलेजच्या पत्त्यावर स्वतंत्र पत्र पाठवून इकडे कांहीं दिवस तरी राहावयाला येण्याबद्दल तिला बोलवावें म्हणतों. आपणही तिला एक तसेंच पत्र पाठवावें. अभ्यास काय, आजचा उद्यां होईल. पण प्रकृति एकदां खूप ढासळली म्हणजे ती पूर्ववत् व्हावयाला किती त्रास होईल हें कोणी सांगावें ? हें मी आपल्याला सुचवावें असें नाहीं.

चि. पुरुषोत्तमचा अभ्यास ठीक चालला असेलच. त्याला एकट्याला पोहावयाला पाठवीत जाऊं नये. भारी हूड आणि अवखळ आहे तो. केव्हां आणि कसा आपल्यावर प्रसंग ओढवून घेईल याचा नेम नाहीं. त्याच्या हूडपणाची मला जितकी गंमत वाटते तितकीच भीतिही वाटते. बाकी, असलीं हूड नी अवखळ मुलेंच पुढें आपल्या आई-वडिलांचे, समाजाचें नी देशाचें आपल्या कर्तबगारीनें पांग फेडीत असतात म्हणा !

आतां आमची चिमुरडी-मंदाकिनी ! तिनें तर आपल्या गोड गोड बाललीलांनीं मला वेडच लावलें आहे. एकसारखी ' नाना-नाना ' म्हणून खिदळायची काय, आंगावर लोळायची काय ? वाचायला लागलों तर मुद्दाम मांडीवर येऊन बसून, खोड्या करायची काय ! तिचें हंसणें, धांवणें, पळणें, पडणें, रडणें, रुसणें, आणि झोपेंतून उठल्यापासून पुन्हां झोपेपर्यंत सारखें सतावून सोडणें, यांमुळें मला तिला सोडून निघतांना अगदीं जीवावर आलें होतें. गच्चींत उभी राहून माझ्यासारखा लठ्ठसा माणूस दिसला कीं, "नाना-नाना" अशा हांका मंदाकिनी अजूनही मारीत असेल नाहीं ! — येथें वाटेनें चाललों असतां कोणीं मुलांनीं-कोणालाही " नाना " अशी हांक मारलेली ऐकायला आली म्हणजे मी दचकून वळून पाहातों.

मंदाकिनी इथें कुठें कशी आली आहे, ती मला हांका मारते आहे ! असा मला सारखा भास होतो ! असो.

ती. सौ. मामीना सादर सा. न. चि. पुरुषोत्तम व चि. मंदाकिनीला अनेकोत्तम आशिर्वाद.

पत्र पाठवून वारंवार समाचार कळवीत जाणे. आतां आपणच मला वडिलांच्या ठिकाणीं आहांत. चि. कु. प्रेमास पत्र पाठवून इकडे येण्याबद्दल लिहिण्यास हयगय करूं नये. तसदीबद्दल क्षमा असावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

आपला नम्र,
आवडता भाचा
**विश्वास गुळवणी**

पुनश्च—

हो, एक लिहावयाचें राहून गेलें. ती. सौ. मामींनी येत्या दिवाळींत माझ्याकडे येण्याचे कबूल केलें आहे. त्याची आठवण देऊन ठेवतों. आपण सर्वांनीं दिपवाळीला येथें आलेच पाहिजे. सबब सांगून भागावयाचे नाहीं. सौ. वर्षाचीही फार फार इच्छा आहे. आपली भाचेसून कशी आहे, कशी वागते, हे ती. सौ. मामींना इथेच खरे पहावयाला मिळेल. तिला अनुभवाच्या शब्दांनीं सांगतां शिकवतांही येईल. केवढा फायदा होईल वर्षाला मामींचा !

— **विश्वास**

लिहिलेलें पत्र जास्तकमी करण्यासाठीं समोर धरून आणि हातांत टांक धरून विश्वास वाचीत होता. त्याच वेळीं त्याच्या मागें उभ्या असलेल्या वर्षाचे दोन डोळे त्या पत्रांतील ओळीवरून फिरत होते.

कागदाची घडी झाली. पाकिटांत गेली. पाकिट बंद केलें गेलें. टेबलावरील बाकीच्या पत्रांची जुळणी झाली. तिकिटें डकविलीं गेलीं. तीं सर्व पत्रें पोस्टांत [illegible] विश्वासनें नोकराला " गोट्या ! -- " अशी हांक मारीत मान वळविली. तेव्हां, " गोटया घरीं नाहीं. मी आहे इथं !-- " वर्षा म्हणाली. वर्षेकडे विश्वासचें आतां लक्ष गेलें.

साश्चर्य आनंदानें वर्षाकडे पहात विश्वास हंसला ! वर्षाच्या तेजस्वी नेत्रांत दिव्य अश्रू चमकत होते !

तरुण सुंदर ललना अश्रूंनीं डबडबलेल्या डोळ्यांनी अधिकच खुलून दिसतात. वर्षा तरुण होती. सुंदर होती. आणि या वेळीं तिच्या डोळ्यांत अश्रूंनीं गर्दीही केली होती. त्यामुळें ती विश्वासला आणखी किती तरी सुंदर दिसत होती.

तो तिच्याकडे टक लावून नुसता पहातच राहिला, तिच्याशीं बोलण्याचें त्याला किती वेळ तरी भानच राहिलें नाहीं. त्याला हा अनुभव – असल्या विलक्षण आनंदाच्या क्षणाचा अनुभव – नवा नव्हता ! वर्षाच्या प्रेमळ स्वभावानें आणि तिच्याशीं त्याच्या गोड वागण्यानें त्याला तो नेहमींचा होता !

" तूं रडूं लागलीस म्हणजे मला अधिकच आवडतेस ! " असें विश्वासनें वर्षाला नेहमीं म्हणावें. त्याने तसें म्हटलें म्हणजे वर्षालाही आनंद होई ! आनंदानें सुद्धां ती, त्याच्या वक्षस्थळावर आपली मान टाकून अधिक रडूं लागे.

आपल्या प्रियकराला आपलें रडणेंही आवडतें, याची जाणीव कोणा सुंदर ललनेला अभिमान वाटावयाला लावणार नाहीं ?

" दिपवाळीला आपल्याकडे येण्याबद्दल मी मामींना पत्र लिहिले आहे " विश्वासनें वर्षाला सांगितलें.

" वाचलें तें मी ! " वर्षा पुटपुटली.

" वाचलेंस ? ठीक ! " विश्वास हंसत म्हणाला, " पत्र वाचून रडूं आलं का तुला ? "

" तें कां म्हणून ? " वर्षानें उलट प्रश्न केला, " असें का वाटलें इकडे ? "

" पत्राप्रमाणं मामा-मामी आपल्या चिल्ल्यापिल्ल्यासुद्धां दिपवाळीला आली तर तुला त्या सर्वांचे कष्ट करावे लागतील म्हणून !— " विश्वासनें खवचटपणानें म्हटलें. वर्षा तें ऐकून किंचित् रागावली. मान वेळावीत ती विश्वासकडे रोखून पहात म्हणाली, " मी इतकी माणूसघाणी आहे वाटतं ? मीच तर त्या मंडळींना दिपवाळीला बोलवायला पत्र पाठवा म्हणून सांगत होतें. असं असून उलट मलाच म्हणायचं— " पुढचे शब्द वर्षाच्या तोंडांतच राहिले. आपल्याबद्दल विपरीत कल्पना करून घेतल्या बद्दल तिला वाईट वाटलें. पुन्हा तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. कंठ दाटून आला !

" माणूसघाणी मला कां म्हटलंत ? " हुंदके देत – पदरानें डोळे पुशीत वर्षानें विश्वासला विचारलें.

" तसं नव्हे ग ! तूं रडायला लागलीस म्हणजे तूं मला किती चांगली दिसतेस— म्हणून मी म्हटले तूं रडलीस. डोळ्यांत तजेलदार मोतीं, गाला-वर लालबुंद गुलाब पाहिल. बरं वाटलं मला ! — " विश्वासनें तिला जवळ ओढीत म्हटलें. प्रेमळ हाताचा स्पर्श होतांच, ती गालांतल्या गालांत हंसली ओठांवर हंसूं डोळ्यांत पाणी ! ऊन पाऊस याचा नयनमनोहर संगम खरेंच किती मजेदार असतो नाहीं ?

तरुण आणि प्रेमळ पतीपत्नींच्या प्रेमाच्या अव्वल आणि ऐन अमदानींत क्षणाक्षणाला ज्या प्रकारचा प्रणयपरिहास जगाला पार विसरून जाऊन चालत असतो, तोच प्रकार विश्वास–वर्षामध्ये चालला असल्यास त्यांत नवल काय ? त्यांच्या लग्नाला उणींपुरीं पांच वर्षं होऊन गेलीं होतीं. परंतु दोघेही प्रेमळ, परस्परांवर अनुरक्त नी स्वभावाची अशीं असल्यानें चालूं घडीपर्यंत, प्रेमानें एकरूप झाल्याचा पहिलाच क्षण आहे, असे दोघांनाही वाटत होतें. तसेंच ते वागत. बागडत. खेळत !

विश्वास निष्कपटी तर वर्षा प्रेमळ–भोळीभाबडी. पण त्याचमुळें त्यांच्यांत लटक्या रागालोभाचे खटके उडत – आणि अल्पकाळांत दिलजमाईही होऊन जाई !

नेहमींप्रमाणे आतांही तसेच झाले. वर्षा विश्वासवर जरा वेळ रुसली– रागावली. रडली. पण त्याने तिची क्षणार्धात गोड बोलून – प्रेमळ वागून तिला खुषींत आणली !

" आपल्याला चहा पाहिजे बोवा ! एकदम !— " विश्वासला चहा पिण्याची हुक्की आली.

" चहाचं आधण तीनदां स्टोव्हवर ठेवलं नी तीनदां उतरलं ! " वर्षा लाडिक घुश्शांत येऊन म्हणाली, " मला चहा करावा असं वाटतं, त्यावेळीं इकडची लहर लागत नाहीं.— आतां चहा मिळणार नाहीं ! "

" आपण चहा घेतल्याखेरीज सोडणार नाहीं ! " जितक्या निकरानें वर्षानें सांगितलें तितक्याच जोरानें – अर्थात् प्रेमाच्या – विश्वासने म्हटलें.

तो तसें नुसतें म्हणूनच राहिला नाहीं, तर चटकन् उठून, पटकन् तिचा हात पकडून चहा करून द्यायला भाग पाडण्याकरितां त्यानें तिला जवळ जवळ आंत ओढून न्यायलाच सुरुवात केली. " हें काय, असं काय करायचं तें ? सोडायचा माझा हात – ओढायला नको कांहीं – नाहीं का म्हणतें आहे पण !— मला नाहीं बाई असं आवडत – कुणी आलं नी पाहिलं तर काय म्हणेल ? — " वर्षा तोंडानें बडबडत होती. हात सोडवून घेण्याची खोटी धडपड करीत होती. पण खरं म्हटलं तर तिला आनंदच होत होता !

वर्षा चहाच्या तयारीला लागली. विश्वास जवळचा पाट घेऊन, एक वर्षाला बसायला देऊन व दुसरा स्वतःला घेऊन त्यावर मांडा ठोकून बसला. ज्याला आरंभही नाहीं नी अखेरही नाहीं अशी गोड गोड बोलणीं त्यांच्यांत चालू झालीं !

चहा तयार झाला; कपांत ओतला गेला. तिने विश्वासपुढें एक कप ठेवून आपल्यालाही एक घेतला. दोघांचे चहापान सुरू झालें !

" चहा किती सुंदर करतेस तूं वर्षा ! " घुटके घेत विश्वास तिला स्तुतीचे घुटके पाजूं लागला. चहाच्या घुटक्याबरोबर पतीच्या स्तुतीचे घुटके मिळाल्यानें वर्षाला किती आनंद होत होता, हें ती न बोलतां ज्या भावनेनें ती त्याच्याकडे पाहात होती त्यावरूनच कळत होतें.

चहापान संपतांच वर्षा उठून इतर कामाला लागण्याकरितां उठूं लागली. " चला, आतां भागीर्थीकाकू येतील– " असें ती पुटपुटत आहे, तोंच " वाः ! म्हणजे काय ? आपल्याला आणखी चहा पाहिजे ना ? "

" म्हणजे काय ? " मान वेळीत, किंचित् त्रासिकपणानें वर्षा म्हणाली.

" माणसाला दुसरीं कांहीं कामं सुचूंच द्यायची नाहींत वाटतं ? इतका चांगला चहा झाला तरी पुन्हा हवाचं— "

" हो ! चांगला चहा एकदांच घेऊन कसं बरं वाटेल ? तसाच पुन्हां नको वाटतं ? " विश्वासानें म्हटलें.

" चहा चांगला झाला नाहीं, तरी पुन्हां हवा. वाईट झाला तरी पुन्हां हवाच ! म्हणजे काय ? " वर्षा कुरबुर करूं लागली.

" तुझ्याच तोंडून निकाल लागला ! मग का कुरबूर ! " विश्वास हंसत त्यावरही बोललाच ! " शिवाय, आपला चहा झाला. पण तुझ्या भागीर्थी-काकूंना आणि गोट्याला कुठं उरला आहे ? त्यांना नको ! भागीर्थीकाकूंना तुझ्या हातचा चहा मिळाल्याशिवाय स्वयंपाक करायला हुरूप कसा येईल ? आणि गोटयाला चहा मिळाला नाहीं तर, त्याला घरांतले चार धंदे करायला कसे सुचेल ? म्हणून म्हणतों, चहा पुन्हां हवा !

" करते- करतें- करतें म्हटलं ना ?- आतां का उगीच ? " वर्षा बोलत बोलत पुन्हा चहा करूं लागली.

चहाच्या बाबतींत रोज सकाळ संध्याकाळ त्यांच्यांत हाच प्रकार चालत असे ! स्टोव्ह पेटवितांना, पंप करतांना, कपबशा जवळच्या पातेलींतच बसल्या बसल्या विसळतांना अगदीं स्वाभाविक अशा वर्षाच्या मांसल आणि प्रमाण-बद्ध शरीराच्या ज्या गोंडस- नाजूक हालचाली होत, त्याकडे, कोणालाही पाहतांच आदर वाटावा. त्याकडे आणि तसेंच तिच्या केश आणि वेशभूषेकडे विश्वास अनिमिष आणि अतृप्त नेत्रांनीं पहात राहिला होता. तन्मयतेनें तो आपल्याकडे पहात आहे, बोलण्यापेक्षा आपल्याकडे पहाण्यांत त्याचें चित्त गुंगलें आहे, मन रमलें आहे, हे न समजण्याइतकी वर्षा दुधखुळी नव्हती. अशा वेळीं कळून न कळल्यासारखें दाखविण्यात आणि त्याला आपल्याकडे तसेच नितांत प्रेमाने पाहूं देण्यांत, नी दोघांचाहि अननुभूत आनंद शत-गुणीत करण्यांत ती वाकबगार होती. चहा तयार झाला. दोघांचेंहि चहापान सुरू झालें. विश्वासने तिच्या अगोदरच चहाचा प्याला ओठाला लावला. वर्षा त्याच्याकडे प्रश्नार्थक पाहूं लागली. न बोलतांच " पहिला मजा नाहीं ! " अशा अर्थाचा मुद्राविर्भाव त्यानें दाखविला. ती हंसली. तोही हंसला. सुखाची गेलेली घडी पुन्हा परत मिळविणें कोणाच्या हाती आहे ?

तेवढ्यांत भागीर्थीकाकू- स्वयंपाकीण बाई, लुटुलुटु करीत, आपलें स्थूल शरीर सांवरीत आल्याच. त्यांच्या मागोमाग मंडईत गेलेला गोटया गडी, भाजी वगैरे घेऊन आला.

वर्षानें भागीर्थीकाकूपुढे आणि गोटयापुढे चहा केला.

" हें हो काय ताई ! रोज रोज हें काय आमच्याकरितां असं करतां ?

चहा तुम्हीं करायचा न् आम्हीं घ्यायचा. लाज वाटते बाई ! " तोंडानें भागीर्थीकाकू हें असें बोलल्या, पण बोलतां बोलतां त्यांनी आपल्या मालकीणबाईनीं पुढे केलेला चहाचा कप उचललाच. गोट्यानें आपला कप घेऊन बाजूस नेला.

विश्वास उठून बाहेर निघाला. नेहमीच्या संवयीप्रमाणें वर्षाही त्याच्या मागोमाग उगीचच निघाली.

" आपल्या मामाना पत्र लिहिलंत; पण माझ्या बाबांना पत्र लिहायची आहे का आठवण ? " मागें चालत असतां वर्षानें विश्वासला विचारलें.

" लिहिलं नाहीं असं कां तुला वाटलें ? तूं आठवण करून द्यायची जरूर आहे वाटतें ? " प्रश्नार्थक उत्तरानें विश्वासने तिचें तोंड बंद केलें—नव्हे एकदम गोड केलें.

आपल्या माहेरच्या माणसावर आपला नवरा इतकी निस्सीम आपुलकी दाखवतो, हे समजलें म्हणजे पत्नीला अभिमानाने आकाश ठेंगणे झाल्या-सारखें वाटतें. वर्षाला या वेळीं तसेंच झालें.

गोट्याला हाक मारून तयार केलेलें टपाल विश्वासनें त्याच्याजवळ पोस्टांत टाकण्यास दिलें. गोट्या टपाल टाकण्यास निघून गेला.

वर्षाच्या मागें घरांतील हजार कामें होतीं, पण ती अजून तेथेंच विश्वासच्या रुबाबदार हालचालीकडे लाडीकपणानें बघत रेंगाळतच उभी होती.

एवढ्यांत तांबड्या रंगाच्या सायकलीवरून खाकी पोषाखांतील तारेचा शिपाई आंत आला. त्यानें विश्वासच्या नांवाची तार त्याच्यापुढें केली.

वर्षानें तार पाहताच घाबरून विश्वासकडे पाहात कांहींसें आपल्याशींच म्हटलें ! " अगबाई ! तार ? अन् ती कुणाची ? "

लिहितां वाचतां न येणाऱ्या खेड्यांतील माणसांना पोस्टांतून एकादें उघडें अर्धेंच लिहिलेलें कार्ड आलेलें पाहिलें, म्हणजे त्यांच्या मनाला त्यांत कांहींतरी हटकून वाईटच बातमी आहे, असें वाटून मनाला विलक्षण धक्का बसतो.

तसेंच ज्यांच्याकडे पत्राऐवजीं तारांनींच व्यवहार चालत नसतो, त्यांच्या घरीं अचानक आणि अवेळीं एखादी तार येऊन धडकली म्हणजे कसल्यातरी अज्ञात अशा दुष्ट वार्तेच्या कल्पनेनें, त्यांच्या पोटांत भीतीचा गोळा उठतो.

या वेळीं विश्वासची किंचित् पण वर्षाची खूपच घाबरगुंडी वळली. तारेतला मजकूर वाचीपर्यंत विश्वासची आणि तो ऐकेपर्यंत वर्षाची काय त्रेधातिरपीट उडाली असेल ती त्यांची त्यांनाच माहीत.

वर्षाचे आईवडिल बदरीकेदारच्या यात्रेला गेले होते. कांहीं दिवसांपूर्वी

त्यांचें पत्र आलें होतें, त्यांत वर्षाची आई प्रवासांतल्या दगदगीनें व हालानें आजारी असल्याचें वर्तमान होतें. त्या काळजींत अगोदर वर्षा होती. तशात ही आजची तार आली ! त्यामुळें तिच्या मनांत आईबद्दलच्या भलभलत्या कल्पना येऊन डोळ्यांतल्या गंगायमुनांना तत्क्षणीं महापूर आल्यास नवल काय ? विश्वास तार वाचतो केव्हां आणि खरा प्रकार आपल्याला कळतोय केव्हां असें वर्षाला होऊन गेलें.

विश्वासनें तार फोडली, मनाशीं वाचली. त्याची चर्या ती वाचून दुःखी न होतां उलट गंभीर किंचित् प्रफुल्लीतच झाली.

" कुणाची तार ? काय आहे ? माझी आई— " वर्षाला राहावेना उतावीळ होऊन आपल्याच विचारांत गढलेल्या विश्वासवर तिनें प्रश्नांचा भडिमार केला. त्यानें तिच्याकडे पाहिलें. गालातल्या गालांत तो हंसला. " घाबरूं नकोस. तुझ्या आईची तार नाहीं. "

वर्षाचा जीव तें ऐकून भांड्यांत पडला. तिला हायसें झालें. पण पुन्हां तिनें बदलत्या आवाजांत, अजून डोळ्यांत पाणी तरंगत असतांना, हंसरा चेहरा करीत विश्वासला विचारलेंच, " मग तार कोणाची आहे ? काय मजकूर आहे तारेंत ? "

" तारेंत मजकूर सांकेतिक असतो. सविस्तर पत्र टपालांतून येत आहे. तें आलें, वाचलें म्हणजे मला कळेल. मग तुला सांगेन. "

विश्वासनें तारेंतला मजकूर काय तो न सांगतां त्यावर नुसती वर्षाला मल्लीनाथीच ऐकविली. ती त्यामुळें रुष्ट झाली.

खरी गोष्ट अशी होती, कीं आचार्य अत्रे यांच्या धडाडीच्या, कर्तबगारीच्या आणि दुर्दमनीय उमेदीच्या तोडीचा एक महाराष्ट्रीय तरुण बांड विश्वासचा एक जिवलग मित्र होता. तो आचार्य अत्रे यांच्याच पावलावर पाऊल टाकून निर्भेळ महाराष्ट्रीयांचीच अशी एक चित्रपट कंपनी स्थापन करण्याच्या उद्योगाला लागला होता. " योग्य वेळ येतांच आपण तुला कळवूं; तेव्हां, तुझी, तुझ्या लेखणीची आणि तुझ्या संपत्तीची ' कंपनी 'ला मदत मिळाली पाहिजे. चित्रपटाचा धंदा महाराष्ट्रीयांनीं धडाडीनें पुढें होऊन आत्मसात करण्यासारखा आहे. जगांतल्या सर्वश्रेष्ठ धंद्यांपैकीं तो एक धंदा आहे. त्यांत नांव आहे.

लौकिक आहे. कीर्ति आहे. आणि त्या सर्वांपेक्षां अलोट पैसा आहे. महाराष्ट्रीयांनीं आकुंचित दृष्टि टाकून, नोकरी, कारकुनी कलम बाजूला सारून, पारशी, बोहरी, गुजराथी, बनिये, या व्यापारी जातीच्या उद्योगप्रियतेकडे पाहून त्यांचा कित्ता गिरविला पाहिजे व "अचाट कृत्यें करावीं, बळेंच लक्ष्मी खेचावी" असे केलें तरच महाराष्ट्रीयांचा यापुढे तरुणोपाय आहे. महाराष्ट्रीयांजवळ बुद्धि आहे चिकाटी आहे पण व्यापारी जग त्यांनीं अजून पाहिलेंच नाहीं. आकुंचित दृष्टि घालविली नाहीं. व्यापारी जगाकडे तुच्छतेनें पाहण्याची, त्या जगाला कमी लेखण्याची वृत्ति सोडली पाहिजे. तशा तऱ्हेचा मान तुझ्या पिढींतल्या लोकांना मार्गदर्शक होण्यासाठीं प्रथम तूं मिळविला पाहिजेस......"

अशा तऱ्हेचे विचार विश्वासच्या मनावर, पत्रांनीं, तसेंच समक्ष भेटींत सारखे बोलून, त्याच्या मनावर चांगले ठसविले होते. विश्वासला ते विचार पटले होते. पचले होते. तो आपल्या कर्तबगार मित्राच्या शिकवणुकीप्रमाणें त्याच्या भावी चित्रपट कंपनीला साह्य देण्याकरितां तनु– मन– धनानें तयार झालेला होता.

पिढीजाद सावकारी असलेल्या घराण्यांतला विश्वास होता. तरुण होता. देखणा होता. शिकलेलाही होता. नव्या व अफाट उद्योगाच्या जगांत शिरण्याची त्याला उत्कट इच्छाही होती. तसेंच वाचनाबरोबर लेखनाचा ही त्याला छंद होता. पुष्कळ वाचीत असे. थोडेंसें लिहित असे. लिही तें चांगलें लिही.

त्याच्या स्नेह्याला त्याच्या ठिकाणीं असलेल्या गुणावगुणांची बारीकसारीक चांगली माहिती होती. ती लक्षांत घेऊन, योजकस्तत्र दुर्लभः या न्यायाचा अवलंब करून विश्वासला त्यानें आपल्या विश्वासांत बरेच दिवसापासून घेतलें होतें. बोलण्याच्या भरांत, "तूं चित्रपटांत काम करावयला तयार हो! नांव कमवशील. चित्रपट कथा तूं स्वतः लिही. कीर्तिसुंदरी तुझ्या गळ्यांत यशाची माला मोठ्या प्रेमानें घालील. बापजाद्यांनीं तुझ्या हातीं निरविलेली संपत्ति पै पैशाच्या व्याजानीं वाढवीत बसण्यापेक्षां अशा मोठ्या धंद्यांत घाल, अल्पावकाशांत खराखुरा तूं लक्ष्मीकांत होऊन जाशील!" विश्वासच्या स्नेहानें अशा तऱ्हेनें त्याला मार्गदर्शन केलें होतें.

चित्रपटांत नट म्हणून नाचणें, चित्रपटाचें लेखन करून कीर्ति संपादन करणें, यांत आनंद वाटत असला तरी त्याबद्दल मनांतून विश्वासला विश्वास नव्हता. हें त्यानें आपल्या मित्राला बोलून दाखविलें नव्हते. पण आपण सावकाराचे बच्चे आहोत. आपण पैसा घालूंही आणि दामदुपटीने मिळवूंही असे मात्र त्याला विश्वासपूर्वक वाटत होते. त्याच्यापुढे 'प्रभात चित्रपटा'चे स्लीपिंगपार्टनर–कुलकर्णी यांचें त्या तऱ्हेचे साक्षात् प्रतीक होते. कुलकर्णी यांचें भांडवल 'प्रभातचित्र'ला यशस्वी झाले तसें त्यांनाही लाभदायक झाले तसेंच, नट किंवा चित्रपट कथालेखक म्हणून आपण आपल्या स्नेह्याच्या "चित्रपट कंपनी" ला तितकें उपयुक्त झालो नाहीं, तरी आपले भांडवल, त्याच्या 'कंपनी'ला यशस्वी होईल, आपल्याला अफाट संपत्तीत लोळवील, असें त्याचें मन त्याला ग्वाही देत होतें.

विश्वासला आलेली आजची तार त्याच्या त्या कर्तबगार स्नेह्याची होती. सविस्तर खुशालाचे पत्र मागून येत होते. आनंदाच्या भरात त्या स्नेह्यानें "कंपनी काढण्याचे नक्की झालें. सविस्तर खुलासा स्वतंत्र पत्रात" एवढीच तार त्वरेनें विश्वासला ठोकली होती.

विश्वासला या प्रचंड उद्योगाच्या घालमेलीचें वर्षाला कांहींच माहित नव्हतें. सांगितले तरी कळेल कीं नाहीं, याबद्दल त्याला शंका होती म्हणून त्यानें तिला आतांपर्यंत काही सांगितलेंही नव्हतें.

तारेंतला मजकूर सांगितला नाहीं, म्हणून वर्षा खट्टु झाल्याचें त्यानें पाहिले. तेव्हां त्यानें तिला कळो वा न कळो, पण सांगितलें पाहिजे, असें वाटून हलकें हलकें तो तिला समोर बसवून सांगूं लागला. वैभवाच्या शिखरावर नेणाऱ्या व्यापारी तत्वाची महति आणि माहिती विश्वास आपल्या लाडक्या वर्षाला आपल्या रसाळ वाणीनें साविर्भाव रंगवून आणि खुलवून खुलवून सांगत होता. ती एकाग्र चित्तानें ऐकत होती. पण तिला तें सारेंच्या सारें कळत होतें कीं नाही कोण जाणें !

तेवढयांत त्याचें टपाल आलें. बोलतां बोलतां तो टपाल फोडून चाळूं लागला. वाचूं लागला. वर्षाच्या वडिलाचें कुशल पत्र त्यांत होतें, तें त्यानें ओझरतें पाहून तिलाच वाचावयास दिलें. त्याच्या मामाचें, प्रेमाचेंही पत्र होतें. कांहीं पत्रें भराभर त्यानें पाहिलीं. सावकाश वाचण्याकरितां त्यानें कांहीं पत्रें बाजूस ठेवलीं.

त्याच्या कर्तबगार स्नेह्याचें अपेक्षित पत्र त्याला दिसतांच, त्यानें तें जरा घाईनेंच फोडून वाचावयास सुरुवात केली. कांहीं ओळी मनांत, तर वर्षाला ऐकावयाला मिळावें, म्हणून कांहीं मजकूर मोठ्यानेंही तो वाचीत होता.

" पत्रें पोस्टांत टाकली " हे सांगण्यासाठीं गोट्या तितक्यांत तेथें आला. पत्रें वाचतां वाचतां चित्रपटविषयक ज्या गोष्टी विश्वास वर्षाला सांगत होता, त्या कांहीं गोट्याच्याही कानीं सहजगत्या पडत होत्याच.

आपले मालक " फिल्म कंपनी " काढणार, एवढे ठोकळमानानें गोट्याला समजलें. तो आश्चर्यानें आणि अभिमानानें त्यांच्याकडे पाहू लागला.

" सिनेमा नटाची आपण बायको होणार; चित्रपट कथालेखकाची— प्रथितयश लेखकाची अर्धांगी बनणार; किंवा भांडवलवाले या नात्यानें पर्यायानें सिनेमा फिल्मकंपनीची मालकीण होणार ! " गोट्यापेक्षां जरा जास्त प्रमाणांत पण एकंदर स्थूलमानानेंच वरीलसारख्या कल्पना वर्षाच्या डोक्यांत विश्वास समजावून सांगत असतां येत होत्या. तिला त्यामुळें आनंदच वाटत होता. सहधर्मचारिणीला पतीच्या कोणत्याही नव्या उद्योगाबद्दल असेंच कौतुक वाटल्याशिवाय कसें राहणार ?

पत्रें पोस्टांत टाकल्याची वर्दी देऊन गोट्या घरात आपल्या कामाला चालता झाला.

आईवडिल प्रवासांत खुशाल असून ते आतां परतीच्या वाटेवर आहेत, हे वाचून वर्षा अतिशय आनंदांत होती. दोघे लवकर परत येणार. आपली भेट होणार. त्यांच्या महायात्रेची सांगता—जंगी मामंदे आपल्याला करायला हवे. विश्वासला सांगून आपल्या मनासारखें आपण सारें सारे करणारच. या आनंददायी विचारानें वर्षाचें मन नुसतें भरून गेलें होतें. मनांतला आनंद तिच्या मुखावर त्या क्षणीं नुसतां नाचत बागडत होता. त्याच वेळीं आपल्या कर्तबगार स्नेह्याचें पत्र विश्वास तिला आमूलाग्र सावकाश वाचून दाखवित होता. नव्या उद्योगाच्या भावी यशाचा आनंद आपल्याचप्रमाणें वर्षाला होत आहे असा समज होऊन, वाचतां वाचतां तो तिच्याकडे उल्हासानें पाहात होता ! त्याला तें पाहून बरें वाटत होतें. पण तिच्या आनंदाचें खरें कारण तिचें तिलाच ठाऊक ! इकडे ही खूष. तिकडे तो खूष !

विश्वास तें पत्र तिला सटीक अजून वाचून दाखवीत होता. या प्रेमळ पति–पत्नीमध्यें आनंद देणाऱ्या पत्रांचें वाचन आणि साल्हाद श्रवण, बाहेर असें, चालूं होतें. त्या वेळीं स्वयंपाकघरांत भागिर्थीकाकू अंग धुवून स्वच्छ सोंवळ्यांतलें नेसून, स्वयंपाक करण्यांत गढल्या होता. हात स्वयंपाक करण्यांत गुंतले होते. तर तोंडानें अभंग म्हणण्यांत त्या तन्मय झाल्या होत्या. भागिर्थीकाकूंचा रोजचाच कार्यक्रम होता तो. पोटासाठी लोकांच्या घरीं स्वयंपाक करण्यासाठीं दुर्दैवानें राबण्याची पाळी त्यांच्यावर आलेली होती. त्या तें काम नेकीनें नी टेकीनें करीत. अंतःकरणांत त्याबद्दल त्यांना कष्ट होत नसतील का ? पण ते कष्ट सुसह्य व्हावेत म्हणूनच कीं काय, त्या रोज देवदेव करीत. काम संभाळून कथा कीर्तनाला नेमानें जात. क्वचित नाटकसिनेमा सुद्धां पहात ! त्यांनीं गळ्यांत तुळशीची माळही घातली होती. कपाळाला बुक्का लावीत. आणि तोंडीं अखंड हरिनामाचा गजर चालवीत. त्यांचे वय कांहीं फार नव्हतें, तिशी संपली असेल, फार तर बत्तीशी उलटली असेल. परंतु त्या अतीशय नेमस्त, संभाळून वागत असल्यानें त्या होत्या त्यापेक्षां बऱ्याच तरुण दिसत इतकें खरें.

वर्षाशीं त्या वडिलकीच्या नात्याने पण त्यांचा दर्जा, मान संभाळून वागत. लहानापासून थोरापर्यंत त्या सर्वांशींच मिळूनमिसळून, आपुलकीच्या मोकळे-पणानें हंसून खेळून असत.

गोऱ्या तिथेंच आंवतीभंवती घोटाळत होता. आपलीं कामें चट्चट् उर-कीत होता. तो भागीर्थीकाकूंचा स्वभाव ओळखीत असे. त्यांच्या बद्दल त्याला आदर वाटे. त्याही त्याला ममतेनें वागवीत. आपल्यावरून जग ओळखीत, त्यामुळें आपल्यासारखाच तो गरीब, दुर्दैवी, काबाडकष्ट करून पोट भर-णारा, हें त्या ओळखीत व जास्त आपुलकीनें त्या त्याला वागवीत. त्या जरा त्रासिक आणि तोंडाळ असत. आणि गोऱ्या, जरा अवखळ, नी खोड्या काढण्यांत पटाईत. कित्येकदां तो भागीर्थीकाकूंना चिडवून हैराण करी. त्यांना अचावचा बोलायला लावी. त्यांनीं तोंड सोडलें म्हणजे, मात्र तो चोरा-सारखा खालीं मान घालून स्वस्थ राही. मनाशीं हंसे पण मग बोलत मात्र नसे.

आपले मालक – विश्वास – लवकरच मोठया सिनेमाचे मालक होणार हें नुकतेंच त्याला समजलें होतें; त्या खुषींत तो होता. आपल्याशींच पुटपुटत होता. हंसत होता. झाडलोट करतां करतां आपल्याच नादांत गिरक्या फिरक्या घेत होता.

भागिर्थीकाकू पोळी लाटतां लाटतां एकतानतेनें, अगदीं सुरावर—

“ *आवडीनें भावें हरि नाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥*
*नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा । पति लक्ष्मीचा जाणतसे ॥*

हा एकनाथ महाराजांचा अभंग आपल्याशींच घोळून घोळून म्हणत होत्या. “ नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा ” हा चरण पुन्हां पुन्हां म्हणत असतां, गोटया खोक् करून एकदम हंसला. भागीर्थीकाकूंनीं त्याच्याकडे पाहिलें. त्यानें तेवढयांत तोंड वळविलें. हंसूं दाबलें. त्या किंचित् चिडल्या. पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून—

“ *सकळ जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसें नाहीं ॥*
*जैशी स्थिति आहे तैशापरि राहे । कवतुक तूं पाहे संचिताचें ॥*
*एका जनार्दनीं भोग प्रारब्धाचा । हरिकृपें त्याचा नाश आहे ॥*

हा सर्व अभंग [illegible] म्हटलाच. पण त्यांची पाहिली समाधी मात्र या वेळी टिकली नाहीं. त्या म्हणत होत्या आणि मधून मधून हंसणाऱ्या गोटयाकडे पाहात होत्या. तो अजून हंसत होता.

आतां त्या चिडल्या आणि “ गोट्या, काय रे मेल्या, फिदी फिदी हंसायला काय झालं ? इथं कुणी नागवं नाचतय कारे ?— ” त्याला गप्प करण्यासाठीं त्या चिडक्या आवाजांत सपाटून त्याच्यावर खेकसल्या. पणं तो त्यामुळें जास्तच हंसूं लागला.

“ तसं नव्ह काकू ! ” भागिर्थीकाकूंना ऐकायला जाईल इतक्या बेतानें तो पुटपुटला, “ अशा कावता कशापायी व ? परमीसराचा धावा तुम्ही करताया तवा त्यो तुम्हास्नी ‘ मोकलील ’ कशापाई ? हाय, काकू, तुमच्या मागचा, पोळ्या लाटायचा भोग सरायचा वकुत येतुया जनूं. ह्यें म्या हेरलं. तवाच तुम्हीं बी ह्योच अभंग गातहूता. म्हणून मला हंसायला आलं व ! ”

“ म्हणजे काय मेल्या ? काय म्हणतोस तें तुझं तुला तरी कळतंय का ? ”

२

भागीर्थीकाकू त्याच्यावर आणखी उसळल्या.

आपल्यावरच्या काकूंचा राग कधींच खरा आणि फार वेळ टिकणारा नसतो, हें तो जाणत होता. त्यांचा राग न मानतां, त्यानें पुढें आपली चावट चर्पट पंजरी चालविली—

" काकूबाई ! तुमच्या कपाळाचं ह्यें पोळपाटलाटणं सुटगार बघा ! आलंया, जवळ आलं या. तुम्हीं मनावर बरीक ध्येया व्होवं ! मग बघा !– "

" अरे, पण आज इतका चेकाळलास कशानें ? आं ? मेल्या, स्पष्ट सांग तरी काय म्हणतोस तें. "

" काकू, तुम्हीं लयी चकोट अभंग म्हणतां— "

" बरं, मग, तुला काय करायचंय ?— "

" तुम्ही दिसताबी बेस एकाद्या संतीणीवाणी— "

" मेल्या, माझी चेष्टा करतोस काय रे ?— "

" आन्, काकू, ह्या कलीमदीं लई बामणीणी षणेमांत बी बेगुमान जात्याती आन् आपलं नशीब काढत्याती नव्हं ? तवा म्हटलं — "

" मेल्या. मांगा तुझ्या जिभेला कांहीं हाड आहे का ? रांडेच्या, मला सिनेमांत जायला सांगतोस का काय ? " त्या त्याच्यावर भयंकर रागावल्या. त्याच्या टाळक्यांत हाणण्यासाठीं हातांतलें लाटणें त्यांनीं वरसुद्धां केलें. गोटया जीव घेऊन तेथून झटकन् निसटला, म्हणूनच बचावला ! पण जातां जातां, " मग, त्यामंदि कुठं बिघडलं ? सारा जलम लोकांच्यांत उष्टींखरकाटीं काढीत बसण्यापरीस काय वंगाळ व्हईल ? नांव बी मिळल पैका बी मिळल. सुख बी लागंल. आन् षणेमांत जायचं, त्यें लोकाच्यांत कुठं म्हनतूया ? आपलंच मालक षणेमा काढत्याती त्या मंदि । वक्तावर धन्यास्नी सांगून मी पर त्यामंदि शिरन म्हनतुया ! " असें बरेंचसें पुटपुटतच होता तो. त्यांतले बरेचसे शब्द भागीर्थीकाकूंच्या कानांत शिरलेच. लाटण्याचा वर गेलेला हात आपसुख खालीं आला. त्यांचें काम चालू झालें. पण राग ओसरतांना त्यांच्या मनांत गोटयानें ऐकवलेले विचार पुन्हां आले असतील कीं नाहीं, कोण जाणें !

भागिर्थीकाकूंचा चढा आवाज आणि गोट्याच्या पायांचा दणदणाट ऐकून वर्षा आंत आली. " काय झालं काकू ? रागावलांत का ? वर्षानें त्यांना विचारलें.

" कांहीं नाहीं. फाजीलपणा करतो कांहीं तरी गोट्या नी वैताग आणतो उगाच. दुसरं काय ?— " . . . सारवासारवी केली. त्यांचा राग पार नाहींसा झाला. लहानाची कळ थोरांत उठल्यासुटल्या नेण्यांत शहाणपणा नसतो. हें भागिर्थीकाकू चांगल्या जाणत.

विश्वास सिनेमाच्या धंद्यांत पडणार आहे, हें त्यांना दुपारच्या जेवणाच्या वेळीं विश्वास वर्षाला सविस्तर सांगत असतांना आपोआपच कळलें, त्यावर त्यांना विचार करण्याची गरजच नव्हती.

एकाच गोष्टीकडे जो तो आपापल्या दृष्टीनें पहात असतो. व त्यावर अनुकूल प्रतिकूल विचार करीत असतो. आपल्याला सुखदायी कोणती आणि दुःखदायी कोणती, यावरच प्रत्येकाचा भर असतो.

ज्या सिनेमाधंद्यांत आपण पडणार, त्यांत किती तऱ्हेनें आपल्याला यश मिळवितां येईल, या विचारांत विश्वास गर्क होता.

आपल्या कर्तबगार पतीच्या सान्निध्यांत आपण किती श्रेष्ठपद पटकावूं ! आपण आहोंत, त्यापेक्षां किती सुखी होऊं, याचा आपल्या परी वर्षा विचार करीत होती.

मालक सिनेमा कंपनी काढणार त्यांत आपल्याला शिरायला मिळेल तर काय बहार होईल ! असा गोड विचार अडाणी गोट्या आतां पासूनच मनाशीं घोळवायला लागला होता.

तर भागिर्थीकाकू — नवा रोजगार सुरू झाला, म्हणजे मालकांच्याकडे तर नव्या नव्या पाहुण्यांचा धबडगा पडेल त्या साऱ्यांना रांधून वाढतां वाढतां आपलें कंबरडें किती खिळखिळें होऊन आपल्याला आपला जीव नकोनकोसा होईल, याच विचाराची दहशत बसून आतांपासूनच त्या हैराण होऊन, या घरचें काम सोडून जावें कीं काय, या विचाराकडे वळूं पहात होत्या.

भावी भीतीला भिऊन, जेवणखाण—कामधाम उरकून जायच्या वेळीं त्या विचाराच्या तिरमिरीतच भागिर्थीकाकूंनीं वर्षाताईला हळूंच " मला नाशिक त्रिंबकेश्वरला जायचं आहे. आठ दिवसांची रजा हवी. " अशी गोष्ट काढली. जणुं काय हे आठ दिवस बाहेर काढले कीं, पुढच्या कष्टांची आपत्ति कायमची मागची टळणार होती, असें त्यांना वाटत असावें. भयशंकांची कोंगि बुद्धि ती हीच !

रजा देण्याचें संकट वर्षाला वाटलें. पण विश्वासू नी कामसू माणसें मिळतात कुठें ? जीं मिळतात, त्यांना टिकवून धरण्यासाठीं, स्वत:ची गैरसोय सोसूनही त्यांची मर्जी संभाळावी लागते. नोकरांना वाटतं, आपल्यासाठीं मालकलोकांचा जन्म आहे. आणि मालकांना वाटतं, आपल्यासाठीं गुलामांचा अवतार आहे. त्यांना आपण पगार देतों, त्यांनीं क्षणमात्र इकडे कीं तिकडे होऊं नये. तसें झालें कीं बिघडलें.

पण विश्वास किंवा वर्षा त्या ' मालका 'च्या कोटींतली नव्हती. त्यांना भागिर्थीकाकूंचीं किंमत कळत होती. त्यामुळें नाइलाजानें, कष्टानें कां होईना, तिनें काकूंना आठ दिवसांची रजा दिली.

सिनेमा फील्म कंपनी काढणाऱ्या आपल्या कर्तबगार मित्राशीं विश्वासचा पत्रव्यवहार-छेः तारांचा-व्यवहार खूप वाढावयाला आरंभ झाला. रोज पत्रावर पत्रें-आणि तारांवर तारा ! तार आली कीं मनांत धसका बसावयाचा, विश्वासच्या आणि विशेषतः वर्षाच्या आयुष्यांतला काळ केव्हांच मागें पडला. रोज नव्या उत्साहजनक प्रगतीच्या बातम्या ! विश्वासनें उत्साहानें वर्षाला सांगावें आणि कळो न कळो वर्षानें त्याच्या प्रत्येक गोष्टीला हुंकार देऊन त्याला प्रोत्साहित करावें.

" आईबाबा पुढच्या आठ दिवसांत येणार. आपल्याकडेच त्यांना ठेवून घ्यावयाचें. जंगी मांवदें करावयाचें. सगळ्या आप्तेष्टांना मावंद्याला बोलवायचें बेत अमका अमका करायचा. " आपल्या या आनंदाचे घोडें वर्षानें मध्येंच थामटावें व विश्वासकडून त्याला संपूर्ण संमति मिळवावी.

त्यांचा रोजचा कितीतरी वेळ याच विचारांच्या देवघेवींत जाऊं लागला.

त्या धांदलींत असतांच एक दिवस विश्वासच्या मामांचें एक पत्र आलें. त्यांत " चि. कु. प्रेमाची प्रकृति बिघडली असल्यामुळें ती नुकतीच घरीं आली असून, तिला तुझ्या मागील पत्राप्रमाणें हवापालट करण्याकरितां लवकरच तुझ्याकडे पाठवीत आहें. इतक्यांतच पाठविणार होतों, परंतु प्रवासाची दगदग सोसणार नाहीं. म्हणून कांहीं दिवसांनीं पाठवितों. तीही तुझ्याकडे येण्याला उत्सुक आहे. आम्ही सर्व दिवाळीला बहुधा येऊंच. पण आतांच नक्की नाही. " असें मामांनीं विश्वासला कळविलें होतें.

वर्षाला तें कळल्यावर आनंद झाला.

" तुमची प्रेमा केव्हां येणार पण नक्की ? दिवस कळविलाच नाहीं ? " कांहीं तरी विचारावयाचें म्हणून पण खऱ्या जिव्हाळ्यानेंच वर्षानें विचारलें.

" माझी प्रेमा – नी तुझी कोणी नव्हे वाटतें ? " विश्वासनें जरा रागाच्या झटक्यानेंच म्हटलें, " तुम्हीं बायका म्हणजे अशाच ! "

तेवढेंच निमित्त वर्षाला पुरें झालें. तिच्या डोळ्यांतून टच्चकन पाणी आलें. तें पाहिल्यावर विश्वासला आपण कुठून बोलून गेलों असें होऊन गेलें. त्यानें आपले शब्द बिनशर्त परत घेतले. तिची गोड शब्दांनीं समजूत घातली. तेव्हां तिला बरें वाटलें.

त्याच प्रेमाचा टांगा एक दिवस संध्याकाळच्या सुमाराला विश्वासच्या दारापुढें येऊन अचानक थांबला !

विश्वास तिला सामोरा गेला.

गोटया प्रेमाचें सामान टांग्यांतून उतरून घेण्यासाठीं पुढें झाला.

जुन्या पद्धतीप्रमाणें प्रेमावरून ओंवाळून टाकण्यासाठीं भाकरीचा तुकडा घेऊन वर्षा दारांत आली. तिनें तुकडा ओंवाळला. पाणी हातावर घातलें. प्रेमानें चूळ भरली.

वर्षानें प्रेमाचा हात धरून घरांत नेले !

---

परकरी पोरगी असतांना प्रेमाला विश्वासनें केव्हां पाहिली होती, त्यानंतर आज ती त्याच्या दृष्टीस पडली. तिलाच काय, पण तिच्या आईवडिलांना— विश्वासच्या मामामामींना पाहण्याचा योग वर्षाला अजूनपर्यंत आलाच नव्हता. प्रेमाला ती आजच पहिल्यांदा पहात होती.

विश्वासचें परब्रह्म म्हणजे त्याची मामामामी आणि प्रेमादि त्यांचीं लेंकरें. जें विश्वासचें प्रिय तें त्याच्याइतकें किंबहुना त्याच्यापेक्षांही वर्षालाही जास्त प्रिय केव्हांही असावयाचेंच.

त्यामुळेंच प्रेमा घरीं येतांच विश्वासनें जितक्या आनंदानें तिचें स्वागत केलें त्यापेक्षां किती तरी पटीनें तिच्या बद्दल वर्षानें प्रेमाला आपुलकी दाखविली.

आपुलकीचे सुखदायी संस्कार आपल्या घरच्याप्रमाणें इकडेही आहेत, हें पाहून प्रेमाला बरें वाटलें.

विश्वासनें प्रेमाला, आपल्या मामा-मामींचें, पुरुषत्तमाचें, मंदाकिनीचें अंतःकरणपूर्वक पण मोजक्या शब्दांत कुशल विचारलें. तिच्या प्रकृतीची पूसतपास केली; हवा बदलण्यासाठीं आपल्याकडे ती आली म्हणून समाधान व्यक्त केलें आणि लवकरच तूं चांगली खडखडीत बरी होशिल असें भरंवशाचें आश्वासन देऊन तो मोकळा झाला. झालें विश्वासचें काम. वर्षाच्या हातीं तिला संभाळण्याला-तिची व्यवस्था ठेवायला निरवून तो आपल्या अन्य व्यवसायाला लागला. पुरुषांचें काम यापेक्षां जास्त काय असणार ?

पण वर्षा ? ती काय पुरुष होती ? कीं आलें, भेटले, हंसून नमस्कार चमत्कार केले, नी दोन औपचारिक शब्दांची देवाणघेवाण करून चालते झाले ? वर्षाच्या हातून असें थोडेंच घडणार ?

प्रेमाला तिनें जवळ बसवून काव घेतलें, तिच्या पाठीवरून आणि तोंडावरून हात काय वरचेवर फिरविला; चच्चुच्च करीत, तिच्या खंगलेल्या प्रकृतीकडे पहात खेद काय प्रदर्शित केला. हळहळली काय, गहिंवरली किती, छेः छेः छेः बोलायची सोय नाहीं. एकाद्यावर अशी माया दाखवावी बायकांनीं आणि करावीही बायकांनींच !

तसें पाहिलें तर वर्षा आणि प्रेमा यांच्या वयांत फारसें अंतर नव्हतें. फार तर चारपांच वर्षांनीं प्रेमापेक्षां वर्षा वडील असेल नसेल इतकेंच; पण लग्न झाल्यानें आपण पोक्त झालो आहोंत, असें वर्षाला वाटत असावें; त्यांत प्रेमाला ती मानानें मोठी, नी सुखावलेलें शरीर स्वाभाविकच गरगरलेलें, या सर्वांमुळें वर्षाला आपण प्रेमापेक्षां फारच फार मोठ्या आहोंत, असें नकळतसुद्धां वाटत असल्यास नवल नाहीं. त्याच चालीनें नी थाटानें प्रेमानें घरांत पाऊल टाकल्यापासून वर्षा प्रेमाशीं वागूं लागली. प्रेमाशीं बोलतांना तर वर्षानें अगदीं बुढ्ढ्या आजीबाईचाच आव आणला.

प्रेमाशीं ती एकदम बोलायला लागली ती सुद्धां कशी ? किती मोकळीचाखळी, कीं माहीत नसणाऱ्या कोणी त्यावेळीं पाहिलें असतें तर, त्याला खात्रीनें वाटलें असतें, या दोघी अगदीं बाळपणच्या जिवाभावाच्या मैत्रिणी आहेत ! फारा दिवसांनीं भेटल्या आहेत. त्या मागच्या गोष्टींच्या नव्या दमानें आठवणी काढीत आहेत !

असतो एकेकाचा असा स्वभाव ! इतक्या अंगलटीला येऊन, घसट करून प्रेमाच्या आईनें देखील तिच्यावर इतका मातृप्रेमाचा वर्षाव केला असेल कीं नाहीं कोण जाणें !

वर्षा बोलत सुटली होती. तिनें पुष्कळ बोललें म्हणजे प्रेमा एकाददुसऱ्या शब्दानें उत्तर देई. तिच्या उत्तरांत लघळपणा नव्हता, तसा तुटकपणाही नव्हता. असला तरी वर्षाच्या ध्यानांत तो आला नाहीं.

प्रेमा तशी फारशी आजारी नव्हती. साधारण ताप येत असे. खराब त्या मानानें ती बरीच झाली होती. शारीरिक आजारापेक्षां मानसिक आजार असला म्हणजे जसें साधारणतः माणूस दिसतें, तशी ती दिसत होती.

ती कुरूप खचितच नव्हती. पण सौंदर्याचें भरपूर मापही ब्रह्मदेवानें तिच्या पदरीं ओतलें नव्हतें हें तितकेंच खरें ! वर्षा कशी शरीरानें आणि रंगानें घवघवीत, ठसटसीत नी तजेलदार दिसे. त्यांपैकीं प्रेमाजवळ कांहींच नव्हतें. आजारामुळें ती अगदीं फिक्कट झाली होती. अगोदर कृश देह. आजारानें त्यांत तिच्या हातापायाच्या काडयाच झाल्या होत्या. परंतु कॉलेजांत जाणारी ती असल्यामुळें त्या वातावरणाचा ठसा तिच्यावर ठळक उमटला होता. लेणं-नेसणं आकर्षक, आटपशीर, हातांत एकेक बांगडी, गळ्यांत एकच सर. केशभूषा अद्यावत् ! या सर्वांमुळें वर्षापेक्षां कमी देखणी, रूपवान असूनही, तिच्यापेक्षां प्रेमा एकदम निराळी, आकर्षक-मोहक-तशा आजारांतही दिसत असल्यास आश्चर्य नाहीं.

चांभाराचें लक्ष लोकांच्या पादत्राणावर असतें, तसें बायकांचें लक्ष दुसऱ्या बायकांच्या नटण्याथटण्यावर असतें. मी कशी, ती कशी, माझ्यापेक्षां तिच्यांत वेगळें काय नी तिच्या पेक्षां आपण कशा जास्त चांगल्या वागतो, तिचें कसें नी माझें कसें ? अशा तऱ्हेच्या तुलना करून स्वतःला श्रेष्ठ ठरवून, त्यांत आनंद मानण्यांत पुरुषजातींतला कवि-लेखकांचा वर्ग आणि त्यानंतर जगांतला एकटा एक महिला वर्ग सांपडेल !

स्त्रिया - मग त्या कोणत्याही काळांतल्या, म्हाताऱ्या, तरुण, लहान, सुशिक्षीत वा अशिक्षित असोत, त्या वरीलसारखी तुलना करण्यांत सारख्याच वाकबगार आणि दक्ष असायच्याच !

वर्षा या बाबतींत अपवाद नव्हती. प्रेमाकडे तिनेंही त्या दृष्टीनें न्याहाळून पाहिलें तिला तिचा – आपल्यांतला फरक जाणवला. त्यावर तिनें फार विचार केला नाहीं, इतकेंच ! विचार आला नी भुर्रकन् एकादें पांखरूं उडून जावें तसा गेला. तेवढ्यांत, स्वतःकडे चांगलेपणा घेऊन, प्रेमाबद्दल " उंः ! अलिकडच्या पोरी या अशाच ! त्यांचें नुसतें नटणेंमुरडणेंच बघून घ्यावें; " अशी आजीबाई थाटाची आणि छापाची, नाकमुरडीत, क्षणमात्र आपल्याशींच वर्षानें टीका केली. व जास्त विचार सोडून दिला.

स्त्री–स्वभावसहज या प्रकारचा तुलनेचा तरळता विचार सोडून दिला तर प्रेमा घरीं आल्यापासून वर्षानें तिच्या शुश्रुषेंत, तिला जपण्यांत, आणि प्रेमाचें नागविण्यांत लवमात्र काडीची कसूर केली नाहीं. प्रेमाला आपल्याही जिवापलिकडे ती जपूं लागली.

गोख्याकडून औषध आणवणें, जागा स्वच्छ ठेवणें, आंथरूणपांघरूण वेळच्या वेळीं बदलणें, यांत तर तिनें कधीं हयगय केलीच नाहीं; पण पथ्या-पाण्याची वेळ तिनें स्वतः कधीं चुकूंच दिली नाहीं. उघड्या वाऱ्यावर तिला जास्त वेळ बसूं द्यायचें नाहीं. गारपाणी पिऊं द्यायचें नाहीं. जास्त बोलूं द्यायचें नाहीं, वाचूं द्यायचें नाहीं, जागूं द्यायचें नाहीं कीं त्रासूं द्यायचें नाहीं. एकाद्या माऊलीसारखी वर्षा प्रेमाकरितां राबत होती. धडपडत होती.

प्रेमा आली त्याच्या दुसऱ्याच दिवशीं असेल, प्रवासाच्या दगदगीनें तिला एकदम घाबरल्यासारखें झालें. तर वर्षा कोण घाबरली. तिच्या तोंडचें पाणीच पळालें. तिची ती अवस्था पाहून डोळ्यांत पाणी उभें राहिलें.

प्रेमाला ती फारसें बोलूं द्यायची नाहीं, पण तिची मात्र सारखी कांहीं ना कांहीं टकळी चाललेली असायची ! आपल्या नुसत्या बोलण्यानें सुद्धां प्रेमाला आराम वाटणार आहे, असेंच जणूं तिला वाटत असावें.

भागिरथीकाकू नाशिकत्र्यंबकेश्वरची यात्रा करायला ज्या गेल्या होत्या, त्या अजून आल्याच नव्हत्या. तर घरांतलें सर्वांचें स्वयंपाकपाणी वर्षा जातीनें करी. आणि प्रेमाच्या पथ्यपाण्याचेंही विनाआळस तीच स्वतः संभाळी ! तिला जास्त कष्ट होतात म्हणून विश्वासनें, भागिरथीकाकू येईपर्यंत दुसरी एकादी स्वयं-पाकिण ठेवायला वर्षाला भाग पाडलें. पण अगोदर थोड्या दिवसाकरितां

तशा बायका मिळेनात, मिळाल्या तरी टिकेनात ! कशा टिकणार ? कोणी चोरून दूध प्यायच्या, आणि कोणी पाहुण्याच्या आंत दुधाचें उष्टें पातेलें तशाच चुलीवर ठेवून द्यायच्या, कोणी एकेक जिन्नस ओटयांतून लांबविण्यांत तरबेज, तर एकादी स्वयंपाकच कसातरी, खारटतिखट, निदान कच्चा करून ठेवून जायची ! त्या स्वयंपाकानें घरांतली सगळींच माणसें आजारी पडायची वेळ आली ! एकतर स्वतःलाच घरची मालकीण समजून, मालकिणीला – वर्षा-लाच डाफरून बोलूं लागली. ज्ञान शिकवूं लागली. एक स्वयंपाकिण दोन दिवसांतच खुद्द प्रेमाच्या देखत विश्वासरावांशींच भलती लाडीगोडी लावूं लागली; म्हणून तिला लगेच हाकलणें भाग पडलें.

घाईघाईनें दुधाचें पातेलेंच तोंडाला लावून, दूध पिऊन कोणी पाहुण्याच्या आंत तेंच पातेलें तसेंच चुलीवर चढविण्याची चलाखी एका बाईनें मोठ्या चपळाईनें केली. पण चलाख गोटयानें ती तिची करणी कशी अचानक पाहिली कोण जाणे ! त्यानें वर्षाजवळ ती बातमी पोंचविली. तेव्हां तिलाही बाहेरचा रस्ता दाखविणें ओघास आलें.

आणि मग भागिर्थीकाकू येईपर्यंत कोणी बाई बोलावयाचीच नाहीं, असें वर्षानें ठरवून आपणच आपल्यावर सर्व कामाचा भार घेतला.

श्रीमंतांच्या घरच्या बायका ऐदी असतात आणि ऐदीपणांतच श्रीमंतीचें खरें सौख्य समजतात. खऱ्याखुऱ्या, पिढीजाद श्रीमंत असतात, त्यांच्यांत हे ऐदीपणाचें लोकोत्तर (?) गुण असतील किंवा नसतील कोण जाणें ! पण येनकेन प्रकारेण नवथर आलेल्या श्रीमंतांच्या घरीं असले प्रकार विशेष. अगोदरच्या गरी बीची आणि त्या वेळच्या कष्टाची आठवण बुजलेली नसतांनाही मध्येंच श्रीमंती-प्राप्त झालेल्या घरांतील बायकांनी श्रम करणें कमीपणाचें वाटतें. ऐदीपणांत काळ घालविण्यांत आराम वाटतो. तशा ऐदीपणा संभाळण्याकरितां स्वयं-पाकीणबाईचें वाटेल ते चोचले, त्या खुशाल खपवून घेतात. हीच त्यांची श्रीमंती आणि हेंच त्यांचें श्रीमंतींतलें सौख्य !

पण वर्षा तशांतली नव्हती ती श्रीमंत असूनही स्वयंसिद्ध, दक्ष नी कष्ट करण्यांत कमीपणा मानणारी नव्हती म्हणूनच ती सर्व कामें सहज नी कंटाळा न करतां उरकीत होती.

वर्षाच्या कर्तव्यदक्षतेबद्दल प्रेमाला दरदिवशीं वाढता आदर वाटूं लागला. पण तिच्या टकळीचा पुष्कळदां कंटाळा येऊं लागला! ती प्रेमानेंच, तिला बरें वाटावें म्हणून बोले; पण तिच्या भाराभर बोलण्यांत प्रेमाला फारच थोडें तथ्य वाटे! मनाशीं ती कुरबुरे, बोलत मात्र नसे. विश्वास आपली बाहेरचीं कामें संभाळून दिवसांतून एकदोन वेळां नेमानें प्रेमाजवळ येऊन बसे; विचारी. त्याचे शब्द थोडे पण त्यांत अर्थ पुष्कळ. शिवाय त्यांत अंतः-करणाचा ओलावा भरपूर; तशीच माहिती, मनोरंजन, गंमती फार! त्यामुळें त्याच्या थोडक्या बोलण्यांत सुखदायी काव्य भरल्याचा प्रत्यय प्रेमाला येई. आनंद होई! दिवसभर त्या आनंदाचें समाधान तिला पुरेसें होई! विश्वास प्रेमाजवळ बसे, त्या वेळीं बहुतेक वर्षाही जवळ असेच. दोघांचीं प्रश्नोत्तरें ती ऐके. प्रेमाचें गुणवर्णन करीत, तिच्या प्रकृतींत सुधारणा होत असल्याची ग्वाही, विश्वासला ती मध्येंच देई. "प्रेमाला उत्तम तऱ्हेनें तूं जपतेस म्हणूनच ती लवकर लवकर सुधारूं लागली आहे" असें बोलून विश्वास आपल्या पत्नीला मनापासून शाबासकी देऊन तिच्या श्रमांचें सार्थक करी. प्रेमाशीं बोलतांना वर्षाशींही बोलण्याचें अवधान तो ठेवी!

प्रेमाची प्रकृति, हवापालट झाल्यानें म्हणा किंवा वर्षाच्या मायेच्या सुश्रुषेनें म्हणा, नाहींतर विश्वासच्या प्रेमळ सहवासाचा लाभ मिळूं लागल्या-मुळें समजा, झपाट्यानें सुधारण्याच्या मार्गाला लागली इतकें खरें.

प्रेमाचें वय तसें कांहीं फारसें नव्हतें. विशीसुद्धां अजून तिनें गांठली नव्हती. पण वयाच्या आणि शिक्षणाच्या मानानें ती विलक्षण समंजस होती. बायका जात्याच भावनाप्रधान असतात. मग प्रेमाही भावनाप्रधान असल्यास विशेष काय? पण तिच्याकडे लक्षपूर्वक पाहाणारास, भावना दिसत नसत. भावनेपेक्षां तिच्यावर विचारांचा पगडा जास्त उठून दिसे. तिचे डोळेच हें निश्चित पटवून देण्यास समर्थ होते. पुष्कळ गरीबांच्या मुली असतात. जात्या हुशार असतात. शाळा कॉलेजांतल्या परीक्षा भराभर पास होऊन पुरुष विद्यार्थ्यां-वरही ताण करतात. आपल्या वयाला व शाळाकॉलेजांतल्या वातावरणाला साजेशा वागतात, नटतात, बागडतात, आनंदांत दंग होतात. त्यांचे आई-बाप आपल्या गरीबीची झळ त्यांना लागू देत नाहींत, जाणवूं देत नाहींत.

आपल्या जीवावर आयुष्यांतला हाच एक कायतो एक काळ मुलामुलींचा निष्काळजीपणांत, आनंदांत वागडण्याचा, हंसण्या खिदळण्याचा, हौसमौज करण्याचा असतो. त्यांच्या त्या सुखांत आपण कमतरता कां करा ? असें म्हणून त्यांना स्वैर सोडतात.

" बाळपणींचा काळ सुखाचा " सार्थ व्हावा, हाच त्यांचा मुलामुलींना वागविण्यांतला मुख्य हेतु असतो.

आणि पुष्कळ मुलेंमुलीं आपल्या त्या वयांतल्या कालाचा आईवडिलांच्या जीवावर खुशाल उपभोग घेत असतातही. त्यांना परिस्थितीची जाणीव नसते. जाणीव करून घेण्याची गरजही नसते. शाळाकॉलेजांतल्या श्रीमंत सौंगड्याहून आपण यत्किंचितही कमी नाहीं, बरोबरच्या आहोंत, अशाच भावनेनें व भरवशानें बेगुमान वागतात.

परंतु प्रेमा तशा वर्गातली नव्हती. तिला वडिलांची गरिबी समजत होती. जाणवत होती, टोंचित होती. लग्नाचा मोसम आला कीं आपल्याला उजवून टाकण्याचा लकडा आईवडिलांच्या मागें लागतो. वडिल, वराच्या शोधाला लागतात, हिंडतात, विवाहेच्छु तरुणांना घरीं आणतात. वधुवर परीक्षा होते. शेवटीं कशामुळें तरी—विशेषतः हुंड्यामुळेंच-सारे वडिलांचे प्रयत्न ॲफस् होतात. आईला वाईट वाटतें. वडील कष्टी होतात. लग्नाचे दिवस निघून जातात. आतां वर्षभर घरीं मुलीला बसवून काय करायचे आहे ? जाऊंद्या शाळेंत—कॉलेजांत. पुढें काय होईल तें खरें. मुली आपल्या अभ्यासाला सुरुवात करतात.

प्रेमाचें असेंच गेलीं चार वर्षे चाललें होतें. आपण सुखी व्हावें, याकरितां आईवडिलांची धडपड, त्यांना आपला भार झेंपत नाहीं. आपण त्यांना खर्चात—कर्जात घालून शिक्षण मिळवतो आहोंत. आपला उपयोग कवडीचा नाहीं; आपल्याप्रमाणेंच आपल्या भावंडांचीही जोखीम त्यांच्यावर आहे; अशा प्रकारची घरोबर वस्तुस्थिति असते. सगळ्याच मुलींना ती कळण्याची अक्कल नसते. पण प्रेमाला त्याची पुरेपूर जाणीव होती. त्यामुळें पुष्कळदां तिच्या मनांत विचार येत, मी शिकून तरी काय करणार ? माझ्या आई वडिलांना काय उपयोग आहे ? लग्न न करतां आयुष्य काढण्याची आपली शक्ति नाहीं. तशी इच्छाही नाहीं. नुसत्या शिक्षणानें आपल्याला हवें तसें स्थळ

लाभेल, असें तरी थोडेंच आहे ? पुष्कळ शिकून शेवटीं एकाद्या ठोंब्या—निर्बुद्धाच्या बरोबर आयुष्य काढण्याची वेळ आली, तर आपल्याला काय सौख्य लागणार आहे ? फसव्या व भूल पाडणाऱ्या भ्रामक आशा नी आकांक्षा, कधींच हातीं न येण्यासारखी वेडी ध्येयें, उराशीं बाळगून उपयोग काय ?

प्रेमा अल्पवयांतही या विचारांची होती. शिकलेल्या मुली बोलायच्या नाहींत. बाहेर दाखवावयाच्या नाहींत नी मनांत कुढल्याशिवाय राहावयाच्याही पण नाहींत. प्रेमाचें असेंच होई. त्या प्रकारच्या विचारांचा जोर झाला म्हणजे तिला तो असह्य होई आणि त्याचाच परिणाम तिला आजारी पाडण्यांत होई.

" खरं म्हणजे माझ्या प्रेमाला एकादा बॅरिस्टर मिळायला हवा ! " प्रेमाची आई एकादे वेळीं तिच्याबद्दलच्या प्रेमानें—अभिमानानें सहज उद्गार काढी. आईची वेडी माया ! दरिद्र्यांचे मनोरथ !

" छेः छेः ! मी तर म्हणतों आमच्या प्रेमाला आय्. सी. एस्‌च हवा. " व्यवहारी कटु अनुभवाची गोळी दाढेंत चघळीत तिचे वडिल बाबासाहेब आपल्या पत्नीशीं ( *खरा नव्हे—तिला बरं वाटण्याकरितां* ) विचारविनिमय करण्याचा पुष्कळ वेळां बहाणा करीत !—

मोठयाची घटकाभर करमणूक ! पण त्यांत लहान जीवांचा चक्काचूर झाल्याशिवाय कसा राहणार ? चुकून प्रेमाच्या कानीं आईवडिलांचे वरील सारखे उद्गार पडत. तेव्हां तिच्या जिवाचें काय होत असेल ? पण कोण हें लक्षांत घेणार ? कारण काय कोणाला ?

प्रेमा अशाच तऱ्हेच्या विचारानें आजारी झाली होती. कॉलेजांतून घरीं गेली. घरून विश्वासकडे हवा पालटण्याकरितां, त्याच्या आग्रहावरून आणि वडिलांच्या सल्ल्यानें ती यावेळीं आली होती.

विश्वासचे मामामामी आपल्या मुलीचें मनोगत जाणत होते. पण ती जशी त्यांच्याजवळ मन उघडें करून त्यांना अधिक दुःखी होण्याला जागा करून देत नव्हती; तसेंच तेही तिच्यासमोर वृथा काथ्याकूट करीत नसत.

विश्वासकडे ती आल्यानंतर, एकदां सहज विश्वासच्या पत्राचें उत्तर त्याच्या मामांनीं त्याला टाकलें, त्यांत त्याच्या मामीच्या सूचनेसह आपला विचार हळूच विश्वासला कळविला होता कीं, चि. कु. प्रेमाकरितां एकादें सुस्थळ तुझ्या कक्षेंत असेल तर पहा. तिच्या आवडीप्रमाणें आणि तुझ्या पसंतीप्रमाणें आणि माहितीप्रमाणें असावें माझी स्थिति तुला माहितच आहे. तुझ्या लौकिकाचा फायदा तिला आणि आम्हांला मिळेल तोच पुष्कळ आहे. तुला यापेक्षां कोणतीच तकलीफ पडायला नको

मामांचें तें पत्र विश्वासनें कोणालाच दाखविलें नव्हतें. वर्षाजवळही त्यानें त्याची परिस्फुटता केली नव्हती

तसें कांहीं आढळल्याशिवाय उगाच त्या विषयाची वाच्यता करण्यांत तरी काय होईल ? म्हणून तो बोललाच नाहीं. परंतु प्रेमाला चांगलें बरें वाटूं लागल्यानंतर जेव्हां ती जाते, जातें, म्हणायला लागली, तेव्हां कांहींतरी निमित्त काढून त्यानें तिला जाऊं मात्र दिलें नाहीं.

वर्षा पण तिला जाऊं देईना. तिचें म्हणणें इतकेंच कीं, " आतांच कुठें तुला बरें वाटावयाला लागलें आहे. अशीच जाशील, श्रम करशील नी पुन्हां दुखणें उलटेल. पहिल्या दुखण्यापेक्षां उलटलेलें दुखणें फार वाईट. म्हणून आपण तुला इतक्यांत जाऊं देणार नाहीं."

दोघांच्याही आग्रहानें प्रेमानें जाण्याचा बेत बाजूला ठेवला. पण हिंडूं फिरूं लागल्यावर मात्र तिचीं कामें ती स्वतः करूं लागली. वर्षाला आपल्या कोणत्याही कामाला ती हात लावूं देईनाशीं झाली.

तेवढ्यांत नाशिकत्र्यंबकेश्वराची यात्रा करायला गेलेल्या भागीर्थीकाकू परत आल्या. त्या आल्यामुळें वर्षाच्या गळ्यांतलें घरकामाचें पेंडें पडल्यासारखें झालें. त्यांचें काम त्यांच्या गळ्यांत घालून वर्षा विश्वासच्या मागें मागें हिंडायला मोकळी झाली.

भागीर्थीकाकूना आलेल्या पाहतांच वर्षाला कोण हायसें वाटलें. एकादें परगांवीं गेलेलें जिव्हाळ्याचें माणूस फार दिवसांनीं अचानक येऊन भेटलें म्हणजे जसें वाटतें, अगदीं तस्सें वर्षाला झालें. भागीर्थीकाकू आल्या. कामाला जुंपल्या. तोंडानें अभंग आणि हातानें स्वयंपाक, हा त्यांचा नित्याचा ठरीव कार्यक्रम सुरू झाला.

गोट्यालाही भागिर्थीकाकू आल्यामुळें फारच आनंद झाला. त्या त्याच्या चेष्टेचे, थट्टामस्करीचें जसें एक साधन होत्या, तसेंच त्याला जपणाऱ्या, जेवूं खाऊ घालणाऱ्या, चहा देणाऱ्या, होत्या, म्हणून त्याच्या थोरल्या बहिणीसारख्या त्याला त्या वाटत होत्या. गोट्या त्यांची थट्टामस्करी करी, पण त्यांचें लहान-मोठे कामही मोठ्या इमानानें करी. म्हणून तोही त्यांना मनापासून आवडे. शिवाय, कथापुराणांत त्या ज्या गोष्टी ऐकत, त्या गोट्यावर मनसोक्त मोठ्या पाल्हाळानें लादीत. त्याला ऐकवीत. तोही मन लावून त्या ऐके. कळो वा नको! नाहीं म्हणायचा नाहीं, नको म्हणायचा नाहीं. नाहीं तरी त्याच्या शिवाय त्या घरांत त्या सांगणार कोणाला? नी त्यांचें ऐकणार कोण? वर्षाला आवडायच्या नाहींत. मग त्यांनीं विश्वासला का सांगायचें?

प्रेमाला घरांत भागिर्थीकाकूंनीं पाहिलें. "ही कोण छानछबेली!" अशा आविर्भावानें त्यांनीं तिच्याकडे दृष्टिक्षेप केला. जेवायच्या वेळेला वर्षाताई व विश्वासबरोबर ती आहेच. ताई तिच्याशी बोलताहेत, मालक आणि ती जेवणावर देखील पुष्कळवेळां इंग्रजींत बोलत आहेत, हंसत आहेत!—

भागिर्थीकाकूंना तो चमत्कार पाहून आचंबाच वाटला. त्यांनीं तिची चौकशी वर्षाताईजवळ मात्र केली नाहीं. हो, केली असती, आणि त्यांनीं मालकिणीच्या तोऱ्यांत, "तुम्हां स्वयंपाकीणींना असल्या चांभारचौकशाच फार लागतात." म्हणून आपला पाणउतारा केला तर घ्या काय! याच विचारांनीं त्या गप्प बसल्या. पण त्यांना चौकशी केल्याशिवाय चैन पडतय थोडेंच?

एक दोन दिवसांनीच, एक दिवस दुपारचीं जेवणींखाणीं, उष्टीखरकटीं झालीं. सारीं माणसें आपापल्या जागीं विश्रांती घ्यायला गेलीं. भागिर्थीकाकू चौघडी टाकून त्यावर कलंडल्या. पडल्यापडल्याच—

*जेथें जातो तेथें तूं माझा सांगाती। चालविशी हातीं धरूनिया॥*

हा अभंग म्हणूं लागल्या. गोट्याही हलकेच त्यांचा अभंग ऐकायला, शिळोण्याच्या गोष्टी करायला, नाशिकत्रिंबकेश्वराकडच्या कथा मौजा विचारून घ्यायला हलकेच भागीर्थीकाकूंजवळ येऊन बसलाच.

त्यांनीं, आपल्या पश्चात् काय झालें, कोण काय आपल्याबद्दल म्हणत होतें,

वगैरे विचारलें. त्यानें कांहीं खरें, कांहीं खोटें, पण तिखटमीठ लावून सांगितलें. स्वयंपाकिणीबायांच्या गंमती सांगितल्या. त्या ऐकून काकू हंसल्या नी गंभीर झाल्या. स्वतःची स्तुति ऐकून त्यांना मूठभर मांस आल्यासारखें वाटलें.

त्यांनीं त्याला यात्रेच्या गोष्टी अघळपघळ सांगून, "तूं पण एकदां यात्रेला जाऊन ये. जन्माचं सार्थक कर." अशा पुन्हां पुन्हां आग्रहानें उपदेश केला. मध्येंच त्यांना कांहीं आठवण झाली, त्यासरशीं, चटकन् उठून बसत त्यांनीं हलक्या अती उत्सुक आवाजांत गोट्याला सहज म्हणून विचारलें, "गोट्या" पुढचे सारे शब्द त्या जवळ जवळ तोंडांतल्या तोंडांतच पुटपुटल्या.

त्यानें कान टवकारले. त्या काय बोलल्या, आपल्याला काय विचारताव, तें त्याला ऐकायला येईना. आजूबाजूस पहात पहात शेवटी, भागीर्थीकाकूंनीं डोळ्यांच्या खुणेनें व हात नाचवीत, " *ती–ती कोण ?* " असें विचारण्याचा प्रयत्न केला. तो आतां समजला. हंसून हलकेंच त्यानेंही आपल्या कल्पनेनें ठरविलेली प्रेमाबद्दलची माहिती काकूंना दिली. डोळे मिचकावीत व कोणी ऐकत नाहीं ना, अशी खात्री करून घेण्याकरितां इकडे तिकडे पहात पहात तो म्हणाला, " ती व्हय ? अव, मालक पणेमा काढत्यात नव्ह ? त्या पायीं ती नटी – इस्टार ( ! ) लेडीचं – काम कराया आनलीया जनूं ? हां ! "

ऐकून भागिर्थीकाकूंनीं आ च वासला ! गोट्याकडे त्या टकमक पाहात राहिल्या !

विश्वासचें स्वरूप, स्वभाव, वागण्याची रीत, बोलण्याची ढब आणि त्याच्या वाढत्या कार्याचा व्याप, हीं सर्व प्रेमानें अल्पावकाशांत आकलन करतांच त्याच्याबद्दल तिला अतोनात आदर आणि आपुलकी वाटायला लागली. दर दिवशीं, किंबहुना दर क्षणीं ती वृद्धींगतच होऊं लागली. तिचें मन तेथें रमूं लागलें. मनाची उदासीनता नी शरीराची क्षीणता केव्हांच जाऊन तिला हुषारी, प्रसन्नता वाटायला लागून ती चांगलीच टवटवीत दिसूं लागली.

प्रथम विश्वास नी वर्षा तिला राहण्याचा आग्रह करीत, आतां तिचें तिलाच आपण होऊन राहावेसें, जाऊं नयेसें वाटूं लागलें. आणि तिला 'जा' असें म्हणणार तरी कोण होतें? मलूल रोपटें, मनाप्रमाणें हवापाणी मिळतांच टवटवीत होतें. तसेंच प्रेमाचें शरीर व मन विश्वासच्या येथें प्रफुल्लीत झालें!

सकाळ दुपारच्या चहाच्या वेळीं विश्वास, वर्षा आणि प्रेमा तिघेही हंसत;

सर्वांच्याच गोष्टी चालायच्या. सर्वांनींच हंसायचें. त्यांत पाहिल्यापेक्षां एक फरक दिसून येऊं लागला. विश्वास कोटीबाज बोलायचा. टिचकीस टोला या न्यायानें प्रेमाही त्याची कोटी सरस प्रतिकोटी पटकन् करून त्याच्यावरच उलटवायची. अशी ललितवाङ्मयात्मक, सरस, मार्मिक कोटी, वर्षाला कळावयाची नाहीं तेव्हां तिला अर्थात् हंसू यायचे नाहीं. ती दोघेच हंसायची. न हंसलें तर वाईट दिसेल, म्हणून थोडी मागाहून ती एकटीच हंसे. व वेळ साजरी करी !

वर्षावरील निरतीशय प्रेमामुळें तिच्यांतील हे व्यंग—हा न्यूनगंड—विश्वासच्या ध्यानांत आला नाहीं, तरी प्रेमाच्या चाणाक्ष नजरेनून वर्षाचा उणेपणा कसा सुटणार ?

बाब क्षुल्लकच, पण सुतानें स्वर्गाला जाऊं पाहणारी बुद्धि—प्रेमाची बुद्धि—तशा एखाद्या क्षुल्लक प्रसंगावरून, विश्वासच्या बेफाट कल्पनेच्या भरारी बरोबर, वर्षाची कल्पनाभरारी जाऊं शकत नाहीं; तिला त्याला खराखुरा सुखी करितां येणें शक्य नाहीं; असा शोध लावी. तिच्याबद्दल कींव करी आणि त्याच्याबद्दल हळहळ करी !

कोण जाणें, प्रेमाच्या मनाचा वेल विश्वासच्या शेजारच्याच शोभिवंत वृक्षावर चढण्याची आकांक्षा बाळगूं लागला कीं काय, असे प्रसंग पाहून सांगतां न येणें कठीणच !

प्रसंग विशेषीं, विश्वासला किंवा वर्षाला नकळत, प्रेमा विश्वासकडे क्षणमात्र आशाळभूत प्रीतीच्या नजरेनें पहात असावी, असा एकाद्याला, तशा एकाद्या वेळीं तिच्याकडे पाहून भास मात्र खचित झाला असता !

प्रीतीच्या चोरट्या पावलाचा आवाज अगोदर कोणालाच कधीं ऐकायला येत नाहीं. पुष्कळदां ज्याचा त्याला सुद्धां ऐकायला येत नसेल, मग ज्याच्या मागून तीं, ज्याला गांठण्याला जात असतील, त्याची जाणीव किंवा त्यांची कल्पना, आकांक्षा मुळांतच नसेल, त्याला कोठून ऐकायला जाणार ?

विश्वासची अवस्था अशाच पैकीं होती.

वर्षा तर काय बोलून चालून भाबडी, निर्मळ मनाची. तिला कोणाबद्दल केव्हांच आणि कसलाच वास येण्याचें कारणच नव्हतें.

आणि खुद्द प्रेमाला तरी काय ? विश्वासच्या सहवासांत आपल्याला आनंद का होतो ? येथेंच राहावें असें कां वाटते ? आपल्या मनाला इतकी प्रसन्नता, इतका उत्साह, इतका अननुभूत आनंद कां वाटावा ? हें तरी स्पष्ट अजून तिला कुठें कळले होतें ?

परंतु नकळत, ती विश्वासकडे आकर्षली जात होती, यांत शंका नाहीं.

यशवंतीविवाहासारख्या विवाहकल्पनेचें मूळ अशाच प्रकारानें आरंभीं मूळ धरीत असेल कीं काय कोण जाणें !

थोड्याशाच सहवासानें, प्रेमा चांगलीच मर्मज्ञ आहे, हे विश्वासच्या लक्षांत आले. त्यानतर त्यांचा दिवसांतला बराचसा रिकामपणचा वेळ वाचनात जाऊं लागला. उत्कृष्ट कथा, कादंबऱ्या, कविता, कांहीं मराठींतल्या तर पुष्कळ इंग्रजीतल्या वाचण्याचा झपाटा सुरू झाला. केव्हां विश्वास स्वतः वाची, तर केव्हां तो प्रेमाला वाचावयाला लावून आपण ऐकत राही ! वाचतां वाचतां मध्येच थांबून, वाचलेल्या भागावर, दोघेही खूप चर्चा पण करीत. पुष्कळदां त्यांचें एक मत होई, अनेकदा मत विरोध पण दिसे. प्रत्येक जण आपापल्या मतांचा पुरस्कार अटीतटीने करीत !

अशा बहुतेक वेळीं, वर्षा तेथें असे. पण तिला कांही बोलताही येत नसे; वाचलेलें विशेष समजतही नसे. त्यामुळे ऐकण्याचा आणि त्यापेक्षां त्या दोघांची चर्चा चाले, त्याचा वर्षाला अतिशय कंटाळा येई. ती बसल्या जागींच आंगाला आळोखेपिळोखे देऊं लागे. तिला जांभया येऊं लागत.

पुष्कळ बायका अद्यावत् साजशृंगार करून नाटकसिनेमाला जातात. त्यांतल्या बहुतेकींना नाटकही कळत नाहीं नी सिनेमाही समजत नाहीं. अशा बायकांच्याबद्दल, अनेकदां, अनेक जण म्हणतात, त्या नाटकसिनेमा पाहून, त्यांतला रसास्वाद घ्यायला मुळीं जातच नाहींत; तर आपलें साजशृंगाराचें सोंग इतरांना दाखवायलाच जात असतात !

प्रेमा-विश्वास यांच्यांत वाचन आणि त्यावरील चर्चा चालू असतांना वर्षा नेहमीं सारखी साजशृंगार करून ऐकत बसली असली म्हणजे तिची स्थिति हुबेहूब नाटकसिनेमा पाहायला गेलेल्या, त्या तऱ्हेच्या बायकांच्या सारखीच होई !

वर्षा बस बस बसे. कंटाळे. कंटाळा आला कीं मध्येंच उठून तिथून जाई. आंत जाऊन, घरांत काय आहे, काय नाहीं, काय आणायला हवें, अशा-सारख्या गोष्टी भागिर्थीकाकूंशीं करण्यांत वेळ दवडी. आईवडील यात्रा करून यायचे आहेत, मावंदे करायचें आहे, त्यावेळीं कोणतें पक्वान्न करायला पाहिजे, किती मंडळींना बोलवायचें आहे, अशांतच ती अधिक रंगून जाई. त्यांत समरस होण्यांत तिला जास्त बरें वाटे. आवडे !

वर्षा बाहेरून आळसटपणानें आंत आली, म्हणजे भागिर्थीकाकूंनीं सहज म्हणूनच तिला विचारावें, "झालं वाटतं ताई वाचायचं ? अलिकडच्या पोरी हुषारच बघा ! प्रेमाताई काय घडाघड वाचतात हो ? नाहीं तर आम्ही ! कांहीं कळायचं नाहीं. कांहीं यायचं नाहीं. फुकट जन्म आमचा !" वर्षा तें ऐकलें न ऐकलें करी नी आपण आपलें बोलणें सुरू करी ! भागिर्थी-काकूंच्या बोलण्यांतली नाजूक खोंच तिच्या ध्यानींही यायची नाहीं. भागिर्थी-काकूंच्या मनांत प्रेमाबद्दल फाजील चौकशी करून, तिच्याबद्दल वर्षाला सावध करावें, असें येई. ओठावर शब्दसुद्धां येत. पण आपली परिस्थिति नी पोट ध्यानांत घेऊन ओठावरचे शब्द तसेच त्या पोटीं लोटीत. वर्षा प्रेमाबद्दल आणि इतर कामाबद्दल काय म्हणते, त्याकडे मग प्रयासानें लक्ष लावीत.

त्यांचें इकडे बोलणें – सांसारिक बाबतींत – चाललें असतां, बाहेर विश्वास आणि प्रेमा यांच्या हंसण्याचा मिश्र आवाज ऐकायला येई. त्यावेळीं भागिर्थीकाकू, एकदम, कान टवकारीत, चेहरा चमत्कारिक करीत आणि "अग बाई ! काय झालं आहे, इतकं हंसण्यासारखं !" असे हंसत पुटपुटत ! वर्षा तर तें ऐकतांच घाईघाईनें तिकडे चालयलाच लागे. त्यांच्या हंसण्याचा – आनंदाचा वांटा आपणही मिळवावा, हीच तिची इच्छा तिकडे जातांना असे. ती गेली म्हणजे तिच्याकडे भागिर्थीकाकू मिस्किलपणें पहात रहात. "भोळी ग बाई भोळी ! कसं व्हायचं पुढें या जीवाचं !" हाच भाव त्यांच्या वर्षाताईकडे पाहण्यांत असायचा. पण तो त्यांचा भाव दिसायला वर्षाच्या पाठीला डोळे कसे असणार ! जवळपास गोटया असला आणि त्यानें काकूंकडे पाहिलें म्हणजे त्या अडाणी जीवाला तें समजे. तो खोक् करून हंसे. काकूंनीं त्याला पाहून डोळे वटारले म्हणजे तो तेथून धूम ठोकी.

वाचनांत, चर्चेत, हंसण्यांत, विश्वासचे आणि प्रेमाचे तासन् तास निघून जात. पहिल्यापहिल्यानें वर्षाला त्याचें कांहीं वाटलें नाहीं. पण अशी स्थिति नेहमीं सारखी कशी राहणार ? आपण बसतों, ऐकतों, मध्येंच उठून जातों; आपण बसलों तरी नी गेलों तरी कुणाच्याच ध्यानीं – विशेषें करून विश्वासच्या–ध्यानीं आपली हालचाल येत नाहीं, असें पुढें पुढें वर्षाच्या मनांत उगीचच येऊं लागलें. त्याबरोबर तिच्या मनांत कालवाकालव होऊं लागली. हृदयाची धडपड व्हायला लागली.

मनांत कुकल्पना आली मात्र, त्यासरशीं वर्षाच्या आपादमस्तक झणझणत विजेचा झटका झटकून गेल्यासारखा झाला. तिचें सर्वांग महिरून गेलें. डोळ्यांपुढें अंधेरी आली. डोळयांतून पाणी घरंगळूं लागलें.

तिला राग आला. प्रेमाचा राग आला. विश्वासचा राग आला. त्यापेक्षां स्वतांचा तिला सगळयांत जास्त राग आला. त्या रागाच्या झटक्यांत विश्वासला जाऊन, प्रेमाच्या देखत ताड्ताड् बोलावें, तिच्याशीं बोलतां, माझी पायमल्ली करितां, माझ्या प्रेमाला तुडवतां असें म्हणून त्याची चांगली कानउघाडणी करावी, डोळे उघडावे, अशी कल्पना येऊन त्या तिरमिरीसरसी ती तडक बाहेर निघाली. पण तितक्यांत तिचे तिलाच काय वाटलें कोणास ठाऊक, ती थबकली. तिचा जोर कुठच्या कुठे गेला. आपल्याला कल्पना आली ती खोटी नसेल कशावरून ? आपल्याच मनाचे हे खेळ नसतील कशावरून ? तीं दोघें काय वाचतात, कां हंसतात, आपल्याला कळत नाहीं, त्यांत आपल्याला सहभागी होतां येत नाहीं, यांत त्यांचा काय दोष ? अशा विचारांनीं वर्षाच्या मनानें उलट कलाटणी घेतली. तिचा जोर नाहींसाच झाला. तरी पण ती अट्टाहासानें बाहेर जाऊन त्यांच्यांत मिसळली. बसली. प्रेमा वाचीत होती. आरामखुर्चीवर पडल्यापडल्या विश्वास ऐकत होता. मधूनच "वाः ! छान !" म्हणत होता. वर्षा येऊन बसतांच, अगदीं सहजगत्या तिला पाहून " कुठें होतीस इतका वेळ ? काय मजेदार आहे पुस्तक ! तूं ऐकायला हवी होतीस. " विश्वास उद्गारला.

त्याचें तें बोलणें. त्याचें तिच्याकडे पाहणें, शब्द उच्चारणें, यांवरून वर्षाची खात्री झाली कीं आपण विश्वासबद्दल कल्पना केली, ती अगदीं अगदीं वेडेपणाची ! विश्वासचें आपल्यावरील पहिलें प्रेम आहे तसेंच आहे.

रतिमात्र कमी झालें नाहीं. ती स्वतःशीच खजील झाली.

परंतु दुष्ट कल्पनेचा नियम असा आहे, कीं ती एकदां एकाद्याच्या मनांत आली, कारणपरत्वें ती गेली असें वाटलें, तरी खरीखुरी ती तशी जात नाहींच. मनांत घर करून, दबा धरून, बसतेंच. आणि सारखी वेळीं अवेळीं डोकें वर काढून आपलें अस्तित्व जाणवत असतें. डिवचित असते. मनाला बेचैन करीत असते.

वर्षाच्या बाबतींत तसेंच झालें. तिची दुष्ट कल्पना अजिबात जायला राजी होईना. अनुकूल संधीची वाट पाहायला सांगूं लागली. कधीं न सुचणारे डावपेंच वर्षाला तिची दुष्ट कल्पना, तिला सुचवूं लागली. शिकवूं लागली. आणि त्याप्रमाणे ती वागावयाला तयार झालीही.

त्या दोघांत वाचन किंवा चर्चा चालूं असतांना, त्यांचे लक्ष त्यांतून निघून आपल्याकडे वेधेल अशा तऱ्हेनें मुद्दाम पाय आपटीत यावें, विश्वासला कांहीं दुसरेंच विचारायला सुरवात तिनें करावी. तसेंच मधूनच उठून जायच्या वेळीं, " काय वाचतां नी किती बोलतां ! तुम्हांला कंटाळा कसा येत नाहीं म्हणतें मी ! " असें म्हणायला चुकायची नाहीं.

आपल्या बोलण्याचा परिणाम त्यांच्यावर काय झाला हें न्याहाळायला सोडायची नाहीं. विश्वास नुसतां खो खो करून हंसे. प्रेमा नुसतीच तिरपी मान करून तिच्याकडे पाही.

विश्वासबद्दल तिला संशय न आला तरी प्रेमानें तिरप्या नजरेनें पाहून आपला उपहास केला असें वाटून तिचा तिच्याबद्दल जळफळाट थोडातरी होई.

" या कारटीला आपण आणायला लावलें, तिच्या खस्ता खाबून आजारांतून तिला उठवली, जेवूं खाऊं घातलीं, नी हीच आतां खाल्ल्या घरचे वासे मोजायला लागली. काना मागून येऊन तिखटपणा करायला लागली. पण मी या तिच्या गमजा चालूं देणार नाहीं म्हणावं — "

अशी कांहींतरी मनाशींच वर्षा पुटपुटत चालती होई.

त्यांत आणखी उप्याला भर. वर्षाची दुष्ट कल्पना दिवसेंदिवस पुष्टच होत जाईल, अशाच घटना पुढें पुढें अगदीं सहजासहजीं घडायला लागल्या.

एक दिवस एका चिकार गर्दीच्या जाहीर सभेंत विश्वासनें प्रेमाला मुख्य व्याख्याती म्हणून व्याख्यान देण्याची संधी आणली. त्या सभेला वर्षालाही त्याने आपल्याबरोबर नेलें. पुष्कळांच्या सहधर्मचारिणी शोभेचा अलंकार म्हणून नी श्रोतृगणाची शोभा वाढविण्यासाठींच आपल्या पतिबरोबर सभा-संमेलनाला जात असतात, तशीच विश्वास बरोबर वर्षाही नेहमीं जात असे. तशीच विश्वासच्या आग्रहानें वर्षा विश्वास-प्रेमाबरोबर सभेला आजही गेली.

प्रेमाचें व्याख्यान त्या दिवशी खरोखरच मुद्देसूद, ठसठशीत, नि परिणामकारक झाले. श्रोतृसमुदायाने, हंशाच्या फवाऱ्यांनीं आणि टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटाने, प्रेमाचे अपूर्व स्वागत केलें. विश्वासला अती आनंद झाला.

परत येताना वर्षाजवळ विश्वासनें प्रेमाची मनमुक्त स्तुति करून म्हटलें, " खरंच सांग वर्षा, आपल्या प्रेमानें किती सुंदर व्याख्यान दिलें नाहीं ? "

तिनें कसें बसे ' होय ' म्हटले. पण तितक्यांत तिच्या दुष्ट कल्पनेनें तिला डिवचले. ती तिच्या कानात गरळ ओकली; " विश्वास प्रेमाची स्तुति करतोय याचा अर्थच हा की, तूं तिच्यासारखी नाहींस. तुझी योग्यता तिच्यासारखी नाहीं. तुझ्याच मुखाने तें तो वदवतोय ! " कल्पना आली. ती अगदी गोरीमोरी झाली. रडकुंडीला आली. डोळ्यांत पाणी मावेना तिच्या.

पुढे आणखी काही दिवसांनीं एका अशाच मोठ्या सभेंत खुद्द विश्वासचेंच व्याख्यान होते. व्याख्यानाला निघतांना प्रेमाला त्यानें बरोबर घेतलें. वर्षाला तयार व्हावयास सांगितलें. पण आपल्याला बरें वाटत नाहीं, अशी सबब सांगून तिनें त्या वेळीं जायचेंच टाळलें. गेलीच नाहीं..

त्या दिवशीं एक चांगली व्याख्याती म्हणून प्रेमाला विश्वासच्या बरोबर व्यासपाठीवर बसविण्यांत आलें होतें.

विश्वास सिनेमाच्या धंद्यांत शिरत होता. त्याच्या मुख्य भागीदाराच्या बरोबरीनें त्याचें नांव, भावी फिल्मकंपनीच्या नांवासह वर्तमानपत्रांतून ठळकठशांनीं गाजूं लागलें होतें. सर्व समाजांत तें गाजत होतें. अशाच वेळीं प्रेमाच्या व्याख्यानाला विश्वास, विश्वासच्या व्याख्यानाला प्रेमा — आणि तेंही त्याच्याबरोबर सन्मानपूर्वक व्यासपीठावर हें पाहून, चांभारचौकशा करणाऱ्यांत-

घरचें खाऊन जगाची उठाठेव करणाऱ्यांत " विश्वास – प्रेमा" बद्दल नसती, भलतीच बारीक कुजबुज सुरू झाली. " ही यांच्या फिल्मकंपनीची हिराईन वाटतें ? सध्यां जो उठतो तो एक देखणी पोरगी काखोटीला लावतो कीं, फिल्मकंपनी काढायला तयार होतो. हें यांना जमतें कसें ? आणि या पोरी त्यांना मिळतात तरी कशा ? "

अशीं वार्तिकें विश्वास – प्रेमाच्या पाठींमागें खुशाल सुरूं व्हायला वेळ लागला नाहीं.

भर उन्हाळ्यांत एकाद्यानें सहज विडी ओढून जळती काडी टाकावी, तिनें जंगलांतल्या गवताला पेटवावें आणि मग जशा ज्वाळा हव्या तशा भडकतात नी सैरावैरा धावूं लागतात, तसेंच कोणाही मोठ्या माणसाबद्दलच्या खऱ्या असोत कीं खोटया असोत, रहस्यमय कथा लोक बरळूं लागतात. तशा कथांचें चर्वीतचर्वण करण्यांतच आनंद मानतात.

तसेंच विश्वास – प्रेमाबद्दल, लोक, जसें कांहीं आपल्याला इत्थंभूत माहित आहे, अशाच तऱ्हेनें कुजबुजूं लागले. त्यावर आपलीं मतें प्रतिपादूं लागले.

भागिर्थीकाकू संध्याकाळीं कीर्तनाला गेल्या. तिथेंही हेंच. कीर्तनाकडे दुर्लक्ष करून, त्यांच्या जवळच्या साळकायामाळकायांनीं, " काय हो, काय तुमच्या मालकांचे अगोचर वागणें हे ! कोण ती बया त्यांनीं घरांत घेतलीय ? चांगली शिकलीय म्हणतात ! नी ती म्हणे, दुसऱ्याची लग्नाची बायको आहे ! धडधडीत नवऱ्याला टाकून सिनेमांत नाचायला आली आहे म्हणे ! तुमच्या मालकिणीला हे आपल्या नवऱ्याचें थेर खपतात कसे म्हणतों आम्हीं ! बाकी, नवरेच असे चळले म्हणजे गरीब बापड्या बायकांनीं करायचं काय म्हणा !– पण तुमचे मालक आतां अशा किती बायकांना नादीं लावणार आहेत नी बिघडविणार आहेत देव जाणें ! नको रे देवा ! हें पाहणं नको नी ऐकणें नको ! " अशा रीतीनें सगळ्याजणींनीं बोलून बोलून भागिर्थीकाकूंना नुसतें भंडावून सोडलें. काकूंनीं कोणाला स्पष्ट कांहींच सांगितलें नाहीं. रामाय स्वस्ति रावणाय स्वति करून कशीबशी वेळ निभावली !

त्या स्वतःच्या भीतीनें बोलल्या नाहींत, पण घरीं येतांच वर्षातांईच्या कानांवर सगळें हें घालावें नी प्रेमाला घरांतून बाहेर घालवून लावावें,

असें मात्र काकूंना वाटलें. पण त्यांची घरी आल्यावर तसें बोलायची छाती झाली नाहीं. कशा बोलणार ?

विश्वास–प्रेमाला बाहेरची ही कुजबूज अजिबात ऐकायला आली नाहीं. त्यांना त्याबद्दल दादपत्ताही नव्हता !

विश्वासच्या भागिदाराचें एका सकाळच्या डाकेलाच तांतडीचें पत्र आलें. " स्टुडिओ ठरविला. बाकीच्या तयारीस सुरुवात झाली. मी लवकरच भेटायला येतों, " वगैरे मजकुराबरोबर एक महत्वाचा मजकूर त्यांत होता. तो म्हणजे विश्वासला त्यानें तात्बडतोब चित्रपटकथा लिहायला अत्याग्रहानें सुचविलें होतें. 'पहिली चित्रपटकथा तुमचीच हवी' असें निक्षून त्यानें लिहिलें होतें.

तो मजकूर वाचून विश्वासला जितका आनंद झाला; तितकाच तो गोंधळूनही गेला. तें पत्र त्यानें प्रेमाला दाखविलें. वर्षालाही आनंदाच्या भरांत सांगितलें.

" कसं काय ग चित्रपटकथानक लिहायचं होईल प्रेमा ? " विश्वासनें डोक्यावरच्या केसांत बोटांची फणी फिरवीत म्हटलं.

" हिमालयाला टेकडी कसे सांगू शकेल हे ? " हंसून प्रेमा उत्तरली.

" लिहायला तूं करशील सहाय्य ? " उत्सुकतेनें विश्वासनें विचारलें.

" गोवर्धन श्रीकृष्णच एकटे उचलूं शकतात. " प्रेमा मार्मिक उत्तरली.

तो हंसला. ती हंसली. वर्षा दोघांकडे पहात गप्प बसली. कुठें हंसायचें तेंच त्या वेळीं तिला कळेना.

चित्रपटकथा लिहिण्याच्या उद्योगाला विश्वास लागला. टाचणें टिपणें करायला त्यानें प्रेमाला जोडीला घेतलें. ती यथाशक्ति यथामति पण मनापासून हौसेनें आणि उत्साहाने त्याला साह्य करूं लागली.

त्यांचें काम चालूं असतां वर्षा तेथें बसे. कंटाळा आला तरी बसून राही. मन लावून ऐके. पाही. कंटाळा येऊन जांभया देत ती चुटक्या वाजवूं लागली म्हणजे विश्वासला तें पाहून हंसूं येई.

" वर्षा, नुसतें पाहूनच इतकी कंटाळलीस ! असं असतं पहा हें किचकट काम ! कंटाळा आला तर कां उगीच शिणतेस ? जाऊन पड जा ना ! "

अत्यंत प्रेमानें नी जिव्हाळ्यानें विश्वास तिला सांगे. पण त्या सांगण्याचा ती उलटाच अर्थ घेई. विश्वासला आपण इथं बसायलासुद्धां नको आहे, असेंच ती समजे. मन खट्टु करून ती मुकाट्यानें तेथून जाई.

ह्या दोघांत आपली तिसरी अडचण विश्वासला नको असते, म्हणूनच तो गोड शब्दांत सांगून आपली ब्याद घालवून देतो, अशीच दुष्ट कल्पना वर्षाच्या मनांत एकसारखी बळावत चालली. ती तिथे बसली नाही तरी किंवा येऊन बसली तरी, तिला समोरचें दृश्य—आपल्या कामांत—विश्वास—प्रेमा गढल्याचें दृश्य—असह्य होई. शब्दाशिवाय, नुसत्या कृतीने—वर्तनानें विश्वास आपला उपहास, अपमान, अवहेलना करतो आहे, ह्याच भयंकर कल्पना तिला येत. तिला त्या दोघांचा आपल्याला तो मुका मार आहे, असें वाटे. त्या मुक्या माराने ती हैराण होई. बेभान, अगतिक होई!

खरेच असें आहे कां? हे अजमावून पाहण्याची तिला एक दिवस दुर्बुद्धि सुचली. विश्वास सांगत होता. प्रेमा टिपून घेत होती. अशा वेळीं वर्षा आली, बसली. थोड्या वेळानें सहज विश्वासनें तिच्याकडे पाहिले. तेव्हा तिनें मुद्दाम खवचटपणानें विचारलें, "मी इथं बसलें तर तुम्हांला त्रास नाहीं ना होत?"

"छेः! तुझा कसला त्रास होणार आहे?" असे म्हणून मान वळवून विश्वास प्रेमाला मजकूर सांगायला लागला. थोड्या वेळानें पुन्हा तिनें विचारलें, "मी जाऊं का?"

विचाराच्या नादांत असल्यानें विश्वास म्हणाला, "जा हवी तर! तूं असलीस तरी आम्हांला त्रास होत नाहीं. गेलीस तरी चालेल!"

झालें! वर्षाची खात्री पटली! ती उठली नी झणकाऱ्यानें चालूं लागली. तिला रडतां भुई थोडी झाली! पण तिच्याकडे लक्ष द्यायला फुरसत होती कुठें कोणाला? तो लिहिण्याच्या नादांतच गर्क होता.

वर्षा पाय आपटीत आपल्या खोलीकडे चालली होती. त्याच वेळीं आगींत तेल ओतल्यासारखें कांहींतरी व्हावयालाच होतें. तें तसें झालेंही लगेच!

वर्षाला सांगायची छाती झाली नव्हती, ते गुह्य गोट्याजवळ घोगऱ्या आवाजांत गर्भिणी मामु, त्या वेळींच आपल्याकडून हलकेंच सांगत होत्या,

" गोट्या, तूं सांगत होतास, तें खरे रे बाबा ! गांवांतल्या सगळ्या बायका बोलताहेत—मला विचारून विचारून सगळ्यांनीं जीव नकोसा केला !—ही शिकलेली घोरपड लग्न करून आपल्या मालकांच्या गळ्यांत कायमची पडणार ! सिनेमांत नटी म्हणून नाचणार रे बाबा ही महामाया प्रेमा ! "

आगींत तेल ओतल्यासारखें व्हायला आणखी काय शिंगें होतीं ? वर्षाच्या कानांवर [illegible]ने ते जळजळीत शब्द पडले ! त्यांच्या सर्वांगाचा भडका झाला ! त्यांनीं धाडकन् दार लावून घेतलें. बिछान्यावर आंग टांकलें. आणि रडून रडून डोळे मुटक्यासारखे केले. डोळ्यांतल्या पाण्यानें उशी चिंब केली; पण विश्वास तिचे डोळे पुसून समजूत काढायला कांहीं आला नाहीं. कसा येणार ? त्याला हे माहित कुठे होते ?

---

एकादा लेखक – मग तो कितीही कसलेला कां असेना, पण एकादे वेळीं लेखन करतांना मध्येंच कुठेंतरी अडतो विचारांची त्याच्या डोक्यांत गर्दी होते, ते मांडण्यासाठीं त्याची मोठी तारंबळ उडून जाते. वेळेवर त्याला एकादा समर्पक शब्दच सुचत नाहीं. त्याच्या तोंडासमोर तो घोंटाळतो पण तो त्याचा होत नाहीं. अशा वेळीं त्याची जी अवस्था होते, त्याची कल्पना, जो लेखक असेल, त्यालाच यथार्थ होईल.

चित्रपटाची कथा लिहितांना विश्वासचें असें किती वेळां तरी होई. त्याला शब्द अडावा. कल्पना सुचूं नये. सुचलेली मनासारखी चितारतांना जमूं नये.

जो शब्द किंवा जी कल्पना, विश्वासला प्रयासानेंही सुचत नसे, तोच शब्द किंवा तीच कल्पना, प्रेमा त्याच्या विचाराशीं समरस होत असल्यानें ती त्याला ऐन वेळीं हलकेच सहज सुचवी.

अशा वेळीं, अशा रीतीनें हवा तोच शब्द, हवी तीच कल्पना प्रेमानें विश्वासला सुचविली, म्हणजे त्याला जो कांहीं परमानंद होई, त्याचें वर्णन काय करावें ? तो एकदम उठे ! " वाः ! वाः ! सुंदर ! सुंदर ! " करीत नाचायच्या बेताला येई ! प्रेमाजवळ जाऊन तिच्या पाठीवर थापटीत, तिला शाबासकी देई ! मनापासून तिचे उपकार मानी ! आणि म्हणे, "शाबास ! प्रेमाताई ! केवढं माझं काम केलेंस ! तूं या वेळीं माझ्याजवळ नसतीस तर माझी किती फजिती झाली असती म्हणतेस ! याकरितां मला तुझी गरज अखेरपर्यंत लागणार ! "

प्रेमा म्हणजे विश्वासला आपली जीवंत स्फूर्तीच वाटल्यास नवल काय ? विश्वासनें अशी स्तुति केली म्हणजे प्रेमाला आनंदानें नी अभिमानानें आकाश ठेंगणें होऊन जाई ! आपण ज्यांच्या मोठेपणानें दिपून जातों, त्यांच्याच उपयोगी एकाद्या क्षुल्लक बाबतींत पडलों नी त्यांनीं त्याबद्दल मुक्तकंठानें आपला गौरव केला, म्हणजे त्या चिमुकल्या जीवाला धन्यता कां वाटणार नाहीं ? आनंद कां होणार नाहीं ?

या वेळीं असेंच झालें. एक सुंदरसा शब्द विश्वासला आठवेना. वाक्य जमेना. त्या वेळीं हलकेंच प्रेमाने नेमका तो शब्द त्याला सुचविला. विश्वासला केवढा आनंद झाला. त्या भरांत ताडकन् उठून प्रेमाजवळ जाऊन त्यानें तिची पाठ थोपटली. धन्यवाद दिले तिला आणि म्हटलें, " तरीपण आमची प्रेमाताई ! आमच्या मामी आपल्या शहाण्या लेकीची उठल्या-सुटल्या उगीच नव्हत्या तोंडभर स्तुति करीत ! प्रेमाताई, तुझ्या या कुशाग्र-बुद्धीवरून त्रिभुवन ओंवाळून टाकावें !" एवढ्याच स्तुतीनें प्रेमा अर्धमेली होऊन गेली. पण तिला किती बरें वाटलें. विश्वास एवढेंच बोलून थांबला नाहीं, तर पुढे आणखी म्हणाला, " प्रेमाताई, तुझ्या या बुद्धीचं कौतुक नी सार्थक करायला तशाच अद्वितीय बुद्धीचा पुरुष तुला जन्माचा जोडीदार मिळायला पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं. आणि मी सांगतों, तसाच तुला सौंगडी मिळणार ! खात्री आहे माझी ! "

हें ऐकून प्रेमाला काय काय झालें, तिचें तीच जाणें ! तिनें ओझरतें विश्वास-कडे क्षणमात्र पाहिलें. लाजून लाजून तिची पुरेवाट झाली ! तिनें खालीं मान घातली ती कितीतरी वेळ वर केलीच नाहीं !

बरें तर बरें, या वेळीं विश्वासचें बोलणें नी प्रेमाची स्थिति ऐकायला नी पाहायला वर्षा तिथें नव्हती! असती तर तिने त्याच वेळीं तिथल्या तिथें आकाशपाताळ एक करायला कमी केलें नसतें!

लिहायचें काम पुष्कळ झालें. थकवा आल्यासारखा झाला. वेळही बराच झाला. "प्रेमाताई! आज पुरें. थकलीस. आता शांतपणानें विश्रांति घे. झोंप जा. आतां उद्यां!" विश्वासनें प्रेमाला म्हटलें; तोही उठला. प्रेमा उठून आपल्या खोलींत झोंपायला निघून गेली. विश्वास आपल्या खोलीकडे वळला.

चांगला मित्र, उत्तम भाऊ आणि उत्कृष्ट पति—ज्या एकाच पुरुषांत अशी सद्‌गुणत्रयी आढळते; त्या वर्गातला विश्वास असल्यामुळें, तो आपल्या निजण्याच्या खोलीचें दार उघडून आंत शिरला, नी मागच्या हातानें दार लोटतांना त्यानें व्यवहारी त्यापांना, लेखनाच्या विचारांना, व्यावसायिक आचारांना खोलीच्या दाराबाहेर रजा दिली. केवळ उत्कृष्ट, एकनिष्ठ पति या एकाच भूमिकेंत विश्वास आपल्या खोलींत उपस्थित झाला.

आतां त्या सृष्टींत तो आणि त्याची अथांग प्रेमाची मूर्ति वर्षा! एवढेंच देहानें भिन्न पण मनानें एक असे दोन जीव उरले!

दिवा प्रकाश देण्याचें आपलें कर्तव्य इमानेइतबारें करीत होता. पलंगावरील स्वच्छ—झिरझिरीत मच्छरदाणींत वर्षा एका कुशीवर भिंतीच्या बाजूस तोंड वळवून गुपचूप निजली होती. विश्वास आंत आल्याचें तिला कळलें कीं नाहीं कोण जाणें! त्याचे पाय वाजले. दार उघडतांना झाकतांना त्याचा किंचित् कर्र आवाज झाला; तरी वर्षानें कांहींच हालचाल केली नाहीं. तिचे हात हालले नाहींत कीं तिनें पायांची चाळवाचाळव केली नाहीं.

विश्वासला वाटलें, वर्षाला गाढ झोंप लागली आहे.

पण त्याला तिच्याशीं बोलावें, तिची थट्टामस्करी करावी, तिला हंसवावे आपणही खिदळावें, हितगुज करावें, अशी सणसणीत लहर आली होती. म्हणून तो हलकेच तिच्याजवळ गेला. न बोलतां, स्पर्श न करतां, तिला जागी कशी करावी, याकरितां क्लृप्ति शोधूं लागला.

बारीकसा केस घेऊन तिच्या गालावर हळूंच फिरवून तिला गुदगुल्या कराव्या म्हणजे आपल्याच गालावर चापट्या मारीत ती उठून बसेल.

गंमत होईल. खोट्या रागानें आपल्यावर ती उसळेल, असें त्याला वाटलें. तो सावकाश मच्छरदाणींत शिरला.

मध्येंच त्याला शंका आली. वर्षाला खरीच झोंप लागली आहे, कीं आपलीच गंमत करण्याकरितां तिनें याचवेळीं बळेंच झोंपेचें सोंग केलें आहे? अगोदर पहावें नी मग तिची गंमत करून तिला उठवावें; हा विचार आला नी त्यानें वांकून पाहण्याकरितां तिच्या अगदीं तोंडाजवळ तोंड नेलें. नुसत्या आपल्या उष्ण श्वासानें ती कदाचित् एकदम खडबडून जागी होईल, घाबरेल, आणि सारी गमत जाईल म्हणून त्यानें श्वासदेखील आवरून धरला. वांकून तिच्याकडे पाहिलें.

तों काय? वर्षा जागी आहे. तिच्या डोळ्यांतून पाणी चाललें आहे. ती स्फुंदून स्फुंदून रडत आहे!

पाहिलें आणि विश्वासाला कांहींच्या काहींच होऊन गेलें.

वर्षा रडतें आहे. स्फुंदते आहे. कां? काय झालें तिला? तापबिप तर तिला आला नाहीं? आपल्याला तिनें सांगितलें कां नाहीं? कळवलें कसें नाहीं? बराच वेळ झाला, आपण पण तिची कशी चौकशी केली नाहीं?

हजार प्रश्न क्षणांत त्याच्या डोक्यांत थैमान घालूं लागले! घाबरलाच तो! त्याने घाबरून, "वर्षा, वर्षा, काय झालय? ताप कां आला आहे?— बरं कां वाटत नाहीं?" असें म्हणत म्हणत तिच्या गालाला, कपाळाला, छातीला, हाताला, पायाला सर्व ठिकाणी आपला मऊ, उबदार, प्रेमळ हातानें स्पर्श करीत पाहिलें.

वर्षाच्या आगांत ताप मुळींच नव्हता!

विश्वासानें तिच्या आंगाला हात लावतांच आणि घाबरटपणानें, "काय झालंय वर्षा तुला?" असे विचारतांच तिच्या अंतःकरणात दुखणाऱ्या दुःखांचा बंधारा फुटला. ती आतां मोठमोठ्यांदा स्फुंदायला लागली.

बोलेना. त्या कुशीवरची या कुशीवर वळेना. आणि विश्वास तिच्या आंगावर हात ठेऊं लागला की, आपल्या हातानें तो झणकाऱ्यानें बाजूस करायला कमी करीना!

वर्षाला काय झालें आहे, हेंच विश्वासला कळेना!

निरतिशय प्रेम करणारा पति प्रेमानें जवळ जाऊं लागला, तर तितक्याच जोरानें त्याला दूर लोटून देण्याचा निर्दयपणा पत्नी कां करते ? असें लोटून तिरस्कारानें झिडकारून त्याला हैराण करण्याचें बायकांना बाळकडूच पाजलेलें असतें कीं काय कोण जाणें !

विश्वास वर्षाची आर्जवें करूं लागला. बळेंच आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करूं लागला. तिला रडायला काय झालें आहे ? आपल्या हातून कांहीं चुकलें काय ? कोणी नोकरांनीं तिचा अपमान केला काय ? एक ना दोन, नाना प्रकारांनीं तिची आळवणी त्याने केली. पण ती जागच्या जागींच आंग घुसळी. तशीच धुमसत राही. विश्वास अगदीं शेवटीं रडकुंडीला आला.

हंसणें, बोलणें बाजूलाच राहिलें. वागायचा तृतीय पंथच वर्षाने आरंभला. भांडणाशिवाय, रुसण्याफुगण्याशिवाय, पतीपत्नींच्या प्रेमाला रंग येत नाहीं, हें खरें. पण त्याला तरी कांहीं सीमा असायला पाहिजेना ? वर्षानें आज अगदीं अतिरेकच चालविला आपल्या तिरसट वागण्याचा !

तरी विश्वास तिच्यावर चिडला नाहीं, रागावला नाहीं, उलट अधिकाधिकच गयावया करायला लागला. त्याचें तिच्यावर तसेंच अमर्याद प्रेम होतें.

बायका आपल्या प्रेमळ पतीच्या आपण 'पायाची दासी' म्हणवून घेण्यांत भूषण मानतात. पण वागतांना मात्र पतीला आपल्या 'पायाचा दास' करतात ! तें अगदीं खरें असतें, हें पटतें तें अशाच प्रसंगीं !

आतां विश्वासच्यानें राहवेना. त्यानें वर्षाच्या दोन्हीं दंडाला धरून बळानें तिला बसती केली. हनुवटीला धरून तिला वर—आपल्याकडे पाहायला लावण्याचा अट्टाहास चालविला. दृष्टीला दृष्टी भिडेल असा शिकस्तीचा प्रयत्न चालविला.

प्रेमळ हातांच्या स्पर्शानें, एकसारख्या प्रेमळ शब्दांनीं, कितीतरी वेळानें वर्षा हळूं हळूं विरघळू लागली. किंचित् ती त्याच्याकडे पाहिलेसें करी. तेव्हां किती किती आनंद होई. तेवढयांत तो तिला अधिक खुलविण्याकरितां, तिच्यापुढें तोंड वेडेंवांकडें करून ती हंसेल असे करी !

प्रेमातिशयानें त्यानें तिला जवळ ओढली. आपल्या विशाल वक्षस्थळावर तिचें मस्तक घेऊन तिच्या केशकलापावरून हळूवार हात फिरवीत, मृदुशब्दांनीं तिच्या रडण्याचें, दुःखाचें कारण विचारण्यास सुरुवात केली.

त्याचा स्पर्श, त्याचीं नेहमींसारखीं आर्जवें, यामुळें वर्षाला याहीवेळीं नव्यानें खात्री पटली, कीं विश्वास आपला–सर्वस्वी–देहानें, मनानें, प्रेमानें सर्वांगांनी–अगदी पहिल्याइतकाच आपला आहे. तो प्रेमाचा–या क्षणापर्यंत–प्रेमाचा नाहीं ! नी मग तिची कळी सावकाश उमलूं लागली. तिला हळूं हळूं आता वाचा फुटूं लागली.

" काय झाल वर्षा तुला ? रडत कां होतीस ? रुसलीस का ? रागावलीस का ? " अशा प्रश्नांना, " कांहीं नाहीं !" एवढ्या दोनच शब्दांचें, उत्तर तो विचारील तितक्या वेळां ती देऊं लागली इतकेंच.

आर्जवें करण्यांत, मन वळविण्यांत, तिला खुषींत आणण्यांत, सारी रात्र जवळ जवळ निघून गेली. त्याच्या डोळ्याला डोळा नाहीं. तिला झोप नाहीं. पण शेवट गोड होण्याचा रागरंग दिसूं लागला. राणीसरकार आतां कुठें प्रसन्न होऊं लागल्या, प्रसन्न झाल्या. तिच्या दोन्ही हातांना त्याच्या माने-भोंवतीं विळखा घालावा, अशा संवेदना होऊं लागल्या. किंचित् हात वर उचलले गेले. विश्वासला तिची चलबिचल कळली. त्यानें ती शिक्षा शिरसा-मान्य आहे, असे आपल्या हालचालीने दर्शविलें.

मध्येच वर्षाने त्याच्या दृष्टीला आपली अस्थिर दृष्टि स्थिर करीत भिडविली. हेतु इतकाच की, विश्वास आपल्याशीं इतका प्रेमाने वागतो आहे, तो खराच, की त्यातही त्याची अजून राखीव लबाडी आहे? याचा कसून सावधगिरीने शोध घ्यावा, तिला धास्ती वाटत होती, त्याच्या डोळ्यांतल्या बाहुलीच्या जागी आपण दिसतो, का ती खट्याळ कार्टी प्रेमा दिसते ? पण तिला तिथें तीच दिसली ! प्रेमा नव्हती !

तिच्या शका निमाल्या. गैरसमज पळाला. दुष्ट खाष्ट कल्पना विरल्या. तिनें त्याच क्षणीं विश्वासच्या मानेभोंवतीं आपल्या कोमल बाहुंचा घट्ट विळखा घातला ! त्यानेंही तिला तसेंच आपल्या बाहुपाशांत कवटाळलें !

दोघांची प्रेमसमाधि लागली. त्या आनंदाच्या समाधींत किती वेळ गेला कोण जाणें ! त्या समाधींत कुकल्पनेचीं भुतें उठलीं नाहींत. त्या कल्पना खोट्या, [illegible] गोट्या जवळचें बरळणें धादांत लटकें. याची तिला शंकाच उरली नाहीं. विश्वासला केवढें समाधान मिलालें. वर्षाही आतां पहिल्या सारखी नितांत प्रफुल्ल झाली !

समाधीं उतरली. बाहुपाश ढिले झाले. दोघेही अपूर्व आनंदाच्या स्थितीत किंचित् दूर झाले. अलौकिक समाधानाच्या तृप्तींत परस्पराकडे पाहात राहिले !

वर्षा का रुसली होती, रागावली होती, याचें कोडें विश्वासच्या मनांत न सुटतां अजून तसेंच राहिलें होतें. त्याची त्याला पुन्हां आठवण झाली. त्याने हंसऱ्या चेहऱ्यानें, " पण वर्षा, तूं रडत कां होतीस ? हे शेवटपर्यंत कळूं दिलं नाहीसच. आतां तरी सांगशील ? " असा प्रश्न तिला टाकलाच

प्रश्न ऐकून ती ओशाळली. उत्तर काय द्यावे याची तिला पंचाईत पडली. खरें सांगायची, का कोण जाणें, तिला लाज वाटली. पण बायका हजर जबाबी, वेळ मारून नेण्यांत मोठ्या तरबेज असतात. ' विजय ' या नावाचे गोजिरवाणे तान्हुले देवानें तिला दिलें होते. त्यांच्या संसारातले सुखाचे ते वैभव दैवानें कांहीं दिवसामागें त्यांच्या हातून नेले होते. वर्षाने विश्वासला पटकन् सांगून टाकलें, " विजया " ची आठवण झाली होती म्हणून "

या बोटावरची थुंकी त्या बरोबर उडवून, आपलें गुपित आपल्याजवळ तसेंच ठेवून दुसऱ्याचें समाधान होईल असें उत्तर देऊन निरुत्तर करण्यांत बायका पटाईत असतात, त्या ह्या अशा ! तिचें काम झालें. विश्वासचें समाधान झालें !

" असें का ? " एवढें मोठ्यानें विश्वास म्हणाला, पण " त्याला काय कोणाचा इलाज ! मला वाटलं आणखी कांहीं भलतंच होतं की काय !, या बायकांचा नेम नाहीं. कशामुळें यांचें बिनसेल नी त्या डोकं फोडायला बसतील, हे ब्रह्मदेवाला देखील कळायचें नाहीं. बायका बिथरल्या म्हणजे त्यांची समजूत पाडणे आम्हां पामरांना काळाच्या अंतापर्यंत साधायचं नाहीं " असें बरेंचसें त्याच्या मनांत आल्याशिवाय राहिलें नाहीं.

पण म्हणतात ना, ज्याचा शेवट गोड तें सारेंच गोड. जसे विश्वासला तसें वर्षालाही त्या वेळीं वाटलें एवढी गोष्ट खरी !

दुसरा दिवस उजाडला. विश्वासच्या दैनंदिनीला आदल्या दिवसापेक्षांही अधिक उत्साहानें सुरुवात झाली. प्रातःकर्मे उरकून, स्नानें, आंगधुणीं होऊन, चहापाणी आटोपून विश्वास आणि प्रेमा लेखनाला लागली. वर्षाविषयींच्या प्रीतीचा कप्पा बंद होऊन प्रेमाताईबद्दलच्या आपुलकीच्या भावनेचा, सहृदयतेचा, जिव्हाळ्याचा, विश्वासच्या हृदयांतला कप्पा खुला झाला.

चित्रपटकथानक आतां बहुतेक कच्चें पुरें झालें होतें. त्यांत जरा मागें-पुढें, जास्तकमी व्हावयाचें होतें. तें करून त्याची स्वच्छ, सुवाच प्रत करावयाला हवी होती. तें काम प्रेमानें आपखुषीनें आपल्या अंगावर घेतलें.

विश्वासच्या समक्ष, त्याच्या नजरेखालीं तिनें लगेच सुरुवातही केली. लिहितां लिहितां, " हे वाक्य फार छान आहे नाहीं ?—हा प्रसंग रजतपटावर भारीच आकर्षक ठरेल. हें वाक्यच विलक्षण विनोदी झालंय. खूप हंशा होईल यानें ! " इत्यादि वाक्यें प्रेमा दाबल्या ओंठांतून मधुरपणें विश्वासला ऐकवीत होती. तोही तिच्या मार्मिकतेची वाहवा करीत होता.

त्याचें हे चालू असतांनाच, एक भलामोठा जाडजूड, उंचा पुरा, खाकी पोषाखवाला, डोकीवर साहेबी टोपी, तोंडांत चिरूट, हातात मोठा सोटा, पायांत जाडे बूट असलेला कोणी पाहुणा दत्त म्हणून त्या जागी उपस्थित झाला !

डोकीवरील टोपी हाताने उंच करून सलामी देत, सिंहगर्जनेप्रमाणे घोगऱ्या आवाजांत गर्जना करीत पाहुण्यानें म्हटलें, " काय रे, विश्वास गुळवणी, आहेस का घरात ? ओळखलंस का आपल्या शाळासोबत्याला ?— "

विश्वासनें त्याच्याकडे पाहिलें. लिहितांना मान वळवून प्रेमानेही पाहिले.

" ओहो ! कोण पार्श्वनाथ पालकर ! " विश्वनाथाने अत्यानदानें आरोळी ठोकीत, आपल्या फार वर्षांनीं अचानक भेटणाऱ्या आपल्या शाळा-सोबत्याचे स्वागत केलें ! " अरे हे रे काय ? ही काळीकुट्ट आफ्रिकेची जंगी हुंडी अचानक इथे कशी केव्हा धडकली बोवा ! मित्रा, तुझें स्वागत असो. ये ये ! ये ! — "

" अरे शाहण्या ! " पार्श्वनाथ पालकर, तोंडांतल्या एका कोपऱ्यांतून चिरुटाच्या धुराचे लोट सोडीत बोबड्या शब्दात म्हणाला, " मी बसायला आलों नाही, तुझ्याकडे काही दिवस पाहुणचार घ्यायला आलो आहे पण अगोदर दारांतल्या गाडीत सामान आहे, ते आणण्याची व्यवस्था कर ना ? मग बसतोंच आहे. आफ्रिकेंतून आलों तो हा सरळ, एकदम, पहिल्यांदा तुझ्याकडेच आलों आहें. "

" ठीक ठीक. यथाशक्ति पाहुण्यांचा परामर्ष घेण्यात कसूर होणार नाहीं "

विश्वासनें असें म्हणत, टेबलावरची कॉलबेल दाबली. गोट्या आला. पाहुण्यांचें सामान आत आणायला त्यानें फर्मावलें. शेजारच्या प्रशस्त आराम खुर्चीवर पार्श्वनाथ पालकराने दाणकन् आपला प्रचंड देह लोटून दिला !

त्या गडबडींत प्रेमाचें लिहिणें थांबलें. ती त्याच्याकडे व विश्वासकडे पाहूं लागली. पार्श्वनाथानेंही त्या जागेंत चौकसपणें पाहतां पाहतां, प्रेमाला न्याहाळलें.

विश्वासच्या ध्यानांत प्रेमाच्या मनाचा गोंधळ झाला. आतां आपल्या बोलण्याच्या धूमधडाक्यांत लिहावयाला शांतपणा सांपडणार नाही, हें ओळखून विश्वास प्रेमाला, हंसत म्हणाला, " प्रेमा, पुरें कर. आतां नाही जमायचें ते. तूं जा, आतां, दुसरं कांहीं पहा. "

तीही त्याच्याकडे पाहात गालांतल्या गालांत हंसली, " मी तेंच म्हणणार होतें " असें कायसेंसें पुटपुटत, प्रेमा तिथून उठून आपल्या खोलीकडे गेली.

तेवढ्यांत कोण आले आहे, हे पाहाण्याकरिता वर्षाही तिथें येऊन डोकावून गेली. तिला विश्वासने पाहिले. पार्श्वनाथानें पाहिले कीं नाहीं, हें त्यानें पाहिलें नाहीं.

" अगोदर चहा पाहिजे बोवा आपल्याला ! " पार्श्वनाथानें खुल्यादिलानें म्हटले, " मग अवांतर हवापाण्याच्या, मागल्यापुढल्या, आफ्रिकन् हुडीच्या गोष्टी ज्या काय तुला विचारायच्या असतील त्या विचार ! "

" अरे पण हो हो ! तुला चहा मिळाल्याशिवाय राहील का ? पण अगोदर आंगावरचें तें खोगीराचे ओझं उतर. जरा मोकळ्या आंगाने घरांत–आल्यासारखा हो कीं येतोंच आहे चहा तोंपर्यंत ! " विश्वासनें तितक्याच मोकळेपणानें हंसत सांगितले.

पार्श्वनाथाने कपडे उतरले. प्रवासी पोषाख बदलला. त्यांच्या गप्पासप्पा सुरू झाल्या.

" आफ्रिका कां सोडलीस ? " विश्वासनें विचारलें.

" महायुद्धाच्या ज्वाळा सारख्या भडकताहेत तुला ठाऊक नाहीं?" पार्श्वनाथ म्हणाला, " त्या ज्वाळेंत आहुती पडावी म्हणून मी तिकडेंच राहावें असं तुला वाटतं कीं काय ? माझा जीव कांहीं इतका वर आला नाहीं, बेट्या ! "

" आलास, चांगलं केलंस ! " विश्वास उद्गारला.

" पण लेका, तुझ्या इतकं अजून माझं चांगलं व्हायचं आहे ! " पार्श्व-नाथ लगेच म्हणाला.

" म्हणजे काय ? "

" लेका, तूं फक्कड फटाकडी बायको पटकावून, सुखाच्या संसारांत मजा मारतो आहेस, " प्रेमाला त्याने पाहिलें; तेवढ्यावरच ती त्याची बायको आहे असें समजून, त्यावरच त्याने कल्पनेची इमारत रचली. विश्वासला धन्यवाद देण्याच्या हेतूनेंच आपल्या रागळ्या भाषेंत पार्श्वनाथ बोलत होता, " तूं देखणी आणि हुषार बायको मिळविलीस, याबद्दल मी तुझं मनापासून अभिनंदन करतो म्हणा ! — पण मूर्खा, हा तुझा पार्श्वनाथ अजून बलभीमा-सारखा ब्रह्मचारी आहे, त्याची काय वाट ? तुझ्यासारखा तो चतुर्भुज होईल, त्याचवेळी तुझ्याइतकं पार्श्वनाथाचं चांगलं होईल. इत्यर्थः ! "

बोलून तो आपणच तोफेचा गडगडाट व्हावा तसा हंसला. विश्वासलाही खूप हंसू आले.

वर्षाला पार्श्वनाथानें पाहिले असावें, तिला उद्देशूनच त्याने तिच्याबद्दल चांगले उद्गार काढले असावे, याच भरंवशानें विश्वासनें, त्याच्या भाष्याचा सन्मानपूर्वक स्वीकार करून म्हटलें,

" पार्श्वनाथ ! माझ्या अर्धांगीच्या बाबतींत मी खराच सुखी आहें ! ती गुणवान् आहे— "

" तें मला माहित नाहीं, " पार्श्वनाथ मध्येच म्हणाला, " ते अजून मला कळायचं आहे. ती रूपवान आहे, हें मी तिला आतांच पाहिलें आहे म्हणून मान्य करतो. आणि तुझ्याप्रमाणें तशी रूपवान बायको मला केव्हां मिळणार याचा विचार करतों. "

" मिळेल मिळेल, काळजी करूं नकोस ! " विश्वनाथानें त्याला तोंडभर आशिर्वाद दिला.

तेवढयात ट्रेमधून चहा घेऊन स्वतः वर्षाच आंत आली. तिनें ट्रे मधल्या लहानशा टेबलावर ठेवला. पार्श्वनाथानें तिला पाहिलें. चकितच झाला तो ! मघाची ती ही नव्हे ! हीही फारच सुंदर आहे. ती कोण आणि ही कोण, पार्श्वनाथाला प्रश्न पडला !

न्ट्रे ठेवून वर्षा जाऊं लागली.

विश्वासनें तिला थांबविलें. " हा पार्श्वनाथ पालकर माझा लहानपणचा शाळासोबती. फार वर्षें आफ्रिकेंत होता म्हणूनच तिकडच्या उन्हानें असा काळाठिक्कर पडला आहे. मूळचा असा नाहीं. नशीब काढायला गेला होता— नशीब काढून— ( खरें ना रे हें ? मी म्हणतों तें ? अशा दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें, तेव्हां त्यानें मान तुकविली आणि मध्येंच "जीव बचावूनही" ही एवढी पुस्ती पार्श्वनाथानें जोडली )— महायुद्धांतून— जीव बचावून— सहिसलामत मायदेशाला आला आहे. माझी आठवण ठेवून आला तो प्रथम आपल्याकडेच आला. असा हा तुझा ' भावजी ' आहे, समजलीस ! आल्याबरोबर त्यानें तुला पाहिली आणि एकदम बेटा तुझी मुक्तकंठानें स्तुतिच करायला लागला ! केलीस ना रे तूं हिची स्तुति ? खरं सांग. नाहीं तर तिला खोटं वाटेल ! "

विश्वास बडबडला. तिनें हंसून मान वेळली. " कांहीतरीच. " पुटपुटली नि निघून गेली. पार्श्वनाथ बुचकळ्यांत पडला. " ही विश्वनाथाची बायको ! मग ती कोण ? कां दोन्हीही बायकाच ! दोन बायकाचा दादला आहे की काय हा ? शहामत आहे याची. दोन बायका सारख्याच सुंदर. सारख्याच याच्यावर फिदा ! आणि अजून आपल्याला एकही बायको नसावी ! काय शिकंदर नाशिबाचे आपण आहोंत ! " त्याच्या मनांत आलें. बोलावेसें वाटलें. पण बोलला मात्र नाही तो

तो आपल्याच विचारांत आहे, तों मध्येच प्रेमा कसलेसें पुस्तक न्यायला मध्येंच आली. तिच्यावर पार्श्वनाथाची दृष्टि खिळली. विश्वासने ते पाहिलें. तिची ओळख करुन द्यायचें राहून गेलें हें लक्षांत येऊन त्याने पार्श्वनाथाला सांगितलें, " ऐकलंस पार्श्वनाथ, हिची ओळख करुन द्यायची आहे. ही प्रेमा— माझी मामेबहिण आहे. सध्यां आमच्याकडेच असतें ! " प्रेमानें विश्वासकडे ओझरतें पाहिल्यासारखें केलें नी ती तेथून पुस्तक घेऊन झटकली.

" असं का ? " एवढेंच जाणाऱ्या प्रेमाकडे पाहात पार्श्वनाथानें म्हटलें.

आफ्रिकेंत पुष्कळ दिवस काढल्यानें, त्याच्या गैरहजेरींत, इकडे शिकलेल्या बायका — पुरुषांशीं वागतांना, किती सुधारल्या आहेत, हें त्याला

माहितच नव्हतें ! त्याला आचंबाच वाटला. पुरुषाशीं बायका – बहिणीही भावाशीं बायकोसारख्या वागतात, आणि बायकाही, नवऱ्याशीं वागतांना बहिणीसारख्या मोकळ्याचाखळ्या वागतात, असें मात्र त्याला वाटलें. आश्चर्य वाटलें. पण त्यांतल्यात्यांत प्रेमा विश्वासची बायको नाहीं, हें समजल्यानें त्याला कां कोण जाणें, जरा हायसें मात्र झालें.

बाकी, इतकी गोष्ट खरी कीं, मकृद्दर्शनीं पाहणाऱ्या पार्श्वनाथ पालकरालाच काय, पण कोणाही त्रयस्थाच्या दृष्टीला, एकदम विश्वास – प्रेमा हें एक प्रीतिविवाहित प्रेमळ जोडपें असावें, अशी दिसण्यासारखी, त्यांची– विशेषतः प्रेमाची वागणूक, मोकळेपणानें वागण्याची मजल गेली होती; यात कांहीं शंका नाही.

मध्यंतरी दोनचार दिवस गेले. पार्श्वनाथ शेजारच्या खुर्चीवर चिरूट ओढीत बसला असला तरी, प्रेमानें तेथेंच आपल्या लेखनाचे काम चालूं ठेवले. विश्वास त्याच्याशी बोलण्यांत, पत्रें, पुस्तकें वाचण्यांत वेळ व्यतीत करी. पार्श्वनाथ प्रेमाकडे, तिचें लक्ष आपल्याकडे नाहीं, हे हेरून कितीतरी वेळ टक लावून पाहात राही.

प्रेमानें लिहितां लिहिता मान वर केलीच, तर ती विश्वास काय करतो त्याच्याकडे, किंवा, त्याच्याच मागें भिंतीला टांगलेल्या त्याच्याच भव्यशा प्रतिमेकडे पाही, पुन्हां लेखनांत मन गुंतवी.

पार्श्वनाथ आल्यापासून, त्या सर्वांचा सकाळ दुपारचा चहा, त्याच बैठकीच्या जागेंत होऊं लागला.

पार्श्वनाथ आपल्याकडे निराळ्या भावनेच्या दृष्टीनें पाहात असतो, याची प्रेमाला बिलकूल दखलगिरी नव्हती. तिचें मन, चित्त, विचार, ही सर्व एकट्या विश्वासवर खिळून राहिलीं होतीं. त्याच्या विषयीं, तिच्या मनांत प्रेमाच्या स्पष्ट तर लाटा हेलावूं लागल्या होत्या. तो आपल्याशीं बोलतो, आपल्याला नांवाजतो, शाबासकी देतो, जिव्हाळ्यानें आणि आपुलकीनें वागवितो, तेव्हां त्याच्या मनांतही आपल्या विषयीं प्रेमांकूर निर्माण झाला असेल, असेंच तिचें पोरसवदा मन तिला दरक्षणीं ग्वाही देत होतें. अशा विचारांत सर्व काळ गढलेलें तिचें मन पार्श्वनाथ पालकराकडे कसल्याच नजरेनें चुकून तरी कधीं कां पाहील !

" तुझ्या जन्माचा जोडीदार, तुझ्या तीव्र – तीक्ष्ण–कुशाग्र बुद्धीला साजेल असाच मिळायला हवा. आणि तसाच तुला मिळेल. " असें विश्वास आपल्याला म्हणाला. त्याचा अर्थ काय ? आपल्याला साजणारा, ओळखणारा, सुखी करणारा – विश्वासशिवाय आहे कोण दुसरा ? वर्षापेक्षां आपल्या चिरसंगतीनें विश्वासला सुखी करण्यास आपणच खऱ्या नी जास्त लायक आहोंत. विश्वास आपल्यामुळें सुखी होईलच पण आपण किती सुखी होऊं ! विश्वासचा चिरसहवास आपल्याला मिळाला, तर आपल्या आईबाबांना किती धन्यता, किती हायसें वाटेल......"

प्रेमा अलिकडे, लिहितां वाचतांना, निजतां उठतांना, जेवतां खातांना, विश्वासशीं बोलतां चालतांना, अष्टौप्रहर याच प्रकारचे विचार मनाशीं खेळवूं लागली होती. पण तिनें त्यांची परिस्फुटता कुठेंच, कोणाजवळच केली नव्हती. फारतर काय, मनीं चिंतिलेलें फळाफुलांना येईपर्यंत, आपल्याच उजव्या कानाची गोष्ट आपल्या डाव्या कानाला कळूं द्यायची नाहीं, ही तिची धडपड होती.

पण एक दिवस तिचें तें बेड अचानक फुटलेंच. त्याचें असें झालें— ती दुपारच्या चहाची वेळ होती. प्रेमा चित्रपटकथानकाची प्रत तयार करीत होती. विश्वास–पार्श्वनाथ मध्येंच कुठें बाहेर कशालासें गेले होते. वर्षाला ते माहीत नव्हतें. ती चहाची तयारी आंत करीत होती.

लिहितांना प्रेमा मध्येंच थांबली. दुसरें कोणीच नाहीं, हे तिच्या ध्यानांत आलें. तिची दृष्टी समोरच्या विश्वासच्या भव्य प्रतिमेवर खिळली. तिचें मन उचंबळायला लागलें. तिला राहवेना. ती उठली. प्रतिमेजवळ गेली. ती उंच टांगली होती, तर तिनें पायाखालीं जवळची खुर्ची ओढून घेतली. त्या प्रतिमेवर तिनें आपले दोन्ही हात ठेवले. तोंडाजवळ तोंड नेलें. एकाग्रतेनें ती त्या प्रतिमेकडे पाहण्यांत बेभान झाली. प्रतिमेला उद्देशून ती कांहींतरी स्वतःशीं पुटपुटत होती कीं काय कोण जाणें !

एकाद्या कुशल नाटककारानें, त्यावेळचें प्रेमाचें प्रेममय मनोगत शब्दांत व्यक्त करावयाचें ठरविलें असतें तर—

" विश्वास, मला तुझं व्हावंसं वाटतं. मी वेडी झालें आहें. तूं माझा होशील का ? तूं हिमालय आहेस. मी लहान टेकडी आहे. तुझ्या पायांजवळ या टेकडीला कायमचं स्थान नाहीं कां देणार तूं ? तूं बुद्धीचा, मनाचा, प्रेमाचा सागर आहेस ! मी लहानशी नदी आहे. तुला भेटायला, तुझ्याशीं समरस व्हायला ही नदी अधीर झाली आहे. अडचणींच्या दऱ्या, संकटाचे पर्वत उल्लंघित, उडया घेत तुला भेटायला धावत सुटली आहे. तिला तूं आपली म्हणशील ना ? होय म्हण ! म्हण होय ! मला मोकलूं नकोस. दूर लोटूं नकोस. हांस. हसून सांग, मी तुझा स्वीकार करीन म्हणून—केला म्हणून ! तूं स्वीकार केला नाहीस, तर मी जीव देईन. आत्महत्या करीन !—वर्षापेक्षा खचित मी तुला अधिक सुखी करीन ! असं नाहीं का तुला वाटत ? मला तूं आणलं आहेस. मला तूं ओळखलं आहेस. मग जीवांच्या जिवलगा, तूं माझा स्वीकार करणार नाहीस, असं कसं होईल ? आजपासून मी तुझी झालें ! तूं माझा झालास. मी तुझ्या पायांची दासी ! तूं माझ्या प्रीतीचा परमेश्वर !—"

असेंच हुबेहुब चितारले असते. आणि हे आपलेच मनोगत आहे, म्हणून प्रेमानेंही मनःपूर्वक सानद कबूल केलें असते.

पाहातां पाहातां आवेगाने प्रेमानें विश्वासच्या प्रतिमेंतील तोंडाजवळ—अगदीं जवळ—आपलें तोंड नेलें.

तोंच वर्षा दारांतून चहाचा ट्रे घेऊन आंत आली. तिनें प्रेमाकडे, तिच्या कृतीकडे पाहिले त्यासरशीं वर्षा संतापली. तिचे सर्वांग थरथर कापूं लागलें. त्यामुळें तिच्या हातांतील ट्रे निसटून खालीं पडला. कपबशा फुटल्याचा, ट्रे पडल्याचा आवाज एकदम झाला !— चमकून, दचकून प्रेमानें एकदम मागे वळून पाहिलें ! दोघींची दृष्टादृष्ट झाली ! वर्षाच्या डोळ्यांतील अंगार जाळून टाकण्याइतका फुलला होता ! प्रेमा भानावर आली. खुर्चीवरून खालीं उतरली. ओशाळगतीनें तिनें आपली मान एकदम खालीं घातली ! काय करणार बिचारी !

पार्श्वनाथ पालकर आला, त्या दिवशींची सकाळ सर्वसाधारण औपचारिक बोलण्यांत कशीबशी गेली. प्रेमाच्या लेखनकार्यातही खण्ड पडला. विश्वासनें तिला, 'आतां उद्यां' असें सांगून टाकलें. तिनें ह्यावेळीं ऐकलें. पण तें त्यावेळेपुरतेंच. दुपारपासून ती आपण होऊनच आपल्या जागेवर लिहांवयाला येऊन बसली.

जेवणानंतर पार्श्वनाथ आणि विश्वास यांच्या गप्पाष्टकांना सुरुवात झाली. पार्श्वनाथ जात्या हुशार— विश्वासपेक्षांही तैल आणि तीव्र बुद्धीचा आणि धडाडीचा. 'साहसे श्रीः प्रतिवसति' हें तत्त्व त्याला बालपणांच पटलेलें. त्याला अनुसरून त्यानें महाराष्ट्रीय कूपमंडूक वृत्ति सोडून आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्याकरितां, कोणाची सल्ला न घेतांच आली संधि साधून आफ्रिकेकडे मोर्चा वळविला होता.

आणि आपल्या कल्पनेप्रमाणें त्यानें तिकडे चांगलें नशीबही पण खरोखर काढले होतें.

आतां मात्र तो आला होता, तो तिकडचें सारें चंबूगबाळें गुंडाळून कायमचा आपल्या मायदेशांत वास्तव्य करण्याकारितांच. एकादा तयार बंगला मिळाल्यास घ्यावा किंवा जरूर तर नवा बांधावा, लग्न करावें, संसार मांडावा; आणि इथेंच जमेल तो, जुळेल तो धंदा उभारावा, त्यांत स्वतःचें जवळचें भांडवल गुंतवावें; अशाच विचारानें तो आला होता.

कांहींतरी मोठा उद्योग करावा, व्याप वाढवावा, म्हणजे मनुष्याच्या आंगांत तडफ राहाते, उत्साह वाढतो, जगण्यांत स्वारस्य वाटतें; याच अशा विचारांचा पार्श्वनाथ होता. आपण कावाडकष्ट करून, पै-पैसा संभाळून ठेवून पुंजी केली आहे, ती एकाद्या बँकेत ठेवावी, त्यावर जे पोटापुरतें व्याज मिळेल, तेवढ्यांत जेवून खाऊन खुशाल काळाला दगड मारीत असावें, एकाद्या आकुंचित बुद्धीच्या पेन्शनराप्रमाणें रांडरोटी खात हरि हरि म्हणत बसावें, असें त्याला कधींच वाटत नसे.

दुपारच्या बैठकींत विश्वासनें आपल्या मित्राला यक्षासारखा एकच सूचक प्रश्न टाकण्याबरोबर, "आफ्रिकेला जायला निघाल्यापासून परत येईपर्यंतची साद्यंत हकीकत" पार्श्वनाथानें आपल्या खणखणीत आणि भरदार आवाजांत अगदीं ऐसपैस रीतीनें सांगायला सुरवात केली. वक्ता चांगला अस्खलीत बोलका. विषय त्याच्या जिव्हाळ्याचा म्हणजे खास स्वतः—संबधाचाच! मग वक्तृत्वाला काय उणें? आणि श्रोता त्याचा बालदोस्त! त्यांतून आस्थेवाईक! त्याच्या जोडीला भक्तीभावानें आणि कुतुहलानें ऐकायला वर्षा हजर! प्रेमा खालीं मान घालून तिथेंच लिहायला ठाण मांडून बसलेली. तिचें मन नसलें तरी कान ऐकणार नाहींत असें थोडेंच?

मग पार्श्वनाथाच्या आत्मकथनपर रसाळ व्याख्यानाला और रंग चढल्याशिवाय कसा राहणार?

अचाट माहितीबरोबर अलोट मनरंजनाची खुसखुशीत, तशी चमचमीत मेजवानीच पार्श्वनाथानें विश्वासला व त्याच्या परिवाराला दिली! विश्वास जिवाचें कान आणि मनाचें भान करून त्याच्या सांगण्याकडे लक्ष देण्यांत

गुंतला होता. वर्षा ऐकत होती. त्याच्याकडे व पार्श्वनाथाकडे अधून मधून पाहात होती. हंसत होती. मधूनच तिला न कळणारें, न पटणारे बरेंचसें गुन्हाळ आले म्हणजे दुर्लक्ष करून पेंगतही होती. बोलतांना, त्या भरांत तो सर्वाकडेच पाही. मधूनच सफाईनें प्रेमाकडेही त्याचें लक्ष जाई ! ती खाली मान घालून लिहित आहे असें त्याला दिसलें, तरी आपलें बोलणें ती खास ऐकत आहे, असें त्याला वाटत होतें तिने आपलें बोलणे ऐकावे – कां कोण जाणे– त्याला वाटत असावें, असें, तो तिच्याकडे पाहतांना जो भाव त्याच्या चर्येवर दृग्गोचर होई, त्यावरून कोणालाही वाटलें असते.

बोलताना चिरूट शिलगावण्याकरितां पार्श्वनाथ जरा थांबला. विश्वासचें घड्याळाकडे लक्ष गेलें, चहाची वेळ झाली होती. हळूंच त्याने वर्षाला सुचविलें. ती चहा करायला आत गेली. बैठक विस्कळीत झाल्यासारखे वाटले. त्याबरोबर विषयाचा ओघही आपोआप बदलला.

“ लहानपणीं तूं जसा हूड होतास – तोच हूडपणा आणि [illegible] गाजवलास म्हणायचा ! ” विश्वासने म्हटले.

“ आणि अजून तसाच आहे. जन्मभरही तसाच राहणार ! ” पार्श्वनाथ म्हणाला; “ जित्याची खोड मेल्याशिवाय जाणार थोडीच ! आणि तुला सांगतों, मनुष्यात हूडपणा असलाच पाहिजे. त्याशिवाय जिवतपणा नाही. आयुष्यात मजा नाहीं माझा अनुभव मी तुला सांगतो. ”

“ बरोबर आहे ! ” विश्वासनें संपूर्ण सहमत दर्शविले.

“ माझं पुराण ऐकलंस विश्वास. पण आतां तुझी कांहीतरी कथा कळूं दे ना मला ? ” पार्श्वनाथानें विश्वासला विचारलें, “ कांही आडमाप उपद्याप चालवला आहेस कीं नाहीं ? का बापानें ठेवलेल्या डबोल्यावर आळसांत नुसता लोळत पडला आहेस ? ”

“ माझं तुझ्याप्रमाणें बेफाट असें कांहीं नाहीं बोवा ! ” विश्वास उत्तरला.

“ कां नाहीं ? जरा बेफाट हो ना ? त्याशिवाय आयुष्याला लजत नाही. खरेंच कांहीं नाहीं करीत ? बावळटच आहेस लेका मग ! लहानपणीं असा बावळट – निष्क्रिय राहशील असं मला नव्हतं वाटलं ! अरे, अशानेंच आपला हिंदुस्थान गुलाम बनला ! परभृत झाला ! जित बनला ! ” पार्श्वनाथ आवेशानें विश्वासवर ओरडला.

" खरं आहे ! " विश्वासनें शांतपणें, हलक्या आवाजांत हंसून म्हटलें. पार्श्वनाथ अधिकच चिडला; " खरं काय आहे तुझं डोकं ? निष्क्रीय राहाणाराच्या, आळशाच्या, दुर्बलाच्या — बायकासुद्धां जबरदस्त लोक खुशाल पळवतात. माहित नाहीं ? कर्तबगाराच्या वाटेला कोणी जात नाहीं. "

प्रेमाने एकदम चमकून विश्वासकडे आणि पार्श्वनाथाकडे पाहिले.

खाडकन् उत्तर देऊन पार्श्वनाथाचें तोंड एकदम बंद कां करीत नाहीं विश्वास असें तिला वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

" अरे पण ऐकून तर घेशील ? " विश्वास म्हणाला, " मी तुझ्या इतका बेफाट, धडाडीचा नाहीं, असं म्हटलं. मुळींच कांहीं करीत नाहीं असं का तुला सांगितलं ? "

अशी प्रस्तावना करून विश्वासनें आपल्या नव्या उद्योगाची स्थूल रूप रेपा सागायला सुरवात केली. बोलता बोलतां, त्याच्या मनांत एक चटकन् कल्पना चमकून गेली. पार्श्वनाथ कसल्यातरी धंद्यांत आपले भांडवल गुंतविणारच आहे, मग त्याने आपल्याच जोडीला कां येऊं नये ? पैशास—पैसा मिळणारा सिनेमाचा धंदा पार्श्वनाथाला पसंत का पडणार नाहीं ? अशा विचारानें विश्वासनें, त्या अनुरोधानें त्याच्याशीं बोलणें सुरू केले.

पुष्कळ लोकांचें असें असतें; एकाद्याला जी एकादी गोष्ट आवडते, तीच सर्वांना आवडत असली पाहिजे, आवडावी असें वाटत असते. आणि तो ती आपली आवडती गोष्ट ज्याच्या त्याच्यावर लादीत सुटतो; " ही गोष्ट तुम्ही आचरणात आणाच, " असें अट्टहासानें एकसारखा प्रतिपादित असतो.

विश्वासने, त्याच अभिनिवेशानें पार्श्वनाथाला आपल्या आवडत्या आकर्षक सिनेमाधंद्याची महती सागावयाला आरंभ केला. आपल्याबरोबर, त्यानेंही सिनेमाधंद्यांत भांडवल गुंतवावे, असें सूतोवाच केलें.

तेव्हा मोठ्यांदा हंसून पार्श्वनाथ विश्वासला म्हणाला, " म्हणजे काय ? तूं मोठ्या प्रेमानें काडेचिराइताचा काढा पेलाभर प्यालास, तर तो मीहि तुझ्याबरोबर घ्यावा असा प्रेमाचा आग्रह मला तूं करतोस का काय ? "

" म्हणजे ? सिनेमाचा धंदा म्हणजे काडेचिराइताचा काढा आहे वाटतं ? " विश्वासनें त्याला उलट प्रश्न केला.

" नसेल. पण मला तो तुझ्यासारखाच आवडला पाहिजे असं शास्त्र आहे कीं काय ? " पार्श्वनाथानें आपली कैफीयत मांडली; " मी दुसऱ्याच्या चालींनं चालणारा नाहीं. माझ्या चालीनं चालणारा आहे स्वतःच्या चालीने चालून मनुष्य खड्डयांत पडला तर त्याला वाईट वाटत नाहीं. दुसऱ्याला दोष देत नाहीं. दुसऱ्याच्या विचारानें वागून नुकसान झाले; म्हणजे मनुष्य आपला गाढवपणा विसरतो. दुसऱ्याच्या नांवानें शंख करीत सुटतो. हे तूं विसरतोस विश्वास ! "

" अगदीं बरोबर ! " विश्वासनें एकदम कबूल केलें. " तुझ्या चालीनं तूं चाल. आनंद आहे मला. माझा मात्र कृतसंकल्प ठरला आहे. आपण सिनेमाक्षेत्रात पडणार ! "

" ब्रेहो ! मी तेंच म्हणतों. तुला तो धंदा पसंत आहे. आवडतो. खुशाल कर ! धंदा बेफाट आहे. अफाट आहे. शहाणपणाने केला तर सोन्याची खाण आहे. " पार्श्वनाथ प्रोत्साहनाच्या स्वरांत म्हणाला, " मला हेच पाहिजे. हेंच, असंच आवडतं ! व्यापाराचं विस्तीर्ण क्षेत्र म्हणजे प्रतिरणक्षेत्र आहे ! त्यांत धांवपळ आहे. धडपड आहे. हाणाहाणी, ठोकाठोकी, मुत्सद्देगिरी, कल्पकता सर्व कांहीं भरगच्च आहे. युद्धांत मेला तर स्वर्ग, जगला तर राज्यप्राप्ति हे जसे आहे, तसेच व्यापारांत यशस्वी झाला तर अफाट ऐश्वर्य, आणि बुडाला तर – निदान, " धडाडीचा बहाद्दर ! " म्हणून अजरामर नाव आहेच !

पार्श्वनाथानें सावेश पुष्टी दिली. विश्वासला साभिमान समाधान वाटलें.

वर्षा चहा घेऊन आंत आली. चहापान सुरू झाले. मग पुढे त्या दिवशींचा चहापानानंतर विषय तितकाच संपला.

पार्श्वनाथ आल्या वेळीं विश्वासनें त्याला, " घर तुझं आहे. संकोचायचं नाहीं. मोकळेपणानें वागायचं. हवी ती व्यवस्था नोकराचाकरांना सांगून बेशक करून घ्यायची. " असें सांगितलें होतें. त्यावेळीं, " तूं मला सांगूं नकोस. मी ते जाणतों. तुझें घर तें माझं घर. तुझे नोकरचाकर, ते माझे नोकरचाकर ! तुझं अन्न, माझें तोंड हें मी विसरत नाहीं, मोकळेपणांत कसूर कधींच करणार नाहीं " असे सडेतोड उत्तर देऊन तसेंच वागायलाही पार्श्वनाथाने केव्हाच कमी केलें नाहीं !

" गोट्या ! " म्हणून गोट्याला आज्ञेच्या आवाजांत पार्श्वनाथानें हाक मारली कीं, हात जोडून कांपत कांपतच गोट्या त्याच्यापुढे हजर राही. पार्श्वनाथाचा तो प्रचंड पण पिळदार देह, त्याचे गरगरीत मोठे डोळे, तो सैलसा सद्रा, आपली न्यारीच तऱ्हा म्हणून घरात वावरताना मद्राशा सारखे नुसतेच कमरेला गुंडाळलेले पायघोळ धोतर आणि त्याचा हुकूमशाही आवाज, या सर्वांचा परिणाम गोट्यासारख्या निरक्षर नोकरावर जबरदस्त झाल्याशिवाय कसा राहणार ?

निदान पार्श्वनाथाच्या हाकेसरसा त्याच्यापुढे गोटया जेव्हां येई, तेव्हा तो आल्यावर, आपल्यावर पार्श्वनाथाचा तसा भयंकर परिणाम झाला आहे, अशा थाटांत गोट्या पार्श्वनाथापुढे नम्रतेनेच उभा राही !

व्यक्तिमत्त्व म्हणतात तें यालाच !

परंतु पार्श्वनाथासारख्या, मनानें, बुद्धीनें, कर्तबगारीनें आणि देहाने सुद्धां व्यक्तिमत्त्वाचा लाभ झालेल्यावर कुणाच्या तरी, दुसऱ्याच्या सहजीं डोळ्यांत न भरणाऱ्या, लक्षांत न येणाऱ्या, अशा लहानशा जीवाच्या व्यक्तित्वाची छाप बसूं शकते. अगदीं सकृद्दर्शनीं छाप बसते. प्रेमाला पार्श्वनाथानें पाहिल्याक्षणीं, तिच्यांत त्याला काय वाटलें कोणास ठाऊक. पण तिचे व्यक्तिमत्व त्याला जाणवलें! क्षणमात्रच तिची दृष्टि त्याच्यावर स्थिरावली असेल, तेवढयांत, त्या दृष्टींत काही तरी विलक्षण जादू आहे, आपल्याला आवडणारी, आकर्षण करणारी जादू आहे, असेंच त्याला वाटलें. प्रथमतः विश्वासची ती अर्धांगी असावी, अशा समजानें, त्यानें तिची विश्वासजवळ वाखाणणी करून, त्याच्या भाग्याला धन्यवाद दिले हें खरें, पण त्याच वेळीं त्याच्या अंतर्मनावर असली सहधर्मचारिणी आपल्याला असावी, या इच्छेचा ठसा, त्यालाही न कळत-सुद्धां पडला नसेलच असें निश्चित कोणी म्हणावे ?

म्हणूनच जेव्हा प्रेमाची ओळख करून देतांना विश्वासनें त्याला आपली मामेबहिण आहे असें सांगितलें, तेव्हां त्याला एक प्रकारचा अज्ञात असा आनंद झाला ! पुढें जेवताखातांना बोलण्याच्या ओघांत प्रेमा अजून अविवाहित आहे, असा सहज कोणाच्या तरी तोंडून उल्लेख झालेला पार्श्वनाथाला ऐकायला आला; तेव्हां तर त्याला विशेषच बरें वाटलें.

प्रेमा, विश्वासची—आपल्या मित्राची—बहिण, अविवाहिता; आपण विश्वासचे मित्र, आपल्याला संसारी व्हावयाचें आहे, मनासारखी जन्माची सांगातीण आपल्याला हवी आहे; ही प्रेमा आपली झाली तर? आपल्याला मिळाली तर? तर मग आणखी आपल्याला काय पाहिजे?......

या प्रकारचे नवे— प्रोत्साहक— लोभनीय विचार, एका क्षणात पार्श्वनाथाच्या मनांत किती तुफान वेगानें आले असतील, हे सांगतां येत नाही. पार्श्वनाथाचे पार्श्वनाथालाही ते सांगता आलें नसते!

लग्न जमणें— हा एक योगायोग आहे, लग्नबंधनानें परस्पराना बांधून घेण्यासाठीं, एकमेक, एकमेकाला शोधीत येतात. शोधीत जातात. कुणी तरी कोणाची जणूं काय वाटच पहात असतात. दोन जीव कुठल्यातरी, कारणाने— अज्ञात कारणानें— एकमेकाकरितांच असतात. त्याना जवळ आणणें, भेटवणें, आकर्षित करणें आणि शेवटीं परस्परांमध्यें लग्नगांठ बांधून टाकणे— हें कार्य कुणीतरी परस्पर घडवीत असतो. त्यालाच कोणी कोणी योगायोग म्हणतात. प्रेमाबद्दलचे विचार पार्श्वनाथाच्या मनांत येण्याबरोबर, त्यालाही असें वाटले असेल, हिच्याच करितां आफ्रिका सोडून मला योगायोगानें इथें आणलें नसेल कशावरून? आपण ज्यावेळीं येथें आलों, त्याच्या आधीच ती येथें येऊन कां राहिली असावी? खास खास आपल्यासाठींच, असें आपण कां मानूं नये?

विश्वाससमोर इकडच्या तिकडच्या— आफ्रिकेंतल्या, आपल्या पराक्रमाच्या अनेक लंब्याचवडया कथा पार्श्वनाथ सांगत होता, त्या वेळीं सर्वांप्रमाणें प्रेमावरही त्यांचा परिणाम हटकून होत आहे, असेंच तो धरून चालला होता.

पण प्रेमाचें त्याच्या बोलण्यावर लक्ष असून नसल्यासारखेंच होतें. तिच्या मनात अवघा विश्वास व्यापून राहिला असल्यानें ती पार्श्वनाथाच्या, त्याच्या बोलण्याचा विशेष विचार करायला स्वतंत्र अशी उरली नव्हती.

आणि खरेंच सांगावयाचें तर, पार्श्वनाथ जरी विश्वासचा मित्र होता, तो आल्यापासून विश्वास त्याचा उदोउदो करीत सुटला होता, त्याचे गोडवे गात होता, तरी प्रेमाला त्याच्याकडे पाहून विशेष असें कांहीं वाटलेंच नव्हते. किंवा असें म्हणण्यापेक्षां त्याच्यांत विशेष कांहीं असेल या भावनेनें आणि

उत्सुकतेनें तिनें त्याला निरखिलेंच नव्हतें, असे म्हटलें तर तें जास्त सयुक्तिक ठरेल. प्रेमाच्या व्यक्तिमत्वानें पार्श्वनाथ भारला गेला. भारल्या दृष्टीनें तो तिच्याकडे पाहात होता. तिच्याशीं बोलण्याची प्रबळ इच्छा त्याला झाली होती. पण उगाच बोलणार कसा आणि केव्हां ? त्या दिवशीं तो आणि विश्वासच बोलत होते. वर्षा ऐकत होती. प्रेमा तर खालीं मान घालून लेखन करीत होती. पार्श्वनाथाला अधूनमधून एकदोनदां कांहींतरी प्रश्न विचारून वर्षाने आपला रसिकपणा आणि मनमोकळेपणा दाखविला होता पण प्रेमानें फारसें वर देखील पाहिलें नव्हतें, तर मग त्याला ती विचारून त्याच्यापुढें आपला बोलकेपणा व्यक्त करणार कुठली ? केव्हां आणि कसा ?

तिच्या मुग्धपणाचें विश्वासला किंवा वर्षाला विशेष कांहीं वाटलें नाहीं. पण पार्श्वनाथाच्या दृष्टीतून तें सुटले नाहीं. जाणवल्याशिवाय राहिलें नाहीं. पण त्याला प्रेमाच्या त्याही मुग्धपणाचें एकप्रकारचे वैशिष्ठ्यच वाटत होतें.

शिकलेल्या पोरी पुरुषांत मिसळण्याचें, मोकळेपणानें बोलण्याचें पुष्कळदां प्रदर्शन करतात पण त्यांत कांहीं अर्थ नसतो ! त्या वाटेल त्याच्याशीं कधींच बोलायला तयार नसतात. त्याना ज्याच्यांशीं बोलावयचें असनें, त्यांच्याशींच फक्त त्या बोलूं शकतात. त्यांना नको असलेला एकादा, लुब्रेपणा करून त्यांच्याशीं बोलायला गेला, तर त्या एक शब्दही न बोलतां नुसत्या तिरस्काराच्या एकाच दृष्टिक्षेपानें त्याला अशा फट्करून टाकतात, कीं ज्याचे नांव ते !

पार्श्वनाथाला हें माहित होतें. प्रेमा सुशिक्षित दिसते, तेव्हां तीही तशीच असेल कीं काय, असा उडता विचार त्याच्या डोक्यांत भर्रकन् येऊन गेला. परंतु तोही कांहीं तसा अगदींच लेचापेचा नव्हता.

अगदीं अल्पकाळांत ती त्याच्या मनांत भरली. हवीशी वाटूं लागली. तेव्हां तिच्याशीं बोलायचें, तिच्या हृदयांत आपल्याला स्थान मिळवायचें असा त्यानें संकल्पच केला. किती शिकल्या तरी बायका त्या बायकाच. पुरुषांनीं एकदां मनांत घेतल्यावर, त्यांना बोलक्या करायला, आपल्याशा करायला, फारसें कठीण नसतें, असें समजणाऱ्यापैकींच पार्श्वनाथ होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चहापान झाल्यावर प्रेमा आपल्या जागीं लिहावयाला बसली. वर्षा घरांतल्या कामांत गुंतली. विश्वासला कांहीं जरूरीचें काम होतें, म्हणून पार्श्वनाथाची परवानगी घेऊन, " जरा बाहेर जाऊन येतों. "

असें सांगून तो बाहेर गेला.

बैठकीच्या जागेंत प्रेमा आणि पार्श्वनाथ दोघेच राहिले. ती लिहिण्यांत गर्क आणि तो चिरुट ओढण्याच्या कामाशिवाय रिकामा !

त्यानें प्रेमाशीं बोलायचें ठरविलें आणि लगेच सुरुवातच केली— " आपल्याबरोबर बोलायचा मान मला मिळेल का ? "

प्रश्न आपल्यालाच आहे हे प्रेमाच्या ध्यानांत आलें. ती चमकलीच. त्रयस्थाशीं उगीच काय बोलायचें आणि तेही हातांतलें काम सोडून ?

अर्थात् ती कांहींच बोलली नाहीं.

पार्श्वनाथ जरा वेळ थांबला. पुन्हां त्याने तिला प्रश्न टाकला—

" आपण माझ्याशी बोलूं शकतां ? "

प्रेमा काय उत्तर देणार ! कोडेंच पडलें तिला.

आपल्या दुसऱ्याही प्रश्नाला काहीच उत्तर नाही, हे पाहून पार्श्वनाथाला चमत्कारच वाटला ! त्याने मनाशीं म्हटलें, " काय पोरगी मख्ख आहे; आपल्याला उत्तरच देत नाहीं. "

जरा वेळ जाऊं देऊन त्याने पुन्हा हिय्या केला—

" विश्वाससारख्या बोलभांडाची बहिण इतकी अबोल कशी बोवा ? जगांतलं दहावं आश्चर्यच आहे हे ! "

प्रेमाला पार्श्वनाथाचा हा केवळ बाष्कळपणा वाटला ! तिने त्याच्याकडे नुसते तिरस्कारानें पाहिले न बोलतांच तिने त्याला निरुत्तर करण्याचा प्रयत्न केला !

प्रेमाच्या त्या एका तिरस्काराच्या दृष्टिक्षेपानें आपल्या प्रचंड व्यक्तीमत्वाला धक्काच बसला असें पार्श्वनाथाला क्षणभर वाटल्याशिवाय राहिलें नाही.

जरा अस्वस्थता वाटली. पण त्याला तिचा राग मात्र आला नाहीं. ज्या व्यक्तीबद्दल प्रेम उत्पन्न होतें, तिनें कसेही वागलें तरी कोणाला राग येईल ?

पार्श्वनाथानें आतां प्रेमाला प्रत्यक्ष प्रश्न करण्याचें सोडून दिले. दुसरीच क्लृप्ति योजली ! तिला ऐकायला जाईल असें कांहींसें तिच्याकडे पहात मोठ्यानें आपल्याशींच बोलण्याचा उपक्रम केला—

" आफ्रिकेच्या जंगलांत कित्येक वर्षं काढलेले आम्ही बोलून चालून जंगली लोक ! विदूषीशीं कसं बोलावें, हें आम्हांला कळायचं नाहीं; पण त्यांनीं

आपल्याशीं बोलावसं तर वाटतं. त्या बोलायला तयार होत नाहींत, हें जंगल्याचं दुर्दैव म्हणायचं. विदुषींनीं आपल्याशीं बोलावं, आम्हांला त्यांच्यांशीं बोलण्याची सुवर्ण संधी मिळावी, आपल्यांत त्यांनीं आम्हांला मिसळून घ्यावं, असं वाटतं पुष्कळ ! पण उपयोग काय ? आमच्या नशिबांत पाहिजे ना ? "

पार्श्वनाथ एकेक वाक्य सावकाश उच्चारीत होता. मिस्कीलपणानें प्रेमाकडे पाहात होता. ती आपलीं वाक्यें ऐकते आहे, ही त्याला खात्री होती. मध्येंच ती किंचितशी हंसली, असा त्याला भासही झाला. तेव्हां त्याला बरें वाटलें.

आपल्या या बोलण्यावर चिडून तीं कांहींतरी वेंचक - बोंचक बोलेल, असे वाटलें, पण ती मात्र त्याची निराशा झाली.

पार्श्वनाथाच्या त्या अगांतुकपणाच्या बोलण्यानें तिचें लेखनाकडचें लक्ष उडालें. तिला लिहितांही येईना आणि त्याच्या प्रश्नाला उत्तरें देण्याचेंही अजून तिच्या मनांत येईना.

लिहिणें बंद करून तेथून निघून जावें असें तिला वाटायला लागलें. तिने प्रयत्न केला — टांक खालीं ठेवला — कागद जुळवूं लागली, तेव्हां पार्श्वनाथाला वाटलें, ती आपल्याशीं बोलायला सिद्ध होते आहे.

" कसलं एवढं लेखन करतां आहांत ? " तिला उत्तर देतां यावें म्हणून त्याने मुद्दाम विचारले—

आता मात्र प्रेमाला त्याच्या ह्या वागण्याचा जुलूम झाला ! तिला वाटलें, हा कोणी एकादा माथेफिरू पागल तर नाहीं ? काय वाटेल तें विचारीत काय सुटला आहे ? विश्वासचा कसला असला हा स्नेही ? आपण याच्याशीं बोलायला लागलों तर हा कुठवर मजल नेईल कोणास माहित ? आणि न बोललों तरी एकाद्या नाटक — सिनेमांतल्या प्रेमवेड्याप्रमाणें, " तुझ्यावर माझें प्रेम आहे. मला पदरांत घेऊन पावन कर ! " असें म्हणत एकदम आपले पाय तर येऊन नाहीं धरायचा हा ?

प्रेमाला कल्पना आली आणि तिचें सर्वांग थरारलें. त्या बरोबर ती एकदम तेथून जायला उठलीच.

" कां हो, उठलांत ? निघालांत ? आमच्याशीं बोलायला आपल्याला मुळींच आवडत नाहीं ? " पार्श्वनाथ गडबडीनें म्हणाला, " तसं सांगा, माझी हरकत नाहीं. नाहीं आवडत तर नाहीं. त्याला कोण काय करणार ? "

तेवढ्यांत गोट्या पाहुण्याना काय हवें – नको, कांहीं काम आहे काय ? हें विचारण्याकरितां तिथें आला. त्यानें पार्श्वनाथाचे कांहीं शब्द ऐकले. बेटा मोठा मिस्किल ! निरक्षर खरा, पण भारी चाणाक्ष आणि धूर्त ! कालचा पाहुणा आज लगेच – प्रेमाताईशीं लाडीगोडी लावूं पाहातो आहे, हें त्यानें हेरलें. या लहान वाटणाऱ्या लोकांची दृष्टी कावळ्याची असते. ता म्हणतां ताकभात ओळखण्यांत हे फार तरबेज असतात. मोठ्या लोकांच्या नाना – लीला चालतात, त्याना वाटते, आपल्याला कोणी पहात नाहीं. पाहिलें तरी त्यांना कांहीं समजत नाहीं. पण गोट्यासारखे प्राणी त्यांची ही भूल कशी असते हें सहज पटवून देतात.

प्रेमाला कल्पना आली नव्हती कीं पार्श्वनाथ आपल्या बद्दल कामुक होऊन बोलूं चाहत आहे. तेंच गोट्याच्या काय पण झटपट ध्यानांत आलें ! स्वतःच्या हातून घडणारी साधी चूक पुष्कळ वेळां समजत नाहीं; तीच एकादा साधा त्रयस्थ सहज चट्दिशीं दाखवून देतो, तसेंच आहे हे !

गोट्या आला, उभा राहिला. त्यांचे बोलणें ऐकलें. त्याच्याकडे कोणी पाहिलें नाहीं, आणि कोणी काहीं त्याला फर्मानही सोडलें नाहीं. डोळे मिचकावीत आपल्याशींच मिस्कीलपणानें हसत तो मागल्या पावलीं चालता झाला.

प्रेमा जायला निघाली. पण पार्श्वनाथ दारांत येऊन आपल्याला अडवतोय कीं काय ? आणि बोलल्या शिवाय चाललीस कुठे ? नाहीं जाऊं देणार ! असें म्हणतो कीं काय ? अशी तिला धास्तीच वाटली.

पण तिचें गाऱ्हाणें देवानेंच ऐकलें. तितक्यांत बाहेर गेलेला विश्वास आला. आपला जीव भांड्यांत पडल्यासारखें प्रेमाला वाटलें. ती निर्धास्तपणें तेथून चालायला लागली.

कपडे काढीत विश्वासनें पार्श्वनाथाला विचारलें, "कसं काय ? मला यायला जरा उशीर झाला. पण तुझा वेळ कंटाळवाणा नाहीं ना गेला ? प्रेमा होतीच तुझ्याशीं बोलायला !"

"हं ऽऽ ! होती ती. पण–" पार्श्वनाथ मध्येंच थांबला.

"पण काय ? तूं बोललाच नाहींस तिच्याशीं ? कां ?" विश्वासनें त्याला हंसत हंसत विचारलें.

" मी बोललों रे! मला बोलायला कोणी सांगावं लागत नाहीं शिकवावं लागत नाहीं. कोणाशीं तरी बोलत राहिल्याशिवाय मला चैन पडत नाहीं! पण– " पार्श्वनाथ म्हणाला, " पण काय रे, तुझी बहिण– काय तिचं नांव! प्रेमा नाहीं का? ती नांवाप्रमाण प्रेमळ दिसली– पण ती मुकी आहे का रे?— "

" म्हणजे?— "

" म्हणजे काय विचारतोस? " पार्श्वनाथानें सांगितलें, " मी तिच्याशीं खूप बोलण्याचा प्रयत्न करून वेळ आनंदांत घालवावा म्हटलें, पण तिनें अखेरपर्यंत– म्हणजे तूं येईपर्यंत खूप मला मुका मार दिला! "

विश्वास तें ऐकून खूप मोठ्यानें हंसला.

पार्श्वनाथानें हंसण्याचें सोंग आणलें. पण त्याला खरें हंसूं आलेंच नाहीं. प्रेमाच्या अबोलपणानें तो किंचित् रुष्टच झाला.

" गरीब पोर! घाबरली असेल तुला! " विश्वासनें प्रेमाच्या वतीनें बाजू सावरण्याकरितां म्हटलें.

" माझ्या रंगरूपाला का प्रचंड देहाला? " पार्श्वनाथ उत्तरला; " म्हणजे मी इतका का भयंकर आहे?— "

" तसं नव्हे रे!– तसा तूं वाईट नाहींस. पण ती चिमुरडी पोर– तुझ्यासारख्या प्रचंड पंडिताशीं काय बोलणार? तुझ्या विद्वत्तेला ती दिपून गेली असेल आणि त्यामुळे तिला बोलायचें सुचलेंच नसेल. माफ कर हं तिला. आमची प्रेमा खरीच तशी फार चांगली– हुषार आणि चुणचुणीत आहे. तुझा खरा स्वभाव समजला म्हणजे, लागेल तुझ्याशीं हळूं हळूं बोलायला! " विश्वासनें मनापासून प्रेमाची वकिली आपण होऊन केली.

पार्श्वनाथाला तेवढयानें खरोखर बराच धीर आला!

---

*" आधी बीज एकलें । आधी बीज एकलें ॥*
*बीज अंकुरलें । रोप वाढलें ॥*
*एका बीजा पोटीं, पोटी तरुकोटी सुमनें फुलें ॥ "*

प्रभातचा ' तुकाराम ' नुकतांच भागिर्थीकाकूंनीं पाहिला होता. त्यांतला अभंग त्या आळवून आळवून म्हणत होत्या. सगळा अभंग त्यांच्या तोंडांत अजून पक्का बसला नव्हता. जशी ओळ आठवेल, तशी तीच पुन्हां पुन्हां म्हणावी. ती म्हणतांना पुढच्या ओळी आठविण्याचा प्रयत्न करावा, असें त्यांचें चाललें होतें. त्यामुळें त्या तीच तीच ओळ एकसारख्या म्हणत होत्या. म्हणत असतांना भक्तीभावानें त्या डुलूं लागत; पण पुढची ओळ आठवेना, म्हणजे त्या थांबत. त्याबरोबर त्यांचें डुलणेंहि साहजिकच संपुष्टांत येई.

आतां देखील तसेंच झालें. भागीर्थीकाकू अभंग म्हणतां म्हणतां थांबल्या, अडखळल्या.

जवळच गोट्या आपलें दुपारपर्यंतचें कामधाम उरकून रोजच्यासारखा भागीर्थीकाकूंच्या भक्तीच्या लीला पहायला—ऐकायला, त्यांची थट्टा करायला टपून बसलाच होता एका बाजूला.

त्या थांबल्या, त्याबरोबर गोट्या हंसला. त्यांनीं डोळे उघडून त्याच्याकडे पाहिलें आणि त्याला उद्देशून,

" काय झालं रे मेल्या हंसायला ? " जरा हंसतच पण रागाचा आव दाखवून भागीर्थीकाकू गोट्याला म्हणाल्या, " मला अभंग आठवेना म्हणून हंसतोस काय ? मला अजून पाठ झाला नाहीं, त्याला मी काय करूं ? "

" तसं नव्ह व काकू ! मी त्येच्या पायीं कुट हंसलुया ! " गोट्यानें म्हटलें;

" मी हंसलों त्येचं कारण लै न्यारं हाय ! "

" कसलं कारण तुझ्या डोंबलाच ! सांग तरी. मग मी म्हणेन — "

" तुम्हास्नी राग येणार नसल तर सांगतों— "

गोट्या काय वात्रटपणा करणार त्याची कल्पना भागीर्थीकाकूंना आली. त्याचा वात्रटपणा, बोलणें, ही सर्व भागीर्थीकाकूंना पुरतीं माहित झालीं होतीं. तो काय म्हणणार हें ओळखून लांब पाय करून आणि एकावर एक पाय चढवीत, त्याच त्याला म्हणाल्या,

" सिनेमांतला अभंग म्हणतें म्हणून मला सिनेमांत घालविणार असशील! होय ना ? " आपणच म्हणाल्या आणि आपणच हंसल्या. इतकेंच नव्हें तर, " जाईन बाबा, एखाद्या वेळीं सिनेमांत सुद्धां मी जाईन, न जायला तरी मला काय झालें ? "

" तुम्ही मस्त जाल व–" गोट्या म्हणाला, "पर उपेग काय तुमचा ?" पणेमांत तुम्हास्नी काकू आतां चानस ( chance ) है कुठं ? लै चकोट तुम्हीं अभंग म्हणताया. पर तुम्हास्नीं आतां कोन बी पणेमांत घेनार नाहीं!"

" कां रे बाबा चट घेतील ! मी गेलें तर—"

" पर आतां वाव है कुटं तत ? समंदी त्येंची पणेमाची जंग जोड कवाच जमलीया. आतां तुम्हास्नी इचारतो कोन ? "

" म्हणजे काय ? — " भागीर्थीकाकूंच्या भक्तीची इतिश्री झाली. अभंगाकडचें अवधान सुटलें; गोट्याच्या वात्रट गोष्टी ऐकण्याकडे त्यांचें ध्यान लागलें. त्यांनीं गोट्याला विचारलें, " कुणाची कसली जंगजोड झाली म्हणतोस ? "

" काकू, तुमच्या ध्येनामंदी काय बी कसं येत नाहीं व ? "

गोट्यानें इकडे तिकडे तेवढ्यांत पाहून, आपण बोलतो. तें कोणी ऐकत नाहीं ना ? अशाबद्दल कानोसा घेतला, आणि मग भागीर्थीकाकूंना डोळे मिचकावीत आणि मिस्कीलपणानें हंसत तो सांगायला लागला,

" षणेमाला कोन कोन मानसं लागत्याती तुम्हास्नी ठाव हाय का अगुदर बोला ? "

भागीर्थीकाकूंनीं नकारार्थी मान हालविली. नाहींतर त्यांना माहित कुठून असणार !

" एक ' आषक ' लागतुया. आन् त्येच्या संगती दुसरी एक ' आवा ' व्होवी. "

" आवा ? इश्श ! गोट्या काय बोलतोस रे हे घाणेरडं ? " काकूंनीं नाक मुरडीत म्हटलें.

" अव, आवा म्हंजी एक तरणी न् देखणी फटाकडी बाई ! " गोट्यानें आवा शब्दाच्या खुलासा करीत म्हटलें, " आतां मंदी मंदी मला वायलं इचारू नगा. समदं माझं ऐकून घ्या न् मग बोला. तुमच्या पुरानांतल्या कथा मी कसा गुमान, मुकाट्यानं बसून ऐकतों. हांग, तसं आज माझं " षणेमा पुराण " तुम्हीं ऐकून ग्यान घेया व्होवं. " अशी प्रस्तावना करून पुढें तो काकूंना स्वताला माहीत झालेली सिनेमाची माहिती देऊं लागला,

" काय सांगितलं तुम्हास्नी ? हां एक 'आषक' एक ' आवा ' व्हय ना ? आन् योक " डाकू " पर लागतुया बगा. आन् त्येच्या बगार वायला योक ' चक्रं ' पर होवाच ! इक्तं लोक जमलं म्हंजी कंचा पर षणेमा उभा राहिलाच बगा ! "

" काय सांगतोस ह्यांतल एक अक्षर कळेल तर शपथ मला मेल्या ! " काकूंनीं त्याला मूर्खांत काढण्याकरितां म्हटलें.

" ऐका व ! ध्येनामंदि ना यायला का झालं ? चट ध्येनामंदि येतया. वाईच ध्यान द्या. " गोट्या जोरांत येऊन सांगत होता,

" आपलं मालक षणेमा काढत्यात नव्हं ? त्येनीं त्या पायीं मानसं जमवलीं संमदी ! 'आषक' आपलं मालक हैतीच. व्हय का नाहीं ? आतां हांवी 'आवा.' त्या पायीं आपल्या परमाताई ऐत्या त्येस्नी गवसल्या का नाहीं ? "

गोट्याच्या बोलण्यांतला भावार्थ आतां कुठें मात्र भागीर्थीकाकूंच्या ध्यानांत आला. त्या चकितच झाल्या. पण त्यामुळें त्या पुराण जितकं लक्षपूर्वक ऐकायला कधीं बसल्या नसतील, त्यापेक्षां एकाग्र मन करून आतां उत्कंठेनें गोट्याचा पुढचा वात्रटपणा ऐकायला लागल्या.

" असं म्हणतोस होय ! " अशा अर्थानें त्यांनीं मान तुकविली आणि पुढें ऐकण्याची इच्छा दाखविली.

" दोन झालीं माणसं ! कळली. आतां कोण उरलं ?— "

" डाकू ! " गोट्याच पटकन् बोलला ! " पर काकू, आमच्या मालकास्नी त्यो पर डाकू गवासला, कीं ! कोन त्यो आला ध्येना मंदी ?—नाहीं ? अव, त्यो–त्यो — " गोट्याला 'डाकू' चें काम करण्यासाठींच पार्श्वनाथ पालकरला विश्वासनें मुद्दाम आणवला आहे असा विश्वास वाटत होता. त्याला उद्देशूनच तो बोलत होता. पार्श्वनाथ पालकरचें त्यानें नांव घेतलें नाहीं. डोळे वटारून, गाल फुगवून आणि शरीराचा लठ्ठपणा दाखविण्यासाठीं हातांचा जसा उपयोग करतात, तसे हात करीत पार्श्वनाथ पालकराची धिप्पाड मूर्ति गोट्यानें अभिनयाच्या जोरावर भागीर्थीकाकूंच्या दृष्टीसमोर उभी केली.

भागीर्थीकाकूंना ' पार्श्वनाथ पालकर ' समजला. तेव्हां त्यांना खूप हंसायला आले.

" तो कोण ? " त्यांनीं मुद्दाम पुन्हां विचारलें.

" त्यो डाकू ! " गोट्यानें उत्तर दिलें.

" आणि तूं रे कोण ? " काकूंनीं उगीच विचारलें.

" मालक व्हय म्हनत्याल तर मी त्येंच्यांत ' चक्रं ' होव म्हनतों ! "

गोट्यानें चटकन् सांगितलें. " अशी बगा, मालकाच्या षणेमापायीं समंद्या माणसांची जंगजोड जमलीया. आतां बोला ? तुम्हास्नी षणेमांत वाव राह्यलाय कुटं ? "

तोही हंसला. आणि काकूही हंसल्या.

वरच्या वर्गातल्या माणसांच्या कोणत्याही ‘ लीलां ’ बद्दल सामान्य वर्गातली लहान माणसें या पेक्षां आणखी काय कुजबुजणार ? कुजबुजतात. बोलतात. चर्चा करतात. टीका करतात. चेष्टा कुचेष्टा करतात. आणि घटकाभर आपल्या थकल्या भागल्या जीवाची करमणूक करून घेऊन थोड्या वेळांत तें सारें विसरूनही जातात.

“ पण अशीं माणसं जमून मग तीं करतात काय ? ” “ ततः किम् ? ”— या थाटांत, गोटयाच्या तोंडचीं आणखीं मुक्ताफळें ऐकून स्वतःची करमणूक करून घेण्यासाठीं गोट्याला [illegible]नीं विचारलें.

“ कंच्या बी षणमांत बघा ! हीं मानसं असत्यातीच ! त्येचा धदा योकच्च ! ” गोट्या माहिती देऊं लागला, “ आषक आन् आवा एकामेकावर प्रीति करत्याती. झुरत्यात, रडत्यात. तळमळत्यात. एकमेकास्नी मिट्या मारत्यात. एका जागीं जलम काढावा म्हनून हैरान व्हत्यात. मधीच डाकू त्येच्या मंदी घुसतो. त्येला ती ‘ आवा ’ होवीशी वाटते. तो तिच्या मागं लागतो ! ( हें सांगतांना अर्थात् गोटयाच्या डोळयापुढें सकाळीं प्रेमा आणि पार्श्वनाथ पालकर, यांचा संवाद होता हे सांगायला का पाहिजे ? ) आवा त्येला लाथेन पाणी पाजते; वक्तावर पायांतली चप्पल घेऊन त्येचं टाळकं सडाकतें ! मग तो वाघावानीं गुरगुरतो. चवताळतो. आषक आन् आवा, ह्यास्नी त्यो डाकू वायलं करतो. त्येच्या वाटंत काटं न् खडं पसारतो— ”

“ आणि चक्रं काय झोपा काढतो वाटतं ? तो काय करतो ? ”

काकूंनीं त्याच्याकडे पाहात मध्येंच विचारिलें.

“ चक्रं काय करनार ? तोंड येडं वांकडं करतो. आचावाचा बोलतों आन् समद्यास्नी पोट धरधरून हंसायला लावतों !— ” गोटयानें म्हटलें. त्याच्या बोलण्याचें काकूंना जास्तच हसूं आलें; तेव्हां “ हां हिंग, तुम्हीं हंसला नव्हं ? तसंच चक्रं लोकास्नी हंसवतो. वक्तावर डाकूलाबी चकिवतो. आषक–आवांच्या उपेगी बी पडतो. ” हेंही त्यानें सांगून टाकलें.

“ असल्या सिनेमाचा शेवट रे काय व्हायचा ? — ”

" लै करून षणेमांत आषक – आवा एक व्हत्यात. डाकू खोडयांत पडतो. तुरुंगांत जातो. नाहीं तर एकाद्या वक्ती जीव बी देतो. " कसलेल्या कथा लेखकावरही गोटयानें ही माहिती देऊन ताण केली; " पर काकू, आमच्या मालकांच्या षणेमांत शेवटाला काय व्हनार ह्यें उमगत नाहीं बगा! परमाताई मालकाच्या व्हत्यात कीं कालचा आलाय त्यो डाकू त्यास्नी कारखो-टीला मारून गुंगारा मारतोय परमीसर जाणं!"

काकूंनीं अंगावर शहारे आल्याप्रमाणें आंग कांपवले! " नको रे देवा, हे ऐकायला नी पाह्यला पण!" असे म्हणत, हात जोडले! कानांवर ठेवले आणि साळसूदपणाचा आव आणित गोटयाला म्हटलें, " चल पुरें कर तुझं! कुणाबद्दल कांहीं तरी बोलूं नकोस! आपले मालक तशांतलें नाहींत प्रेमाताई पण तशा अगदीं ह्या नाहीत. चावटपणानें पुन्हां असं मालकांच्या बद्दल बोललास तर पहा मग! – मी वर्षाताईना सांगेन!"

आणि त्या लगेच आंग झाडून तेथून उठल्याच!

विश्वास आणि प्रेमा यांच्याबद्दल गोटयानें लढवलेली कल्पना भागीर्थी-काकूंना पटली नव्हती असें नाहीं. कथापुराणाला बसून आंवतीभंवतींच्या बायकांनीं त्यांना तेंच ऐकवलें होतें. त्यांनाही तसेंच वाटत होते; पण आपण नामानिराळ्या आहोंत, हे त्यांना, त्या घरांत वागतांना दाखविण्याचे सोंग कायम ठेवावयाचें होतें ना?

काकू उठल्या तेव्हां गोटयालाही उठण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. आपल्या सिनेमा विषयक भरगच्च माहितीचे पुराण काकूंनीं ऐकले आणि शेवटीं आपल्याला आवडले नाहीं, असे दाखविले, हे पाहून गोटयाला जरा वाईट वाटलें. मानेला एक हिसका देत, काकूंना कांहीं कळतच नाहीं. असें पुटपुटत तो कामाला चालता झाला.

काकूही " दिगंबरा, दिगंबरा, श्रीपादवल्लभ दिगंबरा!" हे आपलें आवडतें भजन पुटपुटत संध्याकाळच्या स्वयंपाकाच्या तयारीला लागल्या.

मागीलदारीं, ज्यावेळीं भागीर्थीकाकू आणि गोटया यांच्यामध्यें बोलणें चाललें होतें, त्यावेळीं बाहेरील दिवाणखान्यांतील विश्वास, पार्श्वनाथ, वर्षा आणि प्रेमा यांपैकी प्रत्येकाचीं विमानें निरनिराळ्या कारणानें आनंदाच्या आकाशांत स्वैरसंचार करीत होतीं.

विश्वासच्या भागीदाराची तार आली होती. त्यांत त्याने स्टुडिओ आपल्या ताब्यांत अमूक तारखेला निश्चित घेऊन चित्रपट घेण्यास त्याच दिवशीं अमूक वेळीं मुहूर्त करावयाचा आहे, हें नक्की केल्याचें कळविलें होतें. ती तारीख अगदीं जवळचीच होती.

त्या दिवशीं मोठमोठ्या प्रतिष्ठीतांना निमंत्रणें द्यावयाचीं, टोलेजंग अशी श्रीसत्यनारायणाची पूजा करावयाची. याच गोष्टी अत्यंत महत्वाच्या व आनंद-दायक म्हणून विश्वास सर्वांशीं सारखा बोलत होता.

पार्श्वनाथ पालकर विश्वासच्या आनंदाचा सहभागी, त्याचें ऐकून आणि आपल्यालाही सुचतील त्या सूचना देऊन, होत होता. शिवाय, त्या गोष्टी बोलत असतां सकाळीं अगदींच मौन स्वीकारलेली प्रेमा–विश्वासशीं अधून मधून बोलतांना पार्श्वनाथाच्या योग्य सूचनांना आपली सम्मति देण्याकरितां किंवा त्यांत आपल्याला सुचलेला फेरबदल सुचविण्याकरितां, पार्श्वनाथाकडे पहात बोलत होती. त्यामुळें, प्रेमा आपल्याशीं बोलायला लागली, याच कल्पनेनें पार्श्वनाथ खुषींत होता ! प्रेमानें त्याच्या सूचनेला सम्मती दर्शविली तरी तो मान तुकावीत होता. आभारप्रदर्शनाच्या दृष्टीनें तिच्याकडे पहात होता. तिनें फरक सांगितला तरी तो मान्य करी, “ बरोबर, हें आपल्या ध्यानांत आलेंच नव्हतें. या सांगतात, तसेंच करणें रास्त आहे. ” अशी पुष्टी देऊन प्रेमाला खूष करण्यांत विजय मिळतो आहे, याचा प्रत्यय घेऊन आनंदाचे घुटके घेत होता.

वर्षाच्या माहेरचीं माणसें–तिचे वडिल आणि आई—तीर्थ यात्रा करून, आपल्या गावीं—वर्षाच्या माहेरी--सुखरूप येऊन पोंचल्याचें पत्र सकाळच्या डाकेला आलें होतें. तीं मायेचीं माणसें सुखरूप आल्याचा आनंद वर्षाला तर झाला होताच. पण त्यांना लगेच आपल्याकडे आणण्याकरितां तिनें पत्र पाठवायला विश्वासला आग्रह केला होता. त्यानें तिच्या मनासारखे, तिच्या देखतच पत्र लिहिलें होतें. आपलीं मायेचीं माणसे येणार, आपल्याला भेट-णार, आपलें कौतुक होणार, अशा एकापेक्षां एक वरचढ आनंदाच्या-सुखाच्या पायऱ्या कल्पनेनें वर्षा चढत होती मग तिच्या मानसिक आनंदाला काय उणीव असणार ? त्या आनंदाच्या विचाराच्या भरांत ती आज इतकी गुंगली

होती कीं, तिनें शेजारच्या एका गरीब मैत्रीणीच्या छबुकड्या सोन्यासाठीं लोकरीचा स्वेटर विणायला घेतला होता. – सवड सांपडेल त्या वेळांत, सुया लोंकर तिच्या हातांत सारखी असायची,–त्याचें देखील तिला आज भान उरलें नव्हतें. लोकर सुया आणि अर्धा विणलेला स्वेटर तिनें कुठें ठेवून दिला होता, हेंही तिला आठवत नव्हतें. इतकी ती आनंदांत होती.

प्रेमा स्वतःचें अस्तित्व स्वतंत्र आहे, असें मानीतच नव्हती. तिच्या आनंदाचें सार सर्वस्व म्हणजे सध्यांच्या काळांत एकटा एक विश्वासच होता. तो समोर नुसता असला तरी तिला बरें वाटे, बोलूं लागला म्हणजे तिच्या आनंदाला पारावर राहत नसे. आज तर विश्वास स्वतः अतीशयें उत्साहांत आनंदाच्या शिखरावर होता ! आपल्याला आवडत्या असलेल्या व्यक्तीचा वैभवाचा काल त्या व्यक्तिपेक्षांही, आपल्यालाच जास्त जवळ आला आहे असें दिसत असतें. प्रेमाचें तसेच झालें होतें—

" स्टुडिओ घेतला आहे. चित्रपटाच्या कामाला मुहूर्त होत आहे. माणसांची रीघ लागली आहे. लोक येताहेत, जाताहेत, पानसुपारी–अत्तरगुलाब देण्याघेण्याचें काम चालूं आहे. सत्यनारायणाची पूजा चालली आहे. चौघडा वाजंत्री झडताहेत. सत्यनारायणाच्या पूजेला स्वतः विश्वास बसला आहे. आणि-आणि विश्वासजवळ, अगदीं जवळ, त्या पूजेला आपण पण बसलों आहोंत ! .... "

येथपर्यंतचीं सुरम्य चित्रें प्रेमाला तिची कल्पना–दाखविण्यास तयार झाली होती !

प्रेमा असल्या आनंदाच्या झोल्यावर बसून झोले घेण्यांत दंग झाली होती.

त्या सगळ्यांचा दुपारचा वेळ कसा भर्दिशीं गेला, हें कोणालाच कळलें नाहीं. दुपारच्या चहाची वेळ झाली. कालच्या सारखी वर्षाला विश्वासला आठवण करण्याची जरूर राहिली नाहीं. अगदीं बरोबर वेळेवर ती चहा करायला उठली.

दुपारचें सर्वांचें चहापान झालें.

विश्वास तारा–पत्रांचा योग्य तीं उत्तरें खरडण्याच्या उद्योगाला लागला. प्रेमानें आपलें लेखन सुरूं केलें.

वर्षाला जरा कंटाळा आला होता. ती विश्रांति घेण्यास आपल्या खोलीत गेली.

पार्श्वनाथ पालकर उठला. त्यानें कपडे केले. डोक्यावर टोपी ठेविली. हातांत सोटा घेतला आणि, " विश्वास चालू द्या तुमचं. तुम्हांला आपलीं कामं आहेत. मी रिकामटेकडा आहे. उगाच बसून, कांहींतरी बोलत राहून, तुमच्या कामांत अडथळा आणणें गाढवपणाचें काम आहे. शिवाय काल आल्यापासून नुसतं गप्पागोष्टी करण्यासाठीं मला तूं एकसारखं डांबून ठेवलं आहेस. असा एकसारखा बैठा कारभार आपल्याला खपत नाहीं. चालत नाहीं. माणसानं जरा हालचाल केली पाहिजे. हिंडलं पाहिजे. खाल्लेलं पचलं तर पाहिजे. कीं नको ? तेव्हां, मी जरा कुठें तरी लांब-लांब चक्कर टाकून येतों—चक्कर म्हणजे काय ?—

अगदीं– पुढचं बोलायला नकोच ! आलंच तुझ्या ध्यानांत—" इतके म्हणाला आणि तो बाहेर पडलाच !

जातां जातां प्रेमावरून दृष्टिला प्रवास करण्यास त्याने मुद्दाम परवानगी द्यायला सोडलें नाहींच.

लिहितां लिहितां प्रेमानें सहज वर पाहिले. आपण आणि विश्वास दोघेच आहोंत, हें तिच्या ध्यानांत आले. त्याबरोबर तिला एकदम किती मोकळे मोकळें वाटून आनंद झाला !

आपल्याला सहवास आवडतो, ती व्यक्ति व आपण, सदासर्वकाळ दोघेच असावें; असें ज्या काळांत वाटत असतें मध्ये कोणीही केव्हांही, क्षणभर आलेलें आवडत नाहीं, खपत नाहीं, कोणी आले तर त्याचा त्रास वाटतो, अशा वाटण्याच्या काळांत त्यावेळीं प्रेमा होती.

जेव्हां पहावें तेव्हां वर्षा तरी असायची, नाहींतर गोटया तरी लुडबुडायचा. त्यांत उण्याला भर म्हणूनच कीं काय, पार्श्वनाथ पालकरचा काल पासून कायमचाच तळ पडलेला. प्रेमाला तेव्हांपासून असें कांहीं होऊन गेलें होतें कीं सांगता पुरवत नाहीं. ती परिस्थिति तिला वैरिणीसारखी वाटायची पाळी आली होती. निर्दयपणानें ती वैरीण आपल्या दोघांच्या आड मुद्दाम येऊन आपल्याला मुका मार देण्यांत राक्षसी आनंद मिळवते आहे, असें देखील तिला वाटत होतें म्हटलें तरी चालेल. म्हणूनच जेव्हां विश्वास आणि आपणच आतां आहोंत, हें पाहिलें, तेव्हां प्रेमाला कितीतरी हायसें वाटलें.

विश्वासशीं बोलण्याठीं तिचें मन उचंबळायला लागलें.

पार्श्वनाथानें तिला पाहिल्यापासून तिच्याशीं बोलावें म्हणून मनांतून धडपडूं लागला होता, त्याच्या मनाची – धडपडीची कल्पना प्रेमाला नव्हती. आणि आतां तिला विश्वासशीं बोलण्याची उत्कंठा होती तर तिच्या त्या उत्कंठेचा विश्वासला दाद पत्ताही नव्हता ! —

" धिक् तांच तंच मदनंच इमाच माच " असें ज्या महाकवीनें लिहून ठेवलें आहे, तें उगीच कां ?

विश्वासचें पत्रेलेखन संपलें असें पाहतांच, प्रेमानें आपण लिहिलेल्या कागदाचें 'बाड' उचलून त्याला दाखविण्याचें निमित्त करून ती त्याच्याजवळ गेली.

" हे पाहातां ना एकदां ? " बोलण्याचे सूतोवाच प्रेमानें या शब्दांत केलें. " झाली कीं काय सारी नक्कल ! अरे वाः ! " हातांत कागद घेत विश्वास तिच्याशीं बोलूं लागला ! " प्रेमा, जवळ जवळ तूं संपवीत आणलंस कीं, इतकं सुवाच्य, वळणदार चित्खाट केल्याशिवाय, इतक्या थोडया वेळांत इतकी मजल मारलीस अं ? शाबास तुझी. हाताला आणि टाकाला फ्रॉटियर मेलचा वेग जोडलास की काय ? — "

विश्वासनें असाच स्तुतिसुमनांचा आपल्यावर सारखा वर्षाव करीत सुटावें, असे पेमाला वाटल्याशिवाय राहिलें नाही.

" हातांत घेतलेलं काम जितक्या लवकर सपेल तितकं बरं असतं — " प्रेमा म्हणाली. आणखी एक सहज खडा टाकून पहावा अशा बुद्धीने प्रेमानें पुढे म्हटले, " अर्धवट काम टाकून जायचं म्हटलं तर मनाला कसे बरं वाटेल ? — "

" कुठें जायचं म्हणतेस ? — " विश्वासनें विचारलें.

" कुठें म्हणजे ? मला घरीं जायला नको कां ? बाबा काळजी करीत असतील, आई वाट पाहत असेल, पुरुशा – मंदाकिनीला तर चैन पडत नसेल माझ्या शिवाय – म्हणून लवकर संपवावं असं वाटलं — "

" वा: ! जातेस कशी इथून ? मी तुला सोडलं पाहिजे ना ? " विश्वास निराळ्याच अर्थानें हें म्हणाला. प्रेमानें त्याचा अर्थ निराळाच केला.

तिला वाटलें, विश्वास आपल्याला सोडणार नाहीं. ठेवून घेणार म्हणजे त्यालाही आपण हव्याच आहोंत ! आणखी यापेक्षां तिला जास्त काय हवें होतें ? तिनें त्याच्याकडे पाहिलें.

कितीही मनांत असलें, तरी बायका कधीं बोलत नाहींत. त्यांची लज्जा त्यांना बोलूंच देत नाहीं.

पुरुष जात्याच जास्त निलाजरे असतात. मनांत आलेले बोलायला ते कमी करीत नाहींत. लाजत नाहींत. विश्वासला जर आपण हव्या आहोंत, तर तो स्पष्ट बोलत कां नाहीं ? पर्यायानें कां बोलतो आहे ? असेंच प्रेमाला त्या वेळीं वाटलें. ते तो यावेळीं बोलतो कीं काय हें आजमावण्यासचि, तिनें त्याच्याकडे सहेतूक पाहिलें.

तो बोलला पण, तें हें असें—

" इथं राहयला कंटाळलीस कीं काय प्रेमा ? "

" इथं राहयला मला कधीच कंटाळा यायचा नाहीं ?– उलट इथं कायमचं राहावं अशीच माझी इच्छा आहे ! " हें प्रेमाच्या मनांत आलें. पण ती बोलली नाहीं. फक्त मान वेळवून ' छे ! ' याच एका अक्षरांत तिनें आपला भाव व्यक्त केला. विश्वासनें तिचें मान वेळणें पाहिलें कीं नाहीं, कोण जाणे. तिचा उद्गारही त्याला ऐकायला गेला कीं नाहीं, त्याचा तोच जाणे. तो पुढें म्हणाला—

" प्रेमा, इथं राहायला कंटाळायचं कांहींच कारण नाहीं मामांना–मामींना, पुरुषोत्तमाला आणि मंदाकिनीला – सर्वांनाच मी स्टुडिओच्या ओपनिंग समारंभाला बोलावणार आहे. तीच मंडळी इकडे आल्यावर तुला तिकडे जाण्याची घाई काय ? आपल्या भाचाच्या आयुष्यांतल्या एक मोठ्यांतला मोठा मंगल प्रसंग मामा–मामींना पाहायला नको कां ? भाच्याचं त्यांनीं कौतुक करायला नको वाटतं ? "

असें म्हणून तो हंसला. तिलाही हंसू आलें. बरें वाटलें.

" बरं ! " म्हणत ती त्याच्यापुढचें आपलें बाड घेऊन परत जाग्यावर बसायला निघाली.

" तुला मी उगीच कां ठेवून घेतलं आहे असें तुला वाटतें ? " प्रेमाला आणखी बरें वाटावें म्हणून विश्वास बोलायला आणि त्याच वेळीं बाहेर गेलेली पार्श्वनाथ पालकराची स्वारी परत यायला एकच गांठ पडली.

त्याच्या येण्यानें प्रेमा–विश्वासला बोलत राहायला सवडही उरली नाहीं, आणि बोलायचेंही कांही राहिलें नाहीं.

विश्वासचें शेवटचें वाक्य प्रेमाला सूचक, आपल्याला अनुकूल असेंच मात्र वाटलें. ती त्याच वाक्याचें मनाशीं चिंतन करीत आपले हातांतलें कामाकडे वळली.

" काय ? आलास मनपसंत भटकून ? " विश्वासनें पार्श्वनाथाकडे मोर्चा वळवला।

" आलों. बरं वाटलं ? "

" काय नवीन खबर ?-- "

" तुला आवडणारी–तुझ्या जगातली नवीन खबर सांगूं ? " पार्श्वनाथ म्हणाला; " जगद्विख्यात, नटसम्राट पॉलमुनीचा We are not alone चित्रपट कुठे तरी लागलला आहे, अशी खबर भिंतीवरच्या जाहिरातीनें मला दिली !— "

" असें ! " विश्वासनें सम्मतीदर्शक म्हटलें.

" अरे लेका! नुसते " असें ? " म्हणून काय म्हणतोस ? मी तुझ्याकडे सन्मान्य पाहुणा म्हणून आलों आहे. तुझा बालदोस्त आहे. त्याला असा उत्कृष्ट चित्रपट दाखवतो – आज आपण सारेच जण तो पाहायला जाऊं या असें ! म्हण कीं " पार्श्वनाथानें गर्जना केली.

" अरे, पण मूर्खा ! नाहीं म्हणतो कोण तुला ? जाऊं या ना आज ! " विश्वासनेंही त्याच्याच आवाजाला आवाज लावीत उत्तर दिलें.

" तुम्हीं येणार ना हो आमच्याबरोबर ? " प्रेमाला विचारण्याची दडपेगिरी पार्श्वनाथाने केली. तिला त्याच्या विचारण्याचें हंसू आलें.

आनंदांत आनंदाची भर घालण्याकरितां, त्या रात्रीं विश्वास, वर्षा, प्रेमा, पार्श्वनाथ–ही सर्वच मंडळी तो विख्यात बोलपट पाहायला गेली हें सांगायला का पाहिज !

---

" **म**नसा चिंतितं एकं दैवमन्यत्र चिंतयेत् " हा चिरंतन सनातन सिद्धांत किती सत्य आहे, याची प्रचिती मिळावी म्हणूनच कीं काय, कोण जाणें त्या दिवशीं दुपारच्या वेळीं दिवाणखान्यांत एकटीच असतांना, मनांतला आवेग अनावर होऊन प्रेमा विश्वासच्या प्रतिमेला कवटाळण्यासाठीं, आपले मनोगत तिच्या जवळ व्यक्त करण्यासाठीं आणि तिचें प्रेमभरानें चुंबन घेण्यासाठीं सज्ज झाली. आणि तिचें तें मनांतलें रहस्य उघड व्हावें म्हणून त्याच वेळीं चहाचा ट्रे घेऊन वर्षाही नेमकी त्या जागीं उपस्थित झाली !

वर्षाच्या हातांतला ट्रे खालीं पडून, कपबशा फुटल्या. चहाने बैठकीची नासधूस केली.

विश्वासच्या निर्मळ-प्रेमळ वर्तनानें निर्धास्त झालेल्या वर्षाच्या मनांतील प्रेमविषयक-विश्वासाचा बुरुज एकदम जमीनदोस्त झाला. तिच्या डोळ्यां-

तून आगीच्या ठिणग्या ताडताड उडूं लागल्या ! –

विश्वासच्या हृदयांतील प्रेमाच्या सुंदर मंदिरांत आपण प्रवेश करण्याकरितां अगदी त्याच्या महाद्वारांत पाऊल टाकीत आहोंत, अशा आनंदांत तल्लीन झालेल्या प्रेमाला–ट्रेचा आवाज, फुटणाऱ्या कपबशांचा खळखळाट, कानांत शिरतांच–आपण मनोराज्यांत उभारलेले प्रेमाचे उंच उंच मनोरे झटक्यासरशीं पार ढासळले, असेंच वाटलें. तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागल्या.

" चल, चालती हो आत्तांच्या आत्तां माझ्या घरांतून–क्षणभर मी तुला या उप्पर राहूं देणार नाहीं— " असें सांगण्यासाठीं वर्षाचे ओठ थरथरत होते, पण तिला संतापातिरेकानें एक अक्षरही उच्चारतां येईना.

वर्षा प्रेमाला बोलली असती, तिच्या हाताला धरून फरपटत घराच्या बाहेर तिने तिला लोटली असती.

प्रेमानेंही कदाचित् गयावया केलें असते. " चुकले. क्षमा करा. बोलूं नका. अपराध विसरून जा. तुमचा गैरसमज झाला आहे. तुमची कल्पना झाली. तसा माझा हेतु नव्हता. गैरसमज दूर करा. मी तुमचे पाय धरते– " अशा-पैकीं कांहीं तरी वेळेवर सुचेल तें बोलून वेळ निभावण्याचा प्रयत्नही करून पाहिला असतां—

पण त्या दोघींचाही त्यावेळी नाइलाज झाला. ट्रेचा आणि कपबशांचा आवाज ऐकून, आंतून काय झालें हें पाहण्यासाठीं हातांतील कामे टाकून एकीकडून गोट्या धांवला आणि दुसरीकडून भागिर्थीकाकूही आल्या.

प्रेमानें मान वळवली. वर्षानें रागाला आवर घालण्याचा प्रयत्न चालविला. नोकरचाकरांच्या देखत तिला प्रेमाला बोलण्याचा हिय्या झाला नाहीं.

गोट्या पुढें होऊन ट्रे उचलण्याच्या आणि कपबशांचे तुकडे गोळा करून, सांडलेल्या चहाची जागा पुसून स्वच्छ करण्याच्या उद्योगाला लागला.

" काय झालं वर्षाताई, दाराचा धक्का लागला वाटतं. तुम्हांला कुठं लागलंबिगलं तर नाहीं ना ? " वगैरे म्हणत, भागिर्थीकाकू वर्षाच्या कोपरा–ढोपराला पाहूं लागल्या.

मालकीणीवर कोण भागिर्थीकाकूंची माया ही !

भागिर्थीकाकूंच्या समजुतीकरितां वर्षानेंही त्यांना पटेल असेंच सांगितलें.

" फुटूं द्या कीं मेल्या कपबशा. फुटल्या तर फुटल्या. त्याची काय एवढी किंमत. तुम्हांला दुखापत झाली नाहीं, यांतच सारं कांहीं भरून पावलं ! " भागिर्थीकाकूंनीं मालकिणीबद्दलचा कळवळा दाखविण्यासाठीं म्हटलें, " मला नाहीं बाई, ताई हें तुमचं आवडतं ?– आम्हीं कुणी नसतो कां हीं बारिक-सारीक काम करायला तुम्हींच कशाला करायला हवींत ? आम्हांला ठेवलंय कशाला मग ?—"

भागिर्थीकाकू तोंडानें हें म्हणत होत्या खऱ्या; पण त्याच वेळीं त्यांच्या मनांत, " ह्याच कपबशा जर आम्हां नोकरमाणसांच्या हातून फुटल्या असत्या, तर याच मालकीणीनें अपल्या मालकीच्या तोंड्यांत आकाशपाताळ एक केलें असतें. ' डोळे फुटले होते का ? कुठं लक्ष होतं, मालकाचं जितकं नुकसान होईल तितका तुम्हाला आनंदच व्हायचा ! तुमच्या पगारांतून कपबशांची किंमत काटून घ्यायला कां नको ! असं केलं म्हणजे आम्हीं मालक वाईट !–' एक ना दोन हजार बोलून कांहीं ही गप्प बसली नसती ! आतां कोणाला बोलेल ? " हे किंवा अशासारखे विचार येऊन गेले नसतीलच असें कोण सांगेल ?

गोट्यानें कपबशांचे तुकडे गोळा केले. चहा सांडला होता, तो मोठ्या फडक्यानें पुसून ती जागा साफसूफ केली. कागदांत गुंडाळून ते तुकडे दूरच्या कचऱ्याच्या पेटींत टाकून द्यायला तो गेला.

भागिर्थीकाकूंनीं आंत नेण्याकरितां ट्रे हातांत घेतला. भागिर्थीकाकू तिथून जातील आणि मग प्रेमावर आपण तोंड सोडूं असें वर्षाला अजूनही वाटत होतें.

ऐन चोरी करतांना चोराला पकडलें म्हणजे पकडणाराला जो चेव येतो आणि त्याला त्यावेळीं त्या चोराला, पोलीसाच्या ताब्यात देऊन त्याला शासन करवावें, असें वाटण्यापेक्षां आपल्या अधिकारांत बुकलून मारावें, कडक शासन आपणच करावे असें जसें वाटत असतें, हुबेहूब तीच अवस्था वर्षाच्या मनाची प्रेमाला ऐनवेळीं पकडल्यामुळें यावेळीं झाली होती.

आणि यावेळीं वर्षाचा, असेल नसेल तो सारा राग एकट्या एक प्रेमा-वरच होता. विश्वासला तिनें अजिबात वगळलें होतें. तोही प्रेमाइतकाच

आपला अपराधी असेल किंवा नाहीं, याचा विचार तिला बिलकुल शिवला नाहीं.

अशी मनोवृत्ति बहुतेक सर्वांचीच असते.

आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचें ते कार्टे. एकादीचा नवरा जातिवंत दारुबाज असला, त्याच्या त्या व्यसनाबद्दल दोघेच असतांना ती त्याची कितीही खडसून हजेरी घेत असली, तरी त्याचे जोडीदार दारुबाज मित्र समोर आले म्हणजे तीच बाई, आपला नवरा गरीब, निरुपद्रवी, पापभीरू, व्यसनाचा तिरस्कार करणारा, परमपूज्य देवासारखा आहे, याच खात्रीनें, त्याच्या मित्रांचा उद्धार करील. आपल्या नवऱ्याला त्यांनीं व्यसनी बनविलें, तेच खट, छट, बदमाष आहेत, असें अकांडतांडव करील.

प्रेमाकडे पाहाण्याची या वेळची वर्षाची दृष्टि याच मासल्याची होती.

" पुन्हां चहा करून आणू का ?– मंडळी आली म्हणजे सांगा म्हणजे चहा मी करीन— " असें नागिर्भीकाकूंनीं म्हटलें; वर्षा कांहीं बोललीच नाहीं. त्या तशाच ट्रे घेऊन निघून गेल्या.

प्रेमाला झणझणून खडसावण्याची खुमखुमी वर्षाला अजून होती. ती आतां तिला बोलणार होती, विचारणार होती, तोंच बाहेर गेलेली विश्वास-पार्श्वनाथाची दुकल त्याच वेळीं दाखल झाली. वर्षाचा नाइलाज झाला. एकटा विश्वासच असतां तर कदाचित् तिने त्याला, " आत्तांच्या आतां या सटवीला घरातून घालवून द्या– " असे सांगण्याचा आपला सर्वाधिकार त्याच वेळीं गाजविला असता.

पण कसें कोण जाणें, त्रयस्थासमोर असा तमाशा व्हायला नको, असें, त्यावेळीं तरी तिला वाटलें. ती तडक तिथून चालती झाली. प्रेमा अगतीक होऊन, खुर्चीला इतका वेळ टेकून कशीबशी उभी होती. वर्षा गेल्यावर ती तशीच खुर्चीवर कोलमडली असती. आवरलेल्या अश्रूंना तिने तोंड झाकून वाट मोकळी करून दिली असती तितकेंच तिला हलकें वाटलें असतें. पण विश्वास–पार्श्वनाथाच्या येण्यानें तिला तेथे बसणें शक्य झालें नाहीं. तीही तिथून आपल्या खोलीकडे कशीबशी गेली.

विश्वास-पार्श्वनाथ कसल्यातरी निराळ्याच विषयांत गढले होते; त्यामुळें त्यांचें वर्षाकडे किंवा प्रेमाकडे लक्षच गेलें नाही. आपण येतांच त्या तेथून गेल्या, याबद्दलही त्यांना कांहीं वाटले नाही.

बिचारी प्रेमा! इतर पोरीसारखी निगरगट्ट मनाची—निर्ढावलेल्या हृदयाची नव्हे! किती पोरी बाहेर हवे ते, हवे त्याच्याशीं, हवे तसले रंगढंग करतात. घरीं आल्या की, वडिल माणसांसमोर साळसूदपणानें खुशाल वावरतांना त्यांना कांहींच वाटत नाहीं. आपल्या पोरी इकडचा डोळा तिकडे करून पाहायच्या नाहींत, त्यांच्या हातून गैर कांहीं कधीं व्हायचें नाहीं; या समाजात वडिल माणसांना ठेवण्यांत जशा त्या तरबेज असतात; तशांतली प्रेमा नव्हे.

त्या प्रकारच्या पोरींच्या वर्गांतली ती असती, तर, पहिला झटका, तिला आला असतां, तरी थोडयाच वेळांत ती मूळपदावर आली असती आणि "वर्षाला भ्यायचं मला काय कारण? ती कोण? विश्वास तिला एकटीलाच काय कोणी कायमचा आंदण दिला आहे थोडाच? तिचे त्याच्यावर प्रेम असेल—असेल. माझंही त्याच्यावर तिच्याइतकंच—कां, तिच्यापेक्षा हजारपटींनीं प्रेम आहे. तिनें त्याच्याशी लग्न केलं आहे. मीहि त्याच्याशीं लवकरच लग्न करीन. विश्वासावर जितका तिचा—तितकाच माझा अधिकार आहे. मग मी तिचीं का उणीदुणी उत्तरें ऐकून घेईन? ती एक शब्द बोलली तर मी तिथल्यातिथंच तिचं नाक ठेचायला कमी करणार नाही." हे किंवा अशासारखेंच उत्तराला प्रत्युत्तर देण्याची प्रेमानें आपल्या मनाची केव्हांच तयारी करून ठेवली असती! जसें कांहीं आपल्या हातून कांहीं झालें नाहीं, आपण कांहीं केलें नाहीं, अशा तऱ्हेनेंच ती खुशाल वर्षाच्या नाकावर टिचून रोजच्यासारखी वागायला पुढें पुढे झाली असती.

पण, आपलें बिंग फुटलें. अकालीं गौप्यस्फोट झाला, असेंच तिला वाटलें. मन पापी असतें आणि पाप भितें असतें, असें म्हणतात, ते कांहीं खोटें नाहीं. वर्षाच्या बाबतींत आपलें मन पापी झालें; असेच विचार तिच्या मनांत आले आणि ती भ्याली!

पुढें होणारे, त्याची आगामी कल्पना दुश्चिन्हें सांगतात, असें कोणी कोणी मानतात. त्यावर चिकित्सक मनें विश्वास ठेवीत नाहींत. श्रद्धाळू मनें विश्वास

ठेवतात. विश्वास ठेवला तरी किंवा न ठेवला तरी, काकतालीय न्यायानें कां होईना, पण दुश्चिन्हें केव्हां केव्हां घडत असतात, असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. कांहीं दुश्चिन्हे दृष्टीला दिसतात, कांहीं दिसत नाहींत. पण मन ऐन आनंदाच्या सागरांत पोहत असताना देखिल, उगीच कांहीं तरी मनाला हुरहूर लागते, चुटपुट वाटते, असें कां होतें हेंही कळत नाहीं. आणि त्यामुळें आनंदांतही दुःखाची बारीक सुई कोणी तरी बोचीत आहे असें वाटतें.

आदल्या रात्रीं सर्वांबरोबर प्रेमा पॉलमुनीचा We are not alone (आम्हीं एकटे नाहींत !) हा चित्रपट पहावयाला गेली होती. त्या चित्रपटाच्या छायाचित्रणाकडे, छाया प्रकाश कसा साधला आहे त्याकडे, साध्यासुध्या प्रत्येक प्रसंगात जी विलक्षण आकर्षता निर्माण झाली होती, त्याकडे, एका प्रसंगांतून पुढचा प्रसंग सहज कसा उत्क्रांत झाला आहे त्याकडे, पॉलमुनीच्या पासून प्रत्येक बारिक सारीक नटनटींनीं, आपल्या अभिनयाची, शब्दोच्चाराची, अत्यंत मेहेनतीनें-अभ्यासानें, किती पराकाष्ठा केली होती त्याकडे, आणि त्या सर्वाहून पाश्चात्य कलावान् आपली कलाकृति सर्वांगसुंदर करण्याकरितां, किती कसे परिश्रम करून, सफाई दाखवितात, त्याकडे विश्वास-पार्श्वनाथांनी आपलें सर्व लक्ष दिले होते. त्याचबद्दल बोलत होते. चर्चा करीत होते. " या लोकांच्या मानाने आपण अद्याप शंभर वर्षे मागें आहोत " असे विश्वास उद्गारत होता, तर " आतां तूं सरसावला आहेसच ना हा धंदा करायला, ! तूंच यांच्या जवळपास येण्याचा कर की पराक्रम ! " असें पार्श्वनाथ त्याला चिडवीत होता.

वर्षा नुसती समोर दिसणारे देखावे पहात होती. लोक हंसले म्हणजे गालांतल्या गालांत हंसत होती. आनंदांत होती.

कोण काय पहातो, तर कोण काय पहातो; प्रेमा त्या चित्रपटाच्या कथानकाबरोबरच वाहात चालली होती. पाहिलेलें तिला सारेंच आवडत होतें. पण, त्यांतल्या डॉक्टर आणि त्याची प्रेयसी, यांनीं तिला चांगलाच चटका लावला. त्या प्रेमी जोडप्याचा दुःखांत शेवट पाहून तिला कसेसेंच झालें; आनंदांतही दुःखानुभव असतो तो असा !

घरीं आली तरी, चित्रपटांतील डॉक्टर आणि त्याची प्रेयसी-ही जोडी प्रेमाच्या मनःश्चक्षूपुढें नाचत होती. तिला व्यथित करीत होती.

सर्वांशीं नाहीं तरी बरेंचसें साम्य, डॉक्टर आणि त्याची प्रेयसी विश्वास आणि प्रेमा, यांच्या सद्यःपरिस्थितीशीं जमण्यासारखें होतें. त्यांच्या सारखेंच आपलें होणार कीं काय, अशी कल्पना प्रेमाला चुकूनही येणें शक्य नव्हतें. पण त्यांच्या कथेनें तिला हुरहुर वाटायला लावले इतकें खरें.

इतर व्यवसायांत, त्याचे विस्मरण प्रेमाला होणें स्वाभाविक होते. पण कालचें तें दृश्य, एकप्रकारें, तिला आज दुश्चिन्हांसारखेंच होतें कीं काय कोणाला माहित ?

कांहीं असो, आदले दिवशीं तिनें तें पाहिले. तिचें मन त्यामुळे हुरहुरलें. उदास झालें आणि दुसऱ्या दिवशीं संध्याकाळींच घडलेल्या परिस्थितीनें तिला गोत्यांत घातलें !

प्रेमाला ब्रह्मांड आठवलें ! ती एकदा जी आपल्या खोलीत शिरली, ती रात्रीं जेवायलासुद्धां बाहेर आली नाहीं. ' बरें वाटत नाहीं. ' या, सबबीनें तिनें जेवायचें काय बाहेर येण्याचेंही टाळलें.

वर्षा विश्वास पार्श्वनाथाच्या बरोबरच बसून रोजच्यासारखी जेवत होती. पण तिचें मस्तक भडकलें होतें. संताप आंतल्या आंत धुमसत होता. त्याचा स्पष्ट ठसा तिच्या तोंडावर उमटला होता. परंतु विश्वास पार्श्वनाथ कसल्यातरी उद्योगाच्या गहन विषयावर बोलण्यात–जेवणांत सुद्धां–चूर असल्यामुळें विश्वासला वर्षाच्या वृत्तीत पडलेला फरक पाहायला फुरसतच झाली नाहीं.

जेवायला प्रेमा दिसली नाहीं, तेव्हां विश्वासने ' प्रेमा कुठें आहे ? ' अशी मामुली चौकशी केली. [illegible] वाढतां वाढतां– " त्यांना बरं वाटत नाहीं म्हणून जेवायचें नाहीं त्यांना ! " सांगितलें.

" प्रेमा फार श्रम करते. अशानें तिचं दुखणं उलटायचं एखाद्या वेळीं–" विश्वास वर्षाला उद्देशून म्हणाला, " तिला पहा. तापबीप आला आहे का ? अन् जेवायचें नसलं तर तिला थोडं गरम करून दूध दे ! "

विश्वासनें सहज सांगितलें. पण वर्षाच्या संतापाच्या आगींत तेवढ्यानेंच तेल ओतल्यासारखें झालें. तिच्या मतानें खरें म्हटलें तर, प्रेमाला विश्वासनें वीषच द्यायला वर्षाला सांगायला पाहिजे होते. आणि तसें सांगितलें असतें,

तर ती अत्यानंदानें तें तिला द्यायला तयार झाली असती. इतका तिच्या रागाचा कल्पान्त झाला होता.

घरांतल्या कर्त्यापुरुषाच्या कर्तव्यबुद्धीला उचित म्हणा किंवा माणूसकीला शोभणाऱ्या धर्माला योग्य, अशा विश्वासने प्रेमाबद्दल वर्षाला सूचना देण्या-करितां जें वाक्य उच्चारलें, तेवढ्यावरून विश्वासही आपला प्रेमाच्या बाबतींत तिच्या इतकाच-किंबहुना तिच्यापेक्षां जास्तच अपराधी आहे, असें डोक्यांत वेड घेण्यास वर्षानें कमी केलें नाहीं. आणि म्हणूनच तिच्या सर्वांगाला अंगार लागल्यासारखें झालें.

रात्रींच वर्षा विश्वासचा खरपूस समाचार घेणार होती. आणि उद्यांच्या उद्यांच प्रेमाचा निकाल लावून टाकणार होती. तिनें तसा संकल्पच केला होता. चंग बांधला होता.

परंतु जेवणानंतर, कपडे करून पार्श्वनाथाबरोबर विश्वासला कांही महत्वाच्या कामाला-पार्श्वनाथाच्याच कामाला-जायचें होतें. त्याप्रमाणें ते बाहेर पडलेच. " आम्हीं बाहेर जातों आहोंत यायला उशीर होईल, जागत बसायचें किंवा वाट पहात बसण्याचे कारण नाहीं. " असें जातांना विश्वासनें वर्षाला सांगितलें.

त्याही सांगण्याचा वर्षाने, तशा मनःस्थितीत विपर्यस्त असाच अर्थ घेतला. धुस्पुस् धुस्पुस् करीत ती आपल्या खोलींत जाऊन अंथरुणावर आदळली!

एरव्ही, बहुतेक रोजच, भागीर्थीकाकू जेवायला बसल्या म्हणजे ती त्यांच्या जवळ बसायची. बोलायची. हवं नको करायची नी मग जायची. पण आज तिनें त्या कशाकडेच लक्ष दिलें नाहीं.

भागीर्थीकाकूंनीं गोप्याला वाढलें. मग आपण आपलें वाढून घेतलें. दोघेही जेवायला बसली.

गोप्याला कुठे गप्प बसवतय ? कपबशा फुटण्याचा प्रकार त्याच्या वात्रट डोक्यांत खेळत होता. त्याबद्दल काकूचे मत काय आहे, हेंही त्याला ऐकून आपली करमणूक करून घ्यायची होती.

हलकेंच त्यानें तोंडातला घास गिळीत आणि पाणी ढोशीत काकूंना विचारलें, " काय व काकू, सांचीपारचा त्यो परकार काय हुता ? दोघींचा बी जोराचा सामना झडला जनूं ! तुम्हास्नीं काय वाटतं ? "

कांहींतरी वर्षा-प्रेमामध्यें नाजूक कारणावरून खटका उडाला असला पाहिजे! त्याशिवाय वर्षांची धुसपूस–आदळआपट कशी होईल! प्रेमा उगीचच जेवायला यायचें सुद्धा कां टाळील? हें भागीर्थीकाकू ओळखीत होत्या. गोष्ट्यानें विषय काढण्याबरोबर त्या किंचित् हंसल्या पण लगेच, त्यांनीं डोळे मोठे करून, नाकावर बोट ठेवीत, " शूः! कोणी ऐकेल. त्या असतील बाहेर!" असें बजावून त्याला गप्प केलें "गोविंद!" म्हणत त्यांनी घांस तोंडांत घातला आणि आपल्याला कांहीं माहित नाही, असें भासविण्या-करितां, कोणी ऐकलेंच तर आपण आपल्या देवाचं नांव घेण्यांत मग्न असतो, असे वाटावें म्हणून–तसेंच नोकरांनी मोठ्या घरीं स्वतःला संभाळून कसें वागावें, याचा इषारा गोष्ट्याला देण्याकरितां, भागीर्थीकाकू––

" *तुका म्हणे उगें रहावें। जें जें होईल तें तें पहावें॥*

हा अभंग जेवत असतांनाही मोठ्यांदा म्हणूं लागल्या.

वर्षा अंथरुणावर जाऊन पडली. ती किती वेळ तळमळत होती, काय काय विचार करीत होती, किती वेळ विश्वासची वाट पाहात होती, केव्हा तिला झोंप लागली, विश्वास केव्हां आला; कोण जाणें!

कालपर्यंतचा आनंद आज तिच्या संतापाच्या आगीनें पार करपून गेला होता, यांत मात्र शंका नव्हती!

प्रेमाच्या आनंदावरही पाणी पडलें होतें, हेंही तितकेंच खरें नव्हतें का? प्रेमा भिऊन गेली होती. अंथरुणावर अस्वस्थ होऊन, या कुशीवरून त्या कुशीवर वळत होती. तिच्या डोळ्यांतून किती पाणी सांडलें असेल, तिचें तीच जाणें! तिला कसलाच विचार करतां येईना. उद्यां काय होणार? वर्षा आपल्याशीं कशी वागेल? काय म्हणेल? विश्वासला काय सांगेल? विश्वास आपली बाजू घेईल का वर्षाची? आपल्याला उद्यांच घर सोडावें लागेल की काय? एक सारखे तेच तेच प्रश्न तिच्या पुढें उभे राहून भंडावून सोडीत होते. भीति दाखवीत होते. आपण विश्वासवर प्रेम करतों, आपल्याला तो हवा आहे, पण आपण त्याला हव्या आहोंत का? तो आपल्यावर प्रेम करतो काय? हें अजून आपल्याला कधीं कळलें आहे?––आपण रात्रींच्या रात्रींच इथून पळून गेलों तर? काय होईल? लोक काय म्हणतील? या घरांत

आपल्या बद्दल माणसं काय तर्क वितर्क करतील – आई बाबांना काय सांगतां येईल !

एक ना दोन, लाख प्रश्न ! प्रेमा अगदीं रडकुंडीला आली. तिचा जीव तो काय आणि शक्ति ती किती ? ती दमली थकली. तिला झोंप कशी आणि केव्हां लागली, हें तिला समजलेंच नाहीं.

तिचें बाह्य मन व शरीर झोंपेच्या स्वाधीन झालें. पण आता तिचें आंतर-मन – सुप्तमन जागें झाले. तें तिला निरनिराळीं, कांहीं वाईट, कांहीं चांगली स्वप्ने दाखवूं लागले.

अजून थोडी जाग आहे, झोंपेची झापड पडते आहे. अशा संधीस डोळे गरगर फिरविणारी, करकर दांत वाजविणारी, ओंठ थरथर कांपत, आपल्याला खावूं कां गिळूं करायला सरसावणारी वर्षाची क्रुद्ध मूर्ति – जी संध्याकाळी दिवाणखान्यांत प्रत्यक्षच पाहिली होती – तीच त्यापेक्षां भयंकर स्वरूपांत आपल्या अंगावर चाल करून येत आहे. वाटेल तसे अद्वा तद्वा बोलत आहे. शिव्याशाप देत आहे इतकेंच नव्हे तर आपला गळा दाबून प्राण घेण्यासाठीं चवताळून, खराच आपला गळा दाबीत आहे.

खराच आपला दोन्ही हातानी वर्षानें गळा दाबला आहे. आपला जीव गुदमरत आहे. बोलतां येत नाही, शब्द उमटत नाहीं, प्रतिकारासाठीं आपण जोराने किंचाळत आहोंत...

प्रेमाला भयकर स्वप्न पहिलेंच असें पडलें. ती दचकून जागी झाली. अजून तिचें आंग थरथरत होतें. घामानें ती नुसती निथळत होती. कांहीं वेळानें तिला झोंप लागली—

पुन्हां स्वप्न—आणि स्वप्नांत विश्वास, त्याच्या जोडीला वर्षाच !

आपण करुण नजरेनें विश्वासकडे पाहात आहोंत, विश्वास कांहींसा रुष्ट, त्याच्या तोंडावर थोडीशी तिरस्काराची छटा, पण बरीचशी आपल्याबद्दलची सहानुभूति त्याला आहे, असें प्रेमाला दिसत होतें—

" काय वेडया पोरी तुम्ही असतां ? प्रेम म्हणजे काय हें खरें तुम्हांला माहीत तरी असतं कां ? नुसती पुस्तकी पोपटपंची केली म्हणजे सगळंच कळत असतं कां कुठें ? कुणाचा पोशाख मनासारखा असला, डोळे पाणीदार

पाहिले, श्रीमंती लक्षांत आली; त्याने भलेपणानें तुमच्याकडे पाहिलें, हाटेलांत चहा प्यायला नेलें, नाटकाला घेऊन जाऊं लागला. सिनेमाला वारंवार त्याच्याबरोबर जायला मिळूं लागलं कीं, लगेच त्याच्यावर तुमचं प्रेम बसतं, हें काय गौड बंगाल आहे, हेंच आम्हांला कळत नाहीं— तूं सुद्धां अशा अप्रबुद्ध पोरींतलींच एक निघालीस याचें मला आश्चर्य वाटतें— माझ्या वरच्या प्रेमाचं वेड तुझ्या डोक्यांतलं काढून टाक– ”

विश्वास सामोपचारानेंच पण प्रेमाला नको असलेली उपदेशाची कडू गोळी गिळायला लावीत होता—

वर्षा तिच्याकडे रागानें पहात, विश्वासला, “ असं मुळमुळीत काय सांगतां? असं सांगून का अशा पोरींचे डोळे उघडायचे आहेत? — या मेल्या घरघुशी आपलं सौख्य बघतात. पण आमच्या संसारांत–प्रेमांत माती कालवतात. त्यांना साधंसुधं सांगून सोय नाहीं— चांगली अद्दल घडली पाहिजे— ”

स्वप्नाची सुरुवात कुठून झाली आणि त्याचा शेवट कुठें झाला— प्रेमाला कांहींच समजत नव्हतं, पुसट व्यक्ति दिसत होत्या. शब्द कानावर येत होते; न आवडणारे, न पटणारें असलें वाईट स्वप्न संपत कां नाहीं लवकर असें तिला वाटत होतें, पण त्या स्वप्नाची लांबण संपता संपत नव्हती!––

विश्वासनें स्वप्नात प्रेमाची निराशा केली. आपली कायम निराशा झाली, हे प्रेमाला पटले, तें असह्य होऊन ती रडूं लागली—विश्वास दिसेनासा झाला. वर्षाच्या रागाचे शब्द कानावर पडतच होते.

प्रेमा स्वप्नांत रडत होती. पण त्यावेळीं तिला कोणी प्रत्यक्ष पाहिलें असतें, तर ती गाढ झोपेंत आहे, पण तिच्या डोळयांतून पाणी ओघळते आहे, हे सत्य मात्र दिसलें असतें.

अशीं आणि अशा तऱ्हेचीं त्रासदायक आणि निराशाजनक स्वप्ने त्या रात्रीं प्रेमाला किती पडलीं असतील, त्याला गणतीच नव्हती.

पहाटेच्या प्रहरीं प्रेमाला एक गोड – सुखदायक स्वप्न आणखी पडलें.

वर्षांतले सारे दिवस सारखे नसतात, तसें, रात्रींच्या स्वप्नांतलीं– सारीं स्वप्नेंही सारखीं नसतात, कांहीं स्वप्नें रडवतात. कांहीं हंसवितीलही. बुडत्याला काडीच्या आधारानेंही हायस वाटतें, तसें गोड स्वप्नानेंही प्रेमालाही बरें वाटायला लावलें.

" पहिल्या दृष्टीक्षेपांत बरोबर प्रेम जडतें म्हणतात, हें प्रेमा, तुला माहीत आहे– माझें पहिल्या दृष्टीबरोबरच तुझ्यावर प्रेम जडलें आहे, पण तुला त्याची दाद कुठें आहे......"

नुसते शब्दच प्रेमानें ऐकले. आवाज परिचयाचा वाटला, पण ओळखेना " तूं कां रडतेस ? विश्वासासाठीं ? वेडी आहेस ! प्रेमाची बाजार पेठ कां त्याने उघडली आहे...

" रडूं नकोस– डोळे पूस ! – थांब ! तुझे डोळे पुसून सुखी करण्याचा मान मला मिळूं दे !—

" अग, प्रेम भलत्या जागीं शोधून कसं मिळणार ? ते शोधायला कुठें जावें लागत नाहीं. तें आपली जागा धुडाळीत येत असतें—

" *तुझें आहे तुज पाशीं । परि तूं जागा चुकलाशीं !* तशी तूं आपल्या प्रेमाची जागा चुकली आहेस !—

बोलणाराचे शब्द कानावर येत होते; हातांनीं अश्रू पुसल्याचा तिला अनुभव मिळत होता.

" आणि प्रेम – प्रेम म्हणून तुम्हा पोरींनीं जें काय खूळ माजवलं आहे, त्यांत कांहीं अर्थच नाहीं. प्रेम अमक्याच्याच सहवासांत असतं असें कुठें आहे ? – एक तरुण – आणि एक तरुणी – एके जागीं आली, त्यांचा सहवास झाला म्हणजे त्यांना तो सहवासच बरा वाटूं लागतो हें सहवासाचं प्रेम आहे ! आपला सहवास झाला, तर मी म्हणतों ते तुला पटेल ! तूं माझी आहेस ! मी तुला दुःखी पाहूं शकत नाहीं. तुझ्या सुखासाठी, तन–मन–धन मी अर्पण करायला तयार आहें, इतकेंच काय पण प्राणसुद्धां द्यायला कमी करणार नाहीं ?– "

असें म्हणून कोणीं तिला कवटाळलें. हळूवार थांपटले. आधार दिला. पण कोणीं ? प्रेमा आपल्यावर प्राणा पलिकडे प्रेम करणाऱ्या व्यक्तीला डोळे ताण ताणून पाहण्याचा प्रयत्न करीत होती.—

तो तिला दिसला. दुसरा कोण असणार तो ? पार्श्वनाथ पालकर ! ज्याला तिरस्काराच्या नजरेनें तिनें तो तिच्याशी बोलत असतां ठार केलें होतें, तोच तो ! – काय ज्याचा तिरस्कार करतों– ज्याच्याकडे आपण ढुंकून-ही पहात नाहीं, तेच आपल्या प्रेमाचं – विश्रांति स्थान असतें ! – प्रेमा खडबडून जागी झाली ! स्वच्छ उजाडलें होतें. तिच्या जवळ कोणीच नव्हतें !

---

" प्रेमाला आपल्या घरीं केव्हां पाठविणार आहांत ? "

" कां ? तिने तुला मध्यस्थी करायला सांगीतलं आहे कीं काय ?—"

" ती कशाला मध्यस्थी करायला मला सांगेल— "

" मग ? "

" मग काय ? तिला आपल्या घरीं आजच्या आज पाठवून द्यावी ! "

" कां ? — "

" का म्हणजे ? मी सागत्यें म्हणून ! "

" कां पण ! — तिचा तुला त्रास होतोय ? "

" तें मला विचारूं नये — "

" मग कोणाला विचारूं ? "

" अशी प्रत्येक गोष्ट दर वेळीं हंसून थट्टेवर न्यायची, मला नाहीं खपत !

ज्याचं जळतं त्याला कळतं ! नसता मेला माझ्या जिवाला त्रास ! एकाद्याला घरीं आणा, ठेऊन घ्या, त्याचीं दुखणींबाहणीं खस्ता खाऊन काढा ! — पुष्कळ झालं — ''

वर्षानें विश्वासशीं बोलण्यासाठीं अगदीं अचूक मोका साधला होता. विश्वासची म्हणजे आज कोण घाई होती. त्याचा भागीदार आज येणार होता. त्याची प्रथमच मुलाखत होती. स्टुडिओ, चित्रपट, सिनेमाचा धंदा, याच संबंधाच्या साऱ्या गोष्टींनीं त्याचें मन गच्च भरून गेलें होते.

घरांतल्या कसल्याच गोष्टीकडे लक्ष द्यायला फुरसदही नव्हती आणि वेळही नव्हता.

आपण ज्या विषयात रममाण झाला आहात, ज्या विषयान आपल्या उत्साहाला पूर्ण भरती आली आहे, ज्या विषयावर सर्वस्वीं आपलें मन, आपली बुद्धि, आपले विचार केंद्रीत झाले आहेत; तशीच स्थिति आपल्या माणसांची, मित्रांची, आपांची, मायेच्या माणसांची—झाली आहे, आपल्या वेगळे, त्यांचें विचार नाहींत, आचार नाहींत, कीं आपल्याप्रमाणेंच त्यांना काहीं दुसरें दिसतही नाही आणि सुचतही नाहीं. आपण प्रश्न करतों, तो त्याच विषयासंबंधीं—आपल्याला उत्तर मिळतें, तेंही त्याच विषयांतलें. प्रश्नही तसलाच आणि उत्तरही तसलेंच.

घरांतल्या प्रत्येक कर्त्या पुरुषाच्या मनाची ठेवण अशी बहुधां असते. त्याचें घर, त्याचीं माणसें, त्याचे विचार, त्याचें कार्य, त्याचें जग, या सर्वांच्या सभोवतीं, मध्यें, आदिअंतीं, प्रथम तो आणि इतर असें त्याला वाटत असते.

घरातल्या प्रत्येक लहानमोठ्या व्यक्तीनें आपल्या होस हो म्हणावे, आपल्याहून वेगळें कुणालाच स्वतंत्र अस्तित्व नाहीं, विचार नाहींत, सुखदुःखें नाहींत; जो तो आणि जी ती आपल्या सुखाची शीग चढविण्यासाठीं आहेत; तें होत असतां आपसूकच ज्याच्या त्याच्या परी ज्याला त्याला किंवा जिला तिला सहाजिकच कमीजास्त प्रमाणानें सुखाचा भाग मिळत असतो; आपण स्वखुषीनें देत असतो.

मायेचीं माणसें आपल्याजवळ सतत असावींत, त्यांचीं गोडगोड बोलणी सदा सर्वकाळ आपल्या कानीं पडत राहावींत, आपण त्यांना बोलांनीं,

कृतींनीं, त्यांना आवडणाऱ्या लहानमोठया वस्तु, त्यांनीं मागितल्या म्हणजे-नव्हे मागितल्या नाहींतरी, त्यांचा भाव अगोदरच ओळखून त्यांना द्याव्यात. त्यांना खूष करावे. आनंदांत करावें. हरतऱ्हेनें त्यांचें कौतुक करावें; असें जसें, कर्त्या पुरुषाला वाटत असतें; तसेंच, त्याकरितांच, तो आपल्या नातलगांना, स्नेह्यांना, गणगोताला जवळ करीत असतो. त्यांचें स्वागत करतो. त्यांना आपुलकीनें वागवीत असतो.

पदवी, संपत्ति, कीर्ति, नांवलौकिक हीं सर्व संपादावयाचीं तीं ह्या साठींच. संसार थाटायचा तो यासाठींच. जो हें सारें साधतो, निदान त्यापैकीं बऱ्याचशा गोष्टी मिळवितो, तो या साठींच.

परंतु हे कर्त्यापुरुषाच्या दृष्टीनें खरें तितकेंच, त्यानें आपल्या भोंवतीं गोळा केलेल्या किंवा निसर्गानें दिलेल्या गोतावळ्यांतील, लहानथोर सर्व व्यक्तींना, आपलें स्वतंत्र व्यक्तीत्व आहे, आपल्याला कर्त्या पुरुषांजवळून प्रत्येक तऱ्हेनें सौख्य मिळविण्याचा स्वतंत्र—जन्मसिद्ध हक्क आहे, असें वाटत असत. त्याकरितां प्रत्यकजण धडपडत असतो, तडफडत असतो, हेंही खरें आहे.

आईबापांना वाटत असते. आपण मुलाला जन्म दिला, वाढविलें, पोसले; शिकवले. आतां तो कर्ता झाला; तो सर्वस्वीं आपला आहे, त्यानें आपल्याला आपल्या अशा वयांत सर्वांपेक्षां जास्त सभाळलें पाहिजे. मानलें पाहिजे. आपल्या आज्ञेंत वागलें पाहिजे, त्यांचें हे वाटणें कोणाला गैर म्हणतां येईल ? पण त्याची इच्छा दहा हजारांत एकादा तरी सुपुत्र पुरी करीत असेल कीं नाही, याची वानवाच असते.

भावाला वाटतें, आपण आपल्या कर्त्या भावाच्या जिवावर जगांत जरा मोकळ्या आंगाने उनाडायला काय हरकत आहे ? भावांनीं तशी आपल्याला परवानगी सवड दिलीच पाहिजे.

बहिण मनांत म्हणत असते, भाऊ माझा आहे मी परक्या घरीं गेलें तरी, माहेरपणाचा आपल्या भावावर आपला कांहींच हक्क नाहीं का काय ?—— आपण सटीसामासीं त्याच्याकडे जाणार. त्यानें आपल्याला कांहीं म्हणतां कांहीं उणें पाडतांच कामा नये. त्यानें तसें केलें नाहीं तर तो आपला भाऊ कसला आणि आपण त्याची बहिण कसली ?

भावाच्या आणि बहिणींच्या मनाजोगतें वागून त्यांच्या मनाची संजोगणा किती भावांना करायचें साधत असेल, ती गोष्ट निराळी. आतां उरली कर्त्या पुरुषाची जन्माची जोडीदार !– गृहलक्ष्मी, गृहदेवता, समानहक्काची अधिकारी परक्या घरची आलेली. रक्ताची–ना–मांसाची ना हाडाची ! पण तिनें त्याला प्रेमार्पण केलेलें. सर्वस्व वाहिलेलें ! अर्थात् तिचा त्याच्यावर सगळ्यापेक्षां सर्वच परीनें अनन्य साधारण अधिकार असणारच ! ती तो क्षणोक्षणीं, पदोपदीं वापरणार चालविणार. त्याची पायमल्ली जाणून किंवा न जाणून, आपला जोडीदार करतो आहे कीं काय हें पाहण्यासाठीं डोळ्यांत तेल घालून जागरूक राहणार ! आणि तिचें त्यांत वावगें तें काय आहे ?

कुणाची कुरबूर, कुणाची धुसपूस, कुणाच्या तक्रारी, तर कुणाच्या गाऱ्हाणीं, कोणत्या ना कोणत्या कारणासाठीं, एकसारख्या कर्त्यापुरुषाच्या मागें असतात. त्याचें कारण झालें तरी काय हेंच !

दुसऱ्याचें कांहीं कां होईना, आपली पोळी पिकली–कर्त्यापुरुषानें आपली पोळी पिकविली म्हणजे झालें. आपल्याला अग्रपूजेचा मान मिळला म्हणजे मिळविलें. याच अहमहमिकेनें जेव्हां ही सर्व मंडळी कर्त्यापुरुषाला भंडावून सोडायला लागतात, तेव्हां त्याची त्रेधातिरपीट काय विचारावी ?

एकादा कच्च्या दिलाचा असतो, तो सगळ्यांची समजूत घालतांना मिळवून घेतांना अर्धमेला होतो. वैतागतो आणि हवा तसा वागत सुटून संसाराचा उकिरडा करून टाकतो.

कणखर असतो, तो कसाबसा निभावून नेतो. आपलें तेंच खरें करून सर्वांना चुंबीत बसवतो.

जबरदस्ताबद्दल विचारायलाच नको ! तो सगळ्यांनाच वंगवतो. आपण म्हणूं तसेंच सगळ्यांना वागावयाला भाग पाडतो, हिटलरशाहीच ती त्याची !

परंतु याचमुळें संसारांतल्या ज्या सुखासाठीं प्रत्येकजण धडपडत असतो, तें त्याला किंवा बाकीच्यांनाही मिळत तर नाहींच. पण सगळ्यांच्याच वांट्याला, भांडणे, कलागती, असंतोष, आणि त्रास, हीच येतात.

चार दोन माणसेंच ज्याच्या कुटुंबांत असतात, त्यांची भंबेरी तर वेळोवेळीं उडत असते, तर देशाचें—राष्ट्राचें पुढारीपण ज्याच्याकडे असेल, त्याची पावलोपावलीं, आपल्या मंडळींना संभाळण्यासाठीं काय गत होत असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. कोणी क्षुल्लक कारणावरून रुसतो, कोणी एवढ्याशा मानाकरितां फुगतो, तर आपलेंच सारें ऐकलें पाहिजे असा हट्ट धरून बसतो, न ऐकलें तर तो पक्ष सोडून चालता होईन असा धाक घालून, प्रमुख पुढाऱ्याच्या नाकींनऊ आणतो. तो वेळ पाहात नाही. काळ जाणत नाहीं, स्थळ जाणत नाहीं कीं प्रसंग लक्षांत घेत नाहीं.

विश्वासाच्या संसारांतल्या, त्याच्या आयुष्यांतल्या, कर्तेपणाच्या सुखाचें शिखर गांठण्यासाठीं, तो सज्ज झाला असतां, तो त्या तयारींत असतां आणि आपल्या सर्व माणसांना घेऊन जाण्याची त्याची उत्कंठा कांठोकांठ त्याच्या हृदयांत भरली असतां त्याच्या त्या मनाकडे मुळींच लक्ष न देतां वर्षानें नेमकी हीच वेळ साधली. आपण अशा वेळीं कांहींतरी बोलावयाला गेलों तर त्याला काय वाटेल, याचा विचार तिनें केलाच नाहीं; आपलेंच घोडे पुढे दामटण्याचा निश्चय रात्रींपासूनच करून ठेवला होता.

त्याला सांगण्या अगोदर, ती आपल्या अधिकारांत प्रेमालाच सांगणार होती. आपणच तिला घालवून द्यावे असें तिला वाटत होतें. पण प्रेमा आजारी आहे, जेवत नाहीं, असें कळल्यावर वर्षालाच जेव्हां विश्वासने तिला दूध देऊन तिचीच सेवासुश्रुषा तिलाच करायला सांगितलें, तेव्हां त्याची प्रेमाला फूस असली पाहिजे अशी कल्पना वर्षानें करून घेतली होती. आणि अशा स्थितींत जर आपण तिला बोलायला गेलों तर न जाणों, ती विश्वासच्या आधारावर, आपल्याला उलट उत्तर देऊन आपला पाणउतारा करील, अशी भीति तिला वाटली. म्हणून जें काय व्हावयाचें असेल तें होऊं दे पण सरळ विश्वासलाच अगोदर सांगून प्रेमाचा आपल्याला निष्कारण टोंचणारा कांटा वेळेवरच काढून टाकावयाचा, असेंच तिनें मनाशीं ठरवून टाकलें.

आपल्याला कांहीं बोलावयाचें आहे, असें सांगून विश्वासला बाजूला बोलावण्यासाठीं म्हणून वर्षा दिवाणखान्याकडे एकदां डोकावून आली.

पण तेथें, तो पार्श्वनाथाशींच बोलण्यांत दंग दिसला. शिवाय खालीं मान घालून प्रेमाही तिथें लिहित बसलेली. ती तशीच परत फिरली. आपण रागावलों आहोंत, हें विश्वासच्या ध्यानांत यावे आणि आपली चौकशी करावयाला त्यानें आपल्याकडे आंत यावें, म्हणून वर्षानें आज सकाळचा चहा स्वतः न करतां भागीर्थीकाकूंना करायला सांगितले. तो आपण न घेऊन जातां गोष्याला घेऊन जायला सांगितलें घाईगर्दीत असलेल्या विश्वासच्या ध्यानात रोजच्या नित्याच्या कार्यक्रमांत झालेला किंवा वर्षानें आवर्जून केलला फरक ध्यानांत आला नाहीं. इतकेंच काय, पण चहांत पडलेला फरकही त्यानें ओळखला नाहीं. मग वर्षा रागावली आहे आणि तिची विचारपूस आपण केली पाहिजे, हें त्याच्या लक्षात कुठून येणार ?

पण जेव्हां, भागिदार येऊन परस्पर स्टुडिओकडे गेले आहेत, त्यांनीं ताबड-तोब तिकडे येण्याकरितां आपली मोटार विश्वासला पाठविली आहे, मोटार दारांत उभी आहे; विश्वासची त्यामुळे न भूतो न भविष्यति अशी धादल उडून जाऊन त्या धांदलींत त्याने कसेंबसे स्नान उरकून कपडे करण्याची तयारी चालविली आहे, अशा वेळींच वर्षानें त्याला गाठलें होते.

विश्वास आपल्या कपडयाचें कपाट उघडून, कपडे उलथे पालथे करीत होता. रेशमी नहरू शर्टच नुसता आंगात चढवावा, कीं सुभाषबाबु प्रमाणे आपाद मस्तक खादीधारी बनावे, तशा घाईतही त्याचे ह विचार होतेच चालू.

आणि अशाच भिसाडघाईत वर्षा तेथें येऊन ठाकली. तिनें त्याच्याशीं बोलायला सुरवात केली.

तोंडानें शीळ घालीत, कपाटांतील कादघाल करीत असल्यानें विश्वासचें अर्धें लक्ष कपडयाची निवड करण्यांत आणि अर्धें वर्षाच्या बोलण्याकडे असें अर्थात्च होतें.

आरंभीं वर्षा प्रेमाबद्दल—ती पुन्हां काल आजारी झाली आहे, तिच्या शुश्रुषेची आपल्याला दगदग नको आणि तिलाही कुचंबायला नको, याच हेतूनें प्रेमाला आपल्या घरीं पोंचती करावी–वर्षा आपल्याला सांगत आहे. असें वाटून वर्षा तिच्या प्रश्नाचीं उत्तरें सहजगत्या अशीं देत होता.

पण जेव्हां " ज्याचं जळतं त्याला कळतें – तुम्हां पुरुषांना काय ?— " असें वर्षाच्या तोंडचे निकराचे, चिडक्या, रडक्या आवाजांतले कांहीं शब्द विश्वासच्या कानीं पडले, तेव्हां त्यानें एकदम चमकून तिच्याकडे वळून पाहिलें तेव्हां त्याला चमत्कारच वाटला! हातांतले कपडे हातांत तसेंच राहिले, त्यानें–

" काय म्हणालीस वर्षा ? " जरा बावचळल्या मनस्थितींत वर्षाला प्रश्न केला.

" प्रेमा या घरांत आज राहतां कामा नये ! " सर्व बळ एकवटून वर्षानें म्हटलें.

" कां बरे ? " एक भिवई किंचित् वर चढवीत, विश्वासनें विचारलें.

" मी सांगतें म्हणून ! " वर्षानें निक्षून सांगितलें; " पदरांत जळता निखारा नको आहे मला. बजावून सांगतें !" हे म्हणतांना, प्रेमा विश्वासच्या प्रतिमेला कवटाळीत असून आपण तिला पाहात आहोंत, हें काल संध्याकाळचें दिवाणखान्यांतलें दृश्य तिला यावेळींही स्पष्ट दिसत होतें.

" पण झालं काय ?— "

" तिला घालविणार कां नाहीं आजच्या आज; हें सांगावें अगोदर; उगीच वादंग नको आहे मला ! "

" पण काय झालं आहे, ते तर सांगशील ? "

एकच प्रश्न विश्वास तिला पुन्हां पुन्हा करीत होता. त्याला खरी हकीगत चट्दिशीं सांगावी असें वर्षाला एकदां वाटलें. पण तिची ते सांगायला– कां कोण जाणे – जीभच धजेना !

कोणतीही आणि कसलीही तोंडाळ स्त्री असो, पण आतां वर्षा ज्या मनस्थितींत होती, त्या स्थितींत सांपडली म्हणजे तिला घडल्या प्रसंगाचा उच्चार करणें अतिशय कठीण होऊन जातें. ती बोलूं शकतच नाहीं. तेवढीच गोष्ट लपवते – आणि आपला हेका आळवूं लागते.

आपला नवरा दुसऱ्या स्त्रीकडे पाहूं लागला आहे, हें कळलें म्हणजे, आपल्या सौंदर्याची, त्याच्यावरील मोहिनी कमी होऊं लागली आहे कीं काय आपलें आकर्षण कमी झालें कीं काय, त्यामुळें आपण नकोशा झालों कीं

काय, अशा त्यांच्या त्यांनाच शंका येऊं लागतात. आपल्यावरचा त्यांचा विश्वास उडतो. आणि त्या अविश्वासानेंच त्या जें बोलावयाला पाहिजे तें स्पष्ट बोलायला योग्य वेळींच कचरतात. आणि त्यामुळेंच त्या आपलें नुकसान करून घेतात. दुसऱ्याला दोष देऊं लागतात.

वर्षा स्पष्ट कारण सांगेना, तेव्हां तिच्या सांगण्यांत काहीं विशेष नाही, कांहींतरी थोडें मनाविरुद्ध घडलें असेल, म्हणून वैतागली आहे, असा विश्वासनें कयास केला; जास्त बोलत राहण्यास त्याला तशी फुरसतही नव्हती, म्हणून कपडे काढण्याच्या नादास तो लागला. तात्पुरती तिची समजूत घालण्यासाठीं म्हणून तो तिला म्हणाला,

" बरं आहे. मला आतां वेळ नाही. संध्याकाळीं या विषयावर बोलूं आणि काय तें ठरवूं !—"

" मग नाहीं नी संध्याकाळी नाहीं. आतांच्या आतां मी म्हणते त्याचा सोक्षमोक्ष लागला पाहिजे " कर्कश आवाजांत वर्षा ओरडली, " त्याशिवाय मी इथून हलूं देणार नाहीं कुणाला ! "

कधींच नाहीं तें वर्षानें आज आपलें स्वरूप हें काय प्रगट केलें आहे ? मूळचा सुंदर चेहरा असा संतापानें विद्रूप कां करते आहे वर्षा, हें विश्वासल । कळेना. तिच्याकडे पाहून तो थक्कच झाला ! प्रेमावर ही इतकी एकाएकीं कां घसरली आहे हे त्याला उमजेनाच.

चारदोन शब्दच वर्षानें ओरडून उच्चारले. पण तिच्या संतापाचें रूपांतर अखेर तिच्या डोळ्यांत पाणी येण्यांत झालें !

" इथं तुला प्रेमा कां नको आहे ? "

" आपल्याला ती कां हवी आहे ?— "

" म्हणजे काय ?— "

" ती आपल्यावर प्रेम करते ! "

" प्रेमा माझ्यावर प्रेम करते ? मग त्यांत काय विशेष ? माझ्यावर प्रेम करण्याचा तिला हक्कच आहे ! "

" आपणही तिच्यावर प्रेम करतां !— "

" त्यांत वावगं काय आहे ?— "

" हो तर काय ! सारं जगच आपल्यावर प्रेम करील नी आपणही जगावर तसंच उलट प्रेम करीत सुटाल ?— "

" तें माझं भाग्य असेल तर मी स्वतःला केवढा धन्य मानीन ! आणि तुलाही त्याचा अभिमान नाहीं कां वाटणार ? "

' प्रेम ' हा एकच शब्द–पण तो वर्षा एका अर्थानं उच्चारीत होती. तर विश्वास त्याच शब्दाचा उच्चार करित असतांना त्या शब्दाच्या अर्थाची दुसरी छटा स्वाभाविक स्पष्ट होत होती. पण ती छटा लक्षांत येण्याइतकी वर्षाची मनःस्थिति ताळ्यावर होती कुठें त्या वेळीं ?

प्रेमाच्या बाबतींतील विश्वासचें प्रकरण फार पुढें गेलें आहे, अशीच वर्षाची खात्री पटली.

वर्षा कांहींतरी भलताच गैरसमज करून घेऊन तापली आहे, असें विश्वासला वाटलें.

ती जास्तीच रडायला लागली.

" प्रेमाला पाठविणार कीं नाहीं एक सांगावं–– "

" छेः ! प्रेमाला अशी उगीचच्या उगीच पाठविण्याकरितां कां मी तिला ठेवून घेतली आहे ? "

" कशाकरितां ठेवली आहे, हें एकदां स्पष्ट सागावं ना मग —"

" तें तुला नाही कळायचं ! "

" मला न कळूं दे ! मला न कळलं तरी, साऱ्या जगाला कळतंय ! मांजर डोळे मिटून दूध पीत असलें, तरी जगानं कांहीं डोळे मिटलेले नसतात !— तुम्हां दोघांबद्दल लोक काय बोलतात, हें कधीं ऐकलंय ?—"

" लोक झक् मारतात ! लोकांशीं मला काय करायचं आहे ? लोक कांहीं आम्हांला पोशीत नाहींत ! "

झालें. वर्षाची केविलवाणी अवस्था झाली. ती स्फुंदून स्फुंदून रडायला लागली ! आपलें स्फुंदन ऐकलें कीं विश्वास घायाळ होतो, आणि लगेच

तें निर्वाणीचें अस्त्र तिनें काढलें. ती स्फुंदूं लागली. डोळ्यांतल्या पाण्याचे थेंब– एकाद्या अमोल मोत्यांच्या सराप्रमाणें घळघळ गळूं लागले. एरव्हीं तिच्या अश्रूंचे कौतुक करणारा, अश्रूनीं वर्षाचें सौंदर्य अधिक खुलतें, म्हणून टकमक त्याकडे पहात राहणारा विश्वास, आतां, तसेंच करण्याच्या स्थितींत नव्हता ! त्याचें चित्त बाहेर जाण्याकडे लागलें होतें. त्यामुळें तिचें कौतुक करण्याऐवजीं किंवा विरघळून ती काय म्हणतें तसें करायला तयार होण्याऐवजीं त्याला तिचा थोडासा मनांतून राग आला पण त्यानें तो व्यक्त मात्र केला नाहीं.

" मग नाहीं ना माझं ऐकणार ? "

" उगीच काय वाटेल तें सांगायला लागलीस तर कसें ऐकणार ! "

" प्रेमा माझ्या घरांत नको आहे मला ! "

" पण ती पाहिजे आहे मला ! "

" हवी आहे तर घ्या खुश्शाल तिला ठेवून ! "

" ते अगोदरच सांगितलं आहे ! "

" कळलं तें मला. असं सांगाल हें मला अगोदरच स्वप्न पडल होतं !–"

" मग कां मला विचारलंस ? "

" विचारण्याइतकी सुद्धां माझी सत्ता नाहीं वाटतं ? "

वर्षाचें रडणें आणि बोलणें, याचा विश्वासला आतां एक प्रकारचा जुलूम वाटूं लागला. तिच्या बोलण्याची–हट्टाची त्याला क्लिस यायला लागली. आणि रडण्याबद्दल कींव वाटूं लागली.

तो तिच्याशीं हुज्जत घालायचें सोडून आपल्या उद्योगाकडे वळूं लागला. पण वर्षा अजून तेथें एकाद्या खांबाप्रमाणें रोवलीच होती. तिथून जाईना. विश्वासला सुचूं देईना.

बायकांचें पुरुष ऐकूं लागले, त्यांच्या मनासारखें वागूं लागले, त्यांचा कोणत्याही शब्द झेलूं लागले, म्हणजे त्या त्यांचें असें अवसान घेतात. जास्तच आठमुठेपणानें वागावयाला लागून आपल्याला त्रास करून घेतात. दुसऱ्यालाही वैताग आणतात.

वर्षानें आतां हेंच चालविलें होतें. विश्वासला ती कांहीं सुचूं देईना. आपला हेका सोडीना आणि हेका करण्याचें कारण काय, तें उघड करूनही सांगेना.

" तूं आतां जा पाहूं ! मला उशीर होतोय !" विश्वासनें वर्षाला किंचित् कठोरपणानें म्हटले, " हातांतल्या कामांचा खोळंबा करून बायकोशीं तासन् तास बोलत बसायला मी एकादा—जहागीरदार किंवा संस्थानिक नव्हे ! वेळेचं मोल मी ओळखून वागलो नाहीं तर मी धंदा करायला चांगलाच लायख ठरेन ! — जा आतां – "

" बरं आहे माझ्यावर आपलं प्रेम नाही हें आज मला कळलं ? "

" हे कोणीं तुला सांगितलं ? — "

" जातें मी ! — "

" तेंच तुला मी आत्तां सांगितलं ? — इथं उभी राहून माझा वेळ घेऊं नकोस ! "

" मी इथंही थांबत नाहीं, नी या घरांत पण राहात नाहीं ? "

" म्हणजे ? — "

" माहेरीं ! माझी इथं काय शोभा राहणार आहे ? — मी आज माहेरीं जाणार ! — "

" याचा अर्थ काय ? " विश्वास चागलाच गडबडला ! प्रकरण भलतेंच विकोपाला गेलें आहे, हे आतां त्याच्या पुरते लक्षांत आलें !

" माहेरीं जाणार म्हणजे ? मी कसा तुला जाऊं देईन ? "

" या घरांत मी तरी राहीन नाहींतर प्रेमा तरी एक राहील ! " वर्षांनें निर्धाराच्या आवाजात सांगितलें. " आम्हीं दोघी एका ठिकाणीं याउप्पर राहूं शकत नाहीं ! ती असेपर्यंत माझी या ठिकाणीं राहायची इच्छा नाहीं!"

विश्वासचा सारा उत्साह, सारा उल्हास, सगळा आनंद एकाएकीं जमीन दोस्त झाला ! वर्षांनें त्याची कंबरच मोडून टाकली.

" प्रेमावर इतका दांत धरायचं कारण तरी काय झालें आहे ? ती तुला कां नको ? " विश्वासने तिला कळकळून विचारलें; " तिनं तुझा असा अपराध तरी केव्हां काय केला आहे ? "

" तें तिलाच विचारावं ! — "

" पण तूं सांग ना ! "

" मला गरज नाहीं ! — " इतकें म्हणून ती अधिकाधिक रडूं लागली.

वर्षाच्या बोलण्यापेक्षां तिच्या रडण्याचा विश्वासला भलताच मुका मार होऊं लागला !

" प्रेमाला पाठविणार आहांत कां आतां तरी ! "

" तिनें तुझा अपराध काय केला आहे हें तूं सांगत नाहीस ना ? मग मी तिला पाठवीत नाहीं ! "

" मग ही मी माहेरीं निघालें -- "

" माझी चूक काय हें सांगितल्याशिवाय मी तुला जाऊं देणार नाही ! " दोघेही अटीतटीलाच पेटले !

" मी या घरीं आतां पाणी प्यायला थांबणार नाही. माहेरी गेल्याखेरीज राहणार नाहीं ! " वर्षाने निर्धारानें बजावलें.

" मी तुला जाऊं देणार नाहीं ! " तितक्याच निश्चयाने विश्वासनें म्हटलें.

" म्हणजे ? हा काय माझेवर जुलूम ? "

" वर्षा, हा माझा तुला जुलूम वाटतो ? माझं तुझ्यावर किती प्रेम आहे, हें तुला ठाऊक नाहीं ? मी प्रेमानेंच तुला सांगतो आहे. मला आपल्या घरी प्रेमा हवी आहे. तशी तूं पण माझ्या पासून क्षणभर दूर होतां कामा नये ?– तुझ्याशिवाय माझं क्षणमात्र चालायचं नाही. कां असा उगाच मला त्रास देतेस – दुःखी करतेस ? आणि तूं ही सोसतेस ? – माझी तुला परवानगी नाही. तुझी आई, तुझे वडिल येथें येणार आहेत, त्यांच्या महायात्रेची सांगता करायचं तूं ठरविलं आहेस— "

" त्याची नको कुणाला काळजी ! त्यांचे ते समर्थ आहेत. आपल्या घरीं यथास्थित करतील— "

" मी तुला जाऊं देणार नाही— "

" मी इथं राहणार नाहीं— "

अगदींच दोघे तिरीमिरीला आले. निर्णय लागणार कसा, केव्हां आणि काय ?

पतीपत्नीमध्यें कांहीं तरी बरीच खडाजंगी चालली आहे, हें गोट्यानें, त्या जागेवरून जातां येतां सहज कानावर पडलें त्यावरून ओळखलें होतें; मग पुन्हां त्या जागेकडे जाणून बजून फिरकतो आहे कशाला ?—

महत्त्वाच्या कामाकरितां विश्वासला बाहेर जावयाचें आहे, त्याच्यासाठींच त्याच्या भागीदाराची मोटार दारांत येऊन तिष्ठत आहे, हें घरांतील सगळ्याच नोकरांना माहित होते; त्याला आठवण देण्याचें प्रत्येक नोकराचें कर्तव्यही होतें. मोठीं माणसें कसलेंही महत्त्वाचें काम बाहेर असलें तरी, आलेल्या मंडळीशीं बोलण्यांत रमतात; त्यांना त्या कामाचें भान राहात नाहीं, म्हणून नोकरांनीं वरचेवर येऊन त्यांना स्मरण करावे लागते; पण अशा वेळीं नोकर काय करणार ? पुढे होणार कसें ?

दिवाणखान्यांत बसलेल्या पार्श्वनाथाला किंवा प्रेमाला आंत काय चाललें आहे, याबद्दल कांहींच दाद असणें शक्य नव्हते.

गोट्याला माहित होते, तो बाहेर गेला म्हणजे मोटार ड्रायव्हर त्याला आपल्या मालकांना सूचना देण्यासाठीं सांगत होता. एकदां दोनदां त्याच्या मनांतही आलें कीं, विश्वासला आठवण द्यावी म्हणून.

भागीर्थीकाकूंना त्यानें दोघांत काय चालले असावें, याची अगोदरच कल्पना दिली होती. म्हणून त्यानें त्यांना मालकांना जाऊन सूचवूं कां ? कसें सूचवूं ! ते किंवा मालकीणबाई आपल्या अंगावर खेकसतील, असें म्हणून सल्ला विचारला.

भागिर्थीकाकूंनीं त्याला मोडता घातला, मग तो तरी काय करणार ? मोटार ड्रायव्हरला "सांगतों मालकांना—इतक्यांत येतील ते" असें सांगून जो एकदां तो आंत आला, त्यानें पुन्हां बाहेर तोंड घेतलेंच नाहीं.

मोटर ड्रायव्हर, विश्वासची वाट पाहून पाहून कंटाळला. टेकीस आला. आपले मालक आपली उशीर केल्याबद्दल हजेरी घेतील, हीच त्याला भीति पडली. तेव्हां त्यानें विश्वासला कळण्यासाठीं हॉर्न देण्यास सारखी सुरुवात केली.

विश्वासच्या कानीं तो आवाज आला. तेव्हां त्यानें वर्षाकडे सर्वस्वीं दुर्लक्ष करून हातातल्या घड्याळाकडे पाहिलें. खूपच वेळ झाला होता. त्यानें गडबडीनें सांपडतील ते कपडे काढले. आंगावर चढविण्यास लागला.

वर्षा अजून तेथें उभीच होती.

" हें पहा वर्षा, " कपडे करीत असतां विश्वास बोलत होता; " मी कोणत्या उद्योगांत आहे, किती उत्साहांत आहे हे तूं पाहतेस. हा उद्योग मी माझ्या एकटया करितांच करीत नाहीं. तूं त्याची खरी आणि पुरी भागीदार आहेस. माझ्या यशाचें चीज तूं केलेंस म्हणजे मला जी धन्यता वाटेल, त्याची सर उभ्या जगांत कशालाही येणार नाहीं. तूं गेलीस तर माझा विरस किती होईल याची तुला कल्पना तरी आहे का ? म्हणून तूं जाऊं नकोस असें निक्षून पुन्हां पुन्हां सांगतों आहे. "

पण वर्षाचें माथें त्यावेळीं पुरतेंच फिरलेले. ती विश्वासचें ऐकायला तयारच नव्हती. प्रेमा त्याला पाहिजे आहे, आपण नको आहोंत, हेंच वेड तिच्या मनानें घेतलेलें. तिनें,

" मी या घरांत राहणार नाहीं ! " हें कटु ध्रुपद गायलेंच !

मोटारचा हॉर्न पुन्हां ऐकायला आला.

विश्वास तसाच बाहेर पडला. जातां जातां वर्षाला त्यानें हृदय पिळवटून बजावलें. ' तूं माहेरीं जाऊं नकोस. मी सांगतों आहे. लक्षांत ठेव. या-उप्पर तुझी मर्जी ! पण माझी निराशा करून गेलीस, कारण नसतांना मला दुःख होईल अशी वागलीस तर पुन्हां या घरीं तुला पाऊल टाकतां येणार नाहीं. मी घरांत येऊं देणार नाहीं. माझी तुला यावेळीं तरी मुळींच परवानगी नाहीं. याचा विचार करून तुला जें काय करावयाचें—वागावयाचें, तें करायला तसें वागावयाला, तुझी तूं मुखत्यार आहेस — "

तिसऱ्यादा मोटारचा आवाज येत असतांना तो धांवत मोटारींत जाऊन घुसला ! पार्श्वनाथाला विचारायलाही वेळ मिळाला नाहीं !

वर्षानें मग काय केलें ? तिनें काय ठरवलें ?

त्या दिवशीं सकाळीं प्रेमा उठून आपल्या खोलींतून बाहेर आली खरी, पण ती आपल्या मनाशीं अगोदरच मरून चूर झाली होती त्यामुळें आपण कोणाच्या दृष्टीस पडूं नये आणि आपल्यालाही कोणी पाहूं नये असेंच तिला अजून वाटत होते. पण घरांत असें कसें जमणार ?

तिला अगदी चोरट्या-चोरट्या सारखे झालें होतें. तिला अशीच खात्री वाटत होती, कीं, वर्षानें आपल्या नांवाचा आणि कृतीचा साऱ्या घरभर डांगोरा पिटला आहे आता जो कोणी, किंवा जी कोणी आपल्याकडे पाहील, त्यांची एकच दृष्टि असणार. आपल्याकडे पाहून नाकें मुरडलीं जाणार कुज-बूज होणार कुत्साळकीनें हंसणार !

तशांतून रात्रीं पडलेलीं कांहीं स्वप्नेंही तिच्या मनांत अजून घरणें धरून बसलींच होतीं. तीं टोंचीत होतीं. बोचीत होती. प्रेमाला व्याकूळ करीत

होती. कशींबशीं तिनें आपलीं प्रातःकर्मे आटोपलीं. अंग धुतलें. वेणीफणी केली आणि इकडे तिकडे न पाहतां खालच्या मानेनें तिनें आपल्या लिहावयाची जागा गांठली. लिहावयाला लागली.

पण रोजच्यासारखें तिला आज लिहावयाचें जमेना. हात कांपायला लागला. डोळ्यापुढे अंधेरी येते आहे असें वाटूं लागले. ज्यावरून ती नक्कल करीत होती, त्या कागदाकडे पुन्हां पुन्हां पाहिले तरी, तिला वाक्य नीट वाचतां येईना. वाचलेलें ध्यानांत राहिना. राहिलें तरी लिहितांना आठवेना!

वर्षाच्या तावडींत आपण एकट्याच सापडलो तर ती काय बोलेल आणि काय नाहीं, ही धास्ती तिला होतीच. म्हणूनच चपळाई करून ती दिवाणखान्यांत झटपट येऊन बसली. विश्वास — पार्श्वनाथ असतांना वर्षा बोलणार नाहीं, हीच तिची समजूत. आणि त्यांत थोडासा अर्थही होता. सगळ्यांच्या देखत बोलणाराला जरा तरी संकोच होतोच. आणि अपराधी मनाच्या माणसाला एकटे न राहता मंडळी असतील तेथें जाऊन बसावे असे वाटत असतें तें एवढ्यासाठीं.

विश्वासशीं बोलण्यासाठी वर्षा तशी एकदादोनदा तिथें येऊन डोकावून गेलीच होती. तिघेही तिथें दिसल्यामुळें तिला परत जावें लागलें होते. गोट्यानें चहा आणला. तो सगळ्यांनीं घेतला. वर्षा चहाला तिथें आलीच नाहीं. तिने भागिर्थीकाकू आणि गोट्या यांच्यांत बसूनच घेतला. कितीतरी दिवसांनीं मालकीणबाईनीं आपल्या जवळ बसून, आपल्या बरोबर चहा पिण्याचा मान आपल्याला दिला असें वाटून भागीर्थीकाकूंना किती किती बरें वाटले. चहा पितांना एकदां दोनदां त्या वर्षाला तसें म्हणाल्या देखील. वर्षानें नुसतेंच हंसल्यासारखें केलें. फारसें बोलली मात्र नाहीं.

चहापान चालूं असतांच टपाल आलें. विश्वासच्या भागिदाराची तारही येऊनही थडकली! त्या वेळेपासूनच स्टुडिओकडे जाण्याचा विश्वासला वेध लागला. त्याला आज आपली केशभूषा सजवावयाची होती. चेहऱ्याचा डागिना बनवावयाचा होता. म्हणून पार्श्वनाथाशीं चाललेल्या गप्पाष्टकांचें सत्र, मध्येंच थांबवून तो आपल्या नेहमींच्या ठरलेल्या "देशभक्त — नेहरू — सलून" कडे झटपट चालता झाला. दिवाणखान्यांत दोघेच उरले. प्रेमा आणि पार्श्वनाथ!

पार्श्वनाथानें आपला चिरूट काढला. शिलगावला. त्याची मजा चाखीत, टपालांतून आलेलीं दैनिकें आणि मासिकें त्यानें आपल्या जवळ उचलून घेऊन वाचण्यांत कांहीं वेळ घालविला.

अलिकडच्या बहुतेक वर्तमानपत्रांतून, एकाग्राने ओळ न् ओळ, अक्षर न् अक्षर वाचून, मजकूर हृदयसंपुष्टांत सांठवावा, त्यावर विचार करावा, असें असतेच कुठें मुळीं ?

आठवड्याचे भविष्य, नाटकें सिनेमांचे सचित्र पान आणि जाहिरातवजा नव्या जुन्या, चालू होणाऱ्या चित्रपटांबद्दल, नटनटींच्या, विशेषतः नटीच्याच छायाचित्रासह आणि तिच्या अभिनयादि गुणापेक्षां तिच्या सौंदर्याच्या भडक शब्दांतील मजकूर, कुठें चिमटे, कुठे फटके, कुठे कोपरखळ्या, बरीचशी वैयक्तिक टीका, टवाळी, कुचाळकी, अशाच मजकुरांनीं वर्तमानपत्रें बरबट-लेली. त्यांत वाचायचें तें काय, आणि वेळ घालवायचा तो किती ?

ठळक ठशांतील शीर्षकांवरून नुसती नजर फिरविली, तरी झालें काम !

सकाळीं पुढे आलेला चहाचा कप तोंडाला लावून त्याचा एकेक घोंट घेत घेत एकेका घुटक्याबरोबर एकेक वर्तमानपत्र उलथेंपालथें करीत सुटावें; म्हणजे कपांतल्या चहाचा अखेरचा घुटका आणि समोर आलेली पांचपंचवीस पत्रांचें वाचन, एकदमच खलास होतें.

टपालांतून आलेल्या चारदोन पत्रांचा फडशा पाडायला [illegible] तरी असा कितीसा वेळ लागणार होता ? त्याने झरझर, साऱ्या ठळक शीर्षकां-वरून नजर फिरविली. "महायुद्धाच्या भडकत्या ज्वाळा" या सदरांवर त्याची नजर थोडीशी स्थिरविण्यासारखी होती; कारण ज्या आफ्रिकेंतून तो नुकताच आला होता, त्या आफ्रिकेपर्यंत ती आग आली आहे काय, जो प्रांत प्रत्यक्ष पाहिला होता, तेथें त्या ज्वाला भडकल्या असतील तर तेथें आज लोकांचें काय झाले असेल या कुतूहलानें त्या मजकूरावर स्थिर करावी अशी बुद्धि होणें, स्वभावधर्माला अनुसरूनच होते.

पण यावेळीं पार्श्वनाथाला, त्या मनोरंजक मजकुरापेक्षांही दुसऱ्याच एका विषयानें अगोदरपासूनच आकर्षिलें होतें. त्या विषयाभोंवतीं तो गुंडाळत होता. घोंटाळत होता.

प्रेमाशीं त्याला बोलावेसें वाटत होतें ! आणि ती वेळही त्याला अनुकूल अशीच मिळाली होती. अनायासें विश्वास तेथें नव्हता.

अगोदरपासून प्रेमा त्याच्याशीं आडपडद्यानें – विश्वासला मध्यें करून कां होईना, पण बोलू लागली होतीच.

पण त्याला तिचा मनोदुर्ग काबीज करावयाचा होता. त्या दुर्गाच्या तटाला, कुठून आणि कशी आपल्या वाणीची यशवंती घोरपड लावावी, म्हणजे ती अशा जागीं जाऊन चिकटून बसेल की, तिथें तिनें पक्कें व्हावें आणि तिने आपला मनोरथ – पूर्ण करण्याचें यश मिळवून द्यावे. त्याच एका विचारांत पार्श्वनाथ होता; आणि तें ठरेपर्यंत डोळ्यांपुढून वर्तमानपत्रें फिरविण्याचें सोंग करीत होता. एक पत्र बाजूला करून दुसरें हाती घेई-पर्यंतच्या मधल्या वेळांत तो प्रेमाकडे सहज कटाक्ष टाकीच.

एरव्हीं पार्श्वनाथ तोंडाचा फटकळ, हृदयाचा निष्कपटी, असा होता. तो प्रेम, प्रणय, त्याची जोपासना, संवर्धन, संगोपन, वाढ आणि परिणति असल्या ढंगांना, आणि चोंचल्याना महत्त्व देणारा नव्हता ! त्याचें प्रेमा-बद्दलचें रोख ठोक मतें " कसलं आहे प्रेम आणि कुठचा प्रणय ? एक तरुणी आणि एक तरुण अशा जोडीला खुशाल एका खोलीत लोटावें, बाहेरून कड्या कुलपें ठोकावींत. असें सतत चारसहा महिने करीत गेलें म्हणजे त्या जोडींत आपोआप परस्परावर प्रेम बसलेलें दिसेल. त्याला अगोदर संभाषणें नकोत, ओळख नको, हिंडाफिरायला जायला नको, कीं परस्परांचीं मनें परस्परांना कळूनही घ्यायला नकोत ! " अशा विक्षिप्त कोटींतलींच होतीं.

पण असें झटक्यासरसें जुळणारें आणि चुटकीबरोबर तुटणारें प्रेमाचें प्रेम पार्श्वनाथाला नको होतें. त्याला तिचा चिरंतरचा मधुर अत्रुटित सहवास हवा होता. आणि म्हणूनच तो तिच्याशीं कशी बोलायला सुरुवात करावी, याचा मनाशीं किती वेळ सारखा विचार करीत होता.

रात्रीं प्रेमाच्या प्रकृतीला नीट नव्हत, हें पार्श्वनाथाला माहित होतें; तिचा चेहरा त्याला अजूनही मलूल असल्याचें दिसलें.

" तुम्हीं किती मलूल दिसतां ! बरं वाटत नाहीं ? काय होत आहे? " पार्श्व-नाथाच्या मनांत एकदम सहज आलें आणि त्यानें प्रेमाला प्रथम हेंच विचारलें.

तो इतका बेच्छूट, त्याचा नेहमींचा आवाज घनगर्जनेसारखा; पण यावेळीं त्यानें इतक्या सदयतेनें आणि कोमल–साहानुभूतीच्या स्वरांत तिला विचारलें, कीं, त्याचा एकदम परिणाम तिच्या मनावर विलक्षणच झाला !

आपुलकीची आणि खऱ्या सहानुभूतीच्या जिव्हाळ्याची गोष्टच अशी आहे; त्याचा परिणाम झाला नाहीं अस होतच नाहीं.

प्रेमाच्या कानीं ते अत्यंत आपुलकीचे शब्द पडले, त्यासरसें तिनें चटकन् पार्श्वनाथाकडे मान वर करून पाहिलें. किती थोडा क्षण–क्षणाचाही शतांश असेल. पण तेवढयांतच त्याच्या विशाल डोळ्यांत आपल्याविषयींची अथाग सहानुभूति सांचल्याचें तिला दिसून आलें !

तेवढयांत पहाटेच्या विस्मृतींत जात चाललेल्या त्या स्वप्नानेंही तिच्या हृदयाला हलविलें. तेच शब्द. तींच वाक्यें. तोच आवाज आणि चेहराही पण तोच !—

तिला एकदम चमत्कार वाटला ! कसेसेंच झालें !

सकाळीं ती आपल्या जागेवर येऊन बसली, तेव्हांपासून आतांपर्यंत तिनें मुळींच वर पाहिलें नव्हतें. विश्वासकडेच काय, पण त्याच्या प्रतिमेकडेही पाहण्याची शक्ति तिच्यांत उरली नव्हती ! मग ती पार्श्वनाथाकडे कशी पाहणार ?

" नक्कल पुरी होत आली आहे ना ग ? " एवढेंच विश्वासनें तिला एकदां विचारले होतें. हातरुमालाने कपाळावरचा घाम पुशीत कसेंबसें " हो " असें तोंडांतल्या तोंडांत उत्तर देऊन ती मोकळी झाली होती.

" आल्यापासून मी पाहातों आहे, " पार्श्वनाथानें विश्वासला विचारलें होतें—

" कसलं काय हें इतकें लिहिणें चाललं आहे ? कळूं दे तरी ! "

" अरे, हो ! बरी आठवण केली. मी तुला तें सांगणारच होतों— नव्हे ! दाखवून, वाचावयाला देऊन तुला त्यावर अभिप्राय मागणार होतों. सल्ला सूचनाही पण मला तुला त्याबद्दल विचारावयाच्या होत्या. आहेत. चित्रपट कथानक मी लिहिलें आहे, त्याची सुवाच्य नक्कल प्रेमा करते आहे ! "

विश्वास पार्श्वनाथाला मोठ्या उत्साहानें सांगत होता. " प्रेमा, दे ग ते कागद पार्श्वनाथाला वाचायला. आणि पार्श्वनाथ ! लक्षपूर्वक, तुझें खरं खरं मत दे ! "

" भले शाबास ! " पार्श्वनाथ आपल्या स्वभावाप्रमाणें एकदम गडगडणाऱ्या आवाजांत हंसत बोलला " न्हाव्याच्या सभेला धोबी अध्यक्ष करून काय रे फायदा ? मला तुझ्या लेखनांत काय कळणार आणि मी मत काय देणार ? "

ते दोघेही खूप हंसले. पण प्रेमाला हंसू आले नाही. तिची मनःस्थितीच नव्हती तर हंसणार कशी ? पार्श्वनाथानें ती हंसली नाहीं हें पाहिलें होतें. त्याच वेळीं सुकलेल्या फुलानें देठासह मान टाकावी, तसेंच तिचें झालें आहे, हें त्याच्या लक्षांत आले होतें.

विश्वासनें आपली चौकशी करावी, असें प्रेमाला वाटलें होतें. करील अशी तिची कल्पना होती. पण विश्वासनें तसें कांहींच केलें नाहीं.

ज्याच्याकडून कसलीच अपेक्षा नव्हती, त्या पार्श्वनाथानें तिची पूसतपास केली ! त्यानें तिच्या हृदयालाच हात घातला !

जितक्या त्वरेने तिनें त्याच्याकडे पाहिलें, तितक्याच घाईनें तिनें खाली मान केली. पण हुळहुळत्या जागेवर ऊबदार फुंकर घालावी, म्हणजे जसें गोड वाटतें; तसेंच प्रेमाला यावेळीं झालें !

सहानुभूतीच्या–जिव्हाळ्याच्या–आपुलकीच्या शब्दांनीं, ज्या वेळी तिला त्याची जरूरी होती त्याचवेळी नेमकी पार्श्वनाथाकडून ती तिला मिळाली ! त्याचा परिणाम झाला. तिला एकदम हुंदका आला ! डोळ्यांतून पाणी गळूं लागलें. तें पाहून पार्श्वनाथाला बरें ही वाटलें आणि वाईटही वाटले !

एकाएकीं आपल्या विचारण्याने प्रेमा रडायला लागली, हें पाहून तो गोंधळला. त्याला ती खरेंच आजारी आहे, असें वाटून वाईट वाटलें ! बरे वाटलें, तें आपल्या बोलाची घोरपड योग्य जागा धरून बसली, हें ओळखून !

आणि केव्हांही हें असेंच असतें. दुर्घट दुर्ग काबीज करण्यांत फत्ते मिळविणाराला, त्याची नाजूक, कमकुवत, अशी माऱ्याची जागा अचूक सांपडावी लागते; सांपडली कीं, तिचा लगेच फायदा करून घेण्यांत तत्पर राहावें लागतें म्हणचे फत्ते ठेवलेलीच ।

पहिल्या सपाट्यालाच प्रेमाच्या हृदयांतील नाजूक—हुळहुळणारी जागा पार्श्वनाथाला गंवसली ! तिचा हुंदका म्हणजे आपल्या भावी यशाची नौबद वाजल्याप्रमाणेंच वाटली ! आणि मग काय ? तो तानाजीच्या तोऱ्यानें तटावरून सावधगिरीनें चढायला लगेच पुढें सरसावला !

" प्रकृतीला काय होते ? औषध घेतां कीं नाहीं ? जेवण जाते की नाहीं ? सारखं एकेजागी बैठक मारून कसें चालेल ? हिंडलं पाहिजे. फिरलं पाहिजे. खेळलं पाहिजे. उघडयावरची मोकळी हवा भरपूर घेतली पाहिजे. तुम्हीं आधुनिक विदुषी प्रकृतिकडे अगोदर दुर्लक्ष करतां, मग ही अशी वेळ वारं-वार येते. तुम्हीं खचतां; आणि घरांतल्या मंडळींना काळजींत घालतां. " वगैरे वगैरे दिसायला दुसरा विषय, पण हजार वळसे आणि एक गांठ, त्या-प्रमाणें बोलण्यांतला मतलब एक अर्थ एक. सहानुभूतीनें ओथंबलेला शब्द आणि त्याचें पर्यवसान प्रेमाच्या आकर्षणांत !

प्रेमा हळूं हळूं पार्श्वनाथाशीं बोलूं लागली. उत्तरे देऊं लागली तो विचारील ती माहिती देऊं लागली.

नदीचा ओघ सरळ—समोर वाहात असतो. दुर्लंघ्य अडथळा येईपर्यंत तसाच चालतो. एकादा प्रचंड खडक आड येतो; त्यावर तो जोरानें आदळतो त्यावेळीं त्याचा इतका दांडगा आवाज होतो कीं, जसे काय त्या नदीच्या जीवाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या खडकावर आदळून झाल्या; त्या वेदनांनीं हैराण होऊनच ती आक्रोश करीत आहे ! खडकानें मार्ग अडविला, म्हणजे, त्यालाच वळसा घालून ती आपला नवा — पुढे जातां येईल असा मार्ग काढते, पुढे जाते.

प्रेमाच्या जीवित ओघाला विश्वासच्या खडकावर असेंच एकाएकीं आद-ळावे लागलें होतें. तो खडक आहे, त्यावर तूं आपटत आहेस, तुझा कपाळ-मोक्ष तिथें आहे, हें वर्षानें तिला जाणवून दिलें होतें. म्हणूनच काल रात्री-पासून प्रेमाचें हृदय त्या वेदनांनीं घायाळ झालें होते. रडत होते. कढत होतें.

तिच्या जीवनप्रवाहाला, विश्वासच्या खडकाला वळसा घालून, पुढें सरक-ण्याचा मार्ग आहे, तो दाखविण्याला, विश्वासच्या जागीं आपण आहोंत,

असेंच जणूं काय, पार्श्वनाथ प्रेमाला, आपल्या शब्दांशब्दांतून पटवून देत होता !

प्रेमाला कल्पना नव्हती - पण तिच्या ओघाला, पार्श्वनाथाच्या बाजूनें जाण्याची वाट मिळूं लागली होती — ती त्या दिशेनें निघाली इतकें खरें !

त्यानें तिला घरची माहिती सहज विचारली तिच्या वडिलांचें नांव, तिच्या तोंडून कळल्यानंतर हर्षवायु व्हावा, तितका आनंदून पार्श्वनाथ तिला म्हणाला, ' म्हणजे ? बाबासाहेब देशपांडे कां तुमचे वडिल ? अरे वा ! ते तर माझे लहानपणचे गुरुजी ! मी त्यांचा आवडता शिष्य ! माझ्या हूडपणाबद्दल मला खूप धाक दाखवीत, तर माझ्या कुशाग्रबुद्धीवर ते बेहद्द खूष असत ! असं आहे तर !— म्हणजे पहा कसा योगायोग आहे तो ! विश्वास माझा बालदोस्त. बाळासाहेब देशपांडे माझे बालपणचे गुरुजी ! तुम्ही त्यांचीच मुलगी किती जवळ जवळ आलो हो आपण ! ''

प्रेमालाही तें ऐकून बरें वाटलें. पार्श्वनाथ अगदीं जवळचा असा वाटूं लागला. बोलतां बोलतां पार्श्वनाथानें, '' तुम्हीं टेनिस खेळत का नाहीं ? खेळत चला बैठा उद्योग करणाराने टेनिस अवश्य खेळायला हवें ! त्यांना तो खेळ उपकारकच असतो ! मी आज विश्वासलाच मुळीं सांगतों. तो, वहिनी, तुम्हीं, मी, आहोंत. सर्वांनाच खेळता येईल. मला त्यांत विशेष गम्य नसलें तरी तुमच्याकरितां खेळायला आपण जरूर तयार आहोत. आमचे म्हणजे आडसूळ प्रकरणा पैकीं बेत ! टोला मारायचा ! मग कांहीं कां होइना. तर सेट आम्हांला देतां न आला तरी घेण्यांत आम्हीं कधीच कमीपणा समजणारे नव्हे !''— येथ पर्यंत, एका दिवसांत, एका बैठकींत प्रेमाशीं बोलण्याची — तिला बोलावयाला लावण्याची पार्श्वनाथाने गंमती गंमतीने मजल तर मारली !—

प्रेमाचे सुरेल सूर जुळून मनासारखें संगीत आपल्याला मिळवितां यावेत, म्हणून पार्श्वनाथ प्रेमाच्या हृदयवीणेच्या तारा इकडे जुळवीत चालला होता, त्यांत त्याला यशही येऊं पहात होते; तर त्याच वेळीं तिकडे — आंतल्या आंगास — विश्वास — वर्षांच्या प्रेमाच्या हृदयवीणेच्या मनासारख्या कधींपासून जमलेल्या तारातरंगाचा जोड वर्षा एकसारख्या ताणण्याची, तोडण्याची,

अट्टाहासानें, हेक्यानें. क्षुल्लक गैरसमजानें एकसारखी धडपड करीत होती !

*क्वचित् वीणावाद्यं क्वचिदपि च हा हेति रुदितम् ।*

असें म्हणतात ते अशामुळेंच नाहीं तर काय ?

पार्श्वनाथ – प्रेमाचा बोलण्यांत किती वेळ गेला – आणखी किती वेळ गेला असतां, कोण जाणें ! पण तेवढ्यांत गोट्या त्यांना जेवणाची आठवण द्यायला आला. त्यानें सांगितलें, " मालक कवा येत्याल ? त्येच्यापायीं तुम्ही खोळंबू नगा – जेवून शानी घ्या, असं बाईसाब सांगत्याती ! "

खरें म्हणजे वर्षानें हे सांगितलेंच नव्हतें. भागिर्थीकाकूंनीं धोरण ठेवून सांगितले होतें. त्या कळकळत थांबणार तरी किती ?

विश्वास मोटारींत बसल्यानंतर, त्याने दार ओढून घेतांना त्याचा खाड-कन् जो आवाज झाला, तो कानांवर येईपर्यंत वर्षा विचारमग्न एकाच जागीं उभी होती. पण तो आवाज म्हणजे विश्वासनें संतापानें आपल्या श्रीमुखांतच भडकावली आहे, असें वाटले. त्याबरोबर तिने जरा भानावर येऊन एकदम मनाचा निश्चय केला. आपलें कपाट उघडलें. भराभर चार लुगडीं, कांहीं पातळें, पोलकी काढायला लागली. तिनें माहेरीं जाण्याची झपाट्यानें तयारी चालविली—

भागिर्थीकाकूंना " मी दुपारच्या गाडीनें माहेरीं जातेय– " असे सांगितले. गोट्याला हाक मारून वेळेवर टांगा आणायला आणि आपल्या-बरोबर यायला लगेच ताकीद देऊन ठेविली.

भागिर्थीकाकू तिच्याकडे टकमक पाहातच राहिल्या. त्यावेळीं वर्षाला विचारण्याची, चौकशी करण्याची कांही सोय होती कां ? तिची मुद्राच फिरली होती. भागिर्थीकाकूंनी ताईचा रागरंग ओळखला. गप्पच बसल्या. पण अगदीं खालच्या आवाजांत " जेवायचं झालंय. साहेबांची वाट पाह्यची कीं पाहुण्यांना अगोदर जेवू द्यायचं. तुमचंही जेवण तसं लवकर झालं म्हणजे तितकं बरं— " अशी भागिर्थीकाकूंनीं पुटपुट केली.

तेवढें त्यांचें तिनें ऐकलें पण ' बरं ' म्हणाली.

आणि तेवढ्यावरच भागिर्थीकाकूंनीं गोट्याला बाहेर " जेवायचं झालंय.

साहेबांची वाट पाहायला नको. ते केव्हां येतील तेव्हां येतील " असें सांगायला सांगितलें. गोट्याच तो बोलूनचालून त्यानें कांहीं सांगितलें. कांही शब्द गाळले.

पण सर्वांचीं जेवणें उरकलीं. जेवणार कोणीच कांही बोललें नाहीं. बोलायला विश्वास नाहीं तर बोलणार कोण काय ? सोबतीला पार्श्वनाथ असल्यानें प्रेमाला वर्षा कांही बोलेल, ही काळजी उरली नव्हती. ती बोललीही नाहीं. आणि वर्षाकडे तिने पाहिलेंही नाही.

वर्षा तर आपल्याच गर्दीत – विचारात होती. तिनें प्रेमाकडे ढुंकूनसुद्धा पाहिलें नाहीं.

जेवणानंतर पार्श्वनाथाला आपल्या कामाला कुठें जायचें होतें, तिकडे वेळ होतांच तो गेला. प्रेमा आपल्या खोलींत विश्रांति घ्यायला गेली.

वेळ होतांच गोट्यानें आणलेल्या टांग्यात आपल्या सामानासह वर्षा चढली. बरोबर गोट्याला तिकीट काढण्यासाठीं, जागा करून देण्यासाठीं आपल्याबरोबर घेतलें. निघतांना भागिर्थीकाकूंना फक्त ' येते ' असे म्हटलें. ' कां जातें ' मी ' केव्हां येईन ' यापैकीं कांहींच बोलली नाही.

तिच्या जाण्याच्या घाईत, निघण्यांत किती तरी वेळ गेला. प्रेमा आपल्या खोलींत विश्रांति घेऊन झाल्यावर तशीच वाचीत पडली होती. त्या गडबडींत भागिर्थीबाईचें पुराण वरीच अंतरलें. त्यांच्या जोडीच्या ठिकठिकाणीं काम करणाऱ्या स्वैयंपाकिणी मैत्रिणींना, कधीं ' पुराण ' न चुकविणाऱ्या भागिर्थीबाई आज चुकल्या कशा, असें वाटून, त्याना चुकल्याचुकल्यासारखे झालें.

घरीं मालकीणबाई नाहींत म्हटल्यावर, त्या पुराणाला तरी कशा जाणार, आणि त्यांना ' कीर्तन ' कसें साधणार ! त्यांचा जीव त्याकरितां एकसारखा खालींवर होत होता. पण घरीं दोन [illegible] त्यांच्या दुपारच्या ' चहा 'ची व्यवस्था नको व्हावयाला ? आपल्याशिवाय करणार कोण ? वर्षा घर टाकून गेली, त्यांना, आपल्या अंगावर ती घर टाकून गेली, आपल्याला तें संभाळणें, अशी जबाबदारी वाटणें साहजिकच होतें. जीवावर धोंडा ठेवल्यासारखें त्यांना झालें पण थांबल्या बिचाऱ्या !

भागिर्थीबाईनीं " बालस्वामी " चें पुराण चुकविलें, पण त्या भिलवडी-कर शास्त्रीबुवांचा कीर्तनाला तरी त्या येताहेत कां पहावें, म्हणून कधीं नव्हे त्या, त्यांच्या, मनुताई, दुर्गाताई, उमाकाकू या मैत्रिणी एकामागें एक त्यांचा शोध करायला आल्या कीं !

पाय न वाजतां, इकडे, तिकडे, पुढें मागें पहात त्या घरांत शिरल्या. आपण कोणाच्या अध्यांत नाहीं, मध्यांत नाहीं, आमचा कोणाला त्रास व्हायचा नाही; आम्हांला कोणी बोलायची गरज नाही, आमची पायरी आम्हीं ओळखून आहोत, तुम्हीं मोठे—आम्हीं लहान हें आमचें आम्हीं ओळ-खून आहोंत. असें घरांतल्यापैकीं कोणीही त्यांच्याकडे पाहिले तरी त्यांना तसें वाटावें, अशीच त्यांची घरांत येण्याची पद्धति होती. कोणी बोलेल कीं काय ? कोणी विचारील की काय ? असें पहात पहात, त्या साळकाया माळ-काया थेट जेथें भागिर्थीकाकू होत्या तेथपर्यंत येऊन थडकल्या.

भागिर्थीकाकू दुपारच्या ' चहा 'च्या तयारींत होत्या.

" अगबाई ! — तुम्ही आलात ? या — " भागिर्थीकाकूंनीं सर्वांचें घरच्या सारखें स्वागत करून म्हटले; " पुराण करून आलांत ना ? माझं बाई चुकलं ! कशी चुटपुट लागली. वाटतय कीं परमेश्वरानं माझ्या हातून कधीं नाहीं ते आज हे पाप कां घडविलें ? पण करायचं काय म्हणतात ना परस्वाधीन जिणं नी पुस्तकी विद्या. तशातली गत ! "

" पण तू पुराण कां चुकवलंस ? हें साग अगोदर भागिर्थी ! "

मनुताईनें हलक्या आवाजांत विचारळें.

" वहिनीबाईनीं तुला अडवल का काय ग ? " दुर्गाताईनें पृच्छा केली.

" कित्ती छान सांगितलं ग आज " उमाकाकू मिटक्या मारीत नुसतेच म्हणाली.

घरच्या मालकिणी म्हणजे स्वयंपाकाच्या बायांच्या " ताई " नाहीं तर " वहिनी " आपल्या कायमच्या ठरलेल्या. " तुझ्या वहिनीबाई कुठं दिसत नाहींत त्या ? " आजूबाजूला पहात मनुताईनें विचारले आणि कां ? म्हणून झोपल्या आहेत कीं काय ? असें, तसा अभिनय करूनच विचारलें.

भागिरथीकाकूंना एकीच्या प्रश्नांचें उत्तर देण्याची फुरसदही न देतां दुर्गाताईनें त्यांच्या कानाशीं लागून " अन् ती कुठें आहे ग ? पाहायची आहे तिला, अशी कशी काय आहे ती तरी ! — "

प्रेमाला पाहण्याचीच त्या सगळ्यांना उत्सुकता होती. पाठीमागें, खऱ्या खोट्याची शहानिशा करण्याच्या भानगडींत न पडतां, जिच्याबद्दल आपापसांत हवें तसें बोलायचें, नावें ठेवायचीं, कुचाळकी करायची, त्यांच्या करणीनें धर्म बुडाला, नागव्या नाचतात मेल्या, पहावत नाहीं, ऐकवत नाहीं, अशी बडबड करावयाची; त्यांना पाहण्याची मात्र सगळ्यांना उत्कंठा आणि आवड ! काय विचित्र मनुष्यस्वभावाची घडण ही !

नवरा बायकोंत प्रेमाच्या पायीं खडाजंगी उडाली, आणि वर्षो त्याच तावातावांत माहेरीं निघून गेली हा कयास भागीरथीकाकूंनीं बांधला होताच. तें सारें भारत आपल्या मैत्रिणींना सांगण्याची इच्छा ही होती. पण ती त्यांना तिथें बसून सांगायची चोरी वाटू लागली. बाहेर गेल्यावर सांगण्याचे त्यांनीं मनाशीं ठरवलेंच होते; पण जसें काय आपल्याला माहितच आहे, अशा थाटानें––

" आमच्या ' ताई ' दुपारींच माहेरीं गेल्या. त्यांची आई बरीच सिक आहे असं कळलं म्हणून त्यांना जावं लागलं नी म्हणून माझं पुराण बुडालं ! " असें त्यांनीं ठासून सांगितलें.

" मग आतां कीर्तनाला तरी येणार आहेस कां नाहीं ? " रमाकाकूनें विचारलें.

" बायक्या विष्णूच्या देवळांतलें कोल्हटकर बुवांचं कीर्तन आतां संपत आलं असेल. तें कांहीं सांपडायचं नाही ! " दुर्गाताईनें माहिती दिली.

" भिलवडीकराचें कीर्तन दाढीवाल्या दत्ताच्या देवळांत इतक्यांत उभं राहील ! लवकर चलशील तर जागा सांपडेल. पहिल्यापासून कीर्तन ऐकायला मिळेल. " मनुताईनें घाई करण्याकरितां म्हटलें.

" चहा झाला कीं निघूं या ! " भागिरथीकाकू म्हणाल्या.

" आटप तर बाई लवकर ! " साऱ्यांनींच घाई चालविली.

" तुम्हीं घेणार ना ? " घरमालकीणीच्या ऐटीत भागिर्थीकाकूंनीं सगळ्या जणींकडे पहात, आणि त्यांच्याकरितां दुसरें आधण स्टोव्हवर चढवीत विचारलें.

" नको बाई ! उशीर होतोय ! " मनुताई म्हणाली.

" करतेंसच तर संध्येच्या पळीभर घेईन ! " दुर्गाताईची सम्मति.

" मला पण जास्त नको ! कानकोरण्याइतका दे ! " रमाकाकू म्हणाली.

" तुम्ही साऱ्याजणींच घेणार तर मी पण बापडी घेईन शिंपल्याइतका ! "

" मी तेच म्हणतें ! " भागिर्थीकाकूंनी म्हटलें.

[illegible] प्रेमाच्या खोलीत तिचा चहा नेऊन दिला. पार्श्वनाथ नुकतांच हुश्श करीत लेटला होता. त्याच्याकडेही पोंचविला.

मग सगळ्याजणींनींच चहा घेतला. घेतला तो मात्र भरपूर !

दारूबाजांचें दारूचे आणि स्वयंपाकीणकाकूंनें चहाचें व्यसन, अगदीं तोंडीस तोड म्हणायला कांही हरकत नाही.

गोट्याचा चहा झांकून ठेवायला भागिर्थीकाकू विसरल्या नाहींत. तो वर्षाला पोंचवायला स्टेशनवर गेला होता, तो अजून आलाच नव्हता.

" चला आतां " म्हणत भागीर्थीकाकू मैत्रिणींबरोबर कीर्तनाला जायला तयार झाल्या.

पण जातांना सांगून जायचें कोणाला ? वर्षा घरीं नाही. त्यांना जरा पंचाईत पडली. निदान गोट्या असता, तरी त्याला सांगून ठेऊन जातां आलें असतें. पण त्यांना इतक्यांत सुचलं. प्रेमाला विचारावें. विचारण्याच्या निमित्तानें, आपल्या मैत्रिणींना प्रेमाला पाहण्याची हौस आहे, तीही त्यांची साहाजिक पुरवितां येईल.

मनांत आले आणि त्याप्रमाणें भागीर्थीकाकूंनीं डोळे बारिक करीत, दाबल्या, ओठांनीं आंतल्या आंत हंसत, " ती तुम्हांला पाह्यची आहे ना, या माझ्या मागून—दाखवतें— " असें म्हणून सगळ्या जणींना आपल्या मागून यायला सुचाविलें. त्या पुढें झाल्या. आणि त्या सगळ्याजणीं मागें !

प्रेमाच्या खोलीचें दार त्यांनीं हलकेंच उघडलें. पुढें झाल्या. आणि अत्यंत आदबीनें उभ्या राहून शक्य तितक्या आर्जवी स्वरांत, नम्र नोकराच्या आविर्भावांत, त्या प्रेमाला उद्देशून म्हणाल्या, " मी जरा कीर्तनाला जाऊन येतेय ! वेळेला येईनच. पण आपलं कानांवर घालून ठेवतें भाऊसाहेब ( विश्वास ) बहुतेक कांहीं इतक्यांत यायचें नाहींत—पण आलेच तर आपण आहांत–म्हणून म्हणतें— " प्रेमाला हें कांहीच कळेना. ही बाई आपल्याला काय सांगते, कां सांगतें, हें प्रेमाला समजेना. ती गोंधळल्यासारखी त्यांच्याकडे पहातच राहिली.

मनुताई, दुर्गाताई, रमाकाकू, या मागे राहून माना वळवून – वळवून पाहून न पाहिल्यासारखें करीत, प्रेमाला न्यहाळींत होत्या ! प्रेमा म्हणजे काय औंधच्या म्युझियम मधली प्रेक्षणीय वस्तु आहे, अशी त्यांची भावना होती कीं काय कोण जाणें ! पण विश्वासबरोबर ती फिरत असल्याचा, व्याख्यान देत असल्याचा आणि ती विश्वासच्या सिनेमांत काम करणार असल्याचा बोभाटा याच मंडळींत – कथापुराणांना बसल्याबसल्या झाला होता ना ? सिनेमांत काम करणाऱ्या पोरी घरांत कशा वावरतात, हे पाहण्याची उत्सुकता दुसरे काय ?

भागिर्थीकाकूंनी वरीक प्रेमाच आपली भावी मालकीण, तिच्याच हाताखालीं यापुढें आपल्याला काम करावयाचें आहे, अशाच प्रकारची वागणूक करून दाखविली.

प्रेमाच्या कानांवर घातलें. आपण शब्दांतून मोकळ्या झालों, अशा समजुतीनें भागिर्थीकाकू मैत्रीणी बरोबर बाहेर पडल्या. प्रेमानें त्यांना होयही म्हटलें नाहीं आणि नाहींही म्हटलें नाहीं.

वाटेनें चालताना, " इश्श ! हीच कां ती ? काय अशी रूपानें लागून गेली आहे ? " रमाकाकूंनीं शेरा मारला.

" हिच्यापेक्षां, भागिर्थी, तुझ्या वहिनी हजार पटीनें देखण्या आहेत ना ग ? " दुर्गाताईची वाचा वदली, " मग तुझ्या मालकांना हें काय ध्यान आवडलं ! "

" बिचाऱ्या वहिनीबाईंच्या नशीबाला भोग आला हा ! " मनुताईनीं उद्गार काढले, आणि पुढें म्हटलें, " खरंच वहिनीबाई, माहेरीं कां ग गेल्या?— हीच बया ना कारण ? बाई ग ! — वहिनीबाई हाय घेऊन, झिजून झिजून मरायच्या देखील एकाद्या वेळीं ! दुर्दैव बिचारीचें !

" अस्सं चाललंय सगळीकडे आजकाल ! " रमाकाकूंनीं म्हटलें.

" हिच्याच—पायांत मालकाशी ताईचं भांडण झालं नी त्या निघून गेल्या ! ही खरी गोष्ट आहे. मला ठाऊक आहे ! पण मी म्हणत्यें, आपण बोला कशाला ? संबंध काय आपला ? आपलं काम केलं. कथा कीर्तन ऐकायला मोकळं झालं ! — चला, आपल्याला त्या गोष्टी हव्यात कशाला ? जें करील तें भोगील ! " जें काय सांगायचें ते तर भागीर्थीकाकूंनी सांगीतलेंच; पण वर मैत्रिणींनाच गप्प करीत म्हटले. " चला जाऊं द्या तो आचरट विषय ! आपलं कीर्तनांत लक्ष लागायला हवं आहे. दुर्गाताई ! पडतां जड भारी, दासीं आठवावा हरी । या अभंगाची एवढीच ओळ पाठ झालीय माझी. त्याच्या पुढचा ' शब्द ' देतेस ना? दे बाई. माझा अभंग पाठ झाला पाहिजे. आतांशा मला लवकर मेल कांही पाठच होत नाही कसं तें ! "

मनमोकळेपणाने मैत्रिणींशी बोलत [illegible] कीर्तनाला गेल्या. परत आल्या.

घरीं गोट्या दिसला. त्याच्याकडून कळले, मालक अजून आले नाहींत. प्रेमा आणि पार्श्वनाथ बाहेर फिरायला गेले आहेत.

[illegible] शहामत खरी ! आपल्या अजब जादूने भारून त्यानें प्रेमाला आपल्या बरोबर बाहेर फिरायला नेण्याइतकी तिची तयारी केली.

" कथेकऱ्याला पसाभर तांदूळ देऊन आला जणू काकू आज बी ! " भागिर्थीकाकूंना आलेल्या पाहताच गोट्यानें त्यांची थट्टा केली. " तुमच्या बिगर कथेकऱ्यास्नी पोसनार कोण ? तुम्ही हैसा, म्हणून धरम उरलाया न्हाय तर व्हय ? कवाच पिरथीमींत प्रळयंकार उडाला असता नव्हं ? "

त्यांनीं त्यांच्या थट्टेकडे लक्ष न देतां, त्याला अगोदर हें विचारलें;

" वर्षाताईना गाडी मिळाली का ? जागा चांगली सांपडली का ? त्या कांहीं बोलल्या का ? तूं कांहीं त्यांना विचारलंस का ? "

गाडी सांपडल्याचे जागा चांगली मिळाल्याचें त्यानें सांगितलेंच. पण त्या कांहीं बोलल्या नाहींत. तरी आपणच त्यांना कशापायीं जाताया म्हणून इचारलं. वंगाळ वाटल्याचं सोंग केल. तेव्हां मालकिणीनें आपली ' आई ' आजारी आहे म्हणून जात असल्याचें सांगितलें.

वर्षाची ती सबब खोटी होती, हें गोट्याला माहित होतें.

भागिर्थीकाकूंची खात्री होती.

वर्षाला आपण उघड उघड खोटें सांगतों, हे ठाऊक होते.

वर्षा अशीच बनावट सर्वांना पटणारी सबब सांगणार, हे भागिर्थीकाकूंनीं अगोदरच ताडलें होतें. त्यांनीं मैत्रिणीना तेंच सांगितलें होते. आई किंवा वडिल आजारी असल्याचें सागून, आपल्या मनातील गुपीत लपवून ठेवण्याची कारवाई, किती लोकांच्या तरी नेहमींच उपयोगी पडते नाहीं का ?

प्रेमा पार्श्वनाथाची जोडी लवकरच फिरून परत आली. पार्श्वनाथ विश्वासच्या बोलपटाचें कथानक वाचीत बसला. प्रेमा पुढचें लेखन करीत होती.

विश्वास अगदीं संध्याकाळच्या वेळी स्टुडिओकडून परत आला. त्याचें जेवण – बिवण, चहा, वगैरे सारें तिकडेच झाले होतें. आपल्या भाग्यशाली– उमद्या – तडफदार भागीदाराच्या संगतींत त्याचा सारा दिवस मोठ्या मजेंत गेला होता.

तो परत आला. " कसं काय पार्श्वनाथ ? – ठीक आहे ना प्रेमा ? –" असें म्हणत म्हणतच तो कपडे उतरायला आंत गेला.

त्यानें कपडे बदलले. हातपाय धुवायला मोरीवर गेला. त्याला वर्षा आतांपर्यंत कुठेंच दिसली नाहीं. तो तिला पहात होता. इकडे तिकडे तो पहात आहे, वर्षालाच पहात आहे, हे भागिर्थीकाकूंच्या ध्यानात आलें. त्यांनीं जसें काय आपल्याला त्यांतलें कांहीं माहित नाहीं सकाळच्या त्यांच्या भांडणांतलें– अशीच आपली वागणूक ठेविली होती. " वर्षा कुठें दिसत नाहीं ती ? " वर्षानें ऐकावें, जवळ असेल त्यापैकीं कोणीही सांगावें, या उद्देशानें तो विचारीत होता. पण तेवढ्यांत भागीर्थीकाकू आदबीनें जरा त्याच्या पुढे झाल्या आणि त्यानीं त्याला सांगितलें—

" वर्षाताईंना गाडी वेळेवर सांपडली. गोट्या गेला होता बरोबर !– जागा चांगली मिळाली म्हणाला तो !— "

ऐकून विश्वास सर्दच झाला !– वर्षा गेली ? कुठें ? माहेरीं ?– माहेरीं गेली वर्षा ?—

सकाळचा प्रसंग त्याला एकदम आठवला ! त्याचा चेहरा एकदम बदलला ! तो जागच्या जागींच थबकला !—

भागिर्थीकाकूंनीं पायाच्या नखाने जमीन खरडीत, कांहीं खालीं, कांहीं विश्वासकडे पहात त्यांनीं कळवळणाच्या, काळजीच्या स्वरांत पुढें म्हटल्या—

" त्यांच्या आई अजारी आहेत, त्याने वर्षाताई फारच घाबरल्या होत्या ! इतक्या आई आजारी असतील, असं त्यांना वाटलंच नव्हतं ! "

वर्षानें दिलेल्या मुक्या माराचा धक्का विश्वासला चांगलाच बसला ! तो कांहीं न बोलतांच तेथून बाहेर गेला !—

---

श्रीयुत विष्णू दामोदर ऊर्फ बाबा देशपांडे यांच्याकडे,–प्रेमाच्या घरी त्यांच्या पुरुषोत्तमा बरोबर अभ्यास करण्याच्या निमित्ताने खेळायला, त्याच्या वर्गातले शाळा सोबती, काळेल्यांचा बंड्या, वाडेकरांचा वसंत, आळवण्यांचा नारायण, चांदोरकरांचा पिलू अशी बालसेना गोळा झाली होती.

मुलांचा अभ्यास बाजूलाच राहिला होता. त्यांची मस्तीच चालली होती.

मंदाकिनीला खेळवायला म्हणून साठ्यांच्या चंपा–माली या बहिणी बहिणी हजर होत्याच. मुलामुलींचा धुडगूस, त्यांचें हंसणें, खिदळणें, धावणें, पळणे, मध्येंच दुसऱ्याबद्दल कांगावखोरपणानें वडिलमंडळींत तक्रारी जाऊन सांगणें याला नुसता ऊत आला होता.

एवढीशी चिमुरडी मंदाकिनी, मोठ्या मुलांसारखी कशी खेळणार! ती मुलांत जाऊन त्यांना सतावीत असे; तर मुलींत जाऊन त्यांचा खेळ विसकटून

टाकीत असे. कुणाच्या मांडीवरच जाऊन बैस तर धांवत जाऊन कुणाच्या पाठीवरच धपकन् पडून तिलाही पाडी आणि तिच्या बरोबर आपणही पडे ! जी पडेल, ती रडण्याच्या अगोदर मंदाकिनीच गळा काढी ! आणि लहानापासून थोरापर्यंत सगळ्यांचें लक्ष आपणाकडे वेधवी !

मोठीं माणसे बोलत असतांना किंवा कांही कामात गुंतली असतां मध्येंच त्याच्या जवळ जाऊन कांहींतरी त्यांना विचारीत नसून त्यांना आपल्याशी बोलायला लावण्यांत मुलांचा मोठा हातखंडा.

पुरुषोत्तम आपल्या सवंगड्यांना मोठ्या ऐटीनें आणि अभिमानाने सांगत सुटला होता. " आमच्या नानांचा सिनेमा निघायचा आहे तो आम्हीं पहायला जाणार आहोंत तुम्हांला कुठें ती गंमत पहायला मिळतेय ? -- "

सिनेमाचें नांव ऐकताच, चंपी आपल्या ब्लाऊजनेच नाकाचा शेंबूड पुशीत मुलांना मान हलवीत सांगायला लागली--

" सिनेमा आम्हांला पण माहित आहे ! तुझी कांहीं नको इतकी ऐट !"

" एहेरे ऐट ? ऐट म्हणे ऐट ! सिनेमा माहित आहे म्हणे ! " पुरुषोत्तम चंपीपुढें तोंड वेडावीत म्हणत होता, " काय ग तुला सिनेमा ठाऊक आहे?"

" फिरवा ना सखया डोळा ! — " चंपीने सिनेमा माहित आहे हे सप्रयोग पटवून देण्याकरितां गायलाच सुरवात केली.

चंपी गाऊं लागली असें पाहताच मालीला कंठ फुटला—

" यमुना जळिं खेळुं खेळ सखया कां लाजता आ ऽ ऽ "

आपल्या बोबड्या शब्दांत हात जोडून नीट उभे राहून गायन आरंभलें ! चंपोनें आणि मालीने पुरुषोत्तमाला आपल्या परि चीत केलें ! विजयी मुद्रेने, गाणें मध्येंच थांबवून ( कारण त्यांना सबंध गाणे येत होते तरी कुठें ? ) टाळ्या पिटीत-" आहे का नाही आम्हांला माहित सिनेमा ? "

" पण हे असे. आमच्या नानांच्या सिनेमात नाहीच मुळीं. तो वेगळाच आहे ! "

पुरुषोत्तमानें आपली बाजू पक्की करण्याकरितां जोरजोराने म्हटले.

बालमनाची सृष्टि अगदीं दिलखुलास अशी बहरली होती !

मुलांची मौज अशीच दररोज बाबासाहेबांच्या घरीं सदाची. ते किंवा त्यांचें कुटुंब इंदिराबाई-प्रेमा, मंदाकिनीची आई, या दोघानांही मुलांचा सोस भारी. त्यांना कधीं कंटाळा यायचा नाहीं किंवा मुलांना चुकून देखील [illegible] कधीं व्हायचें नाहीं. बाबासाहेब मुलांना इतके लगटून देत नसत. दुरून त्यांच्या कौतुकांत मात्र कमी व्हायचें नाहीं. तरी देखील मंदाकिनी त्यांना न जुमानतां, ते बसल्या बसल्या चरखा फिरवित असले तरी, त्यांच्या पाठीवर एकदम जाऊन आदळायची. त्या तिच्या दंग्यामुळें हातांतल्या सुताचा आणि डोक्यांतला विचारांचा धागा तुटे! पण ते तिच्यावर रागावत नसत! उलट "अहा ग खुळाबाई!" म्हणून तिला जवळ ओढून तिचे पटापट मुके घेत. प्रत्येक मुक्याबरोबर ती बोबडया शब्दांनीं "गोल गोल" म्हणे! आणि त्यांना आनदित करी

मंदाकिनीचा असा गोड मुका मार त्यांना किती तरी परमावधीचा आवडे.

इंदीराबाईबद्दल तर बोलायलाच नको. त्या कमालीच्या प्रेमळ होत्या. मुलांवर माया करण्यांत त्यांना आपपरभाव माहितच नसे. त्यांचीं मुलें म्हणजे त्यांचा दुसरा प्राणच. त्या त्याच्यावर अतोनात माया करीत, त्यात जगावेगळें कांहींच नाहीं. पण आपल्या लाडक्या मंदाकिनीवर किंवा पुरुषोत्तमावर, जीं मुलें प्रेम करतात, त्यांच्यावरही त्यांचें प्रेम अलोटच असायचें!

मुलें त्यांच्याभोंवतीं जमून खेळायला लागलीं, म्हणजे त्याही पण स्वतःचें वय विसरून जाऊन एक मूलच व्हायच्या आणि समरस होऊन खेळायच्या.

यांच्याकडे असतांना असें गोड दृश्य विश्वासनें प्रत्यक्ष दररोज पाहिलें होतें; आणि म्हणूनच आपल्या मामीबद्दल—इंदिराबाईबद्दल—त्याला अतिशय आदर वाटत होता.

पण आज बाबासाहेबांचें किंवा इंदिराबाईचें मुलांच्या खेळाकडे—किंवा दंग्याकडे लक्षच नव्हते. बाबासाहेब गंभीरपणानें मुकाटयानें चरखा फिरवीत होते; तर इंदिराबाई, त्यांच्यापासून थोडया अंतरावर बसून पाटावर घेतलेले तांदूळ निवडण्यांत, चिंतातुर मनानें वेळ घालवीत होत्या. कोणी कोणाशींच फारसें बोलत नव्हते.

मुलें विचारीत ना म्हणून मंदाकिनी किती वेळां त्यांच्याजवळ आली असेल, कोणालाच न कळणाऱ्या बोबड्या शब्दांत तिनें मुलांबद्दल तक्रारी केल्या असतील—चंपीनें " लपला कुठें ग कान्हा, बाई, कान्हा " हें म्हणतांना, तिचीच री मंदाकिनीनें आपल्या आईजवळ– " मंदा–कान्हा " " कान्हा–मंदा " एवढ्याच शब्दांत ओढली असेल—पण इंदिराबाईनीं तिला जवळही घेतलें नाहीं. तिचा पापा घेऊन कौतुकही केलें नाहीं कीं तिला, " खुळाबाई ! " म्हणत मांडीवर आडवेंही घेतलें नाहीं.

पोक्त वयाच्या या पतीपत्नीस गरीबीमुळें संसारांतल्या चिंता कांहीं थोड्या थोडक्या नसत; पण त्यानीं त्या चांगल्या पचनीं पाडल्या होत्या. प्रयत्नानें आणि अभ्यासानें वीष पचनीं पाडतात – तसेंच त्याचें होतें. पण इतकें असूनही आज दोघेही लोकांना ओळखूं येईल इतके सचिंत होते. त्याचें कारण– कारण दुसरें काय असणार ?

डोंगरावर देवी आणि मुलखांत नायटे, म्हणतात ना ? तशांतली अवस्था ! प्रकृतिस्वास्थासाठीं सहज म्हणून विश्वासकडे गेलेली प्रेमा त्यांची लेक–प्रेमा, विश्वास काढीत असलेल्या सिनेमा फिल्म कंपनींत नटी म्हणून नाचायला तयार झाली आहे – नाचणार आहे, अशी वाऱ्यावर वहात आलेली बातमी त्या जुन्या वळणाच्या, रीतिभातीच्या पती – पत्नीला कोणी तरी येऊन दिली होती. त्याच धक्का देणाऱ्या बातमीनें त्यांना बेसुमार बेचैन केलें होतें.

बातमी ऐकली, तेव्हा प्रथम कोणाचा विश्वासच बसणें शक्य नव्हतें. कसा बसणार ? आपली प्रेमा तशा फंदांत पडणारी नव्हे, ही तिच्याबद्दल खात्री आणि विश्वासची चालचलणूक दोघानींही प्रत्यक्ष पाहिलेली. त्याच्या नेहमींच्या पत्रांतून पक्की अजमावलेली; असें असता, विश्वास प्रेमाला बनवील आणि प्रेमाही त्याच्या सांगण्याप्रमाणें तयार होईल, हें त्यांना पटावें कसें ? पण अति स्नेहः पाप शंकी ! म्हणतात; ते अशा वेळींच ! " कदाचित् न जाणों असेल ही तसें ! " अशी दोघांच्याही मनानें उलट घेतली आणि त्यांना सचिंत बनविलें.

शिवाय विश्वासच्या सिनेमा फील्म कंपनीच्या अनेक वर्तमानपत्रांतून मोठ-मोठ्या जाहिराती फडकूं लागल्या होत्या; त्यांत अनेक प्रकारच्या माहिती

बरोबर या नव्या निघणाऱ्या फील्म कंपनींत सुशिक्षित, विदुषी, नटी समाविष्ट होत आहेत; असा मजकूर येत असे. त्या जाहिरातीकडेही बाबासाहेबांचें लक्ष त्यांच्या एका, नेहमीं त्यांच्याकडे येणाऱ्या मित्रानें--सेवानिवृत्त मामलेदार रावसाहेबानें – वेधविलें होतें. जाहिरातींत नामनिर्देश असा स्पष्ट कुणाचच नव्हता. शिवाय विश्वासचीं आणि प्रेमाचीं बरींच पत्रें वरचेवर आली होतीं. त्यांतही तसा कांहींच उल्लेख नव्हता.

तरी सुद्धां वाईट बातमी सहसा खोटी होत नाहीं, अशी समजूत होऊन दोघांनाही संशयानें घेरलें. बाबासाहेबांना जबर धक्का बसला. पण पुरुष म्हणून, त्यांनीं आतल्याआंत दाबला. तोंडावर त्याचा मागमूस दाखवूं न देण्याचा प्रयत्न चालविला. पण गंभीरता उमटलीच. इंदिराबाईना तर रडतां भुई थोडी अशी व्हायची वेळ आली. आपले हातपाय मोडल्याचें दिसलें, म्हणजे इंदिराबाईला आकाश फाटल्यासारखें होईल, म्हणून बाबासाहेब आपली मनः-स्थिति लपविण्याचा प्रयत्न करीत होते. जर आपण रडायला लागलों तर बाबासाहेबांना धीर जास्तच खचेल म्हणून इंदिराबाई त्यांच्यापासून तोंड लपवीत होत्या.

परवां परवांपर्यंत, विश्वासचें किंवा प्रेमाचें पत्र आलें म्हणजे त्या दोघांना किती आनंद व्हायचा ! एकानें विश्वासचे गुण गायचे, तर दुसऱ्यानें प्रेमाची प्रकृति तिकडे गेली म्हणूनच सुधारली, म्हणून म्हणायचें !

प्रेमानें तिकडे जंगी जाहिर सभेंत व्याख्यान दिलें आणि ते खूप गाजलें असें जेव्हां प्रेमा – विश्वासनें पत्रांत लिहिलें तेव्हां, तिच्या गुणवर्णनांत बाबा-साहेबांचे आणि इंदिराबाईचे सहज आठ दिवस कसे गेले, हें त्यांना कळलेंच नाहीं, इतका त्यांना आनंद वाटला. विश्वासबद्दल किंवा प्रेमा बद्दल बोलणें चाललें असतां पुरुषोत्तम जवळ असला म्हणजे तो मध्येंच विचारायचा, " आई, नाना ( विश्वासला नाना म्हणायला पुरुषोत्तमाला इंदिराबाईनींच सांगीतलें होतें आणि लहानग्या मंदाकिनीला शिकविलें होतें ) कधीं ग आपल्याकडे यायचे ? आणि ताई पण कधीं येणार आहे ? "

" अरे, आपणच आतां दिवाळीला नानांच्याकडे सारी जणं जाणार आहोंत ! मंदाकिनीला पण न्यायची ? " इंदिराबाई म्हणायच्या; " होय ना ग मंदा ? जायचं ना आपण नानांकडे ? "

" खरंच आपण जाणार ? " आनंदून पुरुषोत्तम पुन्हां विचारी.

" विचार वाटेल तर तिकडे ! " बाबासाहेबांकडे पहात इंदिराबाई म्हणत ! तो वडिलांकडे पाही. ते हंसून त्याला " होय हं ! जायचं बरं का दिपवाळीला ! " असेच सांगत.

पुढें विश्वासनें फिल्म कंपनी काढण्यांत भाग घेण्याचें ठरविलें ते त्यानें यांना कळवून सुरवातीच्या समारंभालाच आपण सगळे अवश्य आलें पाहिजे, दिपवाळीचा वायदा नको; असा आग्रह केला तेव्हां त्याच्या व्यापाराच्या धडाडीबद्दलचा बाबासाहेबांचा आदर फारच वाढला. त्याच्या निघणाऱ्या फिल्म कंपनीबद्दलच कौतुक घरांत सुरू झालें.

तेंच ऐकून पुरुषोत्तम आपल्या सौंगड्यांना दिमाखानें सांगे, कीं आमच्या नानांचा सिनेमा निघायचा आहे.

पण जेव्हां विश्वासच्या सिनेमा फिल्म कंपनींत प्रेमा नटी होणार आहे, असें कळले, त्या वेळीं, त्यांच्या साऱ्या आनंदावर पाणीच पडले ! ! प्रेमाला तिकडे धाडली नसती तर बरें झालें असतें. आतां पत्र पाठवून तावडतोब तिला परत बोलवावी, किंवा स्वतः जाऊन आणावें, असा विचार बाबासाहेबांच्या मनांत आला. तेच इंदिराबाईनींही त्यांना सुचविलें.

बाबासाहेब जुनें तें सारें सोनें आणि नवें तें नुसते लोखंड असें मानणारे नव्हते. नव्या पिढीबद्दल–तरुणतरुणीबद्दल त्यांना आदर, प्रेम फारच होते. त्यांच्यांत चैतन्य, जोम, उत्साह आहे. तो खची करतां कामा नये ! त्यांच्याबद्दल तिरस्कार दाखविणें मूर्खपणा आहे; असें ते म्हणत. ते त्याच दृष्टीनें विश्वासकडे किंवा प्रेमाकडेच पाहात नसत. तर साऱ्या तरुण–तरुणीकडेही पाहात. नव्या पिढीबद्दल कोणी वावदूकपणाने बोललेले त्याना आवडत नसे. तेथल्या तेथे त्यांना अगदी गोड शब्दानीं का होईना मोडून काढीत !

त्यांचे रावसाहेब मामलेदार–पेन्शनर–मित्र गप्पा झोडायला त्याच्याकडे आले म्हणजे, ते " आमची जुनी पिढी अशी होती आणि तशी होती–आतांचीं पोरटीं निखालस नादान-नालायख आहेत. " असें म्हणून, आपल्या विधानाला बाबासाहेबांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करीत.

त्यांचें तें विधान त्यांना केवळ वावदूकपणाचें–आचरट–कोत्या बुद्धीचे आणि घमेंडखोरपणाचे वाटे. ते त्यांना फारसे बोलत नसत; फक्त एवढेंच म्हणत, " हें पहा रावसाहेब, त्याचें असं आहे. तुम्हीं जुन्याला नांवाजतां. नव्याला नांवें ठेवतां. पण मला असं वाटतं— " **त्याज्य ( किंवा ग्राह्य ) सर्व नाहीं, जुनें वा नवीन असें तेंही !** "

इतक्या मोजक्या शब्दांत बाबासाहेब, पेन्शनर रावसाहेबांची संभावना करून त्यांच्या आचरट विधानाला आळा घालीत.

आज मात्र त्यांच्या तरुण पिढीने – विश्वास – प्रेमानें – आपल्याबद्दलच्या – प्रेमावरील विश्वास थोडा तरी डळमळीत केला ! इतकेंच नव्हे, तर, विश्वास, प्रेमा आतां आपलें ऐकतील की नाहीं, गेलों तरी भेटतील कीं नाहीं, प्रेमाला चल म्हटलें तर ती येईल की नाही, सिनेमांत काम करूं नको म्हटलें तर ती आपलें मानील कीं नाहीं, अशाच शंका त्यांना त्यांच्याबद्दल यायला लागल्या. एक प्रकारची नवी भीति वाटायला लागली. आणि त्यामुळे ते जास्तच गंभीर झाले ! तरुण पिढी जुन्या पिढीच्या कह्यांत राहिली नाहीं, आणि राहणारही नाहीं. जुन्या पिढीत तेवढें सामर्थ्यच (स्वतःला ओळखूनच ) राहिलें नाहीं, असेंच त्यांना दिसूं लागले. ते खिन्न झाले !

त्याच मनःस्थितींत बाबासाहेब, मनाशीं " काय करावें ? कसें करावें ? प्रेमाला जाऊन आणावें कीं अगोदर पत्र पाठवून बोलावून पहावें ? " असा विचार करीत, हातानें चरखा फिरवीत होते.

इंदिराबाई मुकाट्यानें तांदूळ निवडीत होत्या.

चंपी पुन्हां पुन्हां खेळतां खेळतां, " यमुना जळिं खेळु खेळं "— म्हणत होती. तर काळेल्यांच्या बंड्यालाही गायची हुक्की येऊन – " प्रीतिचा भिकारी । उभा तुझ्या दारीं " म्हणून जणुं काय चंपीलाच विचारीत होता !

या वेळीं रोजच्या पद्धतिप्रमाणें, डोक्यावर जांभळा जरीचा रुमाल, अंगांत, जाकिटासह, पारशी फॅशनचा पण बटणें न घातलेला बावळटासारखा मळकट कोट, पायांत जीर्णशीर्ण झालेलेच बूट, त्यावर खालीं घसरलेले तपकिरी रंगाचे मोजे, गळ्याला जरी किनारीचें कळकट झालेलें गुंडाळलेलें उपरणें, काखोटींत, बाहेर सहज दिसेलसा केसरीचा अंक, पण त्याच्या घडींत, ज्याला ते नेहमीं बाबासाहेबांजवळ नांवें ठेवून, कुचाळकी करीत,

नाक मुरडीत आणि, ' छे: छे: छे: या घाणेरड्या वर्तमानपत्रांनीं समाजाला पार बिघडवून टाकलें आहे ' अशी आरोळी ठोकीत, तींच, नवयुग, चित्रा, मौज, विविधवृत्त, समाजस्वास्थ्य, यासारखीं वर्तमानपत्रें व मासिकें मोठ्या आस्थेनें आणि हौसेनें घातलेलीं, – असें पोराबाळांचीं करमणूक करणारे, पुष्कळदां भीति वांटावयाला लावणारे पेन्शनर रावसाहेब मामलेदार पेटकर यांचें बावळट सोंग रिकामटेकडा वेळ घालविण्याकरितां, बाबासाहेबांकडे उपस्थित झालें !

पेन्शनर पेटकर आलेले पाहतांच इंदिराबाईनीं आपलें काम आवरून त्या तेथून उठल्या. मंदाकिनीला घेऊन त्या गॅलरींत जाऊन उभ्या राहिल्या. मंदाकिनीला तेंच किती वेळापासून पाहिजे होते. ती ' गोल् गोल् ' म्हणत आईचेच पापे घेऊं लागली. " मोटाल आली. हम्मा आली ! आई, ती ताई बघ !—नाना–नाना !— " प्रेमासारखे पातळ नेसलेली बाई दिसली, विश्वाससारखा पुरुष दिसला कीं, मंदाकिनी, बोट करकरून, हंसून, तिचें तोंड तिकडे वळवून वळवून दाखवूं लागली.

एरव्हीं मंदाकिनीनें, ताई म्हणून किंवा नाना–नाना करून बोट दाखवायला सुरुवात केली, म्हणजे इंदिराबाईंना कोण गंमत वाटायची. किती हसूं यायचें; " पाहिलींत का मंदाकिनीची मौज ? " म्हणून बाबासाहेबांना तिनें हांका मारायच्या. पण आज मंदाकिनीनें विश्वासचे ' नाना ' म्हणून नांव घेतलें, प्रेमाची ' ताई ' म्हणून आठवण करून दिली, तेव्हां इंदिराबाईंना कसेसेच झाले ! टचकन् त्यांच्या डोळ्यांत पाणी आलें. तें पाहून अजाण मंदाकिनी कोण घाबरली ! तिनें आपल्या चिमुकल्या हातांनीं आईचे डोळे पुसायला सुरुवात केली ! " आई ललतेस ? " म्हणून विचारलें. इंदिराबाईंना जास्तच रडूं कोसळलें.

पेन्शनर पेटकरांनीं काखोटींतून पुष्कळच मालमसाला बाबासाहेबांकरितां आणला होता. येताक्षणींच ते आपली शिदोरी सोडत होते. पण आले तेव्हां लहान मुले सिनेमांतलीं गाणीं गात होतीं, तीं त्यांनीं ऐकलीं त्यावरच त्यांनीं प्रवचन आरंभलें—

" ऐका बाबासाहेब, तुमचं लक्ष आहे कां ? आजकालच्या सिनेमानें हीं कोवळी पोरं–पोरीं किती बिघडत चाललीं पहा ! " यमुना जळीं " काय ? " प्रीतीचा भिकारी काय ? " आतां पासून ही यांची तयारी ! हीं पोरेसोरें उद्यां सर्रास सिनेमांत जाणार ! समाज बिघडायला काय शिंगें उरलीं आहेत ? — आम्हीं म्हणतों त हेंच ! आमची तक्रार ती याच करितां ! पुराणिक आणि कथेकरी रोज यावरच खूप झोड उठवीत असतात!" ( भागिर्थीकाकूंसारख्या भोळ्या भाबडया स्वयंपाकिणीप्रमाणें हे पेन्शनर लोकही कथापुराणाला जाऊन, तेथेही जगाची टवाळी करण्यांत दक्ष असतात. कधीं चुकत नाहींत. )

लहान मुलांवर वडिलकीच्या नात्यानें पेन्शनर पेटकर खेकसले. मुलें भिऊन तेथून पळालीं !

बाबासाहेबांनीं नेहमींप्रमाणे " या रावसाहेब ! " म्हणून स्वागत केलें.

रावसाहेबांना, बाबासाहेबांची प्रेमा सिनेमांत नटी होणार आहे, हें नक्की कळलें होतें. त्याबद्दल बाबासाहेबांचें मत काढून घ्यायला–ते–विषय काढतात काय हें पहावयाला आले होते. बाबासाहेबांचा चेहरा त्यांना निर्विकार दिसला. त्यांना माहीत नसेल किंवा असलें तरी ते बोलणार नाहींत, असेही त्यांना वाटलें. पण त्यांच्याकडून काढून घेण्याची त्यांना मोठी उत्कंठा होती.

बाबासाहेबांचा चरखा चालू होता.

रावसाहेबांनीं आपली रावसाहेबी ' तोंडाची टकळी ' सुरू केली.

" बाकी हे खरें बाबासाहेब, दुनियाच बदलत चालली आहे. यांत कोणी कांहीं केलं, कसंही वागलं, तरी हरकत काय ?— पोरं पोरी, सिनेमांत झपाट्यानं जाणार ! जायल्या लागल्या. तस पाहिलं, आमच्या जुन्या डोळयांना वाईट दिसतें, हें खरं. पण त्यांत वाईट आहे, असं नाहीं. आम्हांलाही तें समजतं !—

" शिकून, पदव्या घेतल्या तरी पोरांना काय आणि पोरींना काय सरकारी मानाच्या, पैशाच्या आणि पेन्शनेबल नोकऱ्या मिळताहेत आहेत कुठें ?—

" आमच्या वेळीं कारकुनांनीं कचेऱ्या भरत होत्या. आतां सिनेमा-कंपन्या भरतात. पैसा दिसतो, तिकडे वळणारच. सिनेमाच्या धंद्यांत आज-काल मुबलक पैसा आहे कचेऱ्यांत नांवलौकिक नव्हता तो जास्त त्यांत आहे–

" बाकी, एकेकाचं नशीब असतें. आमच्या पिढींत आम्हीं रोजगार करून आईबापांचीं पोटं भरीत होतों – हल्लींच्या काळांत पोरांपेक्षां पोरीच सिनेमांत जाऊन देखील, स्वत: कीर्ति मिळवितात. गडगंज पैसा मिळवून आईबापांना सुखाचे दिवस दाखवितात–

" परवां पहा कोणसाचा सिनेमा पाहिला. त्यांत दहा वर्षांची एक पोरगी होती. काय छान काम केलंय म्हणतां तिनें ! आणि पगारही म्हणे दरमहा अडीच हजार आहे. अहो, म्हणजे असिस्टंट कलेक्टराचा पगार झाला कीं ! आम्हीं जन्मभर मामलेदारी केली – काय मिळाल्या आम्हांला फत्र्या !— तेव्हां त्या दृष्टीनें पाहिलं तर होतंय तें चांगलंच आहे" – पेन्शनर बोलत होते. उत्तरादाखल, ' हं ! चालायचंच ! ' यापलिकडे बाबासाहेब कांहींच बोलले नाहींत.

प्रेमाची चौकशी करण्याचें चकण्या पेन्शनराच्या एकदां मनांत आलें, पण कां कोण जाणें, त्याला तशी छातीच झाली नाहीं.

बाबासाहेब तोंड उघडून या विषयावर बोलूं इच्छित नाहींत, हे ओळखून पेन्शनराने, काखोटींतील पोतडी काढली. आणि शिदोरी सोडयाला सुरवात केली.

आपणच वर्तमानपत्र उघडावें. मनाशीं वाचण्याचें ढोंग करावें, मध्येंच कांहीं मजकूर मोठयानें बाबासाहेबांना ऐकविण्याकरितां वाचावा, असे थेरडयानें चाळे चालविले.

वाचन थांबवून, आपल्या अमदानींतल्या सरस – सुरस–चमत्कारिक अशा रंगेल आणि [illegible] कित्येक गोष्टी रावसाहेबानें बाबासाहेबांना ऐकवल्याच. वास्तविक त्याच त्याच गोष्टी, बाबासाहेबांनीं पूर्वी त्यांच्याच तोंडून अनेकदां ऐकल्या होत्या. पण करतात काय, स्वभाव पडला भिडस्त आणि माणसांचा आळका ! त्यामुळें त्यांची पुनरावृत्तींची आपत्ति निमुटपणें भोगणें प्राप्तच होई त्यांना !–

नोकरींत असतांना फिरतीवर गेलों म्हणजे आम्हीं गांवकऱ्यांकडून कोल्हाटणींचें तमाशे करवीत असूं, अशा दौलतजादा करीत असूं, अशा स्वतःच्या रंगेलपणाच्या गोष्टी रावसाहेब ज्या तोंडानें सांगत, त्याच तोंडानें आजचीं पोरटीं, नाटक–सिनेमा पाहतात, इराण्याच्या हॉटेलांत जाऊन, अंडीं, आमलेट खातात, बिअर पितात, म्हणून त्यांच्यावर तोंडसुख झोडण्यांत कमी करीत नसत.

आतां ते आजच्या पोरींकडे वळले. अमक्याची मुलगी तशी निघाली, तमकी फलाण्या बरोबर पळून गेली अशी माहिती अनाहूत देऊं लागले. बाबासाहेबांना हा असला अशिष्ट गप्पांचा रावसाहेब देत असलेला मुका मार सोसेना ! पण करतात काय ? घरीं आलेल्याशीं सभ्यपणानें वागणें त्याना आपलें कर्तव्य वाटत होतें. त्यांनीं न आवडणाऱ्या गोष्टीकडे जाणून बुजून दुर्लक्ष केलें.

रावसाहेब धोरणी आपल्या ह्या गोष्टी आवडत नाहींत बाबासाहेबांना, असें पाहतांच कौशल्यानें आपली पगडी त्यांनीं फिरविली. त्यांना आवडतील अशा हकिकती काढल्या.

" बाबासाहेब, असं नाहीं तुम्हांला वाटतं ? " रावसाहेबानें पवित्रा बदलून म्हटलें, " आजच्या स्त्रियांच्या दुर्गुणांकडे दुर्लक्ष केलं तर, त्यांच्यांत सद्गुणांचेंही प्रमाण खूप वाढलं आहे ! आपल्या वेळीं बायका मुळीं घराबाहेर पडतच नव्हत्या. तेव्हां त्यांच्याबद्दलचा प्रश्नच नव्हता. पण आजच्या समाजांत स्त्रियांना शिरावंच लागतें; त्यामुळें त्या चांगल्याच धिटुकल्या झाल्या आहेत ! ही गोष्ट विशेष आहे ! अहो, त्यांच्याकडे वांकडा डोळा करून पाहण्याचीच काय, पण त्यांची टिंगल टवाळी करण्याची माय व्याली नाहीं कोणाची ! नुसती त्यांना तशी शंका आली तर, त्या लगेच पायांतली चप्पल हातांत घेऊन जागच्याजागी जाब विचारतात ! आहांत कुठे ? परवांची गोष्ट ऐकलीत कां ? एका जाहीर सभेत बायकांच्याबद्दल टिंगल टवाळी करणाऱ्या, आणि ती ऐकून फिदीफिदी हसणाऱ्या लोकांवर एका पोरीनें त्वेषानें पायांतली चप्पल काढून फेंकली ना ?— खोटं नाहीं, मी होतों ना त्या सभेला हजर ?—

" तुम्हीं हंसणारांत होता रावसाहेब ! " बाबासाहेबांनीं सहज मध्यें प्रश्न केला रावसाहेबांना !

" हंसलो बोवा ! " आतांही हंसूनच रावसाहेबांनीं म्हटलें.

" मग नेमकी तुमच्याच डोक्यावर पडली तर नाहीं त्या पोरीची चप्पल ! " बाबासाहेबांनीं म्हटले.

रावसाहेब चांगलेच खजील झाले ! पण हंसलेच मुरदाडमनानें !

" हॅः हॅः हॅः काय बाबासाहेब बोलतां ! चीत केलंत आम्हांला ! द्या टाळी ! " आणि " चप्पल प्रकरण खूप रंगविलं त्या पोरीनं ! गंमत वाटली ! अभिमान वाटला आपल्याला !— " हेही रावसाहेब म्हणालेच.

ती हकिकत ऐकून बाबासाहेबांना तरुण पोरींच्या शौर्याबद्दल बरें वाटलें असें रावसाहेबांनी हेरलें. सभेतल्या पोरीने फेकलेली चप्पल त्या वेळीं, रावसाहेबांच्या डोक्यांत पडली नाहीं. चुकली. ती बाबासाहेबांनीं आतां शब्दांच्या कौशल्याने मारली; हे बोलण्याच्या भरांत त्यांच्या ध्यानांतच राहिलें नाहीं. आणि म्हणून त्यांनी चप्पल प्रकरण तिथेंच न थांबवतां, पुढेंच जास्त चालू केलें.

बाबासाहेबाची टकळी पुढे सुरू झाली, " चप्पला प्रकरणें आतां सर्रास होऊं लागलीं बरं का ? आता सांगितली, तशी नाहीं, पण निराळ्या तऱ्हेची गोष्ट मुंबईला पण नुकतीच घडली आहे ना ?— आजच्याच कुठल्यातरी वर्तमानपत्रांत ती हकिकत आली आहे. मी नुकतीच ती वाचली. कोणत्या पत्रांत आहे पहा— " असें म्हणून त्यानी जवळचीं पत्रें शोधायला आरंभ केला. सांपडला तो मजकूर.डोळ्यांवर चष्मा चढवून रावसाहेब, बाबासाहेबाना तो सबंध मजकूरच वाचून दाखवायला सरसावले—

" हें पहा—" आरंभी चष्म्यावरून खाली तोंड करीत, बाबासाहेबांचें लक्ष आहे का, हें पाहून मग वाचायला लागले—

## चप्पलचा प्रसाद

नवऱ्याची खोड मोडली !

**त्याच्या प्रेयसीला चप्पलचा प्रसाद दिला ! !**

मुंबई. दिनांक, ३-३-३०— सांताक्रूस येथील एका चाळींत पुढें दिलेली खळबळ उडविणारी हकीकत घडली. घनःशाम घाणेकर

या नांवाचे एक विवाहित तरुण × × × × चाळींत सहकुटुंब राहतात त्यांचा प्रीतिविवाह झालेला आहे. तरीही एक तरुण कुमारिका घनःशाम घाणेकराच्या मोहपाशांत सांपडली ती कुमारिका. ही त्याला भाळली. त्या दोघांना मोकळेपणानें–स्वैर–संचारतां यावें म्हणून, आपल्या विवाहित पत्नीस युक्तीनें घनःशामनें माहेरीं पाठविलें व त्या कुमारीस आपल्या जागेंत खुशाल–राजरोस आणण्यास त्यानें सुरुवात केली. रोज ही जोडी मोटरसायकल-वरून घरीं येई. फिरावयाला जाई. चाळीतल्या शेजाऱ्यांना त्यांच्याबद्दल शंका आली. घनःशामचें व त्याच्या बायकोचें चांगलेंच प्रेम होते हें सगळ्या चाळीत माहीत होतें. म्हणून कोणीतरी उपद्याप करून, घनःशामच्या बायकोला परस्पर पत्र पाठवून बोलावलें. तीही अचानक आली. त्यावेळीं दाराला कुलूप होतें. शेजारी किल्ली होती, ती घेऊन दार उघडून घनःशामची स्त्री आपल्या जागेंत शिरली. संध्याकाळीं, मोटरसायकलवरून नेहमीं-प्रमाणे ती जोडी आली. घनःशाम व ती त्याची प्रेयसी, हंसतखिद-ळत, आनंदांत, खोलींत आले. दार कसें आणि कोणी उघडलें; आंत कोण आहे, हें ध्यानांत येण्याइतकें कोणालाच भान नव्हते. त्या दोघाच्या पुढें, घनःशामची पत्नी एकदम उभी राहिली. तेव्हां, त्या दोघांची विलक्षणच तारंबळ उडाली. घनःशामचा चेहरा काळा ठिक्कर पडला. त्याच्या प्रेयसीची तर तारंबळ उडून गेली. ती त्याच पावलीं परतूं पाहात होती. पण तिला घनःशामच्या पत्नीनें पकडलें. कोपऱ्यांतील आपली वाहाण घेतली. आणि तिचा प्रसाद तिला यथास्थित दिला ! फरफर ओढीत तिला रस्त्यावर नेऊन सोडली ! आपल्या नवऱ्या-चीही शेलक्या शब्दसुमनांनीं यथेच्य पाद्यपूजा केली !– घनःशाम चांगल्या पगारावर एका फर्ममध्यें नोकर असून, त्याची प्रेयसी कुमारी एका प्रतिष्ठीत श्रीमंताची सुविद्य मुलगी आहे, असें कळतें !– घनः शामच्या पत्नीचें, तिच्या शौर्याबद्दल आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन.

करतोंच; पण त्याबरोबर इतर विवाहिता, विवाहित, आणि कुमारिका, या सर्वांपुढें—घनःशाम, त्याची पत्नी व त्याची कुमारी प्रेयसी, यांचें उदाहरण ठेऊं इच्छितो. जो तो व जी ती ( अशाच प्रसंगांत येणारीं ) यापासून धडा घेतील, अशी आशा आहे !—

रावसाहेबांनीं मजकूर वाचून दाखविला. आणि आपणच हंसले. बाबासाहेबांना हसू आलें नाहीं !

नंतर इकडच्या तिकडच्या किरकोळ गोष्टी बोलून, ' कीर्तना ' ला जायची वेळ झाली, या भाकडकथांत काहीं अर्थ नाहीं. चवनाचोथा, असा आपणच शेरा मारून रावसाहेब पेटकर निघून गेले.

बाबासाहेब तो मजकूर ऐकत असतांच, त्यांना कांहीं विचित्रच त्रासदायक कल्पना चाटून गेली. त्यांचें मस्तक बधीर झालें. डोळ्यापुढें अंधेरी आल्यासारखे क्षणभर वाटलें—

विश्वास, त्याची पत्नी वर्षा आणि आपली कुमारी प्रेमा – ही त्रिमूर्ति बाबासाहेबांच्या दृष्टीसमोर येऊन, त्यांच्यांत आतां ऐकलेल्या प्रकाराची पुनरावृत्ति तर होणार नाहीं ? विश्वास तरुण, आपली प्रेमा तरुण – कोणी नेम सांगावा कोणत्या वेळीं कोणाच्या हातून काय घडेल ते ? त्यांतून विश्वास सिनेमा काढतो आहे, प्रेमा काम करायला तयार झाली आहे – त्या दोघांचा रोज निकट संबंध येणार – आणि – आणि —

बाबासाहेब ताडदिशीं विचारांच्या तिरमिरीसरशीं जागेवरून उठले. आजच्या आज जाऊन प्रेमाला आणलें पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं. आपली हानी आणि जगाचें हंसू, असा प्रसंग ओढवून घेण्यांत शहाणपणा नाहीं—

इंदिराबाईजवळ बाबासाहेबांनीं याची वाच्यता केली नाहीं; पण विश्वासकडे जाणार एवढेंच म्हटलें. रात्रींच निघण्याचा त्यानीं विचार केला. पण त्याच वेळीं मंदाकिनाला फणफणून ताप भरला होता. इंदिराबाई घाबरल्या होत्या. त्यांच्या तोंडचें पाणीच पळालें होतें. म्हणून त्यांनीं रात्रीं न जातां,

उद्यां मंदाकिनीचा ताप उतरल्यावर, दुपारच्या गाडीनें जा, असें त्यांना सांगितलें. दिवसाचें वर्ष होत नाहीं, अशी मनाची समजूत पाडून बाबासाहेबांनीं इंदिराबाईचें सांगणें ऐकलें.

पण दुसऱ्या दिवशीं सकाळच्या डाकेनें विश्वासचें निमंत्रणपत्र — " सिनेमाचा उद्घाटन समारंभ × × × वेळीं आहे, सर्वांनीं त्यावेळीं आलेंच पाहिजे. आम्हीं वाट पाहात आहोत. " असें विश्वासच्या सहीनेंच आलें स्वतंत्र प्रेमाचेंही तसेंच छोटेसें पत्र होतें. पुरुषोत्तम, मंदाकिनी, यांना अतिशय पाहावेंसें वाटतें. असेंही तिनें लिहिलें होतें.

बाबासाहेब तीं पत्रें पाहून विलक्षण गोंधळांतच पडले. " आहे काय हें ? त्यांना प्रश्नच पडला ! आणि कोणालाही असाच प्रश्न पडेल असाच नव्हता कां तो प्रसंग ?

काशी, प्रयाग, वृंदावन, गंगोत्री, उज्जनी, ओंकारमांधाता, नाशिक, त्रिंबकेश्वर, इत्यादि पावनतीर्थें आणि आग्रा, दिल्ली, ग्वालेर, इंदूर हीं ऐतिहासिक ठिकाणें, तसेच हिंदुस्थानांतील नंदनवन म्हणून समजण्यांत येणारें काश्मीर, अशा सर्व ठिकाणीं हिंडून परत आपल्या घरीं सुखरूपपणें वर्षाचे वडिल पांडुरंगराव उर्फ आण्णासाहेब हे, रुक्मिणीबाई—या सहचारिणी-सह येऊन बरेच दिवस झाले होते.

वर्षा – विश्वासचीं तेव्हांपासून आतांपर्यंत कितींतरी पत्रें आपल्याकडे येण्याबद्दल गेलीं होतीं. रुक्मिणीबाईंनी पांडुआण्णांच्या पाठीमागें वर्षाकडे जाऊन या, तिला भेटून या अशीं एकसारखीं टुमणीं लावलेलीं होतीं. आणि तेही आतां जातों, उद्यां जाइन, म्हणून म्हणतच होते.

पांडुआण्णा आणि रुक्मिणीबाई, हें जोडपें म्हणजे एक अजब नमुना

होता ! दोघांच्या जन्मकुंडलींत मंगळमहाराज मोठे जोरकस होते. कोणाच्या कुंडलींत कोणाच्या कुंडलीपेक्षां मंगळाचें प्राबल्य जास्त होतें, हे सांगणें कठीणच होतें.

" तुझें माझें पटत नाहीं आणि तुझ्याशिवाय गमत नाहीं " या म्हणी-सारखीच दोघांची उभा जन्म अवस्था होती, असें म्हटलें तरी चालेल. दिवसापोटीं एक क्षण एक दुसऱ्याशीं सुध्दा शब्दाने बोलेल तर शपथ ! नेहमीं तेढा आणि वांकडा शब्द प्रत्येकाचाच !

पुष्कळांमध्यें प्रेमाचें भांडण असतें, पण पांडुआण्णा रुक्मिणीबाई यांना भांडणाचेंच प्रेम जास्त ! भांडणाने दुसऱ्याला जिंकून हार घ्यायला लावण्यांत मात करायची, याचीच दोघांना सारखी विवंचना असे कीं काय कोणास माहित !

पांडुआण्णा एकादे वेळीं बिथरले म्हणजे ते आतां रुक्मिणीबाईंना ठार करणार, त्यांना घरांतून कायमची घालवून देणार, असेंच कोणालाही वाटल्या-शिवाय राहावयाचे नाहीं.

आणि रुक्मिणीबाईंचे एकदां बस्तान बिघडलें आणि त्या पांडुआण्णापुढे डोकें फोडायला बसल्या म्हणजे पाडुआण्णा आतां वैतागाने संन्यास घ्यायला निघतात कीं काय, येथपर्यंत पाळी येई.

जन्मजात हाडवैर असल्यासारखी या दोघांची वागणूकच ज्यांनीं पाहिली असेल, त्यांना, यांनीं एकत्र जन्म काढला तरी कसा, यांचें निभलें कसें, 'सुख' हा पदार्थ त्यांच्या गांवी आहे कीं नाहीं ? पांडुआण्णांनीं पत्नीला कायमची टाकली कशी नाहीं, रुक्मिणीबाईंनीं त्यांना सोडून माहेरवास नाहींतर तीर्थवास कसा पत्करला नाहीं ? असे अनेक तऱ्हेचे प्रश्न पडल्या-शिवाय कसें राहणार ?

परंतु पांडुआण्णा प्रेमांत आले म्हणजे रुक्मिणीबाई पुढें एका दासानुदासा सारखें उभे राहात. आर्जवें करीत. त्याची थुंकी झेलायला तत्पर असत, तसेंच रुक्मिणीबाई पण पांडुआण्णांच्या समोर, अशा कांहीं गोंडा घोळीत, घाय-कुतीला येऊन बोलत आणि वागत, कीं ज्याचें नांव तें ! बोलून न दाख-विल्यासारखेंच त्यांचें परस्परांवर अकृत्रीम प्रेम होतें; हें ज्याना पाहाण्यास

मिळालें असेल, त्यांनाच त्यांनीं सुखाचा संसार कसा चालविला–एकत्र कसे राहिले–वागले याचें गूढ उकलणार !

इतका पांडुआण्णा थेरडा झाला होता तरी आणि रुक्मिणीबाईच्या डोक्यावरच्या केसांच्या वाकासारख्या शुभ्र बटा वळत चालल्या होत्या तरी, त्यांच्यांत भांडणही कायमचेंच होतें. तसें तो म्हातारा एकाद्या तरुण कामुकासारख्या दृष्टीने पहात, रुक्मिणीबाईची मर्जी सुप्रसन्न करून घेण्यासाठीं अशा कांहीं पवित्र्यांत उभा राही आणि त्यावेळीं रुक्मिणीबाई, आपल्या पायांत घुटमळणाऱ्या कुत्र्याप्रमाणें त्याला लेखी; तें पाहून पाहणारा थक्कच व्हावयाचा !

गुरगुरणारा सिंह करुणदृष्टीनें पाहूं लागला, म्हणजे त्याच्याबद्दल जसा चमत्कार वाटतो, तसेंच पांडुआण्णा रुक्मिणीकाकूंना खूष करण्यासाठीं, त्यांची गयावया करायला लागलेलें पाहून वाटे. अशा वेळीं त्यांच्या जिवलग माहितगारानें त्यांना " हे असे कसे हो ? " असा प्रश्न केला, म्हणजे पांडुआणा त्यांना उत्तर करीत; ', दहाबारा मुलं होऊन सोडून गेली तिला त्याचा तिच्या मनावर परिणाम झाला आहे. त्यामुळें वैतागते. कावते. कांहींतरी अर्थशून्य बडबडते. तें मनावर घेऊन कसे चालेल ? तिची समजूत मीच केली पाहिजे ना ? '

या खुलाशाने विचारणारा निरुत्तर झाल्यास नवल काय ?

परस्परांनी परस्परांचे ऐकायचें वागायचें; पण एक जो ज्या शब्दांत सांगेल, त्या शब्दाला मान तुकवायाची नाहीं दुसऱ्यानें. आपले शब्द खरे करण्याकरितां वागायचे अर्थात् शब्द कोणतेही असले तरी अर्थ एकच असावयाचा आणि दोघांचें कार्य एकच व्हावयाचें इतकें खरें.

" तीर्थयात्रा मला करायच्या आहेत ! " रुक्मिणीबाईनी हट्ट धरला. पण पांडुआण्णानीं " आपल्याला तीर्थयात्रा करायच्या नाहींत ! " असा रोखठोक जबाब दिला, " आपण पवित्रस्थळे, निसर्गाचीं रमणीय ठिकाणें पाहावयाला जाणार ! "

आणि दोघेही प्रवासाला निघाले. निसर्गाचीं सौंदर्यस्थळे रुक्मिणीबाईना पाहायला सांपडली; तर त्यांच्याबरोबर पांडुआण्णांना अनायासेच तीर्थयात्रा पण घडलीच !

असें होतें त्यांचें !

आणि अशा आईबापांच्या पोटीं, विश्वासच्या पदरी पडून पवित्र झालेलें वर्षा हे कन्यारत्न आलें होतें !

स्वाभाविकच भांडकुदळपणाच – पण प्रेमळपणाचाही अनुवंशिक गुण आपल्या आईबापापासून वर्षाला मिळाला होता.

वर्षाकडे जायला रुक्मिणीबाईनीं पांडुअण्णांच्या मागें सारखा लकडाच लावला होता, आणि त्यांचा हट्ट पुरवायचा नाहीं, म्हणूनच ते जाण्याची चालढकल करीत होते !

सांगून सांगून त्या थकल्या आणि मग पांडुअण्णा वर्षाला व जांवयाला भेटायला जाण्यासाठीं तयार झाले.

सामानसुमान बांधलें, तयारी केली टांगा बोलावला. टांग्यात चढले टांगा चालूं होणार, तोंच समोरून टागा येऊन त्यांच्याच दारांत थांबला. टांग्यांतून वर्षा अचानक आली कशी ? पांडुआण्णांना व रुक्मिणीबाईना – कारण पांडुआण्णांना निरोप द्यायला त्या दारांत आल्या होत्या, त्या अजून तिथेंच होत्या !– वर्षाला पाहून आश्चर्य वाटलें. आनंदही वाटला !

पांडुआण्णांचें जाणें रहित झालें !

“ हें ग काय वर्षा ! ” तिला पाहून पांडुआण्णा म्हणाले, “ तुला आणि जांवईबोवांना गंडा घालायला – ( काशीहून आणलेला – दुसरा तिसरा नव्हे अं ! ) तुमच्याकडे निघालों. पण काय वस्ताद आहेस ग ? तूंच आम्हांला गंडा घालायला अचानक आलीस कीं ? ( बाकी, माहेराला गंडा घालायचा माहेरवासिणींना थोडा तरी हक्कच आहे म्हणा ! – आलीस बरें झालें ! ) ” रुक्मिणीबाईनी वर्षाला घरात नेलें.

पांडुआण्णामध्यें आतां मामा वरेरकरांचा संचार झाला. रुक्मिणीबाई वर्षाला विचारताहेत, ती त्यांना कच्ची–पक्की त्रोटक हकीगत सांगते आहे, अशा वेळीं पांडुआण्णांनीं रुक्मिणीबाईना कोपरखळी मारली–

“ तरी मी तुला पहिल्यापासून म्हणत होतों, मी वर्षाकडे जाणार नाहीं. तीच आपल्याकडे येणार आहे. पण तुम्हा लोकांना तें खरं वाटलं नाहीं.

भल्यानें तुम्हां बायकांचें कधीं ऐकूं नये. ऐकलं कीं गळ्यांत आलेंच. तुझं ऐकायला गेलों आणि निघालो, तर वर्षानें दारांतच माझी फजिती करून तोंड फोडलें! माझ्या या फजितीला तूं जबाबदार आहेस!"

झालें, त्यांचींच एकेकापेक्षां वरचढ प्रश्नोत्तरें नेहमीं सारखीं सुरूं झालीं! वर्षाकडे लक्ष देतो कोण? आणि तिचें ऐकतों कोण? आपल्या आई-बापांचीं भांडणाची झीट जिरेपर्यंत तिला बिचारीला मूग गिळून बाजूला गप्प बसण्याशिवाय गत्यंतर नव्हतें! हीं त्यांचीं भांडणें वर्षाला लहानपणापासून माहित नव्हती असें नाही. सुरू कशीं होतात, कां होतात, कशीं चालतात, हे सगळें तिला ठाऊक होते. आणि थांबायला किती वेळ लागतो, हेंही ती जाणत होती.

आपला पाडाव होईल असे उणे उत्तर पांडुआण्णांना मुळींच ऐकून घेण्याची संवय नव्हती. आणि त्यांचा तापट स्वभाव इतका असे कीं, एकादा मनाविरुद्ध क्षुल्लक का शब्द असेना, तेवढ्यानें त्यांचें पित्त खवळें आणि ते एकदम भडकत. भडकले म्हणजे आपली बाजु लंगडी — चुकीची असली, आणि रुक्मिणीबाईचें कितीही खरें — सत्य असलें तरी तें ऐकून घेऊन त्यावर विचार करण्याचें त्यांना — त्या वेळांत तरी निदान, कधीं माहितच नसे. भडकलें कीं तारूं भडकलें! "चला, चालते व्हा माझ्या घरांतून. मला कोणाची जरूरी नाहीं." हें त्याचे हटकून पालूपद आदि — मध्यें — आणि शेवटी असायचें!

आणखी एक अशीच त्या नवराबायकोंत मौज होती. पांडुआण्णा भडकूं लागले कीं, त्यांना अधिकाधिक भडकविण्यांत रुक्मिणीबाईना पुष्कळदां मोठा आनंद होई. ते मोठ्यांदा बोलूं लागले म्हणजे त्यांनीं "दिगंबरा, दिगंबरा, श्रीपादवल्लभ दिगंबरा!" असें निर्विकार चेहेरा ठेवून, त्यांच्याकडे पाहात, शांतपणानें भजन म्हणावयाला लागावयाचें! हंसायचें नाहीं. रागावयाचें नाही, बोलावयाचें नाहीं. आपल्या कानीं कोणाचे कसलेच शब्द ऐकायला येत नाहींत असेंच दाखवावयाचें. तोंडानें भजन सारखे सुरूं!

कीं पांडुआण्णांच्या रागाचें भडकलेंच तारूं!

या वेळीं असाच प्रकार झाला ! अखेर पांडुआण्णा वैतागून कपडे करून एकदम बाहेर चालते झाले !

घरीं जरी असें असलें, तरी एरव्हीं बाहेरच्या वागणुकीत पांडुआण्णा फार सिधा आणि भला माणूस, सरळ सल्ला देणारा, कळकळीचा, सहृदय आणि कोणाच्याही एवढ्या तेवढ्या बाबतींत शरीरानें व मनानें तसाच पुष्कळदां आर्थिक दृष्ट्या दुसऱ्याच्या उपयोगी पडणारा, असा असे यांत शंका नाहीं. जरा गंमत्या आणि विनोदीही. केव्हां केव्हां रुक्मिणीबाईशींही ते विनोद करीत. तो कळला नाहीं, म्हणजे त्यांच्या बोलण्याचा भलताच अर्थ घेत आणि चिडत कीं, पुन्हां भांडण सुरूंच ! आपण विनोद केला असे ते समजून सांगायचे नाहींत. रुक्मिणीबाईचा गैरसमज होऊन त्यांचा तेढा शब्द निघाला पुरे, हे राजेश्री भडकलेच !

जगांत सगळ्यावर औषध आहे, पण स्वभावदोषाला कुठें औषध असतें का ?

रात्रीं वर्षानें आपल्या आईला तिच्या कुशींत बिलगून आपल्याकडची सारी हकीकत सांगितली. कशा परिस्थितींत आपण आलों, हें इत्थंभूत कानांवर घातलें. दोघीही रडल्या. संतापल्या. आईनें मुलीला मायेनें कुरवाळलें.

दुसरे दिवशीं रुक्मिणीबाईंनीं मुलीची हकीकत पांडुआण्णांना समजावून दिली. पांडुआण्णांनीं ऐकलें. मधून मधून वर्षानेंही कमी पडेल तिथें भर घालण्यांत कसूर केली नाहीं.

हकीकत ऐकून पांडुआण्णा कळवळले. आपल्या एकुलत्या एका लेकीची जावयानें दैना केली; असें वाटून त्यांना वाईट वाटलें. वर्षाची चूक नाही. जांवयानें गैर केलें. हें त्यांना पटलें. ते तसें आतां बोलणार होते, तों मध्येच रुक्मिणीबाईंनीं––

"हे तुम्ही पुरुष ! इथून तिथून सगळे सारखे ! बायकांचे काळ !" असा तार स्वर लावून म्हटलें; "काय पण जांवई पाहिलेत ? दिवे ओवाळावेत ! सोन्यासारख्या माझ्या पोरीची अशी गत करायची म्हणजे काय ?

इतकं झालं तरी तुम्हीं म्हणणारच जांवईच बरोबर! वर्षाचीच कांहीं तरी चूक आहे! हो, ते तुमच्या जातीचे पुरुष ना? वर्षा आमच्या दुर्दैवी जातीची स्त्री आहे की नाहीं!"

झालें! बिथरायला पांडुआण्णांना इतके पुरें झालें!

"मी खात्रीनें सांगतों, या प्रकारांत वर्षाच्या हातूनच चूक झाली असली पाहिजे!" पांडुआण्णांनीं घेतली उलटी कलाटणी.

"काय तिची चूक झाली?" रुक्मिणीबाईनी तावातावानें विचारलें.

"वर्षा घर सोडून आली कां? ही तिची चूक आहे!"

"मग काय करायचं होतं तिनें? तुमच्या दीडशहाण्या जांवयानें पोरीच्या छातीवर घरांत आणून ठेवली त्या नटीला नाचायला तर तिनं तें कां सहन करावं?"

"तुम्हा लोकांचं चुकतं तें हेच! वर्षानें तिथं राहायला हवं होतं."

"ती सटवी घरांत असल्यावर ही कशी तिथं राहणार?"

"हातची सत्ता आपण होऊन अशी गमावून लाभ तरी काय मिळणार?" पांडुआण्णांना मध्येंच राजकारण आठवलें, "आमचे बळवंतरावजी टिळक नेहमीं आम्हांला उपदेश करीत असत; सर्वसत्ताधारी सरकारवर रुसून त्यांच्यापासून फटकून वागण्यांत शहाणपणा नाहीं. त्यांच्यांत घुसलें पाहिजे. त्यांच्यांत वावरलं पाहिजे. तिथें राहून त्यांना जेरीला आणलें पाहिजे. आणि आपलें स्थान आपण बळकट केलं पाहिजे. नाहीं तर महात्माजींच्या कारकीर्दीतलं आतांचं प्रधान मंडळ— राजीनामे खरडून, सरकारवर रुसून घरांत येऊन बसलं. नुकसान कोणाचे झालं? सरकाराचें का प्रधानांचें?"

रुक्मिणीबाईना पांडुआण्णांचें पांडित्य कांहींच कळत नव्हतें. त्या नुसत्या त्यांच्याकडे पहात होत्या. वर्षा खालीं मान घालून रडत होती.

"टिळकांच्या [illegible] न वागतां, आतांच्या प्रधान मंडळीप्रमाणें— वर्षा वागली, हें तिचें चुकलं. असं म्हणतों मी. राजकारणांत प्रधान मंडळाची चूक. आपल्या घरच्या राज्यांतून राजीनामा देऊन वर्षा बाहेर पडली ही तिची चूक! तिचं नुकसान तिनं करून घेतलें!" [illegible]आण्णांनीं प्रतिपादन केलें.

रुक्मिणीबाईंना जरा वेळ त्यावर कांहींच बोलायचें सुचेना. त्या वर्षाच्या पाठीवर हात फिरवीत विचारांत पडल्या.

" जन्मभर बायकांना पुरुष अस्से छळतात— "

" असें बायका म्हणतात !— "

" तुम्हीं मला काय छळायला कमी केलेंत ? "

" तरी सुद्धां तूं कधीं वर्षा सारखी वैतागून, मला सोडून माहेरीं निघून गेली नाहींस ! "

" पण छळलंत तुम्ही, हें तरी कांही खोटं नाहीं ना ? "

" छळलं असं तुला वाटलं ! तरी पण, त्याचं प्रायश्चित्त म्हणून तूं साऱ्या-तीर्थयात्रा करायला लावून दिलंस ना ? "

पांडुआण्णांचें बिनतोड उत्तर ऐकून रुक्मिणीबाई निरुत्तरच झाल्या. त्यांना तेवढ्यानें पण जरा आनंद झाला. त्यांना हंसायला आलें. पण तित-क्यांत रडणाऱ्या वर्षाकडे त्यांचें लक्ष गेलें आणि त्यांनीं आपलें हंसू आवरलें.

" वर्षाला किती त्रास झालाय, हे तुम्हांला कधीं कळायचं नाही ! "

" आणि वर्षा अशी जांवईबोवांच्या आज्ञेला धाब्यावर बसवून – न विचारतां, – परवानगी घेतल्याशिवाय गेलीस तर पुन्हां घरीं घेणार नाहीं अशी ताकीद दिली असतांही – इकडे निघून आली, त्याचा जांवईबोवांना काय त्रास झाला असेल हें तुम्हां बायकांनाहीं कधीं कळायचा आहे काय ? – तीं आमचीं दुःखें आमचीं आम्हींच जाणोत ! "

" मग वर्षानं वागायला हवं होतं तरी कसं ? "

" तुझा कित्ता गिरवायला हवा होता !– तूं जशी कधी माझी आज्ञा मोडून माहेरीं पसार झाली नाहींस – इथल्या इथं राहून, वाटेल तसं आचरटपणानें वागून मला मुका मार देत गेलीस, तसं वर्षानं वागायला पाहिजे होतं ! "

" त्या लेंकराला इतका पोंच कसा असणार ? "

" मी तेंच म्हणतों. तुमच्याइतका चाऊन चिकट आणि ओढून वळकट-पणा अलिकडच्या या लेंच्यापेच्या लेकरांत नाहींच मुळीं. जरा नवरा मर्जी-विरुद्ध वागतोसा दिसला कीं गेलीच यांची मर्जी. निघाल्या माहेरीं. चालल्या घटस्फोट करायला. लागल्या दुसऱ्या घरोब्याच्या शोधाला ... हीं आजचीं नाजूक लेंकरं— "

" इश्श ! कांहींतरीच्च काय बोलायचं ? जिभेला कांहीं हाड ! मनाला कांहीं लाज तरी ? "

" लेंकरांना वागायची लाज वाटत नाहीं. आणि आम्हांला बोलायची चोरी ! खासा न्याय ! "

आईबापांचें बोलणें वर्षा निमूटपणें—लक्षपूर्वक ऐकत होती.

तिच्या मनावर त्यांच्या बोलण्याचा काय परिणाम होत असेल कोण जाणे !

" पण मी सांगतें, अरेराव पुरुषच बायकांना निर्दयपणानें छळतात— वर्षानें आपल्या नवऱ्याला काडीचा त्रास दिला नाहीं — "

" बरोबर! मी तुला बोलायला लागलों, म्हणजे माझ्या पुढें तुझं "दिगंबरा दिगंबरा, श्रीपादवल्लभ दिगंबरा ! " हें तूं आपलं भजन सुरूं करून मुका मार द्यायला लागतेस—माझा जीव घाबरा होतोय की काय हें पहात नाहींस— तसेंच ना ! "

" हें आपलं तेरे उप्पर मेरा पाव सारखेंच बोलणं ! "

" बस्स ! पुरे कर तुझी वटवट ! "

" असं म्हटलं कीं झालं ! जांवयानं नटी ठेवली, ठेऊं दे. तिनं आपली, आपल्या लेंकराला लुगडीं धुवायला लावलीं, लागूं देत, असंच आपल्याला सांगायचं आहे कां ? मग आमचं बोलणंच संपलं ! एवढ्याकरितां वर्षा आपल्याकडे आली आहे वाटतं ? " रुक्मिणीबाईनीं डोळ्याला पदर लावून म्हटलें.

पांडुआण्णा कांहींच बोलले नाहींत. नुसतें रागारागानें रुक्मिणीबाईकडे पाहूं लागले. त्यांना चेव येऊन त्यांनीं विचारलेंच आणखी—

" पण मी म्हणत्यें, जांवयानें नटीला ठेवली हा त्याचा गाढवपणा नाहीं कां !— "

" अग पण दीडशहाणे, जांवयानें सिनेमाचा धंदा काढला आहे ना ! सिनेमाला नट्या लागतात. तर त्यानं आणायला नकोत ? तुमच्या मर्जी- करितां नट्यांच्या ऐवजीं गाढवं-माकडं का आणायला पाहिजेत ? तुम्हां बायकांना अक्कल नाहीं म्हणतो ती अशीच ! कळत नाहीं तर अक्कल पाजळूं

नये जावयानं आपला धंदा काढूं नये. गाढवपणा केला आणि काढला. तर त्याला त्यासाठीं नटयांना जवळ करणं भाग आहे!"

"हो, उद्यां शेण खाणं सुद्धां भाग आहे, म्हणायचं होईल." रुक्मिणीबाई पुटपुटल्या, "म्हणून काय तो शहाणपणा झाला म्हणायचं का काय?"

पांडुआण्णांनीं रुक्मिणीबाईकडे नंतर दुर्लक्ष केलें. त्यांनाही वर्षाबद्दल रुक्मिणीबाईच्या इतकी नाहीं तरी–काळजी लागलीच होती. त्यांच्या मनांत कांहीं विचार आला; ते वर्षाकडे वळले, आणि त्यांनीं तिलाच विचारलें—

"काय ग वर्षा, खरंच विश्वासने नटीला घरांत बाळगली आहे?"

"हो!" एवढेच वर्षानें उत्तरादाखल म्हटलें.

"ती रूपानं कशी आहे ग?– तुझ्यापेक्षां जास्त देखणी आहे काय?"

"असेल मेली कसली तरी! तिच्या रूपाला काय जाळायचं आहे?" रुक्मिणीबाई मध्येंच जळफळल्या.

"तूं मध्यें तोंड घालूं नकोस! मी वर्षाला विचारतों आहे!"

पांडुआण्णा रुक्मिणीबाईच्यावर खेकसले. त्या गप्प बसल्या. "सांग, वर्षा, स्वतःच्या रूपाच्या घमेंडीत जाऊं नकोस! ती नटी तुझ्यापेक्षां स्वरूपवान आहे काय? —"

"चांगली आहे!" वर्षा म्हणाली.

"ठीक आहे! मग हरकत नाहीं. मला आतां जरा हायसं झालं!" पांडुआण्णा म्हणाले; "वर्षा, तू काळजी करूं नकोस! ती नटी तुझ्यापेक्षां देखणी असेल, तर तुझ्या नवऱ्याजवळ कायम राहात नाहीं, हें लक्षांत ठेव!"

"म्हणजे काय?" रुक्मिणीबाईनीं विचारलें.

"ती नटी स्वरूप सुंदर नसती, तर मी म्हटलें असतें, ती घोरपड विश्वासला जन्मभर सोडणं शक्य नाहीं. स्वरूपवान बायकांना आपल्या स्वरूपाचा गर्व असतो. त्यावर त्या जगाला झुलवतात. मन मानेल तंशा—आणि तितका वेळ—त्या एकाद्याला नादीं लावून रहातात. स्वतःला कंटाळा आला कीं, चालल्या दुसरीकडे. दुसऱ्याचं ऐकायच्या नाहींत. एकाच्या ताब्यात राहायच्या नाहींत! कुरूप बायकांना आधीं कोणीं पत्करीत नाहीं. एकादा

जाळ्यांत सांपडला तर, आपल्या स्वरूपाची उणीव, आपल्या प्रेमळ वागण्यानें भरून काढतात. आपल्या गुणांनीं नी वागण्यांनीं चटका लावतात. आणि कायमच्या बिलगतात ! म्हणून सांगतों. विश्वासची स्वरूप सुंदर नटी, त्याचा कंटाळा येतांच, त्याला लाथ मारून गेल्याशिवाय राहात नाहीं. रुपयाच्या स्टॅपवर लिहून देतों हें ! — ”

“ पण जांवईबोवा तिच्याशीं लग्न करणार आहेत त्याचं काय ? ”

“ नटी कोणाशीं लग्न करायच्या फंदांत पडायच्या नाहींत ! लग्न केलं तरी त्याला त्या किंमत द्यायच्या नाहींत. विश्वासपेक्षां जास्त पगाराचें आमिष दुसऱ्या सिनेमावाल्यानें दाखविलें कीं, लग्नविघ्न गुंडाळून ती पळतें आहे कीं नाहीं पहा !—” पांडुआण्णांनीं ठासून सांगितलें. त्याच्यापुढें मग कोण काय बोलणार ?

मात्र पांडुआण्णाचें बोलणें ऐकल्यानंतर, आपण पुरता विचार केल्याशिवाय घर सोडलें, ही चूकच झाली, असे विचार वर्षाच्या मनांत यायला लागले. ती त्याचाच जास्त विचार करूं लागली.

“ तें सगळं तुमचं बोलणं झालं. पण वर्षाच्या आयुष्याची पुढं वाट काय व्हायची ? ” रुक्मिणीबाईची टकळी पुन्हां चालू झाली. “ तिच्यासाठीं काय करायचं टरलं मग ?—”

“ काय ठरवूं ? नवऱ्याविरुद्ध तिला घटस्फोट घ्यायला सांगूं ? वकिलाकडून आजच कुळंब्यामाळ्यासारखी नोटीस द्यायला लावूं ?— दुसरा नवरा करून देतो म्हणून वर्षाला सांगूं ! करूं काय ? ” पांडुआण्णा पत्नीवर कडाडले.

त्याबरोबर कानावर हात ठेवीत, “ हरे राम ! हरे राम ! देवा ! देवा ! असें आपल्या पोटच्या पोरीबद्दल बोलवतं तरी कसं एकाद्याला रे बाबा ! ” असें कांहीं तरी रुक्मिणीबाई बडबडल्या.

“ वर्षा आली आहे. सगळं लक्षांत आहे. करतां येईल पुढच्यापुढं काय करायचें तें. आतांच त्याचं काय नडलं आहे ? पुढच्यापुढं पाहातां येईल ! काय करीन तें विचार केल्याखेरीज आजच काय सांगणार, माझं डोकं का तुझं कपाळ ! वर्षाच्या नशीबांत जितके दिवस भोगायचे असतील तितके ती

भोगील. जांवयाला काय नाचरंग करायचे असतील तेवढें तो करील. त्याला कोण काय करणार ? असं हे चालायचंच...... "

असें बरेंचसें बोलून पांडुआण्णांनीं त्या वेळीं तितकाच विषय सोडून दिला. ते तेथून उठलेच.

आपलें पुढें काय होणार ? हें वर्षाला कळेना. तिची दर क्षणीं काळजी दुणावूं लागली. आपल्या एकेक चुका तिच्या डोळ्यांपुढे येऊं लागल्या. तिला रडण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाहीं. मुलीला समजावावें कसें हे समजेना. त्यांना चिंताच वाटूं लागली.

पांडुआण्णा घरांत कर्दनकाळ खरे ! पण जांवयाच्या बाबतींत काय करावें ? आपल्या लेकीच्या संसाराची गाडी पहिल्याप्रमाणें रुळावर कशी नेऊन सोडावी, याची त्यांनाही फिकीरच पडली.

चारपांच दिवस तसेच गेले. एक दिवस विश्वासच्या निघणाऱ्या फीलम-कंपनीच्या समारंभाला—व त्यावेळी होणाऱ्या सत्यनारायणाच्या पूजेला येण्या-बद्दलची स्वाक्षरीची पांडुआण्णांना, सकाळच्या डाकेनें आलेली निमंत्रण—पत्रिका, त्यांच्या हातांत पडली !

पांडुआण्णांना केवढा उत्साह वाटला ! त्यांनीं ती पत्रिका रुक्मिणीबाईंना आणि वर्षाला वाचून दाखविली. आणि लगेच समारंभाला वर्षासह सगळ्यांनीच जावयाचें, असा आपला निश्चित विचार जाहिर करून टाकला.

जांवयाबद्दल त्यांना विलक्षण अभिमान वाटूं लागला — ते तो दरक्षणीं उच्चारून दाखवूं लागले.

वर्षाच्या नांवाचा उल्लेख पत्रांत मुळींच विश्वासनें केला नव्हता ! रुक्मिणी-बाईंना राग आला. वर्षाला वाईट वाटलें. पण त्याचेंच पांडुआण्णांनीं कौतुक वाटलें. ते म्हणालेच कीं, " स्वाभिमानी पुरुष आहे ! बायकांच्या पायांत कुत्र्यासारखा लोळणारा, त्यांची गय करणारा, डोक्यावर घेऊन त्यांना नाचणारा बावळट—बायल्या नव्हे !— "

निघायच्या वेळीं वर्षाला पंचाईत पडली. भीति वाटली. ती चुळबूळ करूं लागली, " घरांत घेणार नाहीं, असं मला बजावलंय ! " असें आईजवळ हलकेंच म्हणाली. पण तें पांडुआण्णांनीं ऐकलेंच. त्यांनीं गर्जत म्हटलें,

"चल ग तूं माझ्याबरोबर मुकाट्याने, जांवई असो, नाहीं तर कोणी ब्रह्मदेव असो, माझ्याशीं गांठ आहे त्याची. माझ्या समोर त्याची तुला बोलण्याची काय माय व्याली आहे, हेंच मी पहाणार आहें! घरांत घेणार नाहीं म्हणे, त्याचा बाप तुला घरांत घेईल! माझ्या पुढें त्याच्या भलत्या गमजा चालायच्या नाहींत!"

जांवयाचें चालूं देणार नाहीं, ही ज्या पांडुआण्णांना खात्री त्यांच्यापुढे वर्षाचे तरी काय चालणार? ती येत नाहीं असें त्यांना कसें म्हणणार?

---

उद्यां विश्वासच्या स्टुडिओचा अनावरण समारंभ होता. आपल्या भागीदारासमवेत, तो त्याच धांदलीत एकसारखा गुंतला होता. त्याचा भागीदार म्हणजे त्याच्या कार्याची साक्षात् स्फूर्तीच त्याला मिळाली होती; तर तो जीवंत अशी कार्याची मूर्तिच असा सर्वांना दिसत होता !

दररोज कोण ती त्याची धावपळ, काय ती त्याची धांदल ! मूर्तिमंत उत्साहच महाराष्ट्रांत अवतरला आहे कीं काय, असें त्याच्याकडे पाहाणारास वाटत असे.

वर्षा त्याला न जुमानतां माहेरी गेल्यापासून त्यानें आपल्या भावनामय हृदयपेटिकेला कुलूप घालून ती बंदच करून टाकली होती. डोक्याच्या—राजप्रासादांतील विचारमंत्र्याच्या संगतींत तो दिवसाचा सारा वेळ विश्वास घालवीत होता.

तिची आई आजारी झाली म्हणून ती निघून गेली, हें निमित्तही त्याला सर्वांना सांगायला मिळालें तें त्याला ठीकच झालें.

पार्श्वनाथानें विश्वास, वर्षा, प्रेमा यांच्यासह टेनिस वगैरे खेळायचा उपक्रम करण्याचें ठरविलें होतें, त्याप्रमाणें त्यानें विश्वासला विचारावयाचें वेळींच त्याला एकदमच कळलें कीं वर्षा माहेरीं गेली.

स्टुडिओकडेही त्याचा बहुतेक सारा वेळ जाणार, हे उघड होतें. म्हणून विश्वासनें टेनिस वगैरे प्रेमा आणि तूंच सध्यां खेळूं शकाल, असें पार्श्वनाथाला सांगून टाकलें होतें.

आपल्यापायीं वर्षा माहेरी निसटली नाहीं, तर तिची आई आजारी झाली म्हणून गेली, हें ऐकल्यानंतर प्रेमालाही तितकें बरेंच वाटलें. तिचा ससेमिरा कोणत्याही कारणानें कां होईना, आपल्या मागचा सुटला, याचाही तिला जरा आनंदच झाला.

तुझ्या पायांत वर्षानें घर सोडलें, असें विश्वास आपल्याला म्हणेल कीं काय ? आणि आणखी कांही ती जें बोलली असेल, त्याचा उल्लेख करून, आपल्याला दोषी ठरवील कीं काय, अशी प्रेमाला मनातून धाकधूक वाटत होती; पण विश्वासनें तिला कांहींच म्हटलें नाहीं. तिच्याशीं त्याच्या पहिल्या आणि नंतरच्या वागण्यांत कसलाच फरक नव्हता. तें पाहून प्रेमाला एकाद्या डोंगराखालीं चेंपलों आहोत असें उगाचच वाटत होतें, तें खोटेंच ठरलें.

विश्वासचा दिवसाचा सारा वेळ स्टुडिओकडे आणि सिनेमाधंद्याला आवश्यक असणाऱ्या अनेक भानगडींची जुळवाजुळव करण्याकडे भागीदारासंगती जाऊं लागल्यामुळें, पार्श्वनाथाला प्रेमा आणि प्रेमाला पार्श्वनाथ, बोलाचालायला, वेळ घालवायाला—असा प्रकार घडूं लागला. केव्हां केव्हां जेवणाच्या वेळीं विश्वास घरीं सगळ्यांच्या पंक्तीला असे. पण त्या वेळीं त्याच्या साऱ्या गोष्टी आपल्या फिल्म कपनीच्या, भागीदारासंबंधींच्याच तो बोले. आज हें झाले; उद्यां तें करायचें आहे. आर्टिस्ट अमूक, कॅमेरामन तमूक, स्टार्स अमूक आले. नटी अमक्या अमक्या तमक्या निवडल्या आहेत; याच साऱ्या गोष्टी आणि जास्त म्हणजे आपला भागीदार.

त्याच्या बद्दल विश्वास एकदा बोलायला लागला, म्हणजे तो स्वत:लाही विसरून जाई. तो त्याचा परमेश्वर ! महाराष्ट्रांत–शिकलेल्या तरुणापैकीं धंद्यांत धडा-डीने शिरून, पराक्रम दाखविण्याची ईर्षा बाळगणारा, आचार्य अत्रे सोडले, तर दुसरा आपला भागीदारच ! उमदा काय आहे, उदार काय आहे, व्यापक आणि विशाल दृष्टीचा काय आहे, असा तरुण महाराष्ट्रभू प्रसवते आहे तोपर्यंत तिची गत काय होईल, असा निराशावाद करीत बसण्याची कोणालाच गरज नाहीं— इत्यादि इत्यादि– विश्वास काय बोलेल आणि किती बोलत राहील, त्याचा नेमच नाहीं ! परंतु आपलेंच स्तोम आपण माजवतो आहोंत, आपला आणि आपल्या भागीदाराचाच नगारा पिटून दुसऱ्याला नकोसें करीत आहोंत, असें वाटूं नये याचसाठीं नव्हे, तर, त्याला सर्वांची सारखीच जाणीव आणि आपुलकी असल्यामुळें मधून केव्हां केव्हां, “ काय पार्श्वनाथ, तुझ्या उद्योगाचं कुठवर आणलेंस ?— व्यापारांत पडणार कीं शेतकरी बनणार ? पाहून आलास का ती शेती ? ” असें पार्श्वनाथ पाल-कराला विचारी, तर प्रेमाच्याही प्रकृतीची चौकशी करी !

पार्श्वनथाला आणि प्रेमाला त्यानें आपला स्टुडिओ दाखवायला आग्र-हानें नेलें. भागीदाराशीं दोघांचाही परिचय करून दिला. आणि पार्श्वनाथ–प्रेमाला, आपल्या भागीदाराचें खोटें वर्णन आपण करीत नाहीं, हें पटवून दिलें.

परंतु त्या सर्व गडबडींत, त्याने वर्षाचा विषय कोणाजवळ आणि कधींच चुकूनही काढला नाहीं. दिवसाच्या कार्याच्या व्यापांत त्याला तिची आठवण ही होत असेल कीं नाही याची शंकाच होती.

रात्रीं अंथरुणावर येऊन पडला म्हणजे विचारी डोक्याच्या दालनाला बंद करून, हृदयांतील भावनेची पेटी हलकेंच उघडून वर्षाबद्दल त्यांत, मागल्या प्रेमाच्या, परिहासाच्या एकेक गोष्टी न्याहाळीत नसेल असें मात्र कोणालाच सांगतां आलें नसतें !

विश्वास बाह्यात्कारी दाखवो वा न दाखवो, पण जेव्हां तो कामाला बाहेर जाई आणि त्याच्या पश्चात् प्रेमा आणि पार्श्वनाथ यांची बोलणींचालणीं, हंसणें खिदळणें चालत, तें पाहून, दुपारच्या वेळीं भागिर्थीकाकू आणि गोट्या, यांच्यांत चर्चा चालल्याशिवाय राहात नसे.

" तुम्हीं काय बी म्हणा काकू, पर आपल्या मालकाचं नशीब वंगाळच बघा ! " गोटया म्हणे.

" का रे ? असं कां म्हणतोस ?--" भागिरथीकाकू विचारीत.

" का म्हंजी ? ताईसाब मालकास्नी टाकून गेल्या–आतां त्या पोटगीचा दावा लावण्यापायीं मालकास्नी कवा नोटीस देत्याल कुनास ठाव !–" गोटया आपली कल्पना सांगे, " आन् हाकड तुम्ही बघतायाच कीं, त्या डाकूनं ( पार्श्वनाथानें ) मालकांच्या परमाताईला काखोटीला लावलीया. म्हंजी हाय बी गेलं, हुयबी गेलं आन् मालकाच्या हातांत अखेरीला धुपाटनं राह्यलं कां न्हायी ? म्हणून म्हणतों, कसला बी मोटा उद्योग मालकांनी केला, तरी त्येचं नशीब वगाळच ! त्यांच्या कपाळांत सुख है कुटं ? "

" खरं आहे बाबा तुझें ! कालच पुराणिकबुवा सांगत होते, कीं रामदासांनीं सागितलय, " *जगीं सर्व सुखी असा कोण आहे, विचारी मना तूंचि शोधूनि पाहे !* " तें खोटं का आहे ? "

× × × ×

आज दुपारीं स्टुडिओकडे जातांनाच विश्वास भागिरथीकाकूंना सांगून गेला होता कीं, निमंत्रित पाहुण्यांपैकी काही मंडळी आपल्याकडेच उतरायला येतील, त्यांची व्यवस्था व्यवस्थित ठेवा.

संध्याकाळच्या वेळीं पार्श्वनाथ–प्रेमा रोजच्याप्रमाणें चहा घेऊन फिरायला गेले होते.

घरांत काय आहे नाहीं तें पाहून, भागिरथीकाकूंनीं गोटयाला सामान-सुमान आणायला दवडलें होतें !

पांडुआण्णा, रुक्मिणीबाई वर्षासह दाखल झाले !

वर्षा आईला घेऊन घरांत गेली. पांडुआण्णा दिवाणखान्यांत प्रविष्ट झाले.

भागिरथीकाकूंना वर्षाला अचानक पाहून आश्चर्य व आनंद झाला !

सर्वांची पूसतपास करतांना, त्यांच्या चहाची व्यवस्था करतांना कोण त्यांची घाई नी तारंबळ !

रुक्मिणीबाई, वर्षानें ओळख करून दिल्यावर भागिरथीकाकूंशीं बोलत बसल्या. वर्षा इकडे तिकडे पाहूं लागली. तिला आंत बाहेर कोणीच दिसलें नाहीं.

रुक्मिणीबाई काकूशीं बोलत होत्या, तर घरांत सटवी नटी कोण कशी आहे, हें पाहण्यासाठीं पाहाण्याचा प्रयत्न करीत होत्या.

तेवढयांत विश्वास घरीं कांहीं कामानिमित्त आला. पांडुआण्णांची त्याची दृष्टि–भेट झाली. विश्वासनें श्वशूरांचें सानंद हंसून स्वागत केलें. आल्याबद्दल आभार मानले. त्यांनाही जांवयाच्या दिलखुलास वागण्याचें कौतुक वाटलें. दोघे बोलत बसले; केव्हां निघाला–काय–वगैरे औपचारिक चौकशी त्यानें आस्थेनें केली. श्वशूरांनींही त्याच्या उद्योगाबद्दल त्याची अभिमानपूर्वक पाठ थोपटली. विश्वासनें वर्षाची चौकशी केली नाहीं. कोण कोण आले म्हणूनहि विचारलें नाहीं.

दिवाणखान्यांत विश्वासचा आवाज झाला. कानीं येतांच वर्षा दचकली, घाबरली. तिला कसेसेंच झालें. श्वशूर–जांवयाचें बोलणें काय चालतें, हें ऐकण्याची उत्कंठाही तितकीच प्रबळ झाली. जिवाचा धडा करून हलकेच दाराच्या बाहेर ती येऊन उभी राहिली.

सामान आणायला गेलेला गोटया बाहेरून आला, त्यानें वर्षाला पाहिलें. त्याबरोबर आश्चर्यानें आणि आनंदानें तिच्याकडे पाहून पोस्टाच्या पेटी-सारखा आ च वासला! "आं? तुम्ही अन् कवा आल्या जी?" असें विचारणार होता वर्षाला तो! पण वर्षानें चूप करण्याकरितां नाका-वर बोट ठेवलें. तो तसाच मग तेथून आंत निसटला. आपल्या मालकीणीला पाहून त्याला इतका आनंद झाला होता कीं, त्या भरांत धांवतांना, बरें तर बरें, हातांतलें सामानाचे पुडे जमिनीवर पडून साराच गोंधळ व्हावयाचा–तें त्यानें कसेंबसें सावरलें!

आतां त्याला आपले मालक भाग्यशाली आहेत असें वाटूं लागलें. आपल्या-कुणब्या-माळ्याच्या बायका अशा शाहण्यासुर्त्या कुठल्या असायला? गेल्या कीं गेल्याच! असें कांहीं तरी त्याच्या मनांत येऊन गेलें.

भागीर्थीकाकूंनीं चहा तयार केला होता, तो दिवाणखान्यांत, पांडुआण्णांना आणि विश्वासला देण्यासाठीं त्याच घेऊन येत होत्या. वर्षानें तें पाहिलें. त्यांच्या हातांतला ट्रे वर्षानेंच घेतला. आणि आतां काय व्हावयाचें असेल तें होवो, असे मनाशीं म्हणत, तीच दिवाणखान्यांत चहा घेऊन गेली!—

विश्वासनें वर्षाला आलेली पाहिलें. त्याला काय काय वाटलें असेल कोण जाणें !– वर्षानें त्याच्याकडे पाहिलेंच नाहीं. ती चहा ठेऊन परत निघाली; पण आजींनीं, तिला "निघालीस कां ? बैस ना इथंच !" म्हणून बसायला भागच पाडलें. तिच्या देखत, त्यांना खुलासा करून, दोघांचें काय असतील ते गैरसमज योग्य वेळींच काढून टाकावयाचे होते.

खालीं मान घालून मुकाट्यानें बाजूच्या खुर्चीवर बसली बिचारी वर्षा !

प्रेमा आणि पार्श्वनाथ खूप दूर फिरायला गेले होते. फिरून फिरून दमल्यावर रस्त्याच्या एका कडेच्या कठड्यावर दोघेही बसले. जाणाऱ्या येणाऱ्यांची त्यांना करमणूकही होत होती. आणि अनेक विषयांवर मजेदार संवादही चालं होते.

दोघेंही तेथें किती वेळ आणखी बसले असते कोणास ठाऊक ! पण त्यांना आकस्मिक कारणानें तेथून उठण्याची पाळी थोड्याच वेळांत आली. कारण आनंददायकच अर्थात् घडलें.

बाबासाहेब देशपांडे, इंदिराकाकू, पुरुषोत्तम, मंदाकिनी, या लवाजम्यासह अगदीं समोर आल्यावर त्यांनी पाहिलें. बाबासाहेबांच्या काखोटीला गाठोडें, मागें हमालाच्या डोक्यावर बरेंच सामानाचें ओझें. एका हाताचें बोटाला धरून पुरुषोत्तम चालतो आहे, मंदाकिनी इंदिराकाकूंच्या कडेवर !

त्या कोणाचें लक्ष प्रेमाकडे आणि पार्श्वनाथाकडे जाण्याचें कारणच नव्हतें. त्यांना आपल्या भाचाचें–विश्वासचें घर फक्त समोर दिसत होतें. बाबासाहेब गरीब होते. आणि क्षणभराची खोटी श्रीमंती जगाला दाखविण्याकरितां मोटर टांगा [illegible] त्यांना हौसही नव्हती !

सारेजण पायींच चालले होते. पुरुषोत्तम "अजून किती हो आहे लांब बाबा, नानाचें घर ?" [illegible] विचारीत होता.

मंदाकिनी इंदिराबाईच्या कडेवर सारखी वळवळ करीत, इकडे तिकडे पहात होती. आपल्या आईला, 'हें बघ ! – तें बघ !' असें म्हणून सारखी भंडावून सोडीत होती.

प्रेमाचें किंवा पार्श्वनाथाचेंही लक्ष या आपल्या मंडळीकडे गेलें असतें कीं नाहीं बोलण्याच्या नादांत कोण जाणें !

पण मंदाकिनीनेंच आपल्या प्रेमाताईला पाहिलें. लठ्ठसा माणूस–पार्श्वनाथही तिला दिसला. ती चिमुकल्या हातांनीं टाळ्या पिटीत, लहानशा जिवणींतून हास्याचा हलकल्लोळ करीत आपल्या आईला बोबडे बोबडे बोलत सांगूं लागली, " आई, ताई ! आई, नाना–नाना !— "

इंदिराबाईचें प्रेमाकडे लक्ष गेलें.

आणि मंदाकिनीनेंच प्रेमाचें आणि पार्श्वनाथाचें या सर्व मंडळीकडे लक्ष वेधविलें.

आपल्या साऱ्याच मंडळींना असें अकस्मात् पाहून प्रेमाला काय आनंद झाला पण !

पुरुषोत्तम हंसरा चेहरा करीत आपल्या प्रेमाताईजवळ गेला. मंदाकिनी आईजवळून आपल्या ताईकडे जायला कोण उतावीळ झाली ! " ताई–ताई– " करीत गेलीच तिच्याजवळ; ती पार्श्वनाथाजवळ " नाना–नाना–" करीत अगोदर जाणार होती; पण तिनें त्याच्या तोंडाकडे पाहिलें. तिला तो नाना पटला नाहीं. आपल्याकडे गोडशी मुलगी येते आहे असें पाहून पार्श्वनाथानें तिला घेण्याकरितां हात पुढें केले पण तिनें मान मुरडली. पुन्हां त्याच्याकडे पाहिलेंच नाहीं. लहान मुलांना देखील आपलें आणि दुसरें असें आपोआप कळतें.

बाबासाहेबांनीं प्रेमाला पाहिलें. तिच्याबरोबर असलेल्या पार्श्वनाथालाही पाहिलें. ओळखलेंही. इंदिराबाईना मात्र त्याची ओळख पटली नाहीं.

" प्रेमा, इकडे ग कुठं तूं ! " बाबासाहेबांनीं आणि इंदिराबाईनीं प्रेमाला विचारालें.

अतिशय आदरानें पार्श्वनाथानें बाबासाहेबांना नमस्कार केला. आणि " मी पार्श्वनाथ पालकर, आपला लहानपणींचा एक विद्यार्थी ! " अशी कदाचित् ते आपल्याला विसरले असतील या समजुतीनें आपली ओळख आपणच करून दिली.

" मी ओळखतों तुला ! विसरलों नाहीं. " बाबासाहेबांनीं पार्श्वनाथाच्या नमस्काराचा स्वीकार करून म्हटलें, " अरे तूं इकडे कसा ? "

" मी आणि प्रेमा रोज या बाजूला फिरायला येत असतों ! " पार्श्वनाथाने खरी ती माहिती दिली. " पण बाबासाहेब, आपण असे पायीं पायींच कसे ? "

" अरे बाबा ! आम्हीं गरीब माणसें आहोंत. तुझ्यासारखा श्रीमंत नाहीं तूं आफ्रिकेला जाऊन मोठा झालास. आमचा भाचा विश्वास मूळचाच श्रीमंत आहे. तसं माझं नाहीं. आपले नातेवाईक किंवा विद्यार्थी मोठे असले, म्हणून आम्हीं, ते वागतील, तसें वागून कसें चालेल रे ! " बाबासाहेबांनीं हंसून म्हटलें; " ज्यानें त्यानें आपल्या चालीनें चालावें. आपल्या स्थितीप्रमाणें वागावें. त्यातच सुख आहे. भूषण आहे ! होय कीं नाहीं ? "

चाणाक्ष, अनुभवी आणि सरळ मनाच्या बाबासाहेबांपुढें पार्श्वनाथ जास्त तें बोलणार काय ?—

" तुम्हीं दोघेच फिरायला आलांत ? आणि विश्वास कुठें आहे ? तो नाहीं कसा तुमच्याबरोबर ! " बाबासाहेबानी प्रेमाकडे व पार्श्वनाथाकडे पहात विचारलें.

" तो आपल्या सिनेमाफिल्मकडे दिवसभर असतो. आमच्याबरोबर यायला त्याला वेळ कुठें मिळतों ? त्याचें जग वेगळे, आमचें वेगळें ! " पार्श्वनाथ म्हणाला.

" तूं विश्वासकडेच उतरला आहेस वाटतं ? " बाबासाहेबांनीं पृच्छा केली.

" म्हणूनच तर प्रेमाची भेट झाली, ओळख झाली, आणि आम्हाला असें फिरायलाही सांपडतें ! दोघाना आम्हां " प्रेमाकडे हसून पाहात पार्श्वनाथाने म्हटले.

पुरुषोत्तम प्रेमाताईकडे आणि पार्श्वनाथाकडे आळीपाळीने पाहात होता. आपली ताई पार्श्वनाथाकडे पाहून कां लाजते आहे, तो तिच्याकडे प्रेमाच्या नजरेनें कसा पाहातो आहे, हें पाहून त्याला चमत्कारिकच झालें होतें. आपल्याप्रमाणे आपल्या आईचेंही त्या दोघांकडे लक्ष आहे कीं काय, हें अजमावण्यासाठीं तो गुलाम आईकडेही पाहात होता.

११

" तूं आफ्रिकेला गेला आहेस, तिकडे तुझं चांगलं चाललं आहे, असं केव्हां तरी कोणाकडून तरी मला कळलं होतं. ऐकलं, तेव्हां आपला एकतरी विद्यार्थी दुसऱ्या देशांत जाऊन नशीब काढूं शकतो, असें वाटून मला फार आनंद झाला होता ! " बाबासाहेब म्हणाले, " पण तूं तिकडून आलास केव्हां ? कां ? इथं काय करतोस ? काय करणार आहेस ? कळूं दे तर खरें."

वाटेंतच भेटी झाल्या, आणि सारेजण तिथेंच बोलत उभे राहिले.

इंदिराबाई एका बाजूला उभ्या राहिल्या होत्या. प्रेमा कांहीं एकदोन शब्द आपल्या आईशीं बोले, तर पुन्हां पार्श्वनाथ–बाबा काय बोलताहेत, त्याकडे लक्ष देण्याकरितां वळे.

पुरुषोत्तम उभे राहून कंटाळला. हीं मोठी माणसें उगीच रस्त्यांत कां उभीं राहून बोलताहेत. चालत कां नाहींत. असें त्याला वाटत होतें.

प्रेमाच्याकडेवर बसलेली मंदाकिनी, ताईनें आपल्याशीं बोलावें, आपला पापा घ्यावा, आपण ' गोल् गोल् ' म्हणावें, याकरितां तिला आपल्याकडे बघायला लावण्याच्या खटपटींत होती.

डोक्यावर ओझें घेतलेल्या हमालाच्या मानेला रग लागली होती. तो कुरबूर करायला लागला होता. पुष्कळ वेळ तो बोलला नाहीं. पण ओझ्याचा भार जास्त वाटूं लागला तेव्हां नाइलाज होऊन पण आदबीनेंच त्यानें बाबासाहेबांना म्हटलें, " चलतांना रावसाब ! वझं लै झालंया. मान मोडलीया अक्षी !— दुसरं गिऱ्हाईक बी मग गरीबाला गवसायचं न्हायी—"

बाबासाहेबांना आतां आपली चूक लक्षांत आली. " हो, चल बाबा ! आम्हीं गरीब म्हणवतों आणि असा गरिबानांच त्रास देतो. चल-चल " म्हणून–ते चालूं लागले.

पण पार्श्वनाथ त्या मंडळींना आतां चालूं द्यायला तयार नव्हता ! त्यानें बाबासाहेबांना थांबायला सांगितलें. हमालाला सामान खालीं उतरायला सुचविलें, आणि त्यालाच एकादी टॅक्सी आण म्हणून आज्ञा फर्मावली.—

जवळच टॅक्सी स्टॅंड होता. हमालानें पळत जाऊन टॅक्सी आणली. बाबासाहेब ' कशाला रे हें नसतें लचांड ? ' म्हणालेच. पण पार्श्वनाथ त्यांचें ऐकणार थोडाच ! हमालाकडून सामान टॅक्सींत टाकलें. सर्वांनाच बसायला लावलें. मागें, इंदिराबाई, प्रेमा, पुरुषोत्तम आणि बाबासाहेब यांना बसविलें.

आपण पुढें बसला. मंदाकिनी आपल्या आईच्या मांडीवर विराजमान झाली. पार्श्वनाथ पुढें बसला. हमालाची हमाली त्यानेंच चुकती केली. बाबासाहेबांनीं जितकी हमाली ठरविली होती, त्याच्या दुप्पट त्याला सहजच मिळाली. तो ' राम राम ' करीत, हंसऱ्या चेहऱ्यानें पार्श्वनाथाला मनापासून दुवा देत गेला. गरिबांच्या अंतःकरणांतून निघालेल्या अशावेळच्या दुव्याला त्रिभुवनांत मोल नसतें. टॅक्सी चालूं झाली.

मोटारींत बसल्यानें पुरुषोत्तमाला कोण आनंद झाला ! मंदाकिनी तर आईच्या मांडीवर नाचायलाच लागली !

हा पार्श्वनाथ इतक्या सत्कारानें आपल्याला कां वागवतो आहे, याचें इंदिराबाईंना नवलच वाटूं लागलें. त्याच्याबद्दल जास्त चौकशी करावी, म्हणून त्या प्रेमाला विचारून घेण्याकरितां तिच्याकडे वळून पाहूं लागल्या. प्रेमा त्यावेळीं, पार्श्वनाथाच्या चाणाक्षपणाचें, औचित्याचें, आणि आपल्या प्रेमासाठीं, आपल्या साऱ्याच मंडळीवर किती प्रेम करीत आहे, त्या त्याच्या थोर थोर हृदयाचें कौतुक करण्याकरितां, त्याच्याकडे पाहण्यांत तन्मय झाली होती. भान विसरली होती.

खरा आणि सारा प्रकार इंदिराबाईंच्या ध्यानात आला !

आपली प्रेमा सिनेमांत नटी होणार ही ऐकलेली दुष्ट वार्ता त्या एकाच प्रसंगानें, खोटी असल्याचें पण त्यांना लक्षांत यायला वेळ लागला नाहीं.

आतांपर्यंत त्या प्रेमाकडे ज्या निराळ्या नजरेनें पहात होत्या; ती त्यांची दृष्टि क्षणांत बदलली ! त्यांना किती हायसें झालें ! आनंद झाला. नव्या नजरेने त्यांनीं लेकीकडे पाहिलें. तिच्या प्रकृतींत इकडे आल्यापासून किती सुधारणा झाली, ती किती टवटवीत—सतेज दिसते आहे, हे आतां त्यांनीं नीट न्यहाळून पाहिलें !

गाडी चालत असतांना दमल्या भागल्या बाबासाहेबांनाही जरा हुशारी वाटूं लागली. पार्श्वनाथानें त्यांचा असा अनाहूत—अचानक भेट होतांच सन्मानपूर्वक परामर्ष घेतला, त्यामुळे बाबासाहेबांनीं आपल्या सत्‌शिष्याचें कौतुक करीत, त्याला म्हटलें, " पार्श्वनाथ, तूं मोठा झालास, त्याचं आम्हां जुन्या खोडांना अशा रीतीनें वागवून चीज केलेंस—आनंद वाटला ! "

" बाबासाहेब, तसं नाहीं कांहीं ! " जणुं काय आपला बाळपणचा हूड आणि फटकळ स्वभाव आहे तसाच आहे हें दाखविण्याकरितां पार्श्वनाथ त्यांना म्हणाला, " मी इतके दिवस मोठा नव्हतों; पण आपली प्रेमा माझ्याशीं स्वखुषीनें लग्न करायला तयार झाली; तिनं मान्यता दिली, तेव्हां-पासून मी खरा मोठा झालों असें वाटतें खरें ! आणि मला असा मोठा करणाऱ्या जीवाकरितां, त्यांच्या मायेच्या माणसांचा मनापासून परामर्ष घेणें, माझं कर्तव्यच नाहीं का ? होय ना प्रेमा !– मी म्हणतों ते खरें की नाही ? "

" अरेच्या ! असं आहे का ? अरे वाः ! " बाबासाहेब, प्रेमाकडे, इंदिराबाईकडे पहात पहात उद्गारले ! " ठीक ! ठीक ! देवानं आमचं गाऱ्हाणं ऐकलं म्हणायचं ! पार्श्वनाथ, तुम्हीं आमच्या प्रेमाचा स्वीकार करून आम्हांला खरोखरच उपकृत केलेत. आभारी आहें मी !— येतां क्षणीं–वाटेंतच ही अत्यानंदाची वार्ता समजली. धन्य आहे ईश्वरी लीला ! तरीच निघतांना आम्हांला इतके शुभ शकून झाले ते ?— नाहीं ग ?—"

पार्श्वनाथ मनापासून हंसत होता ! प्रेमाच्या वडिलांची सम्मति मिळाली, हें त्याला दुधांत साखर पडल्यासारखेंच वाटलें.

" पण काय ग पोरी–प्रेमा !" बाबासाहेबांनीं जवळ बसलेल्या प्रेमाला विचारलें; " पार्श्वनाथांनीं सांगितलें तें खरें आहे ना ? नाहीं तर तुम्हीं अलिकडच्या पोरी–लग्न नको म्हणायच्या–आणि– "पुढें नटी होण्याकरिता सिनेमात पळायच्या—" वगैरे म्हणणार होते. पण तो आतां प्रश्न उरला आहे कुठे ? असें त्यांचें त्यांनाच वाटून ते पुढें बोललेच नाहींत. नुकतेंच त्यांनीं प्रेमाकडे वात्सल्यपूर्ण नजरेनें पाहिलें.

तिनें लाजून मानेला सुंदरशी वेलांटी दिली ! तोंडाला हातरुमाल लावून आनंद, व्यक्त केला.

गाडी वेगानें धांवत होती. बाबासाहेबांना आणि इंदिराबाईना वाटत असावें, जणुं काय वधुवरांसह आपण लग्नमंडपाकडेच, त्याच्या मस्तकांवर मंगलाक्षताच टाकायला चाललों आहोंत !

× × × ×

" वर्षा माझ्या परवानगीची परवा न करतां निघून गेली. माझ्या प्रेमाची तिला कदर राहिली नाहीं. मला तिनें ओळखलंही नाहीं." नाहीं होय म्हणतां म्हणतां वर्षा माहेरीं कां आणि कशी गेली, हा विषय पांडुआण्णा आणि विश्वास यांच्यामध्ये निघालाच. वर्षाच्या समोर विश्वासने पांडुआण्णांनी विचारलें म्हणून तिच्या सर्व अपराधांचे चुकांचें माप भरपूर तिच्या पदरांत घातलें.

" मान सांगावा जनांत आणि अपमान ठेवावा मनांत " असें म्हणतात त्याप्रमाणें वर्षा गेल्यापासून मी वागतों आहें. मी वर्षाचे अपराध तिच्या पदरांत घातले. तिनें माझा तिच्या बाबतींतला अपराध एकतरी सांगावा ! सांगतेस वर्षा ? ऐकायची माझी तयारी आहे. खरा ठरला, तर मी तुझी क्षमा मागायला तयार आहे !" विश्वास गंभीरपणानें बोलत होता.

वर्षानें, विश्वासच्या प्रतिमेकडे पाहिलें, तिला तो विचित्र प्रसंग आठवला. पण त्या प्रसंगीं विश्वासचा अपराध कांहींच नव्हता. प्रेमाचा तो अपराध होता, हे तिच्या ध्यानांत आलें. मग ती काय बोलणार ?

" प्रेमाबद्दल आणि माझ्याबद्दल शंका घेतलीस वर्षा ? " जरा जास्त अस्वस्थ होऊन, उरलीसुरली तिची शंका होती तीही स्पष्टकरण्याकरितां विश्वास चढत्या आवाजांत म्हणाला, " पण तुझ्या डोक्यात इतकं आलं नाहीं कीं प्रेमा माझी बहिण आहे. तिच्याकडे माझी अमंगल–कामुक–दृष्टी जाईल हे शक्यतरी कसं आहे ? "

" काय म्हणतां ? प्रेमाताई आपली बहिण आहे ?— म्हणजे ?— " पांडुआण्णांनीं मध्येंच पृच्छा केली. ते कोणती ती बहिण हे आठवूं लागले.

" प्रेमाताई माझी मामेबहिण आहे. ती आजारी होती म्हणून आणवली. वर्षानंच तिची शुश्रुषा करून बरी केली.—— "

" मामेबहिण का ? अस्सें ! " पांडुआण्णा म्हणाले; पण त्याक्षणींच त्यांच्या मनांत आलें, " मामेबहिणीशीं देशस्थांत लग्न करतात. तशी शंका वर्षाला येणें साहजिक होतें. आलीही असेल म्हणूनच ती बिथरली असेल. कदाचित् अजूनही तिच्या मनांत तीच भीति असेल ! "

मनांत आलें; पण पांडुआण्णा विश्वासला तें स्पष्ट विचारणार कसें ?

वर्षाच्या मनांत त्यावेळीं नेमका तोच विचार होता. प्रेमा विश्वासची मामेबहिण आहे, हें वर्षाला काय माहित नव्हतें ? " त्याच आधारावर तर प्रेमानें आपल्या प्रतिमेला कवटाळली होती. अगोदर प्रतीमा नी मग प्रत्यक्ष !— म्हणूनच मला शंका आली. राग आला. आपण आगींत तेल ओतलेंत, म्हणून तर मी चालती झाल्यें ! " हें बोलावेसें वर्षाला वाटत होतें; पण त्यानें सर्वच बाबतींत स्पष्ट सांगून निःशंक केल्यावर ती बोलणार काय ?

" मामेबहिणीशीं लग्न करतां येतं ! " असें विचारून खरेंच तसें विश्वासच्या मनांत आलें होतें काय, अजूनही आहे कीं काय, या वेळीं मानभावीपणानें आपल्या तोंडावर साखरपेरणीची सारवासारव करून, पुढें तेंच खरोखर करणार आहे कीं काय विश्वास, हें आपल्यावरून जग पारखणाऱ्या पांडुआण्णांच्या मनांत विश्वासला विचारून त्याही शंकेचें कायम निवारण करून घ्यावें अशी चुटपुट अजूनही होतीच. ते विश्वासला तसें विचारणार—

इतक्यांत टॅक्सी दारांत थांबली. पार्श्वनाथ उडी मारून एकदम आंत आला. विश्वास त्याला दिसतांच, त्याला तो म्हणाला, " आला आहेस का ! तुझ्याकडे कोण मंडळी आली आहेत पहा. "

पाठोपाठ मंदाकिनीला कडेवर घेतलेली प्रेमा आंत आली. तिच्या पाठोपाठ बाबासाहेबही पण आले. इंदिराबाई बाहेरच उभ्या राहिल्या. त्यांना कुठें जायचें हेंच कळेना.

मामा-मामींना पाहून विश्वासला आनंद झाला. तो त्यांचें स्वागत करायला चटकन् उठला. त्याला पाहतांच मंदाकिनीनें ओळखून चटकन् 'नाना' करीत त्याच्याकडे झाप घेतली. त्यानें तिला पटकन् घेतलें.

पार्श्वनाथानें गोट्याला हांक मारून, टॅक्सीतलें पाहुण्यांचें सामान आणायला फर्मावलें. टॅक्सीचें भाडें चुकतें करण्यास, त्याच्या जवळच दिलें.

मामींना विश्वासनें आंत बोलावलें.

विश्वासनें सर्वांची सर्वांशीं ओळख करून दिली.

" ही माझी मामेबहीण प्रेमा ! " विश्वासनें श्वशूरांना सांगितलें.

वर्षाला अचानक पाहून, प्रेमाला काय वाटलें कोण जाणें ! पार्श्वनाथाला मात्र खूप आनंद झाला ! " आलांत वहिनी ? केव्हां ? वाः ! छान ! ऐन

वेळीं आलांत, आनंद आहे !— तुमच्या आईची प्रकृती कशी आहे ? बाकी ज्याअर्थी तुम्हीं येऊं शकलांत त्याअर्थी, चांगलीच असली पाहिजे ! ”

या प्रश्नाला कोण, काय, कसें उत्तर देणार होतें ?

मामेबहीण म्हणून प्रेमाला दाखविल्यावर पांडुआण्णा तिच्याकडे पाहूं लागले ! बाबासाहेब विश्वासला म्हणाले, “ विश्वास ! तुम्हीं तरुण पोरं मोठीं लबाड असतां कीं रे ! पार्श्वनाथासारखा आमच्या प्रेमाला नवरा निवडलास— तिनेंही स्वीकारला—हें आम्हांला तूं कळविलं नाहींस. प्रेमानं लिहिलें नाहीं. काय रे हें ? हें गोड गुपित आम्हीं प्रत्यक्ष येईपर्यंत कळवायचं नव्हतं कीं काय ? बाकी आनद वाटला ! तूं आपलं कर्तव्य सोळा आणे पार पाडलंस ! परमेश्वर तुझं भलं करो ! — ”

ते ऐकून, विश्वास आपल्या मामाकडे, मामीकडे, पार्श्वनाथाकडे आणि प्रेमाकडे आश्चर्यानें पाहातच राहिला !

वर्षा आणि पांडुआण्णांची तीच गत झाली. तेही पाहूं लागले !

पार्श्वनाथ विश्वासला म्हणाला, “ असा पाहतोस काय बावळटासारखा !— तूं आम्हांला मूक संमती दिलीस—प्रेमानें आणि मी—परस्परांचें पाहून घेतलें ! आमचं जुळलं ! लग्नाचं ठरवून टाकलं ! बाबासाहेबांची सम्मती मिळविली. वाटेंतच त्यांना आम्हीं आमचं गुपितं सांगून मोकळे झालों ! ”

पांडुआणाची शंका मनांतल्या मनांतच वितळली !

वर्षाच्या मनांतला काल्पनिक प्रेमाचा कांटा, दूर झाल्याचें तिला कळलें. ती पुरतीच खजिल झाली !

सिनेमा फिल्म कंपनीच्या उद्घाटनसमारंभाला, आपला सारा गोतावळा जमला—त्यांतही वर्षा—आपल्या हृदयांतली प्रेमाची मूर्तिसुद्धां—साराच जमला, त्यामुळें विश्वासला आनंदानें आकाश ठेंगणें झालें !

× × × ×

रात्रीं एकांताच्या वेळीं, विश्वासनें अजून आपल्याशीं अबोलपणा धरला आहे हें पाहून—अर्थात् तो खोटाच होता—तो घालवून, त्यानें आपल्या मोकळेपणाच्या प्रेमानें पहिल्यासारखें बोलावें म्हणून वर्षानें त्याला म्हटलें,

“ मी चुकलें होतें ! — ”

" बरं ! — "

" माझी मला चूक समजली ! "

" ठीक आहे ! "

" मला क्षमा करावी नी माझा स्वीकार करावा ! "

" पुन्हां ? "

" मी परवानगी न घेतां गेले होतें -- "

" हं ऽ ऽ ! "

" मी कित्ती कित्ती त्रास दिला ! — "

" आणि मी मुकाट्यानें तुझा हवा तितका मुका मार सोसला ! "

" मग क्षमा नाहीं का करायची ? "

" तूं आलीस तेव्हांच ती तुला मिळाली आहे ! "

वर्षाला तें ऐकून अति आनंद झाला ! ती फुलून फुलून रडूं लागली ! आनंदाश्रूंनीं तिच्या डोळ्यांत गर्दी केली ! गालावरून गगायमुनांचे पूर वाहूं लागले !

" हें पहा वर्षा ! तुझ्या या अश्रूंचा वर्षाव एकदां थांबव ! पुष्कळ झाला त्याच तुझ्या अश्रूंचा मुका मार आजपर्यंत घेतां घेतां मी बेजार झालों !— यापुढें या घरात रडायचं नसेल, डोळ्यांत पाणी आणायच नसेल, आणि त्या अश्रूंचा मुका मार देत राहून जन्मभर मला छळायचे नसेल, तर--तुला क्षमा आहे, तर या घरांत राहण्याची मुभा आहे--नाहीं तर नाहीं—चले जाव माहेरीं ! -- "

वर्षा मग काय करणार ! भोळी भाबडी पोर ! रडतां रडतां हंसूं लागली—आणि हसतां हंसतां रडूंही लागली ! —

" पुरें कर ! " असें म्हणत विश्वासनें प्रेमभरानें तिला हाताला धरून जवळ ओढलें !

**यत्कृतं यत्करिष्यामि तत्सर्वं न मया कृतम् ।**
**त्वया कृतं तु फलभुक् त्वमेव मधुसूदन ॥**

---

अप्-टू-डेट शिलाई

हेंच आमचें ध्येय !

मेसर्स— पी. बाबूराव आणि कंपनी.

# तयार कपड्यांचे व्यापारी.

बुधवार चौक, टांगास्टॅन्डसमोर, पुणें २

लेटेस्ट डिझाईनच्या कापडाचा

नवीन स्टॉक. एकवेळ

जरूर पहा.

## टीकाकारांना संदेश !

तयार कपड्याबद्दल असमाधान व्यक्त करण्यापूर्वी—

# एकवेळ—

## पेन्टर्स— जी. गेंगजे ॲन्ड को.

( रजिस्टर्ड )

( बुधवार चौक, बंबासमोर पुणें. )

यांचे

# तयार कपडे

वापरून पहा.

लेटेस्ट स्टाईल ! समाधानकारक फिटिंग

न्यू डिझाईनच्या कापडाचा

भरपूर स्टॉक.

तारेचा पत्ता:— Techlab, Bombay.

## — वाळवीचा शत्रु म्हणजेच वुडगार्ड —

ओल, बुरशी, वाळवी व इतर कीड यांनीं लाकूडकाम खाऊन टाकल्यामुळें आपल्या घराचें, लांकडी सामानाचें होणारें नुकसान टाळावयाचें असेल तर—

# वुडगार्ड

## वापरल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

१ वुडगार्ड वापरल्यानें लांकडास नुसती कीड लागत नाहीं इतकेंच नव्हे तर त्याच्या रासायनिक क्रियेमुळें त्याला अधिक बळकटी येते. त्यामुळें त्याचे आयुष्यहि अधिक वाढतें. २ वुडगार्ड साध्या रंगाप्रमाणेंच कुंचलीनें लांकडास लावलें म्हणजे काम भागतें. ३ वुडगार्ड लावल्यानें वरच्या रंगास एक प्रकारचा तुकतुकीतपणा प्राप्त होतो. ४ वुडगार्ड हे द्रव्य पाण्यानें धुवून न जाणारें असल्यानें पुनः लावावे लागत नाहीं.

वुडगार्ड मिळण्याचीं मुख्य ठिकाणें:—

## इंडियन टेक्निकल इंडस्ट्रीज.

ऑफिस: — कमिसारिअट बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई.

कारखाना, शीव, मुंबई नं. २२

Poona Agent:— **L. N. Tol**, Esq 12,
Connaught Road, Poona.

**समाधानः— लग्नसराई आली म्हणूनच सावध असा.**

**सोनें, चांदी व कल्चर मोत्यांचे अलंकार**

# पागनीस पेटकर आणि मंडळी

( प्रार्थना समाजसमोर, गिरगांव मुंबई. )

यांचेकडे खरेदी करणें म्हणजे सावध असणे होय. कारण येथें सर्व माल खात्रीचा असून अगदी योग्य भावांत मिळतो.

हमारे बगीचेमें पैदा हुवा

**फूलराणी ऑईल** REGD

नागी आणि कं. मुंबई नं. ४.

---

**मुंबई, वऱ्हाड-मध्यप्रांत सरकारनें शाळांच्या लायब्ऱ्यांसाठीं मंजूर केलेलें मासिक**

# मन्वन्तर

**सुप्रसिद्ध साहित्यसेवकांच्या खास व्यवस्थेखालीं दरमहा पहिल्या तारखेस नियमित प्रसिद्ध होतें.**

**शिवाय एक खास अंक.**

**किरकोळ अंकास १॥ आणा.**

**वार्षिक वर्गणी ट. ख. सह १ रु.**

**जाहिरात देणारांनीं खालील पत्त्यावर चौकशी करावी.**

**मन्वन्तर कचेरी** C/o हनुमान छापखाना, पुणें २.

## शेंकडा १० टक्के बचत करा !

**रेडीमेड कपडे = साधारण शिलाईचे कपडे**
**हें समीकरण आपल्या मनांतून पूर्णपणें काढून टाका**
**कारण**
**महिंद्रकर ब्रदर्सनीं दिवाळीच्या मुहूर्तावर अप-टु-डेट**

# टेलरिंग डिपार्टमेंट

**सुरू केलें आहे.**

**—: प्रत्यक्ष अनुभव घ्या व खूष व्हा. :—**

या सोईमुळें
कॉलेजातील प्रोफेसर्स, लॉ व इतर कॉलेजातील विद्यार्थी
**कापड पसंत करून व स्वतःचें माप देऊन**
पैशांत बचत करून फॅशनेबल कपडे शिवून घेतात.
**मनपसंत शिलाई होईल याची खात्री बाळगा.**

# महिंद्रकर ब्रदर्स.

**बंबखान्याचे माडीवर बुधवार चौक, पुणें.**

**गिरगांव, मुंबई.**

अत्यंत वक्तशीर सुटणारी

रॉयल मेल कॉन्ट्राक्टर्स

# श्रीलक्ष्मी मोटार सर्व्हिस कोल्हापूर.

कोल्हापूर ते सातारा, पुणें

पुणें ते डायरेक्ट कोल्हापूर

कोल्हापूर ते रत्नागिरी.

बेळगांव, धारवाड, हुबळी, गदग, कारवार.

आजरें, सावंतवाडी, वेंगुर्लें.

तसेंच रिटर्न गाड्याही सुटतात.

तरी ह्या कंपनीच्या सुखकर प्रवासाचा फायदा
गरजू अवश्य घेतील अशी उमेद आहे.

मॅनेजरः— श्रीलक्ष्मी मोटार कंपनी,

कोल्हापूर.

"लेव्हलिंग" वरचें मराठी पुस्तक

## "निरीक्षकाचें निरीक्षण"

मिळण्याचें ठिकाणः— केशव रामचंद्र काळे, टेलर.
कुंटेवाडा, सांगली. (S. M. C.)

# —: सांडू ब्रदर्स :—

कुमारी आसव नं. २— मुलांचे सर्व विकार दूर करून त्यांना बंडखोर बनविणें. अभ्रक ( सहस्रपुटी ):— क्षयाच्या कोणत्याही अवस्थेवर लक्ष्मी-विकासः- धातुक्षीणता, नपुसंकत्व यांवर. गार्भिणी-गर्भ-रक्षकः- गरोदर स्त्री व गर्भ यांना पोषक.

## दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स.

टिकाऊ तयार काढ्यांचे आद्य प्रवर्तक

## चेंबूर ] आर्यौषधी दवाखाना [ मुंबई

मुख्य दुकानः— ठाकुरद्वार मुंबई नं. २.

शाखा नं. १:— पोयबावडी-परेळ-मुंबई नं. १२.

शाखा नं. २:— लेडी जमशेटजी रोड-दादर मुंबई नं. १४.


पुणें एजंटः— ठाकूर देसाई आणि कंपनी.

दृष्टीमुळेंच सृष्टि

आयुष्य समाधानकारक घालविण्यासाठीं नजर साफ लागते. कोणत्याही कारणामुळें तुमच्या डोळ्यांस त्रास होत असेल तर—

सर्वांच्या खात्रीचे आणि विश्वासु

# चष्म्याचे व्यापारी



## आर. एन्. शिंदे ॲण्ड सन्स्

यांच्या येथें डोळ्यांच्या हॉस्पिटलमध्यें काम करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून घ्या.

**उत्तम माल व माफक दर**

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांस भरपूर सवलत.

[ १ ] २०७ गिरगांव रोड.

[ २ ] चमारबाग, पोयबावडी मुंबई नं. १२.

[ ३ ] रानडे रोड दादर मुंबई नं. १४.

[ ४ ] शिवाजी चौक, कल्याण.